म. ग्रं. सं. ठाणे

विषय

सन

लेखक

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

(भू-प्रवास)

पा ठ

# अनुक्रमणिका

## खंड पहिलें.

### स्थावरजंगम विद्या किंवा सृष्टींतील राष्ट्रें


| | | | |
|---|---|---|---|
| पहिला. | | सृष्टराष्ट्रांविषयीं प्रस्तावना | १ |
| दुसरा. | भाग १ | धातुजाती. दगड आणि माती | २ |
| तिसरा. | ,, | ,, दाह्यखनिजपदार्थ, मोलवान पाषाण व धातू | १० |
| चवथा. | भाग २ | मूळजाती. रोप्यांचें वर्णन. (बीज, मूळ) | १९ |
| पांचवा | ,, | ,, रोप्यांचें वर्णन. (देंट) | २३ |
| साहावा. | ,, | ,, रोप्यांचें वर्णन. (पान) | ३२ |
| पुढें चालू | ,, | ,, रोप्यांचें वर्णन. (फूल इत्यादि) | ३६ |
| सातवा. | भाग ३ | जीवजाती. प्राण्यांची साधारण रचना | ४४ |
| आठवा | ,, | ,, प्राण्यांचें आच्छादन | ४९ |
| नववा. | ,, | ,, प्राण्यांच्या संरक्षणार्थ केलेलें साधन | ५० |
| दाहावा. | ,, | ,, पक्ष्यांची प्रेरणा | ५५ |
| अकरावा | ,, | ,, उरःसर, मत्स्य आणि मगर | ५७ |
| बारावा. | ,, | ,, कीटक, कोळी इत्यादि | ६० |
| तेरावा. | | सृष्टीचा निर्माण कर्ता ईश्वर | ६८ |


## खंड दुसरें.

### भाग १ वर्णनात्मक भूगोलविद्या.


| | | | |
|---|---|---|---|
| पहिला. | ,, | ब्रिटिश बेटें | ७३ |
| दुसरा. | ,, | इंग्लंड आणि वेल्स | ७९ |

पाठ पृष्ठ
तिसरा ,, स्कॉटलंड ........... ८६
चौथा. ,, फ्रान्स ........... ९२
पांचवा. ,, बेलजीयम ........... ९७
सहावा ,, हालंड ........... १००
सातवा. ,, डेनमार्क व त्याच्या ताब्यांतील संस्थानें १०२
आठवा. ,, नार्वे, स्विडन आणि ल्यापूलंड . १०७
नववा. ,, रशिया ........... ११४
दाहावा. ,, पीटरधिग्रेट ........... ११८
अकरावा ,, जर्मनी ........... १२२
बारावा ,, स्विटसरलंड ........... १२९
तेरावा. ,, इटाली ........... १३४
चौदावा ,, स्पेन ........... १४०
पंधरावा. ,, पोर्तुगल ........... १४५
सोळावा. ,, ग्रीस ........... १४९
सतरावा. ,, टर्की ........... १५३
भाग २ एशिया खंड
अठरावा. ,, प्यालेस्टैन आणि सीरिया ........ १५७
एकुणिसावा. ,, अर्बस्थान ........... १६३
विसावा. ,, हिंदुस्थान ........... १६८
एकविसावा. ,, चीन ........... १७४
भाग ३ अफ्रिका
बेविसावा. ,, मिसरदेश ........... १७९
तेविसावा. ,, मध्य व दक्षिण अफ्रिकेविषयीं संक्षिप्त वर्णन ........... १८४
भाग ४ अमेरिका.
चोविसावा ,, उत्तरअमेरिकेविषयीं संक्षिप्त वर्णन .. १९०
पंचविसावा ,, उत्तरअमेरिकेंतील इंडियन लोक .. १९६
सव्विसावा ,, वेस्टइंडीझ् ........... १९६
सत्ताविसावा. ,, दक्षिण अमेरिका भाग १ ...... २०१
,, ,, ल्यानाझ, किंवा दक्षिण अमेरिकेंतील मैदानें भाग २ ........... २०७

पाठ पृष्ठ
,, ,, ओरिनोकोची रचना . .. .. .. .. . . .. २०९
अठ्ठाविसावा ,, गायना . . . . . .. . . . . . . २१२
एकुणतिसावा ,, न्यूहालंड . . .. . . .. . .. . .. . . . २१५
तिसावा ,, न्यूझीलंड . .. . . . . . . .. ..२२२

कवितासंबंधी वेंचे.

तुझें नाम धन्य असो ·· . . . . . . . . . . . . . १९
ईश्वराचीसर्वव्यापकता . . .. .. . . . . .. . . . [illegible]२
वेंचे . . . . . . . . . . . . . हार्डिसवमिलटन कृत. ६६
कीटकांची रचना . . . . . ० . . .. . .. . . . . ६७
सृष्टीचा निर्माण कर्ता ईश्वर. ( पाठ तेरावा ) .. . . . . ६८
एक कल्पित गोष्ट ·· . . . . . . . . . . . .. . . . ६९
प्राण्यांवर क्रूरता .. . . . . . . . . . . .. . . . . .७०
पृथ्वी पर्यटन . .. . . . . . . . . . . .. . . . . ..२२४

## परिशिष्ट.

या पुस्तकांतील कठिण शब्दांचा

## कोश.

# PREFACE.

When the Book, of which the following is the translation, was introduced, and put into the hands of my pupils, they began to complain that it was very hard and difficult for them; and therefore requested me to prepare a translation of it. At first, I did not comply with their wishes, being engaged in some urgent private business. But after a time, having observed that they did not make any rapid progress, I became of opinion that it was not owing to carelessness and indifference but rather because the Book was difficult for them. Thus I was at last induced to write the present translation which I intended to circulate in manuscript among the boys; but I was very hard pressed by my friends and pupils to publish it. The latter thought of making copies of it for themselves, but this would have been no easy task. I therefore issued a number of Copies in the form in which it is now seen. The following few pages were written merely with the view of helping boys beginning to learn the Fourth Book. In doing so it was not my object to compose a Marathi Work; for had that beenmy ambition, I would not have translated a book, but composed one according to the Marathi Idioms. It will be found in some places that I deviate from the Marathi Idioms as my chief object is to acquaint boys with the construction of the English language through the medium of the Marathi and not to compose a Marathi treatise. I have translated the Book, for the most part, without leaving the Marathi Idioms in accordance with the strict letter of the English language, in order that the construction of the English language may be seen in and through such a translation and be pressed on the minds of beginners. Had I translated it according to the Idioms of the Marathi language and put it into the hands of such persons, I should have been doing them great harm, as I should have been the means of introducing them into the habit of laxity of style and expression, which all know is a great defect. Had the Book been written for men, it would have mattered very little, had I followed the Marathi Idioms; but as it is composed solely for the use of boys, I have constantly kept a double object in view, viz- as I said above, to acquaint them with the construction of the English language through such a translation and to prevent

laxity of style and expression. The above will be a sufficient apology, I trust, for the language and style of the book.

I tried my best in finding appropriate Marathi equivalents for some of the English words which occur; but not having been able to procure them in some instances I have Marath[illegible]d them, for which I hope to be excused. It will be the business of the masters to inform thier pupils, if they know of any.

I have translated the Poetical pieces which occur in these sections except the last into Marathi Prose, because it is very difficult to keep up the pathos and enthusiasm which a poet exhibits in his own language in a versified form. It has been the fashion for a long time to omit the translation of Poetical peices, but my object in translating them is that, by means of the version, the boys may be enabled the better to commit the pieces to memory-a good exercise required at many Schools.

The plan of the book, of which the following is the translation, is a very scientific one, and worthy the attention of the public. It begins in the first Section with an introduction to the three Kingdoms in Nature, and then, proceeds to treat each of them separately. In the Second, it goes on to treat of descriptive Geography-that is geography describing the position of each country, its political divisions and establishments, the manners and costoms of the people, and the forms of religion that prevail in different states. It is this, I think, that must have induced the Director of Public Instruction to approve of the Series of Irish Books aud to introduce there in all the government Schools. I have, threfore, written the following few pages in order to facilitate the study of the Irish Fourth Book. It is hoped that this will serve as an adequate guide for them. I conclude with the earnest prayer that the Book may be useful in the diffusion of scientific and geographical knowledge in countries where the Marathi language predominates.

Bombay
October 1858. } WISHWANATH JUGONNATHJEE.

ASSISTANT-MASTER.

# प्रस्तावना.

ज्या पुस्तकाचें पुढील भाषांतर आहे तें जेव्हां शाळेंत सुरू करून माझ्या शिष्यांच्या हातीं दिलें तेव्हां तें आपणास फार कठिण व अवघड आहे असें ते गाऱ्हाणें गाऊं लागले, ह्मणून त्याचें भाषांतर तयार करण्यास त्यांनीं मला विनंती केली. प्रथमतः मी कांहीं जरुरीच्या घरगुती कामांत गुंतल्यामुळें त्यांच्या इच्छेप्रमाणें केलें नाहीं. परंतु कांहीं वेळानंतर माझ्या दृष्टोत्पत्तीस असें आलें कीं त्यांच्यानें जलद अभ्यास करवत नाहीं त्यावेळीं मला वाटलें कीं ते निष्काळजी व दुर्लक्षामुळें करीत नाहींत असें नाहीं, तर तें पुस्तक त्यांस कांहींसें अवघड पडतें. ह्यावरून माझी शेवटीं सांप्रतचें भाषांतर लिहिण्यास प्रवृत्ति झाली. तें हातचें लिहिलेलें मुलांमध्यें फिरवावें, असा माझा इरादा होता, व त्याच्या प्रती कराव्या असें शिष्य मंडळीस वाटलें, परंतु हें काम सोपें नाहीं, ह्मणून माझ्या मित्रांनीं व शिष्यांनीं मला तें छापविण्याविषयीं फार आग्रह केल्यावरून सांप्रतच्या आकाराच्या प्रती काढविल्या आहेत. हीं पुढील थोडीं पृष्ठें चौथें पुस्तक शिकणाऱ्यां मुलांस मदत व्हावी या हेतूनें लिहिलीं आहेत. असें करण्यामध्यें मराठी ग्रंथ रचावा असा माझा अभिप्राय नव्हता. जर तो माझा उद्देश असता तर मीं एकाद्या पु-

स्तकाचें भाषांतर केलें नसतें, परंतु मराठी भाषेच्या प-द्धती प्रमाणें ग्रंथ रचिला असता. माझा मुख्य उद्देश मुलांस मराठी भाषेच्या योगेंकरून इंग्रेजी भाषेचें ज्ञान व्हावें असा आहे व मराठी ग्रंथ करण्याचा नाहीं. या-स्तव कितीएक ठिकाणीं असें आढळेल मराठी भाषेची पद्धत सुटलेली आहे. मुळारंभीं शिकणाऱ्यांस अशा भा-षांतरामधून इंग्रेजी भाषेची पद्धत समजावी वत्यांच्या मनीं बिंबावी ह्मणून मी बहुतकरून मराठी पद्धत न सोडतां,इंग्रे-जी भाषेचें शब्दशः भाषांतर केलें आहे. जर मी तें मराठी-च्या पद्धतीप्रमाणेंच केलें असतें आणि अशा मुलांच्या हातीं दिलें असतें तर मोठाच अपराध केला असता, का-रण मी त्यांस पाहिजे तसें लिहिण्याची व रचनेची सवय लावण्यास कारण भूत झालों असतों-ही सवय मोठा दोष आहे असें सर्व जाणतात. जर हें पुस्तक मोठ्या लोकांकरितां लिहिलें असतें तर मराठी पद्ध-तीप्रमाणें केल्यास चिंता नव्हती. परंतु ज्या अर्थी मु-लांच्याच उपयोगाकरितां केलें आहे त्या अर्थी मी वर सांगितल्याप्रमाणें आपल्या मनांत दुहेरी उद्देश रा-खिला होता ह्मणजे त्यांस अशा तर्जुम्यामुळें इंग्रेजी भाषेची पद्धत समजावी व शब्दरचनेच्या व प्रयोगा-च्या मोकळेपणाची सवय लागूं नये. यावरून मला वाटतें कीं वरील सांगितलेले पुस्तकाच्या भाषेविषयीं व प-द्धतीविषयीं कोणी दोष काढणार नाहीं.

त्यांत जे इंग्रेजी शब्द आढळतात त्यांतील कि-तीएकांचे योग्य मराठी शब्द शोधून काढण्यास्तव मी पुष्क-ळ उपाय केले, परंतु कितीएक न मिळाल्यामुळें मी

मराठी शब्दांप्रमाणें योजले ह्मणून मला क्षमा असावी. जर कोणा शिक्षकांस त्यांतील कितीएक माहित असले तर त्यांनीं आपल्या शिष्यांस सांगावे हा त्यांचा धर्म आहे.

दोन खंडांत ज्या कविता आढळतात (शेवटली खेरिज करून) त्यांचें मी वाक्य रूपानें भाषांतर केलें आहे, कारण कवी आपल्या भाषेंत कवितेच्या रूपानें जो करुणारस व अनुराग प्रगट करितो तो दुसऱ्या भाषेचा कवितेंत आणणें फार कठिण आहे. फार दिवसांपासून कवितांचें भाषांतर करणें सोडून देत असत, परंतु त्यांचें भाषांतर करण्याचा माझा इरादा इतकाच कीं तेणेंकरून मुलांस लवकर त्या पाठ व्हाव्या—ही उपयुक्त चाल पुष्कळ शाळेंत आहे.

ज्या पुस्तकाचें पुढील भाषांतर आहे त्याचा क्रम फार शास्त्रविषयक आहे व सर्व लोकांस लक्ष लावण्याजोगा आहे, तो येणेंप्रमाणें—प्रथम खंडांत ज्यास सृष्टींतील राष्ट्रं ह्मणतात त्यांची प्रस्तावना, व पुढें त्यांतून प्रत्येक जातीचें वर्णन निरनिराळ्या प्रकारें आहे. दुसऱ्या खंडांत वर्णनीय भूगोलविद्येविषयीं वृत्तांत ह्मणजे प्रत्येक देशाचें स्थान, त्यांतील राज्यसंबंधीं भाग व कारखाने, तेथील लोकांच्या रीती भाती व निरनिराळ्या संस्थानांमध्यें धर्माचे प्रकार ह्यांविषयींची भूगोलविद्या आहे. मला वाटतें कीं ह्याच कारणावरून विद्याखात्याचे अधिकाऱ्यांस हीं पुस्तकें बरीं वाटून त्यांनीं तीं सरकारी शाळेंत सुरू केलीं. चौथ्या पुस्तकाचा अभ्यास सुलभ पडावा ह्मणून मीं पुढील थोडें

पृष्ठें लिहिलीं आहेत. माझी अशी आशा आहे कीं हें शिकणाऱ्यांस पुढेंपणीं वाट दाखविणारें होईल. हें पुस्तक ज्या देशांत मराठी भाषा चालते त्या ठिकाणीं शास्त्रीय व भूगोलसंबंधीं ज्ञानाचा प्रसार करण्यास उपयोगीं पडावें अशी माझी ईश्वराकडे प्रार्थना आहे.

# खंड पहिलें.

## स्थावर जंगम किंवा सृष्टींतील राष्ट्रें.

### पाठ पहिला.

#### सृष्ट राष्ट्रांविषयीं प्रस्तावना.

आपणास आपल्या पृथ्वीसंबंधी जीं कृत्यें माहित आहेत त्यां सर्वांच्या तीन जाती केल्या आहेत त्यांस सृष्टींतील राष्ट्रें किंवा सृष्टराष्ट्रें असें ह्मणतात; कारण राजाच्या हुकुमानें कायदे लिहून व स्थापून जसीं मनुष्यांमध्यें राज्यें चालतात त्याचप्रमाणें ईश्वराच्या कृपेनें प्रत्येक राष्ट्र अमुक कायदे किंवा नियम याखालीं असल्यामुळें त्याची व्यवस्था चांगली होत्ये.

ह्यांतील पहिल्या राष्ट्रास धातुजाती ह्मणतात त्यांत ज्यां पदार्थांस जीव नाहीं, उदाहरण माती व पाषाण; ते जेव्हां, वाढतात, तेव्हां वनस्पती व प्राणिमात्राप्रमाणें आपल्यामध्यें पदार्थ घेऊन वाढत नाहींत परंतु पदार्थ त्यांजवर बाहेरून जडल्यामुळें ते वाढतात.

दुसऱ्या राष्ट्रास वनस्पति जाती ह्मणतात. त्यामध्यें पृथ्वी वरील जीं सर्व. उत्पन्नें राहातात व वाढतात तीं आहेत. परंतु ते अचेतन आहेत; ह्मणजे ज्यांस चेतना नाहीं, जें झाड उंच आकाशांत वाढत जा-

तें तसेंच ज्याच्या पायापाशीं नीळ वाढते तीं ह्या वनस्पतीमध्यें आहेत.

तिसरी जीवजाती होय. ह्यांत सर्व जीवंत वस्तू आहेत, ह्मणजे जे रहातात, वाढतात व ज्यांस स्पर्शज्ञान होतें. उदाहरण, मनुष्य, पशू, पक्षी, मासे, कीटक इत्यादि.

# भागपहिला-धातुजाती.

## पाठ दुसरा.

### दगड आणि माती.

दगड, माती व धातू ह्यांस खनिज पदा[illegible]त. दगड व माती भूगोलाच्या बाहेरील बाजूचे किंवा पापोद्र्याचे भाग आहेत व जे प्रकाशित पदार्थ त्यांत गाडलेले किंवा त्यांतील शिरा व फटींमध्यें भरलेले आपणास आढळतात ते धातू होत. ह्या खडकाच्या स्थितीचे व कालगतीने त्यांजवर जे फेरफार घडतात त्यांचे ज्ञानास भूगर्भ विद्या ह्मणतात.

जे खडक दुसऱ्या खडकाखालीं असल्यामुळें फार जुने असे मानलेले आहेत ते, डबलीनचे आसपास जे सुंदर चकचकीत ग्रानीटचे ढीग पडलेले दिसतात व जे घरें बांधण्यांस किंवा रस्त्यांची फरसबंदी करण्याकरितां काढतात त्यांप्रमाणें प्रकृतीने एकाप्रकारचे व एकसारखे आहेत.

ज्यां खडकांस दुसऱ्यापेक्षां वर असल्यामुळें फारच नवीन ( हल्ली झालेले ) मानितात, त्यांमध्यें थर

( पडदे ) पुष्कळ फूट खोल असतात. ते मातीं दगड व फुटक्या शिंप्याचे बनत असतां काळाच्या क्रमानें ज्या वनस्पती व प्राणी मेले त्यांचे शेष त्यांत आहेत. हे वनस्पतीचे व प्राण्याचे शेष जरी आतां दगड झाले आहेत तरी त्यांचा आकार तसाच आहे व ते सहज ओळखतां येतात; त्यांस उपधातू असें ह्मणतात.

आपल्या गोलावर धातुमय उत्पन्न फार आहे. त्यांतून कित्येक अनेक जातींच्या मृतिकेच्या स्थितींत व दुसरे, स्लेट आणि संगमरवरी दगड इत्यादिकांसारिखे भरींव स्थितींत सांपडतात. दुसरे धातू होत, उदाहरण सुवर्ण, रौप्य, लोह इत्यादि. तुला धातुमय सृष्टीचें महत्व काय आहे हें समजावें ह्मणून मी या प्रत्येक जातींतून थोडक्याचें वर्णन करितों.

खनिज उत्पन्नापैकीं चिकण माती किमपि सुंदर नसून अतिशय उपयोगी आहे. ती माती सर्व मातीप्रमाणें किती एक खडक झिजल्यानें झालेली आहे, व ती पृथ्वीच्या प्रत्येक भागांत सांपडते. ती बहुधा अंधुक अस्मानी, लाल, किंवा पिंवळ्या रंगाची असते; परंतु कोठें कोठें स्वच्छ पांढऱ्या रंगाची आढळते.

चिकण माती चिकट असून ती प्रसारणीय आहे ह्मणजे ती एकत्र जमते ह्मणून पाहिजे तशी पसरतां किंवा वळवितां येते. तिच्या निखालस कणामध्यें अंतर नाहीं ह्मणून ती पाणी धरते. पृथ्वीमध्यें

चिकण मातीचे थर किंवा गुहा यामुळें स्वाभाविक विहिरी किंवा पाण्याचे हौद झाले आहेत. असा सृष्टि-नियम पाहून आपण आपल्या तळ्यांत व नळांत पाणी जिरूं नये ह्मणून चिकण मातीनें गिलावा करितों. आपण झोंपड्याच्या भिंती बांधण्याकरितां चिकण माती लावितों. ती अधिक मजबूत व्हावी ह्मणून तीमध्यें पहिल्यानें पेंढा कापून मिश्र करितों.

उष्णतेजवळ ठेविल्यानें चिकणमाती टणक होते ह्मणून तिचा, विटा व सर्व प्रकारचीं भांडी करण्यांत उपयोग करितात. विटा करण्याकरितां रेतीने मिश्र असी साधारण प्रकारची चिकण माती खणून बरीच मळल्यावर योग्य आकाराच्या साच्यांत घालून सुकवायास रांगीनें ठेवितात. मग त्या उपयोगास पडत इतक्या कठिण होईपर्यंत भट्टांत भाजतात किंवा जाळतात तीस आवा ह्मणतात.

विटा करण्याची कृति पृथ्वीवर फार प्राचीन काळापासून माहित होती असें दिसतें. धर्मपुस्तकामध्यें बेबलचा बुरुज बांधण्याच्या वृत्तांतांत याविषयीं सांगितलें आहे आणि इस्राएल लोक मिश्र देशांत बंदींत होते त्यावेळीं तेथील लोक विटांचा उपयोग करीत आणि त्या त्यांकडून करवून घेत. ह्या विटा उन्हामध्यें सुकविल्या असाव्या व भाजलेल्या नसाव्या कांकीं त्यामध्यें पेंढा मिळविलेला होता असें आढळतें; जर त्या विटा जाळल्या असत्या तर तो जळून गेला असता.

इस्राएल लोकांवर मिश्र देशांतील त्यांच्या धन्यांनीं

त्यांला सक्त मजुरीस लाविलें होतें, त्यांत हें ही सांगतात कीं ज्या विटा ते करीत त्यांकरितां पेंढा त्यांसच जमा करावा लागे, आणि हें सर्व कृत्य मिश्रदेशांतील कडकडीत उन्हामध्यें होत असे, इंग्लंड आणि ऐयर्लंड ह्यामध्यें चिकणमातीच्या जमीनीचे मोठे विस्तीर्ण प्रदेश आहेत आणि विटा करणारांस ते कितीही उपयोगी असले तथापि धान्य पिकण्यासारिखे करण्यास, नागरण्यास चर पाडण्यास, आणि खणण्यास तसेंच तऱ्हतऱ्हेचे उपाय योजण्यास शेतकऱ्यांस फार श्रम होतो. चांगल्या प्रकारच्या चिकणमातीची भांडीं करितात.

मातीची स्लेट (पाटी) ह्या उपयोगी खनिज पदार्थाचे नमुने, ज्या पाट्यांवर तुह्मी लिहितां व जाड्या प्रकारच्या ज्या घराच्या छपरावर घालण्यास लावितात ते आहेत.

आपले बहुतेक डोंगर विशेषेंकरून इंग्लंडाच्या वायव्येकडील पर्वत मुख्यत्वेंकरून स्लेटीचे आहेत. त्यांस पत्रे होण्याचा कल असतो आणि संस्कृतामध्यें पत्र याचा अर्थ पान असा आहे. ह्मणून त्यास पत्रेदार असें ह्मणतात.

ज्या स्लेटींची लिहिण्याकरितां योजना केली असते त्या चांगल्या खुमाशीच्या व काळ्या रंगाच्या निवडून काढतात, परंतु त्या उपयोगाकरितां योग्य होण्यापूर्वी त्यावर गुळगुळीत व साफ करण्याची कृती करावी लागते. कधीं कधीं स्लेटी इतक्या मोठ्या व जाड सांपडतात कीं कबरींचे दगड, धुरांड्याचे भाग व फर-

सबंदी करण्यांत त्यांचा उपयोग करितात.

पृथ्वीवर चुना पुष्कळ आहे तो बहुधा ज्यास कारबॉनीक आसिड ह्मणतात त्या पदार्थाबरोबर मिश्र झालेला आढळतो व पृथ्वीवर खडकांत पुष्कळ प्रकारचा दिसतो.

पृथ्वीच्या सर्व भागांत मोठे चुनखड्याचे खडक व डोंगर आढळतात. कधींकधीं चुनखडा, रस्त्यावर जी खडी फोडून पसरतात त्याप्रमाणें काळा असतो; कितीएक ठिकाणीं पांढरा व सुंदर खुमासीचा असतो तेव्हां त्यास संगमरवरी दगड ह्मणतात, तो कापून साफ केल्यावर पुतळे, धुरांड्याचे भाग इत्यादि करण्यास लावतात.

खडू हा चुनखड्याचा दुसरा प्रकार आहे.

खडू हा मृदु फुसफुशीत दगड बहुतकरून काळ्या फळ्यांवर चित्रें काढण्यास किंवा आंकडे मांडण्यास लावतात, परंतु इंग्लंडामध्यें त्या देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत खडूचे थर आहेत व कोठें कोठें टेकऱ्याप्रमाणें उंच गेलेले आहेत, कोठेंकोठें कडे फुटलेले आहेत व कोठेंकोठें खाडे किंवा खिंडी पडल्या आहेत. लंडन शहर चिकणमाती व रेती ह्यांच्या थरावर बांधलें आहे. त्यांहींकरून कालक्रमानें खडूमधील ह्या खाड्यांतील एक भेग भरली आहे व ह्या थरांतून फार खोल विहिरीकरितां खणिलें असतां तुह्मास तो खडू लागेल.

इंग्लंडचा दक्षिण व नैर्ऋत्य किनाऱ्यावरील भाग

मोठ्या खडूच्या कड्यानें समुद्रापासून राखला आहे ते कडे आपल्या पांढरेपणामुळें दिपवून टाकितात, व जेव्हां हिरव्या झाडींनें व वेलींनें थोडेथोडे आच्छादिले असतात तेव्हां ते फार सुंदर दिसतात.

ऐयर्लंडमध्यें खडूचा एकच थर आहे; व स्कॉटलंडमध्यें निखालस नाहीं; परंतु तो फ्रान्सदेशाच्या समोरील किनाऱ्यावर व युरोपखंडाच्या पुष्कळ भागांत आढळतो.

खडू फुटलेल्या शिंप्याचा मुख्यत्वेंकरून झाला आहे, त्या शिंप्या चुन्यापासून होतात. मागील काळाच्या पुष्कळ शिंप्या व पोंवळीं हे शेषहि खडूमध्यें अगदीं जसेचेतसे व चमत्कारिक आकाराचे मोठे गारीचे दगड जे निरनिराळ्या कामास लावितात तेही आढळतात. चुन्याचा दुसरा प्रकार आहे त्यास जिबसम ह्मणतात; तो सुंदर प्रकारें पांढरा असून खडूप्रमाणेंच बहुतकरून दिसतो. त्याचें "प्ल्यास्टर आफ् प्यारिस" करितात. त्याच्या ज्या सुंदर लहान पांढऱ्या बाहुल्या रस्त्यांतून मुलांच्या डोक्यावरून विकण्याकरितां नेतांना तुह्मी पहातां त्या करितात. ह्याच जातीचा आलाबास्टर ह्मणून एक पदार्थ आहे. इतकेच कीं तो अर्ध पारदर्शक आहे.

परंतु चुना जसा उपयोगी आहे तसाच सुंदरहि आहे, तो, चुनखडा मोठ्या आव्यांत किंवा भट्टींत जाळण्यानें त्यापासून स्वच्छ स्थितींत प्राप्त होतो मग त्यास कळीचा चुना ह्मणतात; व इमारती बांधण्याकरितां खरची चुना करण्यांत त्याचा उपयोग करितात. त्याचा खरची चुना करण्याकरितां त्याजवर एक कुंडी

घडते त्यास उमळणे ह्मणतात, व त्यापासून वाफा निघतात त्या डोळ्यास इजा करितात ह्मणून जरी भयंकर आहेत तरी हें पाहाण्यास मोठें चमत्कारिक आहे. त्या कळीच्या चुन्याचा ढीग करून त्यावर थंड पाणी ओततात तेव्हां जबरदस्त गरमी उत्पन्न होऊन तो फुगून त्याची भुकी होते, ही रेती बरोबर मिश्र करून खळ बनावितात त्यास खरची चुना ह्मणतात. चुन्याचा साखर साफ करण्यांत, साबू करण्यांत व दुसऱ्या कामांत ही उपयोग करितात.

गार (चकमक) ही खडूच्या थरांत आबडधोबड आकाराचे काळ्या गोळ्यांत आढळते असें पूर्वी सांगितलें आहेच. ती काचमणीप्रमाणेंच आहे, तो काचमणी कठीण नाजूक पांढरा खडक कधीं कधीं अर्धपारदर्शक असतो तेव्हां त्यास बिलोरी असें ह्मणतात, परंतु ती बहुतकरून दुसऱ्या वस्तूंबरोबर मिश्र झालेली असते उदाहरण ग्रानीट; त्यांत ती फेलस्पार व चकचकीत अभ्रक ह्याबरोबर मिश्र असी तुह्माला दिसेल.

गार इतकी कठीण आहे कीं ती लोखंडावर मारिली असतां ती मधून विस्तवाच्या थिगळ्या निघतात आणि जरी विस्तव पाडण्याची ही रीति आहे असें ह्मणतात तरी बहुतकरून ती आतां निरुपयोगी झाली आहे. कारण तयार केलेली सणकांडी फारच स्वस्त मिळतात, परंतु बंदुकीमध्यें तिच्यापासून थिगळ्या पाडण्याकरितां तिचा अद्यापि उपयोग करितात.

गारीचा दुसरे निराळे कारणाकरितां ह्मणजे कांच करण्यांत उपयोग करितात. गारा लाल तापवून थंड पा-

ण्यांत टाकितात तेव्हां त्या पांढऱ्या आणि फुसफुशीत हो- ऊन त्यांची सहज बारीक भुकी करितां येते. तीं क्षार अथवा पापडखाराबरोबर मिश्र करून वितळवितात.

बारीक जातीचे पांढरे रेतीचा उत्तम कांच कर- ण्यांत आणि जाड्या प्रकारची रेतीचा हिरव्या सिस्या- ची कांच करण्यांत उपयोग करितात. रेती ही गार अथवा दगड यांचे खडक फुटून पुष्कळ युगेंपर्यंत ए- कमेकांवर पाण्याच्या प्रवाहानें व आपटण्यानें घांसून होते. खडकाचा नरम पदार्थ झिजण्यानें तर चिखल अथवा माती होत्ये. ज्याविषयीं आपण वाचीत असतों ते समुद्राच्या किनाऱ्यावरील रेतीचे विस्तीर्ण प्रदेश आणि रेतीचीं मोठीं मैदानें ह्या प्रकारें झालीं असावीं.

अभ्रक,— जीं सुंदर लहान रुपेरी खवलें तुह्माला डब्लीनच्या आसपास दगडामध्यें सांपडतात तीं अभ्र- काचीं भिंगें आहेत. हा पारदर्शक पदार्थ आहे; आणि रशियामध्यें जेथें त्याचे मोठे पातळ पत्रे सांपडता- त तेथें ते खिडक्याच्या कांचांचें काम बजावितात.

मीठ—साधें मीठ हें दैववशेंकरून पुष्कळ सांपडतें ह्मणून साधारण हें नाव योग्य आहे. तें समुद्रामध्यें आणि पृथ्वीच्या खालीं खडकामध्यें सांपडतें. शेंदेलोण इंग्लन्डमध्येंच शाइर प्रदेशांत मात्र पुष्कळ सांपडतें. पो- लन्डमध्यें आणि दुसऱ्या जागेमध्यें देखील मिठाच्या मोठ्या आणि सुंदर खाणी आहेत. मीठ हें समुद्रां- तून पुष्कळ पाणी घेवून काढवितात ह्मणजे तें उष्ण करून त्याची वाफ करितात; मग मीठ जें त्या-

मध्यें मिश्र किंवा वितुळलेलें असतें तें खालीं बसून सुकें रहातें.

सोराखार किंवा सूर्याखार कांहीं देशामध्यें पांढऱ्या धुकंयाप्रमाणें पृथ्वीच्या सपाटीवर सांपडतो. याचा कला कौशल्यामध्यें, मुख्यत्वेंकरून बंदुकीची दारू करण्यांत उपयोग करितात. हा खार कधीं कधीं मिठाबरोबर मिश्र करून मांस टिकण्याकरितां त्यास लावितात, तेणेंकरून त्यास तांबडा रंग येतो.

## पाठ तिसरा.

### दाह्य खनिजपदार्थ, मोलवान् पाषाण व धातू.

खनिज पदार्थांचा एक भाग आहे त्यास दाह्य पदार्थ असें ह्मणतात कारण कीं त्याचा सर्व किंवा थोडा भाग विस्तवाचेयोगानें जळला जातो. त्यांतून अति उपयोगी असा खनिज कोळसा होय, तो जरी वनस्पतीपासून झालेला आहे तरी पृथ्वीचे सपाटीखालीं त्याचे मोठमोठाले थर सांपडतात, हे थर इंग्लन्डांतील कित्येक परगण्यांत आहेत, त्यांस खनिज कोळशांचीं विस्तीर्ण शेतें असें ह्मणतात.

प्लंबेगो अथवा वाड हा एक दुसरा ह्या खनिजपदार्थांपैकीं आहे; आपल्या पेन्सिला ह्याच्याच करितात.

तो पृथ्वीमध्यें उत्तम असा कंबरलंडच्या एका पर्वतांत सांपडतो.

गंधक हा एक फार ठिसूळ फिकट पिवळे रंगाचा सुंदर खनिज पदार्थ आहे तो जलदीनें पेट घेतो ह्मणूनच दिवेसळई करण्यामध्यें त्याचा उपयोग केला आहे.

डांबर हा खनिज राळ होय तो एशियाखंडांत व वेस्टइंडिझमध्यें आणि इंग्लन्डच्या एके ठिकाणीं सांपडतो. ह्याचा प्राचीनकाळीं चिकटीप्रमाणें उपयोग करीत असत. बाबेलन या मोठे शहरच्या ज्या विटांच्या भिंती बांधल्या त्यांच्या विटा डांबर ह्या पदार्थानें चिकटाविल्या होत्या असें ह्मणतात. हा पदार्थ कोळशांत असतो ह्मणून इतका प्रज्वलित पेटतो.

दुसरा एक सुंदर खनिज कोळशाचा प्रकार आहे त्यास राळी कोळसा असें ह्मणतात याचे कठिण आणि चांगले चांगले भाग खेळ करण्याकरितां कापून जिल्हई देतात तेव्हां त्यास काळीं खेळणीं असें ह्मणतात.

आंबर ह्या एक चांगला स्वच्छ पिवळट रंगाचा दगड आहे तो चेरी झाडाच्या गुंदाप्रमाणें असून कधीं कधीं समुद्र किनारीं व रेतीमध्यें सांपडतो. फर झाडापासून जी राळ तुह्मी निघतांना पाहिली आहे त्याप्रमाणें हा झाला असावा असें मानलें आ-

हे ह्मणजे तो पूर्वीं राळ असून कांहीं काळानें दगडासारिखा होतो. तोही दाह्य ही आहे.

## मोलवान् पाषाण.

कितीएक पाषाण कापून साफ केले ह्मणजे मग तेच चकचकीत आणि सुंदर होतात व ते दुर्लभ असल्यामुळें त्यांची किंमतही फार असते आणि याच कारणानें त्यांस मोलवान् पाषाण असें नाम दिलें आहे. त्यांतील हिरा, जरी बिलोरी कांचेपेक्षां अधिक सुंदर नाहीं तरी अतिशय मोलवान् असें मानलें आहे. तो इतका कठिण आहे कीं तेणेंकरून कांच कापते आणि कांच कापणारे वोहरी त्याच कामाकरितां त्याचा उपयोग करितात. जरी तो इतका सुंदर आणि चकचकित आहे तरी तो कारबॉन ह्मणजे कोळसा यापासून झाला आहे असें आढळतें आणि तो उष्णतेच्यायोगानें जाळतां येतो.

माणिक एक सुंदर गुलाबी पाषाण आणि पाच एक अस्मानी हे दोन्हीं एक जातीच्या मातीपासून होतात, जिला आल्युमिन असें ह्मणतात आणि ती चिकट मातींत सांपडते.

याकूद हा एक तांबडा पाषाण आहे तो गारींमध्यें असतो. यावरून ईश्वराचा हात नीच पदार्थांतून शोभा आणि चकचकाट कसा बाहेर आणितो हें आपणास समजतें.

## धातू.

आतां आपण चकचकित खनिज पदार्थांचे भागाविषयीं बोलूं. त्यांस धातू असें ह्मणतात. ते खडकाचे थरांत अथवा शिरांत अथवा चिखलट किंवा वालुकामय पाण्याच्या ओघांत किंवा नदीच्या केवळ पात्रांत सांपडतात. प्रत्येक धातू बहुधा दुसऱ्या धातू किंवा खनिज पदार्थ यांच्या बरोबर मिश्र झालेली असते तेव्हां तीस मिश्र धातू असें ह्मणतात.

धातू वितळणाऱ्या आहेत ह्मणजे त्यांस वितळण्याची शक्ति आहे, आपणास जे अधिक उपयोगी त्यांस घनवर्धनीय असें ह्मणतात ह्मणजे त्यांना पाहिजे तितकें पातळ करितां येतें; आणि प्रसारणीय ह्मणजे ज्याची तार मोडल्याशिवाय काढितां येते.

प्लाटिना ही सर्व धातूमध्यें अधिक जड आहे; ती कठिण असून तिच्या आंगीं विस्तवास प्रतिबंध करण्याची शक्ति आहे, साधारण अग्निपेक्षां जर त्याला अतिशय उष्णता लावली तर ती मात्र वितळते.

प्लाटिना ही रुप्यापेक्षां रंगानें काळसर असून फार भरींव चिवट आहे ह्मणून तिच्या मोडल्याशिवाय आपल्यास इतक्या बारीक दोऱ्या काढतां येतात कीं त्या खुल्या डोळ्यांनीं दिसत नाहींत. मेक्सिको आणि अमेरिकेच्या दुसऱ्या भागांत सोन्याबरोबर तिचे लहान चपटे कण सांपडतात. ती रशियामध्यें ही सांपडते.

पहिल्यानें लोखंड वितळवितात आणि जशी आकृति पाहिजे असेल तसा रेतीमध्यें किंवा मातीमध्यें सांचा करून त्यांत तो रस ओततात. ह्याप्रमाणें चुली, नळ्या, कठडे, चाकें आणि पूल हीं करितात. कधीं कधीं, रेतीच्या खळग्यांत कांहीं कामाकरितां लोखंड ठेवितात तेव्हां त्याला जोडें लोखंड असें ह्मणतात. लोखंडाचा दुसऱ्या प्रकारें उपयोग करितात; त्याला लवचीक किंवा घनवर्धनीय लोखंड असें ह्मणतात. ही स्थिती त्यास प्राप्त होण्याकरितां फार तापवून हातोड्यानें तें ठोकतात; नंतर ज्या कामाकरितां जशी आकृति पाहिजे तसी कापून करितात. लवचीक लोखंड ओतीव लोखंडापेक्षां कांहींसें चिवट आहे आणि त्यासारखें सहज फुटत नाहीं.

लोखंडाच्या तिसऱ्या प्रकारास तिखें असें ह्मणतात. तें सुंदर, फार टणक आणि गुळगुळीत करण्यासारिखें असतें, याचे चाकू, कातऱ्या आणि दुसरीं सर्व कापण्याचीं हत्यारें आणि सुंदर खेळणीं हीं करितात. लोखंडाचें तिखें करण्याकरितां त्यांत कोळसा मिसळून त्याला पुष्कळ उष्णता लावितात. जेव्हां तें अग्निवर्ण होतें तेव्हां थंड पाण्यांत बुडवून तिखें टणक करितात. या कृतीस पाणी देणें असें ह्मणतात.

तांबें,— तांबेंही फिक्कट अथवा नारिंगी रंगाची धातू आहे ती फार खणखणीत ह्मणजे जसें रुपें आपटलें असतां त्यापासून आवाज होतो तसा तांब्यापासूनही होतो. तें इतकें चिवट ( चिकट ) आहे कीं तें मोडल्याशि-

वाय त्याची फार लांब तार काढतां येते. एका इं-चाच्या एक दशांशाची तार २९९ पौंडाचें वजन धरूं शकते. तांबें पृथ्वीच्या सर्व भागांत मिळतें आणि तें नानाप्रकारच्या वस्तू करण्यास लावितात. उदाहरण चहादाण्या, कढीचीं भांडीं, इत्यादि. जेव्हां तें जस्ता-बरोबर मिश्र करितात तेव्हां त्याची पितळ होते; ती ह्या दोनही धातूपेक्षां फार कठिण असते. तांब्याच्या अथवा पितळेच्या किटास कळंक ह्मणतात. तो फार विषकारक आहे, तो हिरव्या रंगाचा असतो आणि रंगाप्रमाणें त्याचा उपयोग करितात.

सिसें फार जड धातु असून नरम व फिकट का-ळ्या रंगाचें आहे. तें औषधामध्यें आणि कलाकौ-शल्यांत उपयोगीं पडतें. जेव्हां तें कथील व पितळ याबरोबर मिश्र करतात तेव्हां त्याचें कांसें होतें, त्याचीं ताटें आणि चमचे व दुसऱ्या पुष्कळ वस्तू होतात. नानाप्रकारचे रंग करण्यांत, कांच करण्यांत, मातीच्या भांड्यांस मिना चढविण्यास, छापण्याचे ठसे व बंदु-कीच्या गोळ्या करण्यामध्यें त्याचा उपयोग करितात.

कथील हें रुप्यासारिखें पांढरें चकचकीत आहे, परंतु त्याहून फार हलकें आणि सहज लववितां अथवा चे-चतां येतें ह्मणून मुख्यत्वेंकरून दुसऱ्या धातूबरोबर मि-श्रकरून त्याचा उपयोग करितात. तें लवकर कि-टत नाहीं ह्मणून कढीच्या भांड्याचें आणि दुसऱ्या कित्येक भांड्याचें लोखंड वितळलेल्या कथलांत बुड-

वितात ह्मणजे मग त्या लोखंडावर त्याचा पातळ पत्रा जडतो व त्याचें रक्षण करितो. याचप्रमाणें लोखंडाचे अथवा तांब्याचे भांड्यास कलई लावायास याचा उपयोग करितात आणि असें जर न केलें तर त्यांत अन्न शिजविलें अथवा ठेविलें तर खराब होऊन जातें. दुसरा कथलाचा असा उपयोग आहे कीं धातु सांधण्याकरितां कथील व सिसें मिश्रित करून त्याचा डांक करितात. अशी आतां चाल पडली आहे कीं ज्या धातूचीं टोंके आपणास जडविण्याचीं आहेत तीं जसीं आपण मेणबत्तीचीं टोंकें वितळून जडवितों त्याप्रमाणें अतिशय उष्ण करून जोडावीं. घन वर्धनीय लोखंडाचा भाग उष्ण असतो त्यावेळेस ठोकून जडवितात त्याला सांधणें असें ह्मणतात.

सोमलही एक ठिसूळ धातू आहे. ज्या धातूविषयीं आपण बोलत होतों त्यापासून ही फार भिन्न आहे. ती साफ असते तेव्हां फार चकचकीत दिसते. ती मोठें विष आहे परंतु आपल्या पुष्कळ शिल्प विद्येंत उपयोगी आहे असें आढळतें.

सुरमाही एक दुसरी ठिसूळ धातू आहे, तिचा औषधामध्यें व कलाकौशल्यामध्यें आणि विशेषेंकरून जे सिस्याचे छापील ठसे करितात त्यांस कठिणपणा देण्यामध्यें उपयोग करितात.

## तुझें नाम धन्य असो.

तूं जीवाचा रक्षिता व दाता, तुझें नाम धन्य असो! तुझ्यानें आपल्या निजणाऱ्या जिवांचें रक्षण करवतें, व रडण्यानें फार दिवसांपासून फुटलेल्या अंतःकरणास बरें करवतें. शांति, व गति, रान व सागर, डोंगर, खडक व नदी यांच्या देवा, तुझें नाम सर्वदा धन्य असो.

तूं डुलकी किंवा निद्रा घेत नाहींस, ज्यांस तूं कृपेनें राखितोस ते भाग्यवान् होत; संध्याकाळचें जाणारें किरण, मध्यरात्रीचा अंधार, व असमानी समुद्रांतून अनाद्यंतपणाच्या श्वासाप्रमाणें उगवणारा दिवस त्यांच्या देवा, व ज्या जीवनाचा कधीं नाश व्हावयाचा नाहीं त्याच्या देवा, तुझें नाम सर्वदा धन्य असो.

# भागदुसरा-मूळजाती.

## पाठ चवथा.

### रोप्यांचें वर्णन.

प्राण्याचें जीवन रहाण्यास जी वस्तू पृथ्वीस शक्तिमान् करिते ती वनस्पती होय. कारण धातू जातींमध्यें सर्व उंच धातू व मोलवान् पाषाण व उपयोगी मृत्तिका असून ही मनुष्य किंवा पशु यांच्या पोषणास योग्य असा पदार्थ नाहीं. परंतु ती रोप्यांस

पुष्कळ अन्न पुरविते. रोप्यांच्या व वृक्षाच्या १०००० पेक्षां अधिक जाती भूपृष्ठावर आहेत, त्यांतून कितीएक मनुष्यांस, कितीएक पशुपक्ष्यांस, अन्न पुरवितात व इतर वस्त्रावरणांस व औषधांस उपयोगी पडतात. व ते सर्व अशा सुंदर आकारानें व रंगानें शृंगारलेले आहेत कीं ते केवळ आपल्या करमणुकीकरितां केले असावे असें आपणास मानलें पाहिजे.

रोप्यांचें हें सौंदर्य त्यांच्या उपयोगीपणापासून भिन्न आहे. जरी हे बहुधा त्यांच्या मुळाप्रमाणें मातीच्या रंगानें रंगविले असते, तरी त्याचप्रमाणें ते मनुष्याच्या गरजेस पडते. ह्मणून तें केवळ आपल्या मौजेच्या हेतूनें दिलें आहे असें आपण क्वचित मानावें; व आपल्या रानांचा व शेतांचा सुंदर हिरवा रंग, आपल्या फुलाचे सुंदर व नाजूक रंग, आपल्या झाडांचे चांगले आकार, आपल्या फळांचा चकचकित रंग हे सर्व त्यांच्या व आपल्या निर्माण कर्त्यानें आपल्या सुखाकरितां दिले आहेत. ह्याप्रमाणें टेकऱ्या, मैदानें, कुपणाच्या वई, इतकेंच नाहीं तर आपल्या सर्वांच्या सुखाकरितां सौंदर्यानें रस्त्याच्या बाजूदेखील ज्याणें वेष्टिल्या आहेत, त्याजकडे रिकाम्यावेळीं आपले विचार लावण्यास हें सुख योग्य आहे.

रोप्यास, आपल्या वाढण्यास, पूर्णतेस येण्यास व प्रत्युत्पत्ति करण्यास पांच भाग आवश्यक आहेत; ते येणेप्रमाणें—, मूळ, देंट, पान, फूल व फळ हे होत. फळ ह्मणजे बीज मग तें, मृदुफळ, जांब, शेंग किंवा टणक फळ, किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या शेंगेंत

झांकलेलें असो किंवा उघडें असो.

बीज— तुह्मी जर वाल, वाटाणा किंवा घेवडा ह्यांचें बीज तपासून पहाल तर तें सहज दोन भागांत विभागलेलें असून त्यांत पुढील रोप्याचा अंकूर असतो असें आढळेल. बीजाच्या ह्या दोन बाजूस दळें (दाळिंबी) ह्मणतात. बीज जमिनींत घातल्यानंतर थोडक्या वेळानें, हीं दळें फुगून उघडतात. व स्वतः निरनिराळीं होऊन कोमळ रोप्यास वर खालीं जाण्यास जागा देतात. जो भाग वर येतो त्यास अंकूर ह्मणतात. व जो खालीं जातो त्यास पाळ ह्मणतात, तें जमिनींत जाऊन पुढें मूळ होतें; परंतु मूळ आपल्याकरितां अन्न शोषण करण्यास बळकट होईपर्यंत हीं मांसलदळें कोमळ रोप्यास अन्न पुरवितात. ज्या रोप्यांच्या बीजांस ह्यांतील दोन दळें असतात त्यास द्विदल असें ह्मणतात. द्वि ह्मणजे दोन. आपल्या सर्व मोठाल्या वृक्षांस व बहुतेक रोप्यांस, दोन दळें असतात. जे ध्रुव प्रदेशांत होतात त्यांतील बहुतेकांस व आपल्या कितीएक लहान रोप्यांस एकच असतें. व ह्यांस एक दळ ह्मणतात. दुसऱ्या एका जातीचे रोपे आहेत त्यांस दळें नसतात. उदाहरण, नीळ, दूर्वा, समुद्र वनस्पती व आळंबें, ह्यांस निर्दळ ह्मणतात. निर् ह्मणजे नाहीं.

जेव्हां कोमल रोपावर येतो तेव्हां तो ह्या तीन जातींतून कोणत्या प्रकारचा आहे हें तुह्मी सहज सांगाल, आणि ह्या लहान मांसल बीजाचे भाग जर अमुक असले किंवा निखालस नसले तर या

झाडाला कोणत्या प्रकारचा देंट व पान येईल हेंही पूर्वींच तुह्मी सांगूं शकाल. तें कोणत्या प्रकारें ह्याविषयीं पुढें दाखविलें जाईल.

मुळाविषयीं— झाडाचे मुळाचे दोन उपयोग आहेत;— एक तर तें झाडास जमिनींत गच्च धरितें आणि दुसरा ज़मिनीपासून तें आपल्या तंतूंच्या शेवटास जीं छिद्रें आहेत त्यांतून अन्न ओढून घेतें. तंतू मुळाचे फारच आवश्यक भाग आहेत; त्या तंतूंला पाळें हीं ह्मणतात बहुधा ते हिंवाळ्यामध्यें मरतात व वसंतऋतूमध्यें पुन: नवे होतात. कांहीं मुळें लांकडी आणि डाहाळ्यासारखीं आहेत जसीं काय झाडाच्या जमीनी खालच्याच डहाळ्या होत, त्यांला हे तंतू किंवा मुळें जडलेलीं असतात. ह्या जातीचें मूळ फार बळकट असून मोठमोठालीं झाडें जमिनींत गच्च धरितें. कांहीं मुळें लांब दोरे किंवा तंतू ह्यांचीं झालेलीं असतात, तीं आतां जाड व बळकट, कोठेंकोठें दोरासारिखीं बारीक, कोठेंकोठें एकच, कोठेंकोठें डाहाळ्यासारखीं, आणि कोठेंकोठें आडवीं जमीनींत गेलेलीं असतात.

दुसऱ्या रोप्यांत मांसाळ देंटांचें मूळ असतें, त्याच्या शिखरापासून पानें वाढतात व खालून पाळें आणि तंतू येतात; ह्या जातीचीं गाजर, रताळें व मुळा हीं आहेत.

ह्या प्रकारचें मूळ ज्या भागांतून मुळें फुटतात त्याभागीं जाणूंकाय चावलेलेंसें दिसतें ह्मणून तें निराळ्या जातीच्या रोप्यांचें ह्मणजे गोकर्ण व गुलबास ह्यांच्या जातीचें आहे असें तुह्मी समजावें. लहान डा-

हाळ्याचे शेवटास, मांसाळ गोळे ज्यांस कांदे ह्मणतात झालेले असतात. ह्या कांद्यांत कोंब असतात त्यांतून नवीन रोपा होतो. बटाटा हा कांदा असून त्यांतील लहान डोळे लोक लावण्याकरितां कापतात, ते तुह्मीं पाहिले असाल. ते कोम होत. कित्ती एक मुळें गोळ्यास जडलेलीं असतात ह्मणून त्यांस गोलदार मुळें असें ह्मणतात. परंतु हा गोळा मूळ नाहीं तर कोम होय. तो मांसाळ थरांचा किंवा एकावरएक पडद्यांचा असतो. उदाहरण कांदा जो गोळा आहे तो त्याप्रमाणें बहुधा झाला असतो. कोठें कोठें गुलछडीच्या मुळाप्रमाणें एकावर एक पानें जडल्यानें झाला असतो. जो पुढें रोपा जमिनीवर येणार त्याचे सर्व भाग ह्या गोळ्यांत असतात. खरीं मुळें त्यांच्या शेवटांस जोडलेलीं असतात व तीं जमिनींत जातात.

मनुष्यांस मुळांचे उपयोग,– मनुष्य व गुरें ह्या दोहोंच्या अन्नाचा मुख्य भाग रोप्यांचीं मुळें होत. ज्यांस मांसाळ देंट असतात ते फार पुष्टिकारक. उदाहरण—गाजर, लाल मुळा, व म्यांगेल वर्झल हे आहेत. कंदाकृति मुळें– उदाहरण बटाटा आहे, तो अमेरिकाखंडाहून पुष्कळ वर्षांमागें आणला होता; व गोळाकार मुळें – उदाहरण कांदा इत्यादिक आहेत.

## पाठ पांचवा.

### रोप्यांचें वर्णन

देंट – देंटास रोप्याचें शरीर किंवा स्तंभ ह्मटल्या-

स चालेल तो त्याच्या डाहाळ्यांस, पालवीस व फुलांस आधारभूत आहे. तो वृक्षांत व झाडांत, लांकडी; किंवा चारींत व धान्यांत मांसल किंवा पोकळ असतो.

त्यांच्या वाढण्याच्या रितीप्रमाणें रोप्यांच्या देंटाच्या दोन जाती केल्या आहेत.

पहिली, त्यास पूर्ण आकृति प्राप्त होईपर्यंत ज्याची वाढ लांकडी तंतूचे थर देंटास जडून बाहेरून होते ती होय. झाडाचा सोट मधून कापलेला तुह्मीं पहाल, तर झाडाचा मध्यभाग किंवा गाभा या सभोंवतीं रंगाच्या निरनिराळ्या छायेचीं मंडळें पडलेलीं आहेत व तो फारच टणक भाग आहे असें आढळेल. हीं वर्तुळें मोजून झाड किती जुनें आहे तें तुह्मास सांगतां येईल. देंटाचा हा प्रकार सर्व द्विदली रोप्यांत ह्मणजे ज्या रोप्यांच्या बीजांस दोन दळें असतात त्यांत आढळतो, व असा मोठ्या वृक्षांचा व बहुतेक रोप्याचा देंट असतो.

दुसरी जाती, ज्यांची वाढ देंटामधून होत्ये ह्मणजे जे देंटाचे मध्यभागांतून मोठे होतात ती होय. व त्याची बाहेरील बाजू नरम व लवचिक असते. जेव्हां बाहेरील बाजू कठीण होते तेव्हां देंट अधिक जाड व्हावयाचा नाहीं. हे देंट गाभ्याजवळ नरम असून कधीं कधीं पोकळ असतात. असे सर्व एक दळी रोप्यांत व झाडांत ह्मणजे ज्यां वृक्षांच्या व रोप्यांच्या बीजास एकच दळ असतें त्यांत असतात. ह्मणून हें चमत्कारिक असून खरें आहे कीं बीजावरून रोप्यास कोणत्या प्रकारचा देंट येईल हें तुह्मास भविष्य करितां येई-

ल. आपल्या बहुतेक झाडांस व झाड्यांस लांकडी देंट असतात; त्यांमध्यें भेद इतकाच कीं झाडास एक व झाडीस पुष्कळ देंट असतात. एक मोठें चमत्कारिक जातीचें झाड आहे, त्यामध्यें डाहळ्यांतून तंतूसारिखे नवीन देंट बाहेर निघण्याचा गुण आहे. ते जमिनीवर पडून मूळ धरितात व त्यांपासून झाडें बनतात. ह्या प्रकारचें म्यानग्रोव हें एक आहे; परंतु ह्या जातीच्या झाडांतील फारच चमत्कारिक उदाहरण हिंदुस्थानांतील प्रख्यात वडाचें झाड आहे; त्यास हिंदुस्थानांतील कमानीदार अंजिराचें झाडही ह्मणतात. तें म्यानग्रोव प्रमाणेंच वाढतें. त्याच्या डाहळ्यांतून तंतू बाहेर पडतात व ते उतरून मूळ धरितात व कांहीं वेळानें त्यांचे झाडाप्रमाणें सोटे होतात, व ह्याप्रकारें त्याची एका प्रकारची रायी होते. हिंदुस्थानांतील नर्मदा नदीच्या किनाऱ्यावर एक वडाचें झाड आहे, त्याचा जरी बराच भाग मोठ्या पुरांनी वाहून गेला तरी अजून मुख्य देंटासभोंवतें मोजलें असतां त्यांत २००० फुटीच्या परिघाची जमीन आहे. ह्या एका मोठ्या झाडाचे मोठे सोट ३५० व लहान ३००० रांवर आहेत. ह्यांतील प्रत्येक देंट नेहमी डाहळ्या व लोंमणारीं मुळें दुसरे देंट व्हावे ह्मणून बाहेर टाकतो. तीं पुढील येणाऱ्या झाडांचे जाणू काय आईबापच होत.

एकेवेळीं ह्या झाडानें ७००० मनुष्यांचे फौजेस छाया दिली होती. हिंदुलोक वडाच्या झाडाची बहुधा पूजा करितात. ते हें झाड आपल्या देवळापाशीं ला-

वितात व जेथें देवालय बांधिलें नसतें तेथें त्याचें काम हें झाड बजावतें. त्याच्या सोटापाशीं आपल्या देवाची मूर्ति ठेवून तेथें ते पूजा करितात.

आपल्या देशांतील लांकडी दंट कधीं कधीं फारच मोठ्या आकृतीचे होतात; परंतु दुसरे किती एक फार लहानही आहेत. उत्तर ध्रुवसंबंधी कांटेरी झाड इतकें लहान असतें कीं एका सर्व झाडास साहा औंस वजनाच्या कुपीमध्यें ठेवितां येईल, व ठेंगणी आलपैन विलोची साहा झाडें आपल्या सर्व डाहळ्या पानें, फुलें, व मुळें, ह्यांसुद्धा एका बाईच्या खिशांतील पुस्तकाच्या दोन पृष्ठांत तीं एकास एक लागल्यावांचून दाबून ठेवितां येतील.

उष्ण देशांतील रोप्यांस बहुतकरून जाड व मांसाळ दंट असतात. त्या सर्व दंटांत एक नाजूक पदार्थ असतो त्यास गीर ह्मणतात. तो तुह्मास येलडर्च्या कोवळ्या कोमांत व लव्यांतही सुकलेला दिसेल.

बहुत्येक वनस्पतीस व रोप्यांस क्वचितच दंट असतो. किती एकांमध्यें मुळाच्या शेंड्यावर तो सपाट असतो; दुसऱ्यामध्यें तो जमिनीखालीं असतो; व जो दंटसा भासतो तो जमिनीमधून फुलाचा दांडावर उभा निघतो. कितीएक दंट उभे राहत नाहींत; परंतु आधाराकरितां दुसऱ्या झाडांस किंवा भिंतीस चिकटतात. ह्यांस अवलंबणारे रोपे असें ह्मणतात.

( ऐवि) आकाश वेलीला आंकड्यासारिखे तंतू असतात, त्याहीं करून ती झाडावर अथवा भिंती-

वर चढून त्यास गच्च धरिते. व ह्याप्रकारच्या वेलीस मिठी मारणारी वेल असें ह्मणतात.

वाटाण्याचे आणि द्राक्षाचे वेलीला कुरळे असतात त्याहीं करून तीं दुसऱ्या रोप्यांवर अथवा कांड्यावर चढून त्यांस धरिते. त्यांला चढणारी वेल असी संज्ञा आहे. हापव कनवाल्व्ह्यूलस हे दोन प्रकारचे रोपे ज्या रोप्यांवर अथवा काठीवर चढतात त्याच्याभोंवतीं ते गुंडाळून गुंडाळून घेतात; आणि याजातीचे वेलीस गुंडाळणारी वेल असें ह्मणतात. कितीएक झाडांच्या आणि रोप्यांच्या देंटाला कुसें असतात आणि तीं साली वर असतात ह्मणून साल काढली असतां तीं देखील निघतात. उदाहरण कांटे गोखरूं (ब्र्यांबल); आणि दुसऱ्या झाडांस कांटे असतात ते लांकडी असून देंटास लागून असतात; उदाहरण बल्याकथार्न; ज्या झाडास एकदळ आहे त्याचे देंट कधीं कधीं चारीसारखे पोकळ व पेराचे असतात; किंवा लव्याप्रमाणें गिरानें भरलेले असतात.

**मनुष्यास रोप्यांच्या देंटाचा आणि मुळाचा उपयोग** — आपणास रोप्याचा कोणताही भाग त्याच्या देंटापेक्षां अतिशय उपयोगी नाहीं अथवा फुलाचा देंट उपयोगाव्यांचून आहे असेंही नाहीं. बहुत्येक रोप्याचे हे दोनही भाग गुरें व कितीएक मनुष्यें खातात; व दुसऱ्याही प्रकारें ते आमच्या सुखास उपयोगीं पडतात. आपल्या मोठ्या झाडाच्या सोटांचा उपयोग सर्वांस चांगला ठाऊक आहे. जेव्हां ते कापून त्याच्या डाहळ्या वेगळ्या करितात; तेव्हां त्याला लांकूड

असें ह्मणतात; आणि मग तें इमारती बांधण्याकरितां अथवा दुसऱ्या उपयोगाकरितां ठेवितात. देंटाचे इतर भाग दिसण्यांत मात्र फार क्षुल्लक आहेत, परंतु ते मनुष्याने बुद्धीच्या योगेंकरून आपल्या उपयोगास लाविले आहेत. झाडाची साल अथवा बाहेरील आच्छादन हें त्यापैकींच आहे. ओक झाडाची साल रांप देण्यांत ह्मणजे चांबड्याचें कातडें तयार करण्याकरितां उपयोगी पडते. दक्षिण अमेरिकेंतील सिंकोना आणि दुसऱ्या झाडाची साल औषधाकरितां उपयोगी पडते. आणि ज्या देशांत विषमज्वर व ताप चालू होतो तेथें हजारो मनुष्यांचे प्राण वांचविण्यास ही साल साधन आहे.

सिलोन (लंका) मधील दालचिनीच्या झाडाच्या सुवासिक सालीचा, औषधांत व स्वयंपाकांत, उपयोग करितात. ही साल प्रथम हिरवी असून नंतर तांबूस फिकट रंगाची होते; ती काढून उन्हांत सुकवितात तेव्हां जे तिचे कुरले होतात ते आपण विकत घेतों. ही साल काढण्यांत व तयार करण्यांत पुष्कळ लोक गुंतले असतात व तो एक व्यापाराचा जिन्नस झाला आहे.

पृथ्वीच्या कितीएक प्रदेशांत व विशेषेंकरून सोसाईटी बेटांत एका झाडाच्या सालीचा वस्त्रें करण्यांत उपयोग करितात. तिचे लांब तुकडे काढून पाण्यांत बुडविल्यानंतर ते एकमेकावर थोडे ठेवून जोडतात व मग ते चिकटत तोंपर्यंत चेपतात व ठोकतात. मग सुई दोऱ्यावांचून पोशाक करण्याकरितां कापून ठोक-

तात. ह्याच जातीच्या झाडाच्या सालीपासून चिनांत कागद करितात; तें एका जातीचें तूतीचें झाड आहे.

ताग व सण ह्यांचे तंतूमय देंट आपणास सर्व प्रकारचें तागाचें कापड पुरवितात. ताग बारीक कापड आणि सण फार जाडें कापड व दोर, करण्यास लावितात. कितीएक झाडांचा व रोप्यांचा गीर त्यांच्या पोषणार्थ आवश्यक असून त्याचे आपणासही पुष्कळ उपयोग आहेत. तो फारच हलका पदार्थ आहे असें दृष्टोत्पत्तीस आल्यावरून ज्या कितीएक शास्त्रीय कर्त्यांत फारच हलकेपणाची गरज लागते तेथे गीराचे गोळ्यांचा उपयोग करितात.

रैसपेपर ( कागद ) नामें सुंदर जिन्नस चित्रें काढण्याकरितां हिंदुस्थान व चीन ह्यादेशाहून येते, ती हिंदुस्थानांतील गंगेच्या पाण्यांत व चिनांतील कितीएक नद्यांच्या किनाऱ्यावर एक रोपा होतो त्याच्या गिराची करितात.

आपल्या साधारण लव्ह्याचा गीर सर्वांस माहित असेलच. लव्ह्याची साल काढून नाजूक मलईच्या रंगाचा गीर प्राप्त झाल्यावर आनंदी होत नाहीं असा कोण आहे? त्याच्या बारीक लांब मेणबत्या ज्यांस त्याजवरून लव्ह्याच्या मेणबत्या ह्मणतात त्या करण्यांत उपयोग फार दिवसांपासून करितात.

इंग्लंडाच्या कितीएक प्रदेशांतील लोक आपणाकरितां लव्ह्याच्या मेणबत्या करीत असत. त्यांचीं मुलें लव्हे गोळाकरून सोलीत व आईबापें ते तयार करून लांबलांब कापीत व उष्ण चर्बींत बुडवून सुक-

ण्याकरितां टांगीत. एक गृहस्थ आपल्यापेक्षां गरीब शेजाऱ्यांस त्यांच्या घरगुती कामांत मदत करण्यास उत्सुक होता, तो, जरी लव्हे तयार केलेले विकत घेतले तरी ते किती थोड्या दरानें करितां येतील याविषयीं आपणास सांगतो; तें येणेंप्रमाणें. — साधारण चर्बीच्या एका रत्तलास आठ पैसे पडतात आणि सुमारें साहा रत्तल चर्बीनें लव्ह्याचा एक रत्तल भिजेल. तयार केलेल्या लव्ह्याचे एक रत्तलास दीडरुपया पडेल; परंतु त्यांत १६०० लव्हे मावतील. आतां ते एकामागून एक अर्धतास पर्यंतच जळूं लागले अशी कल्पना करा ह्मणजे मग एका मनुष्यानें अडीच रुपयांस उजेडाचे ८०० तास विकत घेतल्यासारिखें होईल. ( ते पूर्ण तेहतीस दिवसांपेक्षां जास्त होत ) ह्या रितीनें एका गरीब कुटुंबास एका दुगाणीस सुखकारक उजेडाचे तीन तासांवर उपभोग घेतां येईल.

माडाच्या जातींतल्या एका झाडाचे गीरदार देंटामधून सागू उत्पन्न होतो. त्याचा आजारी लोकांस पुष्टिकारक पेजेकरितां उपयोग करितात एका झाडापासून वजनी ६०० पौंड सागू उत्पन्न होतो. ओलसर जमिनींत बोरु अतिशय वाढतो. तो फार उपयोगी रोपा आहे. या देशांत जे उंच साधारण बोरु सांपडतात ते घरें शिवण्याकरितां पेंढ्यापेक्षां चांगले असें मानितात; परंतु त्यांला पांथळ जागा आवडते ह्मणून जेथें ते वाढतात त्या जमिनीस रोगी असें ह्मणतात. ह्या बोरूचें एका जातीचें वाद्य करितात, त्याला प्यानची नळी असें ह्मणतात आणि कांहीं दे-

शांमध्यें ह्याचा लेखणीकरितां उपयोग करितात; क्रांति वृत्तसंबंधी प्रदेशांतील बोरु आणि गवतासारखीं झाडें फार चमत्कारिक आणि सुंदर असतात. बांबूचा देंट हा पेरदार व फार हलका असून फार टणक आहे आणि ४० किंवा ५० फुटी उंच वाढतो ह्याच देंटाला सांधे आहेत आणि तो धान्याच्या काडीसारखा पोकळ आहे. ज्या देशीं तो रुजतो तेथील लोकांस तो फार उपयोगी असतो, त्याचीं घरें, खुर्च्या, खाटा, आणि बाजा करितात. तसींच त्याचीं हत्यारें व कुपणेंही करितात. त्याच्या तंतूचे गलबताचे शेंड्याकरितां दोऱ्या केलेल्या असतात.

ऊंस हा उंच चारीचे रोप्यांतला आहे. तो वीस फुटी उंच वाढतो आणि त्याच्या देंटापासून आपल्यास साखर मिळते. मुख्यत्वेंकरून वेस्टइंडिज एथें त्याची फार लागवड करितात आणि या रितीनें त्यापासून आपणास साखर मिळते-ती असी कीं देंट जेव्हां पिकतात तेव्हां ते कापून रस काढण्यासाठीं घाण्यास लावतात. नंतर तो रस एकत्र करून त्यांत कळीचा चुना किंवा वनस्पतीची राख मिश्र करून कढईंत घालितात आणि त्याची तार निघे इतका तो कढवितात. मग मोठ्या सावधगिरीनें झाऱ्यांतून बेरी काढल्यावर तो बाहेर काढितात आणि सच्छिद्र भांड्यांत थंड होण्यास ठेवितात; त्यांतून वाईट जो भाग उरतो त्यास काकवी असें ह्मणतात. तो पदार्थ खालीं भांड्यांत पडतो आणि बाकीचा जो अंश भांड्यांत राहतो त्याची कठिण लालरंगाच्याकणाची एक रास होते त्या-

स कच्ची साखर ( गूळ ) असें ह्मणतात. अशा स्थितीमध्यें ती इंग्लंडास आणितात आणि तेथें पुनः साफकरून त्या साखरेचे भेले करितात. उंसाच्या रसाखेरीज त्याचीं पानें आणि वाडें गुरांस खाण्याचे उपयोगीं पडतात. कांहीं झाडाचे शेंड्यापासून टरपनटाएन (नकतेल) आणि राळ मिळतो; दुसऱ्यापासून कांहीं मोलवान् गुंद मिळतो; आणि कित्येकांपासून रोगहारी मलम मिळतें. हे कितीएक लाभ आपल्याला रोप्यांच्या देंट किंवा सोट्यापासून प्राप्त होतात.

## धडा साहावा.

## रोप्याचें वर्णन—पान.

रोप्याचे पानाचा व्यापार त्याची आरोग्यता व बळकटी राखण्याचा दिसतो. ज्या सुंदर शिरा आपण पानांत पहातों त्यांत जो रस रोप्याचीं मुळें जमिनीमधून ओढून घेतात तो असतो.

आपल्या त्वचेप्रमाणेंच पानास पुष्कळ बारीक छिद्रें किंवा भोंकें असतात, त्यांतून तो आपला फारच ओलावा वातावरणांत टाकितो व दुसरीं कितीएक आहेत त्यांतून ताजी पुरवणी आंत घेतो.

रोप्याच्या आरोग्यतेस पान आवश्यक आहे असें करवंदाच्या झाडीवरून कळून येतें; कारण असें वारंवार घडतें कीं जेव्हां तिचीं पानें किड्यानें खाऊन टाकलीं असतात तेव्हां तिचीं फळें पिकत नाहींत.

रोप्यास हवा व उजेड आवश्यक आहे. जर पान प्रकाशापासून दूर काढिलें तर त्याचा रंग बदलून जातो असें तुह्मास दिसेल. जेव्हां सेलरी मातींत गाडली जाते तेव्हां, किंवा जेव्हां ड्यान्डिलियनूचा सोट व पानें कांहीं अपायेंकरून सुकलेल्या पानांनीं आच्छादून जातात तेव्हां तीं पिवळट पांढरीं होतात.

झाडाच्या बळकटी व आकृति यांचें मान त्याचे पानाच्या आकाराच्या मानानें नसतें परंतु संख्येच्या मानानें असतें. कितीएक आपलीं मोठमोठालीं झाडें जसें सायाचें झाड आणि बांबू ह्यांस लहान पानें असतात व कोबीचे कांद्यास अथवा कितीएक लहान झाडांस फार मोठीं पानें असतात; परंतु तीं आपल्या आकृतीची न्यूनता संख्येनें पूर्ण करितात. ट्यालीपॉट झाडाचें एक पान इतकें मोठें असतें कीं सात किंवा आठ मनुष्यांस छाया देऊं शकतें असें ह्मटलें आहे. आपल्या बहुतेक झाडांचीं व रोप्यांचीं पानें वर्षांतून एकदां खडतात आणि झाड ओसाड पडतें. त्यांस पडणारीं किंवा खडणारीं असें ह्मणतात. जीं झाडें आपलीं पानें वर्षभर हिरवीं राखितात त्यांस सदा हरित असें ह्मणतात. त्यांचीं पहिलीं पानें नवीं पानें बरींच वाढल्याशिवाय झडत नाहींत, अथवा दोन तीन वर्षांनीं एकदां झडतात. चकचकित व तेजस्वी हाली, फर, युव आणि दुसरीं कितीएक झाडाचीं पानें पहिल्या प्रकारचीं आहेत.

पान मुळामधून निघतें उदाहरण गोकर्ण व वा-

येलेट; आणि कित्येकांचें देंठामधून किंवा डाहळ्यामधून निघतें.

जेव्हां आपण आपलें लक्ष रोप्यांच्या पानांकडे लावितों तेव्हां त्यांच्या नानाप्रकारावांचून दुसरी कोणतीही गोष्ट आपणास अधिक मनास लागत नाहीं. कितीएक पानें देंठावर एक एक, कितीएक जुळीं किंवा पुष्कळ पानाचीं झालेलीं असतात उदाहरण गुलाबाचीपानें इत्यादि; कितीएकांचे कडे किंवा कांठ कांतलेले असतात; कितीएक करवतलेलीं असतात; कितीएक सपाट, कितीएकांचे बोटाप्रमाणें विभाग झालेले असतात, कितीएक ऱ्हदयाप्रमाणें; कितीएक फणीप्रमाणें आहेत; कितीएकांस कंटक रूप शस्त्रें दिलीं आहेत उ० निनगुटा इत्यादि कितीएकांस लोम व कितीएकांस केश आहेत; परंतु आपल्या निरनिराळ्या आकारामध्यें तीं सर्व सुंदर आहेत. पुष्कळ पानांचा संग्रह करून शाईच्या किंवा सिस्याच्या लेखणीनें त्यांची नक्कल करणें हें मोठें मनोरंजक आहे.

**मनुष्यास पानाचे उपयोग**-चार व दुसऱ्या वनस्पतीचीं पानें ज्यांवर गुरें चरतात त्यांखेरीज स्वत: आपणास औषध, अन्न व सुख देणारीं अशीं पुष्कळ आहेत, उदाहरण कोबी, लेट्यूस, स्पिन्याक इत्यादि.

चाहा, जो फार श्रमहारक पिण्याचा पदार्थ तो एका झाडाच्या पानाचा करितात, तें झाड चीन व जपान एथें होतें व त्या देशांत त्याची बरीच लागवड करितात. चाहाचें झाड सर्वदा हिरवें असतें व त्याची

१०-१२ फुटी उंची असते. त्याचीं पानें आपल्या मटलीपेक्षां सादृश्यांत कमी आहेत असें नाहीं.

चिनई लोक पृथ्वीच्या सर्वभागीं चाहा रवाना करितात; ह्मणून ते त्याची मोठ्या काळजीनें लागवड करितात. नियमित अंतरावर पांच पांच इंच खोल अशा खळग्यांत साहापासून बारापर्यंत त्याच्या बिया घालतात; कारण असें आहे कीं त्यांतील थोड्याच रुजतात. तें झाड तीन वर्षांचें झाल्यावर त्याचीं पानें गोळा करण्याजोगीं होतात. जे लोक तीं गोळा करितात ते त्यांची रुची बिघडूंनये ह्मणून हातमोजे घालतात. ते एकएक वेंचतात व त्यांचा चुराडा होऊं नये ह्मणून मोठी सावधगिरी ठेवितात. जरी ही कृती मंद भासते तरी प्रत्येक दिवसीं एकेक माणुस दाहा पंधरा पौंड गोळा करितो. नंतर तीं पानें कढलेल्या पाण्याचे वाफेवर ठेवितात. नंतर त्यांस तांब्याच्या ताटांत घालून विस्तवावर धरितात; मग हातऱ्यावर पसरून कितीएक मजूर तीं थंड करण्यास, हालविण्यास, व दुसरे कित्येक गुंडाळण्यास लावले असतात.

वर्षांतून तीनदां चाहाचीं पानें गोळा करितात. जीं फारच कोंवळीं पानें तीं रुचीमध्यें मधुर असतात. एक बाई असें सांगते कीं जसी इंग्लंडांत दारू प्रसिद्ध रस्त्यावर व शहरांत विकतात, त्याप्रमाणें चीन व जपान यांमध्यें चाहा विकतात व त्यांत साखर किंवा दूध घातल्यावांचून मजूर व प्रवासी लोक पितात.

## धडा साहावा ( पुढेंचालू )

## रोप्यांचें वर्णन – फूल, इत्यादि.

फूल हें सर्व रोप्याचा फार सुंदर भाग आहे इतकेंच नाहीं तर तो एक फारच अगत्याचा भाग आहे, कारण कीं जो भाग फल उत्पन्न करितो तो तो होय. फुलांत पुष्कळ भाग आहेत. प्रथमतः देंटाच्या शेंड्यावर लहान प्याला असतो त्यांत फूल बसविलेलें असतें त्यास गोंड ह्मणतात व तें बहुधा हिरव्या पानाचें झालें असतें; परंतु ईश्वरास नानाप्रकार आवडतात ह्मणून कितीएक फुलें गोंडांवांचून आढळतात. उदाहरण खसखसीचें फूल; व कितीएकांस गोंड असतें तें हिरवें नसतें उदाहरण गोंडा; त्याचें गोंड लाल आहे.

फुलाचा दुसरा आवश्यक भाग निदान सौंदर्याविषयीं तरीं आवश्यक असा केंसर किंवा मोहोर आहे. तो पिवळ्या बटर कप् किंवा एक पाकळीची भोंवरी इत्यादिकांमध्यें रंगित किंवा पांढरीं पानें ज्यांस पाकळ्या ह्मणतात त्यांचा झालेला असतो.

जेव्हां तुह्मी फूल पाहातां तेव्हां मध्यभागीं दोर किंवा तंतूवर कितीएक लहान धूसर बिंदु जडविलेले असून त्यांपेक्षां जाड व निराळ्या आकृतीचे एक

किंवा पुष्कळ बिंदू सभोंवते ते असतात. ह्यांस पुंकेशर ह्मणतात व जो एक त्यांहून जाड असतो त्यांस स्त्री केशर ह्मणतात; ह्या गर्भ केशराच्या खालच्याभागीं फ- ल किंवा बीज असतें व दुसरे भाग केवळ त्याच्या पूर्णतेस आवश्यक आहेत. हे भाग ह्मणजे पुंकेशर व स्त्रीकेशर सर्वदा आढळतात तरी कितीएक रोप्यांत व मोठ्या वृक्षांत केशर किंवा मोहर मुळींच नसतो ह्म- णून त्यांस फूल नाहीं असें बहुधा ह्मणतात. जरी व्हायलेट फूल उमलतें तरी उन्हाळ्यांमध्यें त्या फु- लास पाकळ्या नसतात त्याचा सुंदर अस्मानी मो- हर वसंतऋतूमध्यें मात्र असतो.

हे लहान पुंकेशर व स्त्रीकेशर फुलाचे इतके गरजेचे भाग आहेत कीं ह्यांच्या संख्या व स्थितीप्र- माणें रोप्यांच्या २४ जाती केल्या आहेत व लोका- नीं जें झाड पूर्वीं पाहिलें नाहीं त्याचें फळ मधुर किं- वा विषमय होईल हें ते त्याच्या केशराच्या स्थिती- वरून सांगूं शकतील.

जर ते गोंडाबाहेर इतके वाढले कीं तुमच्यानें त्यांस राखून गोंड काढवेना तर मग जरी रोप्याचा बाकीचा भाग विषमय असला तरी फळ मधुर होईल. कितीएक रोप्यांस एकच पुंकेसर असतो उदा० लाल व्हेलेरियन्; दुसऱ्यांस, उदाहरण खसखसीचा रोप्यास शेंकडो असतात. दुहेरी फुलांत उदाहरण गुलाबांत पुंकेशराच्या पाकळ्या होतात व फूल बीज धरित नाहीं. जेव्हां तुह्मी लक्ष लावून फुलांकडे पहाल तेव्हां त्यांची वाढण्याची रिती, रंग व आकार ह्यांच्या भि-

न्नतेंत, तुह्मास आनंद होण्यास पुष्कळ गोष्टी आढळ- तील. कितीएक फुलें, एकटीं, कितीएक झुबक्यांत, कितीएक देंटासभोंवती वर्तुळाकार, कितीएक छत्रीच्या काड्याप्रमाणें लहान दांड्यावरून बाहेर आलेलीं, व कितीएक क्याटकिन ( मांजराचे शेपटीप्रमाणें ) इत्या- दिक एका बारीक तंतु सभोंवती दाट रचलेलीं अस- तात. कितीएक फुलांस जुळलेलीं ह्मणतात ह्मणजे एका गोंडांतून पुष्कळ फुलें बाहेर निघालेलीं असता- त. ह्याप्रकारचीं मोगरे व ड्यानडेलियन आहेत. जर तुह्मी मोगरे घेऊन मध्य भागांतून पिवळे बिंदू उपटून ते कांचेंतून पाहिले तर प्रत्येक बिंदु निरनिराळें फूल आहे व लहान लालसर टोंकाच्या पाकळ्या त्या स- भोंवत्या असतात त्याही निराळीं फुलें आहेत असें तुह्मांस आढळेल, पण इतकेंच कीं ह्या शेवटल्यास पुं- केशर नसतो. मोगऱ्याच्या मृदुजागीं जीं छिद्रें तु- ह्मी पहातां त्या बिया जडविण्याच्या जागा होत.

फुलांमध्यें आकृतीची भिन्नता व स्वरूपाचे नाना- प्रकार, हे चमत्कारिक आहेत: कितीएक इतकीं बारीक असतात कीं त्यांस लहान लाल धनगराचे सावधपण ( ह्मणून एक फूल ) असें ह्मणतात तीं तुह्मास चारींत आढळतात; कितीएक पिओनी इतकीं मोठीं असतात; कितीएक पतंगाप्रमाणें असतात. उदाहरण वाटा- ण्याचें फूल, ब्रुम व फर्स इत्यादि; ( ह्यावरून त्यांस पतंग सदृश फुलें ह्मणतात. ) कितीएक खुरसाप्रमाणें आहेत; दुसरीं कितीएक घंटेप्रमाणें आहेत.

फुलांस उमलण्याकरितां त्यांचे ऋतु आहेत इ-

तकेंच नाहीं परंतु उमलल्यावर फुलण्याचे व मुकुलित होण्याचे तास असतात. सर्व पतंगाप्रमाणें फुलें रात्रौ आपले पंख ( पाकळ्या ) बंद करितात. मखमाल सूर्याच्या पहिल्या किरणाबरोबर विकास पावतें व जेव्हां तो मावळतो तेव्हां मुकुलित होतें. याचप्रमाणें जेव्हां संध्याकाळ सुखकारक आवरण करणारे तास आणतो तेव्हां सूर्य विकासी कमळें निमेषोन्मेष करित बंद होतात.

व ह्याप्रमाणें तीं आर्द्र हवेंत होतात; कारण सूर्य कमळास पाऊस आवडत नाहीं. जलकमळ आळसी आहे व तें दोनप्रहरपर्यंत आपलीं फुलें उघडीत नाहीं. एकाप्रकारचें क्याकूटस ( उंबराचें फूल ) रात्रीं थोडे तासपर्यंत मात्र फुलतें. कितीएक फुलें नेहमीं दोनप्रहरीं मुकुलित होतात उदाहरण गोटूस बियेर्ड; त्यास इंग्लंडाच्या कितीएक भागांत, "योहान दोनप्रहरीं निजावयास जा असें ह्मणतात.

## मनुष्यास फुलांचा उपयोग.

फूल हें जरी वनस्पतीचा अतिशय सुंदर भाग आहे तरी तो फारच थोडा उपयोगी आहे. फुलांपासून आपणांस कितीएक सुंदर रंग मिळतात व त्यांतील थोडे आपण औषध करण्यांत व स्वयंपाकास लावितों. क्रोकस अथवा कुरणी केशराचें गर्भ केशर ज्यांतल्या पिवळ्या पदार्थास केशर ह्मणतात तो आपणास मिळतो, त्याचा औषधांत उपयोग करितात व तेणेंकरून पोळ्यांस पिवळारंग चढतो

त्यांस केशरी पोळ्या असें ह्मणतात. एका जातीच्या कोबीच्या फुलास फूल कोबी ह्मणतात. तुह्मांस ठाऊक असेलच कीं तें उमलण्यापूर्वी बहुधा खातात. फुलांची अमृतकुपी ह्मणून जी, पाकळी बंद झाल्यानें लहान कुपी बनलेली असते तीजमधून मधमासी आपणाकरितां मध मिळविते, तो मध तुला मधाच्या पोळ्यांत चाखतां येईल. फुलामुळें आपले कितीएक सुगंधी पदार्थ झाले आहेत, उ० लव्हेंडर, गुलाब, जाई इत्यादिकांचें अत्तर.

फळ अथवा शेंग— ज्या बीजावरून आपण झाडाचे इतिहासास प्रारंभ केला त्याविषयीं आतां पुन्हा बोलूं. बीज गर्भ केशराच्या खालच्या भागांत असतें; त्या भागास बीजांकुर असें ह्मणतात. कितीएक फुलांस गर्भ केशराचा हाच भाग असतो. उदाहरण खसखस. जेव्हां फूल गळून पडतें तेव्हां बीज गर्भ आपल्या भरांत येतो त्याला शेंग असें ह्मणतात. परंतु कितीएक फुलांमध्यें बीं शेंगेंत झाकलेलें नसतें परंतु मोगऱ्याचे (डेझी) फुलाप्रमाणें गोंडाच्या नरम भागांतून वाढतें. शेंगा नानाप्रकारच्या आहेत. कधींकधीं बिया करटींत व करटीसभोंवती काथा असतो, उदाहरण सर्व टणक फळें. बोर, चेरी व पिच ह्या फळांच्या आठ्यां भोंवता गीर असतो. किंवा पेरु व शिताफळ याप्रमाणें फळाच्या बिया छिद्रांत असतात आणि त्यासभोंवतीं गर असतो; किंवा लिंबु व नारिंग याप्रमाणें नरम फळांत बिया असतात.

कधींकधीं बीजाला आच्छादन नसतें परंतु तें र-

साल फळांत आच्छादलें असतें—उदाहरण, करदें, मनूका आणि द्राक्षें.

सर्व प्रकारचीं धान्यें उदाहरण भात वगैरे लाहान बारीकशा तुसामध्यें असतात दुसरीं बीजें बोंडामध्यें असतात त्यांस योग्यरीतीनें शेंगा असें ह्मणतात; उदाहरण वाटाणे आणि वाल. कांहीं बिया मृदु पदार्थानें गुंडाळलेल्या असतात, उदाहरण कापसिणीच्या बिया कांहीं बिया मृदुलोमानें गुंडाळलेल्या आहेत तेणेंकरून त्या पृथ्वीच्या सपाटीभर उडतात आणि पक्ष्यांस पुष्कळ अन्न पुरवितात; असें ड्यांनडिलियनचें, कुयलीचें, तागाचें, आणि दुसरें बहुतकरून बीज पुष्कळ आहे. एक साधारण कुयलीचा रोपा २४००० आणि खसखसीचा सुमारें ३०००० पेक्षां अधिक बिया उत्पन्न करितो.

**मनुष्यांस बीजाचा उपयोग**—बीज हें रोप्याचा अगत्याचा भाग आहे कारण त्याला पुन:पुन: रोपा उत्पन्न करण्याची शक्ति असते. तसेंच तें मनुष्यांस सर्व उद्भिज्ज उत्पन्नापैकीं अगत्याचा भाग दिसतो. जसा शिजविलेला भात हिंदुस्थानांतील आणि एशियांतील दुसरे लोकांच्या उपजीविकेचा भाग आहे तसाच गहूं, जव, चणे, तीळ ह्यांच्या भाकऱ्या पोळ्या, सांजा किंवा पेज शिजवून अथवा भाजून केली ह्मणजे कितीएक लोकांच्या जीवनाचा मुख्य भाग होतो. कांहीं देशांत लोक फळांवरच मुख्यत्वेंकरून राहातात. पिस्तें युरोपाच्या दक्षिणेस, भाजून अथवा भाकरीकरून खातात. नारळ जो मनुष्याचा डोक्याइतका मोठा होतो तो पूर्व आणि पश्चिम हिंदिबेटांत होतो त्यापा-

सून कसदार अन्न आणि पाणी मिळतें; कारण कीं नारळामध्यें गोड दुधाप्रमाणें प्रवाही पदार्थ असतो आणि तो ताजा असतो तेव्हां फार मधुर लागतो.

दक्षिण समुद्रांतील द्वीपवासी लोक बहुतकरून ज्या झाडाला पोलिका वृक्ष असें ह्मणतात त्या झाडाचे फळावर आपला उदर निर्वाह करितात. त्या झाडाला असी संज्ञा देण्याचें कारण हें आहे कीं, त्याचें फळ भाकरीसारिखें आहे. द्राक्षापासून द्राक्षरस होतो, जांबापासून सायडर दारू होते, आलीव्हपासून तेल होतें. असें वर्णन केलें आहे कीं जो मृदु पदार्थ कापसिणीच्या बीजा सभोंवता वेष्टिलेला असतो त्याला जेव्हां कोष्टी लोक साफ करून व पिंजरून तयार करितात तेव्हां त्याजपासून सुंदर आणि अल्प मोलाचे पोशाक होतात अमेरिका, मिसर आणि दुसऱ्या देशाहून तारवें भरून कापूस लिव्हर पुलास आणितात मग आमचे कारखानेदार कसबानें आणि मेहनतीनें त्या कापसाची रंगीत व सफेत व पातळ आणि जाडी कापडें करून पृथ्वींतील सर्व देशाच्या उत्पन्नाची अदलाबदल होण्याकरितां पाठवितात.

आपण आतां झाडाच्या मुख्य भागांचें वर्णन केलें. बीज आपल्या दळामधून निघतें; मूळ किंवा पाळ खालीं जातें; देंट वर येतो; फुलाचा देंट, पान व ज्या प्यात्यांत फूल असतें तो, मोहर पांढरा किंवा रंगित, पुंकेशर आणि गर्भ केशर, फळ किंवा शेंग हे सर्व रोप्याच्या उपजीविकेस व वाढण्यास मोठे आवश्यक भाग आहेत तरी हे सर्व भाग मनुष्यास सुखाकरितां व

मौजेकरितां ईश्वराच्या निरनिराळ्या देणग्या आहेत.

## ईश्वराची सर्वव्यापकता.

वर खालीं, जेथें जेथें मीं पहातों तेथें हे प्रभू तुझें मार्ग दर्शविणारें बोट मला दिसतें, तें मध्यरात्रीचे ग्रह प्रकाशांत किंवा सकाळच्या धुक्यांत चकचकतांना मीं पहातों; जें जें सुंदर व शोभायमान तें तें केवळ तुझें परावर्तन आहे.

जो झंझा वायु सागरास क्षोभून टाकितो, त्यामध्यें मीं तुझा शब्द श्रवण करितों; व जेव्हां मजसभोंवती उन्हाळ्याची हवा फिरते तेव्हां ही तुझी चमत्कारिक शक्ती कमी आहे असें मला आढळत नाहीं. वादळ व शांति तुला प्रगट करितात कारण तूं सर्वत्र आहेस.

मीं तुला मध्यरात्रीस पाहातों, व प्रत्येक ताऱ्यास आपलें तेज जो दयेचा मोठा प्रकाशित गाडा वहातो त्यापासून प्राप्त होतें अश्या ताऱ्यांत मीं तुझें नांव वाचितों. प्रत्येक तारारूप माणिक, हे प्रभू तुझें चरणपीठ होय परंतु तुझा मुगुट नव्हे.

जेव्हां प्रकाशाच्या किरणमय गोळ्यानें डोंगराचीं शिखरें सोन्यानें मढविल्याप्रमाणें दिसतात तेव्हां त्या उजेडानें मनास धक्का लागून माझी व्याकुळ दृष्टि जे चमत्कार मीं पहातों तेणेंकरून चकित होते. तेजस्वी व शोभायमान असें जें तेजाचें किरण तें केवळ तेथें तुझी जिवंत छाया आहे.

रात्रीचा शांत मध्य प्रहर, तीनसानची वेळ व तुषारमय प्रातःकाळ हीं सर्व तुझीं आहेत. जें जें सुंदर व चकचकीत तें तें शोभा देण्यास्तव तुझ्या हातांनीं बनावलें आहे. तुझी कीर्ति प्रत्येक गोलांत चालते व सर्व वस्तू सुचवितात "ईश्वर येथें आहे."

आननकृत.

---

# जीवजाती.

## भाग २

### पाठ—सातवा.

### प्राण्यांची साधारण रचना.

प्राण्याचें जीवन होण्यासाठीं वनस्पतीनें पृथ्वी कशी सिद्ध करून ठेविली हें आपण पाहिलें; व ती प्राण्यांनीं व्याप्त आहे असा आतां आपणास विचार करणें आहे. या प्राण्यास समष्टिरूपानें जीवजाती असें ह्मणतात. जशा धातू व मूळजाती आपल्या नियमाच्या स्वाधीन आहेत तसीच ही ही आपल्या विशेष नियमाखालीं आहे.

प्राण्याची मोठी संख्या व नानाप्रकार त्यांहींकरून पृथ्वी भरून गेली आहे ही ह्या व्यापृत दृष्टीखालच्या पसाऱ्यांत पहिली गोष्ट आपल्या मनांत भरते. प्रत्येक फूल व पान रहवास्यांनीं भरलें आहे व ते आपल्या खालच्या जमिनींत ही दडून असतात व जी हवा

आपणा सभोंवती आहे त्यांमध्यें ते भरले आहेत असें आपण पहातों. प्रत्येक पर्वत व पानथळ, जंगल व रान, समुद्र व सरोवर, नदी व तळें जीवंत प्राण्यांनीं गच्च भरून गेलीं आहेत. व प्रत्येक ठिकाणीं त्यांस आपल्या संरक्षणाकरितां ज्या आच्छादनाची आवश्यकता आहे तें सांपडतें. पाठाच्या दुसऱ्या पुस्तकाच्या पुरवणींत प्राणिमात्र विद्या विषयक अध्यायांमध्यें पशु व पक्षी यांचा साधारण वृत्तांत कथन केला होता. एथें सर्व जीवजातीच्या रचनेचा यथायोग्य विचार केला तर उपयोगीं पडेल. पूर्वी लिहिलें होतें कीं ज्यांस पाठीचा कणा आहे ( सपृष्ठास्थि ) व जे त्यावांचून आहेत ते ( निःपृष्ठास्थि असे दोन विभाग केले आहेत. पृष्ठास्थि युक्ताच्या चार जाती आहेत. पहिली-जे प्राणी आपल्या पिलांस पाजतात ते;(त्यांस सस्तन ह्मणतात.) दुसरी, पक्षी; तिसरी, उरःसर. चवथी मासे; ह्यांतील प्रत्येक जातीच्या उपजाती केल्या आहेत. सस्तनाच्या नऊ उपजाती आहेत.

उदाहरणें

दोनहाती···· ( द्विहस्त ) ····मनुष्य

चारहाती···· ( चतुर्हस्त)····माकड, वानर,नीळ,

मांसभक्षक··· ( मांसाशन)····सिंह, फेरेट, कुतरा, सील, इत्यादि.

पिश्वीदार····( पेशीवान्)····कंगारु, आपोझम,इ०

कुरतुडणारे·· ( )····उंदीर, रानससा पाणमाजर इत्यादि

बोचरे······ ( अदशन )··स्लॉथ, आरम्याडिलो

इत्यादि

जाड चांबडीचे..( घनचर्म )....डुकर, गेंडा, हत्ती,
घोडा, वगैरे

रंवथकरणारे.. ( रोमंथकारी ) उंट, बैल, हरिण, गि-
राफ, मेंढा इत्यादि.

मगराप्रामणें.. ( मकराकृति ) मगर, गाहा, मनाटी, इ०

पसंत केलेल्या व्यवस्थेवरून पाहतां पक्ष्यांमध्यें पांच उपजाती आहेत. ह्यांतील दुसरीचे बहुधा दोन भाग करितात. असें दुसऱ्या पुस्तकाच्या पुरवणींत सांपडतें. उदाहरणें

भक्षाचे पक्षी..( मांसाहारी ) गिधड, गरुडपक्षी, ससाणा, घुबड इ०

काठीवर बसणारे व चढणारे ( यष्ट्यारोह निष्ट ) नुरी, राबिनपक्षी, कावळा, कोकिळा सुतार.

खरवडणारे.... (      )..कबुतर, कोंबडा, शाहामृग इत्यादि

पाण्यांतून चालणारे ( जलचर ) पाणबुडकी, कुकुवा, पाणलावा इत्यादि.

पोंहणारे.... ( जलतर ) ...राजहंस, हंस, भजना, बदक, वगैरे.

उरःसराच्या चार उपजाती केल्या आहेत. उदाहरणें.

१ कांसव.. ( कूर्मजाति )....कांसव व कूर्म.

२ पाल.... ( पल्लीजाति)....पाल, सरडा, सुसर.

३ सर्प.... (उरगजाति) ....सर्प, भुजंग, आर.

४ बेडूक.. ( मंडूकजाती )..बेडूक, न्यूट, चामरडेल, स्यालाम्यान्डर इत्यादि

ज्यांस हाडाचा पांजरा असतो व ज्यांस तरुणास्थि रूप पांजरा असतो अशा माशांच्या दोन जाति केल्या आहेत. हाडाच्या पांजऱ्याचे माश्यांच्या सहा उपजाती केल्या आहेत, पर्च, सामन्, व्हैटिंग, निवटा, पोक, व पैप मासा हीं उपजातीचीं घरगुती उदाहरणें आहेत. तरुणास्थिरूप मास्यांच्या तीन उपजाती आहेत; उदाहरण त्यांतील पहिली स्टरजियन्, दुसरी रेव शार्क्, तिसरी ल्यांप्रे इत्यादि. ज्यांस पाठीचा कणा नसतो त्यांचे मुख्य तीन भाग आहेत त्यांतून प्रत्येकांत पुष्कळ प्रती आहेत.

१ मऊ प्राणी ..( मृदुजीव ).. समुद्रकफ, गोगलगाई, गांडूल, काळवें, शिंप्या, वेलक्स्, पेरिविंकल् इत्यादि.

२ सांधीव प्राणी ( संधितप्राणी ) खेंकडी, कोळी, जीववजंतू, किडे.

३ किरणासारिखे प्राणी ( किरणाकार ) खरपा, गलगल, पोटांतील जंत, पोवळ्याचे किडे, व इतर बारीक जीवजंतू.

जीव जातींतील प्रत्येक जातीचे लहान लहान समुदाय केले आहेत त्यांस कुटुंबें ह्मणतात व ह्यांतील प्रत्येकांचे त्यांहून ही लहान समुदाय केले आहेत त्यांस गण ह्मणतात; त्यांत अमुक सांसिद्धिक गुणांत मिळणाऱ्या जाती असतात. उदाहरण कावळा, रेवन व डोमकावळा हे सपृष्ठास्थि ह्मणून जो

भाग मागें सांगितला त्यांतील आहेत. त्यांतील दुसरी जात पक्षी, ह्या जातींतील दुसरा प्रकार काठीवर बसणारे, कारविडी या कुटुंबाचे व कारव्हस, ह्या गणातील ह्या तीन मुख्य जाती होत.

धडापरिमित असल्यामुळें सविस्तर रचना दर्शवितां येत नाहीं; परंतु अशी आशा आहे कीं सिद्ध पदार्थ विज्ञान्यानीं जो बेत चालविला आहे त्याचा साधारण आशय वर जें सांगितलें त्यावरून समजेल.

हें सांगण्यास ठीक आहे कीं ऐयर्लंड हें तेथील विद्यार्थ्यांस आपल्या देशाच्या प्राण्यांविषयीं विचार करण्यास व त्यांची व्यवस्था करण्यास मोठें क्षेत्र आहे. त्या देशांत रानटी प्राणी आढळतात त्यांची संख्या खालीं सांगितल्याप्रमाणें आहे—सस्तन २९; पक्षी २३५; उर:सर ५; मासे १५२; मृदुप्राणी ५३०; सांधिव प्राणी ४००० रांवर; व किरणाकृति प्राण्यांत बारीक जीवन धरितां ५०० वर आहेत. ह्याप्रमाणें आसमंतात् बहुत करून ५४५१ प्राणी आहेत. त्यांतील शेंकडो ऐयर्लंडामधील प्रत्येक शहरांत आढळतील.

ह्या भागांतील फारच चमत्कारिक पशु व पक्ष्यांच्या मनोरंजक गोष्टीपूर्वीं कथन केल्या होत्या. आतां त्यांच्या आश्रयाकरितां व संरक्षणाकरितां ईश्वराने जी सामग्री करून ठेविली आहे त्याविषयीं आपण बोलूं.

# पाठ आठवा.

## प्राण्याचें आच्छादन.

प्राण्यांच्या रचनेचा कोणताही भाग जसा आश्चर्य करण्यास योग्य आहे त्याचप्रमाणें त्यांचें आच्छादन ही आहे; कारण तें त्यांच्या भिन्न भिन्न प्रकृतीस योग्य असून अनेक प्रकारचें आहे. आपणास सड, केंस, लोंकर, लंव, पिसें, नळयाची पिसें, कांटे आणि खवळें मिळतात; असे पदार्थ व आकार व दोहोंचे नानाप्रकार असतां ही एखाद्या प्राण्यांचें आच्छादन उघड त्याचें वाईट केल्याशिवाय आपल्याच्यानें बदलवत नाहीं. आपणास हें ही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं हीं आच्छादनें बहुत्येक प्रसंगीं कवच व पोशाक ही होतात; तीं संरक्षणाकरितां आणि उबेकरितां योजिलीं आहेत. नग्न असा काय तो एक मानवी प्राणी मात्र आहे व जो स्वतः आपणास आच्छादूं शकतो. ह्या एकाच गुणामुळें मानवी प्राण्यास सर्व देशांत व ऋतूंत राहातां येतें. त्याच्या राहाण्याच्या स्थितीप्रमाणें तो आपल्यास हलकें किंवा उष्ण आच्छादन करूं शकतो. जर तो आपल्या पाठीवर मेंढ्यासारिखा लोंकर घेऊन झाला असता तर त्यास थंड हवेमध्यें जरी सुख झालें असतें तरी उष्ण प्रदेशामध्यें तिच्या त्या ओझ्यानें व उबेनें तो गांजला असता.

असें असतां ज्या प्राण्यास कलेचा उपयोग करितां येत नाहीं त्याकरितां ईश्वरानें बहुत्येक प्रसंगीं करून ठेविलें आहे. त्यांच्या गरजेप्रमाणें त्यांचीं

आच्छादनें आपोआप बदलतात. जीं मोठीं चतुष्पद जनावरें लवेनें आच्छादिलीं आहेत त्याविषयीं विशेषेंकरून हा प्रकार आहे. रानटी व गांवठी ससाच्या कातड्याचा प्रत्येक व्यापारी हिंवाळा आला असतां कसी लोंकर दाट होते हें जाणतो. असें वाटतें कीं जनावराच्या सुखासाठीं उष्ण प्रदेशांतील लोंकरीचे केंस होतात. परंतु ध्रुव प्रदेशांतील कुत्र्याचे केंसाची लोंकर होते किंवा त्यासारिखी काहींसी होते.

पक्ष्याचें आच्छादन त्याचप्रमाणें आश्चर्यकारक आहे. त्याचा हलकेपणा, त्याचा गुळगुळीतपणा, त्याची ऊब, पिसांचा पाठीमागें कल, त्याच्या पाठीच्या कण्यासभोंवतीं लोंकर, त्याचें एकावर एक कांठ तसाच त्यांचा नानाप्रकारचा रंग, हें सर्व मिळून त्या पक्ष्याच्या जीवास इतका सुंदर व योग्य पोषाक होतो कीं मला वाटतें ज्याणें तो पाहिला नसेल त्यास त्याविषयीं कल्पना सुद्धा करवणार नाहीं.

## पाठ नववा.

### प्राण्यांच्या संरक्षणार्थ केलेलें साधन.

प्रत्येक प्राणिमात्राचे जातीला तिच्या प्रकृतीस जें अन्न पाहिजे तें मिळविण्याकरितां, भक्षणाकरितां, पाचन करण्याकरितां, तसेंच संरक्षणाकरितांही उत्तम साधनें दिली आहेत असें आपण पाहतों. जनावरें जीं तृण आणि धान्य यांवर उपजीविका करितात ( ह्मणून ज्यांस तृण भक्षक असें ह्मणतात ) त्यांस अन्न चावण्यास्तव योग्य असे रुंद व चपटे दांत

ह्मडें व मांस यांच्या एकामागून एक अशा पंक्तीनें रचिले आहेत. त्यांतून कित्येक जीं रंवथ करितात त्यांस ह्मासाठीं योग्य असे जठराग्नी असतात, परंतु त्यांचें अन्न त्यांचे पायाखालीं असतें ह्मणून तें घेण्यास त्यांस त्यांच्या अवयवाची मदत लागत नाहीं. कधीं कधीं संरक्षण शस्त्राप्रमाणें घोड्यासारिखा त्यांच्या खुरांचा उपयोग होतो. तथापि त्यांच्या तंगड्या आणि पाय हे केवळ त्यांचें शरीर सांभाळण्यास व हिंडण्यास केले आहेत. कांहीं रंवथ करणाऱ्या जनावरांस रक्षणार्थ शिंगें आहेत, कित्येक टक्कर मारितात.

मांसाहारी पशूंचा पंजा आपला भक्ष ओढण्यास आणि धरण्यास चमत्कारिक रितीनें केलेला असतो आणि तो फाडून चुराडण्यास त्यास तीक्ष्ण दांत असतात. जर तुह्मीं माजरास गरीब लहान उंदिरावर उडीमारतांना पाहिलें असेल तर वाघ बिचारा हरिण किंवा बोकड यांस कसा धरितो ही कल्पना सहज करितां येईल. ( मांजर हें जरी नम्र आणि शांत दिसतें तरी तें व्याघ्र व सिंह यांच्या जातीचें आहे. ) (कुरतुडणाऱ्या जातीचे प्राणी) उ० गांवठी व रानटी ससे व उंदीर अशा प्राण्यांस कुरतुडण्यास योग्य असे दांत असतात. कुरतुडणें ही एक त्यांच्या खाण्याची रिती होय. डुकर व टेपर ह्या जनावरांस खळगे पाडण्यास व जीं मुळें ते खातात तीं उकरण्यास त्यांस मूस दिलेली आहे; तुह्मीं सर्व जाणत असाल कीं बटाट्याचे जमिनींत डुकर शिरला असतां किती लवकर नाश करील ! ईश्वरानें प्राण्याच्या शरीर रचनेंत त्यांचा आ-

श्रय व सांभाळ याविषयीं जी सामग्री उत्पन्न केली आहे त्याची हीं थोडीं उदाहरणें आहेत. जर त्यांना अक्कल ही दिलेली नसती तर हें सर्व निरुपयोगी झालें असतें. व त्यांस चारींतून चांगला चारा निवडण्यास व वाईट टाकण्यास अक्कल नसती तर गुरांस, चावण्यास दांत, पाचन करण्यास जठराग्नी आणि खाण्यास पायाखालचा चारा हीं सर्व साधनें व्यर्थ झालीं असतीं. जर त्यांना आपला आहार घेण्याची माहिती नसती तर मांसाहारी जनावराचे भक्ष्य धरण्याकरितां पंजे व फाडण्याकरितां दांत हे व्यर्थ होते. जें ज्ञान किंवा चातुर्य जनावरांस असतें त्यास प्रेरणा असें ह्मणतात. व्याघ्र इत्यादि मांसाहारी जनावरांची प्रेरणा त्यांस आहार मिळविण्याकरितां मुख्यत्वेंकरून प्रवृत्त करिते. हा आहार ह्मणजे मांस व तें बहूतकरून आपल्याहून श्रेष्ठ प्राण्याचें होय ह्मणून ते आपल्या बळावर पूर्ण विश्वास नठेवितां संध्याकाळीं अंधारांत भक्षासाठीं टपत बसतात, किंवा ते थोडक्या पाण्याजवळ जेथें गुरें आणि हरणें पाणि प्यावयास येतात असें त्यांस माहित असतें तेथें दिवसास पडून राहतात; आणि एकाएकीं वीस फुटींच्या अंतरावरून उडी मारतात. आपल्यीं बळीस भिवविण्याकरितां सिंहास त्याची प्रेरणा प्रवृत्त करिते अथवा जी गर्जना पृथ्वीच्या सपाटीवरून जावी ह्मणून डोकें टेकून तो करितो तेणेंकरून मैदानांतील गुरें व हरणें चरत असतात तीं सावध होतात व त्यांनीं ही ऐकली ह्मणजे तीं इतकीं घाबरतात कीं तेणेंक-

रून तीं इकडेतिकडे धावूंलागल्याने त्यांस सुलभे भक्ष्य होतात.

कितीएक पशूंची प्रेरणा त्यांस वासानें पारध करण्यास प्रवृत्त करिते. कुतरे, लांडगे, व कोल्हे ह्या प्रमाणें करितात. ते कळपांनीं पारध करितात तेणेंकरून त्यांच्यापेक्षां बळवान् शत्रूंवर ही त्यांस मोठा फायदा होतो.

परंतु आपलें स्वत:संरक्षण करण्याकरितां आणि लोकांवर हल्ला करण्याकरितां त्यांसएक प्रेरणा आहे. गुरें आणि हरिणें यांना आपल्या शत्रूपासून आपला कसा सांभाळ व्हावा हें माहित आहे. त्यांजवर जर संकट पडलें तर ते आपल्यावर चालून येणाऱ्याचें निवारण करण्याकरितां जमाव करितात. घोड्याची प्रेरणा त्यास मागल्या दुगाण्या झाडण्यास प्रवृत्त करिते आणि तो वारंवार कधीं कधीं सिंहाबरोबर लढून जय पावला आहे. हरणाची प्रेरणा त्यास मोठें संकट प्राप्त झालें असतां पाण्यामध्यें लपून नाक वर करण्यास प्रवृत्त करिते ह्मणजे त्यांचा वास पारध्यांस उमगत नाहीं. जेव्हां ससा आपल्या शत्रूपासून पळतो तेव्हां शत्रूनें वासानें आपला मार्ग शोधून काढूं नये ह्मणून मोठ्या चमत्कारिक रितीनें वांकडातिकडा धांवतो. बाहेर जाण्याच्या पूर्वी आपल्यावर कांहीं संकट आहे किंवा नाहीं हें तो आपल्या बुराकांतून डोकें वर करून पहातो. जसा सांसारिक मनुष्य आपल्याकरितां धान्याची सामग्री करून ठेवितो त्याचप्रमाणें कांहीं लाहान प्राण्यांस

त्यांची प्रेरणा हिंवाळ्याकरितां धान्याची सामग्री करण्यास प्रवृत्त करिते. खार आणि दुसरीं कांहीं जनावरें ह्याप्रकारचीं आहेत. बीव्हरांची प्रेरणा फार आश्चर्यकारक आहे, ते कसे बांध घालतात आणि परस्परांचें संरक्षणाकरितां आणि मंडळीकरितां लहान खेडीं बांधितात हें पूर्वीं सांगितलेंच होतें. सर्व जनावरांची प्रेरणा असी आहे कीं त्यांस आपल्या पिलांला दुःखापासून राखण्यास प्रवृत्त करिते. सिंह आणि सिंहीण आपला प्राण आहे तोंपर्यंत आपल्या पिलांचे जीव रक्षण करितात. वाघीण माजरीसारिखी कधीं कधीं आपल्या पिलांस आपण मारिते परंतु दुसऱ्यापासून त्यांचा सांभाळ करिते. सौम्य जनावरें, मुख्यत्वेंकरून गुरें, जेव्हां हीं रानटी स्थितींत असतात तेव्हां तीं आपल्या लहान पिलांच्या संरक्षणाकरितां फार काळजी बाळगितात. जेव्हां गाई एकादें संकट आपल्या वासरावर येतानां पाहाते तेव्हां ती त्यास झाडीमध्यें मोठ्या काळजीनें लपविते. ज्यांस कुत्र्याविषयीं पुष्कळ माहीत आहे त्यांस असें आढळतें कीं त्यांची प्रेरणा बुद्धि जवळ जवळ आहे आणि त्याचप्रमाणें हत्तीचीही ह्मणतां येईल. मोठ्या ममतेस पात्र असल्यामुळें ते आपल्या प्रेरणाशक्तीनें आपल्या धन्यास अथवा त्याचे मुलांस सांभाळतात. तुह्मास तुमच्या वाचनाच्या क्रमांत या विश्वासूपणाच्या प्रेरणेचीं उदाहरणें ज्या गोष्टी वाचाल त्यावरून दिसून येतील.

# पाठ दाहावा.

## पक्ष्यांची प्रेरणा.

पक्ष्यांची प्रत्येक जाती आपआपले घरोटे बांधण्यांत एक चमत्कारिक युक्ती करिते आणि त्या जातीचे सर्व त्याच युक्तीनें काम चालवितात असें आपण पाहातों. जर कावळ्याचें अंडें तुह्मी कोंबडी खालीं ठेविलें आणि त्यानें आपले स्वजातीचे घरोटे कधीं पाहिले नसले तरी तो त्यासारिखाच घरोटा काठ्या रचून बांधील. असें जें काम करायास प्रवृत्त करिते ती प्रेरणा होय. जर ती बुद्धि असती तर आमच्या घराप्रमाणें त्यांच्या निरनिराळ्या सोईप्रमाणें त्यांचे घरोटे भिन्नभिन्न असते. पुन: आपण पाहातों कीं आईबापांची प्रीति आपल्या संततीवर जोंपर्यंत चालू असते तोंपर्यंत जरी अतिशय असते तरी त्यांच्या संरक्षणास तिची गरज नाहींसी होतांच तीं त्यांजवरील प्रीति कमी करितात आणि त्याचें पोषण त्यांजवरच सोंपवितात. याकरितां ही प्रीतिच प्रेरणा होय; आणि ही एक चमत्कारीक गोष्ट आहे कीं जरकरितां लहान पिलांच्या रक्षणार्थ या प्रीतीची गरज असली तर ती तिच्या योग्यकाळापेक्षां अधिक लांबवितां येते. जे पक्षी आपलीं पिलें चरितार्थ चालविण्यास समर्थ होतांच हाकलून लावून देतात, तेच जर तीं घरोट्यांत अथवा पिंजऱ्यांत अडकवून ठेवलीं असलीं तर त्यांस चारा कांहीं अधिक वेळपर्यंत चा-

रितात. बुद्धि आणि प्रेरणा यामध्यें फार मोठें अंतर आहे. प्रेरणा विरहित असें एक जनावर घेतलें तर त्याची बुद्धिभ्रष्ट झाली आहे असें तुह्माला आढळेल. उदाहरण कोंबडी आपल्यास योग्य जागीं पुरविण्याकरितां किती सावधगिरी वागविते! जेव्हां ती अंडीं घालिते तेव्हां त्याविषयीं किती काळजी घेते! जेव्हां ती आपलें अन्न आणण्याकरितां त्यांस सोडून जाते तेव्हां तीं थंड होण्यापूर्वीं कसी वेळच्या वेळेस परत येते! ती वारंवार त्यांजवर बसल्यानें अन्नावांचून केवळ व्याकुल होऊन जाते! अंडें फोडतांना पिलांकडे किती लक्ष देऊन ती त्यांस मदत करिते! मग किती सावधगिरीनें हवेपासून त्यांस राखिते आणि कसें अन्न टिपण्यास शिकविते! जर योग्यवेळीं तिच्या पिलांनीं दर्शन दिलें नाहीं तर ती आपला घरोटा सोडील हें सांगावयासच नको. परंतु हें सर्व उघड दिसणारें शाहणपण असतां कोंबडी विषयीं जर दुसऱ्या रीतिनें विचार केला तर तिला विचाराचा अथवा ज्ञानाचा लवलेश नाहीं. अंडें असें समजून त्याच रितीनें खडूच्या तुकड्यावर बसते; ती जितकीं अंडीं घालिते तीं वाढलीं किंवा कमी झालीं याविषयीं अज्ञानी असते. ती आपल्या स्वताच्या पिलांस अथवा दुसऱ्याच्यांस ओळखत नाहीं परंतु त्या परक्याचें पालन आपल्या स्वताच्याच प्रमाणें करिते. प्रत्येक गोष्टीमध्यें जेव्हां ती आपले स्वताचे आणि आपल्या जातीचे रक्षणासाठीं कांहीं काळजी बाळगित नाहीं तेव्हां ती केवळ मूर्ख आहे.

# पाठ अकरावा.

## उरःसर, मत्स्य आणि मगर.

प्राणिमात्रांतील द्विपद व चतुष्पद यांतून कोणत्याच प्रकारच्या नाहींत अशा प्राण्याच्या कितीएक मोठ्या जाती आहेत त्यांविषयीं अजून वर्णन केलें नाहीं. ह्यांतील उरःसर हे आहेत. त्यांचें रक्त थंड व त्यास पिसें आणि केंस नसतात एवढ्यावरून ते माशासारखे आहेत. परंतु ते हिंवाळ्यांत थंड देशांत अचेतन होऊन राहातात तसे मासे राहात नाहींत, कारण पाण्यामुळें ते अतिशय थंडीपासून बचावतात आणि ह्यांतून बहुत्येकांस पाय असतात तसे माशांस नसतात. उरःसरांच्या चार मोठ्या जाती आहेत.

पहिली, सर्प; दुसरी कांसव; तिसरी, पाल, ह्यांतच सुसर येतो; चवथी बेडूक. ह्यांतून कित्येक जरी पाण्यांत सर्वदा राहात नाहींत तरीं पाण्यांत जातात, उदाहरण सुसर इत्यादि. असें असतां या गोलावरील पाण्यांत पुष्कळ जीव आहेत ते जरी सर्व नाहींत तरीं मुख्यत्वेंकरून मासे आहेत.

## मासा.

मासा हा हंगड्यावांचून प्राणी आहे; त्याला सांधीव पाठीचा कणा आहे आणि तो गाऱ्या ह्मणून डोक्याखालीं झालरीप्रमाणें एक पदार्थ असतो तेणेंकरून श्वास घेतो. माशांस हवेचा भाता (फु-

फुस ) आहे तो ते हवेनें जेव्हां, हलके होऊन सपा-टीवर येण्यास इच्छितात त्यावेळीं फुगवितात किंवा जड होऊन तळीं जाण्यास इच्छितात तेव्हां चेपतात. त्या फुफुसांची ऐसिंग्लास ( एक चिकट पदार्थ ) करितात. मासे फार जलदी पुष्कळ होतात एकाकाड ( सुरमी ) माशांचे गाबोळींत ह्मणजे आंड्याचे समुदायांत सुमारें ४० लक्ष आंडी सांपडतात. जर हीं आंडीं दुसऱ्या पुष्कळ जातीच्या प्राण्यांचें अन्न नसतीं व मोठेमासे लहान माशांस नखाते तर त्यांचे संख्येस पार नसता.

मास्यांस तीक्ष्ण दृष्टी व कर्णेंद्रिय हीं आहेत, परंतु वाचा नाहीं. कारण काड मास्यांचा इतका पुष्कळ समुदाय येतो कीं कांहीं मैलपर्यंत त्यांहीं करून समुद्र पांढरा होतो तरी त्या सर्व समुदायांतून सपाटीवर येतात त्यावेळीं त्याच्या शरीरानें जे शितोडे उडतात त्यांखेरीज दुसरा आवाज कानीं पडत नाहीं. मोठ्या श्यार्क ( घोळ ) पासून तो अगदीं लहान मिनो ( मोतकें ) पर्यंत सर्व आकृतींचे मासे आहेत.

ह्या प्राण्यामध्यें आपले व आपले अंडरूपी संततीचे रक्षणाकरितां प्रेरणेची कमताई आहे असें दिसत नाहीं; परंतु बहुत्येक जातीमध्यें आंडीं घातल्यावर पिलांविषयींची सर्व चिंता नाहींशी होते. आपलीं आंडीं घालण्यास नदीच्या वालुकामय पात्रांत कांहीं मासे अमुक ऋतूंमध्यें नियमित वेळीं खारें पाणी सोडून जातात. सामन हा मासा समुद्रांतून शेंकडो मैलपर्यंत नदीमध्यें पोहत येईल व पुष्कळ शत्रूस तोंड देईल इतकेंच नाहीं परंतु जे उंच कडे त्याच्या गता-

स प्रतिबंध करतील ते उलटून देखील येईल. त्याणे मोठ्या काळजीनें आंडीं घातल्यावर जर कोळ्यानीं जाळीं घातलेलीं असतात त्यांतून युक्तीनें तो बचावला तर परत समुद्रास जातो.

मासे मोठे प्रवासी आहेत. हेरिंग माश्याचे असंख्य कळप जे उत्तर समुद्रांत राहातात ते एकत्र होऊन आमच्या किनाऱ्यास दरसाल सफर करितात. मुख्य समुदाय जून महिन्यांत येऊन तो समुद्र पुष्कळ मैलपर्यंत व्यापितो. मासे धरण्यांत डच व इंग्रेजलोक गुंतले असतात व हेरिंग धरून त्यास धूर देऊन त्याचें लोणचें करितात व युरोपांत सर्व ठिकाणीं पाठवितात.

जे प्राणी समुद्रांत जातात किंवा राहातात त्यांची दुसरी जाती आहे तिला मकरजाती ह्मणतात ह्मणजे मगरजातीचे प्राणी होत.

सर्व प्राण्यांमध्यें फारच मोठा असा मगर, त्याची वस्ती अगदी खोल पाण्यांत असते. मगर आपल्या पिलांस पाजितो व त्याचें रक्त गरम आहे. परंतु मागील दोन पायाबद्दल त्यास शेपूट असून त्याचे पुढील पाय पोहण्याकरितां वल्याप्रमाणें केले आहेत. वेल(मगर)च्या पुष्कळ जाती आहेत. फारच मोठ्या मगराची लांबी ९० फुटी असते. त्याचें संरक्षणाचें शस्त्र शेपूट होय, तेणेंकरून तो फार मजबूत होडी फोडून हवेमध्यें वर उडवून देतो ह्मणून वेल धरण्यास फार संकट पडतें. वेलाची चरबी किंवा नादें फार उपयोगी आहे कारण कीं त्यापासून तेल निघतें. ज्यास वेलबोन

ह्मणतात तो त्याच्या हिरड्या सभोंवतील पदार्थ दंतस्थानी असतो. जो साधारण उपयोगांत येतो तो एका जातीचाच मात्र होय. जरी ह्या प्रकारचा वेल फार मोठा असतो व त्याचे तोंड कित्येक माणसें उभीं राहातील इतकें रुंद असतें तरी त्याचा घसा इतका अरुंद असतो कीं त्याच्यानें हेरिंगपेक्षां दुसरी कोणतीही मोठी वस्तु गिळवत नाहीं, व तो मुख्यत्वेंकरून हालव्यासारिख्या मृदु प्राण्यावर उपजीविका करतो, त्यांस गलगल ह्मणतात. ह्याप्रकारचे दुसरे कितीएक प्राणी आहेत ते समुद्रांत राहातात; त्यांतील गादा हा एक आहे. दुसरे कितीएक आहेत ते पाण्यांत वारंवार जातात परंतु त्यांतच सर्वदा राहात नाहींत-उदाहरण शील व वालरस. हे शेवटले मांसाहारी प्राण्याचे जातीचे आहेत मकर या जातीचे नव्हत.

# पाठ बारावा.

## कीटक, कोळी इत्यादि.

सर्व इतर जीवंत पदार्थांपेक्षां कीटक पुष्कळ आहेत. त्यांच्या स्वारीपासून एक कोन किंवा कोपरा मोकळा नाहीं. कितीही नाखुष असला तरी त्यांस अन्न व छाया देत नाहीं असा कोणताच प्राणी नाहीं.

दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे जातीपेक्षां ते प्रेरणेविषयीं फार प्रख्यात आहेत; दुसऱ्यांपासून त्यांचे स्थित्यंतरामुळें ते फार भिन्न आहेत; व त्यांच्या आ-

काराचा नानाप्रकार व रंगाचें सौंदर्ययांवरून ते दुसऱ्यापेक्षां वनस्पतीच्या सृष्टी जवळजवळ येतात.

जेव्हां आपण खादाड कीटकांचें खाणें पिणें, त्यांचेठायीं जें विष आहे तें, त्यांचे दुःखकारक दंश आणि केवळ ते शरिरावरून गेल्याने किंवा कानांत गुंगण्यानें जो थरकांप पशूंस आणि मनुष्यांस सुटतो ह्या सर्वांविषयीं विचार केला असतां जोंपर्यंत आपला सृष्टीच्या इतर भागाशीं संबंध आहे तोंपर्यंत अश्या प्रकारच्या प्राण्यांपासून कांहीं लाभ होणार नाहीं, व ते पृथ्वीवर पीडाभूत आहेत असें मानण्यास आपण प्रवृत्त होतों.

परंतु ईश्वराच्या कोणत्याही कृत्याविषयीं असा निर्णय करण्याच्यापूर्वी आपणांस थोडा पुढें विचार केला पाहिजे. जरी त्यांना फार क्षुधा आहे व ते कधीं कधीं मनुष्यांस व पशूंस आपली क्षुधा तृप्त करण्याकरितां जखम करितात तरी ते सृष्टींतील अतिशय खराब आणि विषमय पदार्थांचा देखील नाश करितात आणि अश्या रितीनें घाणीपासून हवा स्वच्छ राखण्यास आपणास मदत करितात. जरी ते आपलें अन्न खातात व आपल्या त्वचेस व कानांस तोडून तोडून घेतात तरी ते स्वतां पक्षी व मासे ज्यांवर आपली कांहीं अंशीं उपजीविका चालते त्यांस पुष्कळ अन्न पुरवितात आणि त्यांच्यांतून तीन जातीचे तर आह्मी ऋणी आहों; कारण आपल्यास रेशमाच्या किड्यापासून रेशीम, मधमाशीपासून मध व

मेण, आणि किर्मिजी रंगाच्या किड्यापासून आपल्या शिपायांची डगलीं जेणेंकरून ओळखतां येतात तो रंग, हीं सर्व प्राप्त होतात.

कीटकांस वास्तविक ह्मटलें असतां साहा किंवा आठ पाय असतात; डोकें व गळा पृथक् आहेत; लहान शिंगाप्रमाणें पुढें दोन स्पर्शेंद्रियें असतात त्यांस आंटिनी असें ह्मणतात; व श्वास घेण्यास वातनलिका असतात.

कीटक एका फारच चमत्कारिक गोष्टीमुळें दुसऱ्या प्राण्यांपासून भिन्न आहेत. त्यांजवर त्यांच्या आयुष्यांच्या निरनिराळ्या अवस्थेंत केवळ भिन्न प्राणी होण्याजोगे फेरफार घडत असतात जो लहान प्राणी आपल्या आयुष्याच्या एकवेळीं पाणी सांचलेल्या खळग्यांत राहाण्यास मात्र योग्य असतो, तो दुसऱ्यावेळीं पक्षयुक्त हवेंतील रहवासी होतोः हा प्रकार मत्सराचा आहे.

कितीएक कीटकांवर ह्या रूपांतरांतून दोन व कितीएकांवर तीन घडतात. प्रथम आंड्यांतून किडा येतो, त्यास लोक सुरवंट, कृमि, कीड इत्यादि निरनिराळीं नांवें देतात. ह्यास वस्तुतः लार्वा असें ह्मणतात. किडा आपल्या नेमलेल्या वेळेपर्यंत वांचल्यानंतर त्याचा बेडौल कमी होतो त्यास कोशवासी किंवा कोशस्थ ह्मणतात. हा कोशस्थ जमिनींत किंवा वृक्षाच्या मुळाखालीं गाडलेला किंवा एखाद्या अगदीं एकांत कोनांत रेशमाच्या किंवा दुसऱ्या कोणत्या ही पदार्थाच्या गुंडाळ्यांत गुंडाळलेला असतो, त्यांतून योग्यकाळीं पूर्ण प्राणी

ह्मणजे माशी, किंवा मोगर, किंवा तसर किंवा सुंदर पतंग पक्षी होऊन निघतो.

कोशवासी होण्यापूर्वी आपल्याकरितां हें आच्छादन किंवा गुंडाळें करण्यांत किड्याची प्रेरणा फार चमत्कारिक आहे. त्यानें आपल्यास स्वतः पुर्तेपणीं गुंडाळल्यानंतर तो आपला कोश झाडाच्या डाहाळीस एका दोऱ्यानें टांगितो. एका जातीच्या किड्यास रेशमाचा किडा ह्मणतात तो आपल्याकरितां रेशीम काढितो. त्यांतून सर्व रेशीम आपणांस मिळतें. असें ह्मणतात कीं एका गुंडाळ्यांतून ३०० वार धाग्याचें रेशीम निघतें. जो किडा रेशीम काढितो तो आपली उपजीविका तुतीच्या पानावर चालवितो. माश्या, मत्सर, मधमाश्या व गांधील माश्या व दुसरे पुष्कळ कीटक यांचीं दोनच रूपें होतात.

मध माश्यांची विशेषेंकरून आपला कृमि किंवा कोश याच्या काळजीविषयींची प्रेरणा फार चमत्कारिक आहे. त्याविषयीं तुह्मी दुसऱ्या ठिकाणीं वाचाल.

प्राण्यांच्या कितीएक जातीस कीटक ह्मणण्याचा प्रघात पडला आहे, परंतु त्यांवर हे चमत्कारिक फेरफार घडत नाहींत व त्यांस दुसरीं नांवें दिलीं आहेत.—उदाहरण कोळी व त्यांसारिखे दुसरे जीवजंतू आहेत. कोळी आपले भक्ष पकडण्याकरितां जीं जाळीं पसरतात त्यांच्या रचनेंत ते चमत्कारिक प्रेरणा दाखवितात. कोळी स्वशरिरांतून आपल्या जाळ्याचे दोर काढतो. जर एकाद्या कीटकानें एकाद्या धाग्यास स्पर्श केला तर तो हालतोसा त्यास वा-

टून तो आपल्या बळीस धरण्याकरितां लपलेला असतो त्या जागेंतून धांवत जातो. जर तो आपल्या शक्ती पलीकडे आहे असें त्याचे अनुभवास आलें तर तो आपल्या धाग्याने हळूच पुनः खालीं उतरतो. कितीएक कोळी आपला भक्ष सहज आपल्या स्वाधीन असावा ह्मणून जाळ्यांत त्यास गुंडाळितात. घर कोळी आपलें जाळें एकाद्या वहिवाट नसलेल्या कोनांत पसरतो तो एक लहान गुहाही करितो. तो तिचा त्याजबरोबर पुलानें संयोग करितो व जी दुर्दैवी माशी किंवा मुरकूट त्याच्या फासांत गुंतून जाते तिला आपल्या पुलावरून त्या गुहेंत नेतो.

दक्षिण **अमेरिकेंत** एक कोळी आहे तो कबुतराच्या आंड्याइतका मोठा आहे. नासलेल्या पन्हेरांत जो लहान किडा असतो तो ह्या जातीचा प्राणी आहे. त्याचप्रमाणें विंचूही होय. तो **युरोप** खंडाच्या उष्णप्रदेशांत आढळतो व त्याचा दंश फार दुःखकारक आहे.

**कोशदारप्राणी**—कोशदार ह्मणजे आंड्याच्या कवची किंवा पापोड्याप्रमाणेंच, परंतु ह्याहून कांहींशा कठिण आच्छादनाचे प्राणी होत. खेंकडीं, शेंवड व कोलंबी हे कोशदार असून फार मधुर भक्ष आहेत.

**मृदु प्राणी**—मृदु शरिराचे प्राणी बहुधा शिंप्यांत आढळतात, परंतु कोठें कोठें चामड्यासारिख्या झग्यानें आच्छादिले असतात, त्यांस मृदु प्राणी असें ह्मणतात. त्यांच्या शिंप्या रंगानें व आकारानें बहु-

धा फार सुंदर असतात. कालवें प्राण्यांच्या ह्या जातीचीं आहेत व किती एक जातीमध्यें मोत्यें असतात, त्यांचे दागिनें करितात ह्मणून त्यांस फारच किंमत पडते.

ह्या प्राण्यांतील बहुतेक, समुद्रांत किंवा ज्या खडकापर्यंत समुद्राचें पाणी येतें त्यांस जडलेले अथवा गोडया पाण्याचा सरोवरांत, आढळतात. परंतु त्यांतील किती एक प्राणी जे जमिनीवर राहातात ते आपल्या बागास फार नाशकारक आहेत. उ० गोगलगाई किडे इत्यादि.

**किडे**–किडे थंड रक्ताचे व दिसण्यांत नग्न असून उरःसरांच्या जातीचे असावे असे दिसतात; परंतु त्यांहून ते हलके प्राणी आहेत. त्यांस डोकें किंवा तंगड्याही नाहींत, किंवा ते कीटकाप्रमाणें ही नाहींत. जळू ह्या जातीचा एक प्राणी आहे.

**किरणाकृति प्राणी**–आपण आतां प्राण्यांच्या एका जातीकडे येतों. त्यांतील किती एक ताराकृति आहेत; व दुसरे वनस्पतींशीं इतकें सादृश्य पावतात कीं त्यांस चेतनात्मक वनस्पती ह्मणतात. असें आहे ह्मणून जीव जातीचें वर्णन समाप्त करितांना आपणास असें दिसण्यांत येतें कीं ज्या विषयीं पूर्वीं वर्णन केलें त्या वनस्पती व जीव ह्यांचे स्वभाव अगदी सारिखे आहेत.

त्या लहानकुत्याची ह्मणजे पक्ष्याच्या घरोट्याची रचना पाहून मला आश्चर्य होतें. आंतून व बाहेरून बरोबर लक्ष लावून पाहा; ज्याने तो केला त्याजवळ शस्त्र, कापण्यास सुरी, जडविण्यास खिळा, शिवण्यास दाभण, किंवा चिकटविण्यास सिरसही नव्हता; सर्व काय ती त्याची लहान चोंच होती; तरी तो कसा चांगल्या रितीनें तयार केला बरें! प्रत्येक कलाकौश्यल्याचें शस्त्र व साधन घेऊन निपुण होण्यासाठीं वीस वर्षेंपर्यंत उमेदवारी केली तरी कोणता चांगला हात असा दुसरा करूं शकेल?

हार्डिस कृत.

खाड्या व समुद्र, प्रत्येक कोळ व उपसागर असंख्य मास्याचे कळप किंवा समुदाय यानें भरून गेले आहेत. ते आपले पंख व प्रकाशित खवळांसुद्धा हिरव्या लाटे खालून जातात; ते समुदाय बहुधा मध्य समुद्रांत असतात. कितीएक एकटे व कितीएक मादी सहवर्तमान आपला चारा जी समुद्र वनस्पती त्यावर चरून पोवळ्याचे खडकांतून जातात, किंवा जलद उड्यामारून आपले तरंग सदृश सुवर्णबिंदूचे आंगरखे सूर्यास दाखवितात, किंवा खुशाल आपल्या मोत्यांच्या शिंप्यांत आपलें आर्द्र अन्न खातात, किंवा खडकाखालीं जोडलेल्या चिलखतांने अन्न मिळवण्याकरितां टपत बसतात; कितीएक आकृतीनें जड असतात, ते फार ओरडण्यानें व चालण्यानें सागरास क्षुब्ध करितात.

मिल्टन् कृत

## कीटकांची रचना.

जें सर्व ईश्वरानें उत्पन्न केलें त्यांत जें त्यानें चातुर्य ( अपार चातुर्य ) दर्शविलें त्याविषयीं विचार करणें व त्याच्या फारच सूक्ष्म हेतू मध्यें त्याच्या शक्तीची खुण मुद्रा शोधून काढणें हें फार सुख कारक आहे. दुर्घट योजना सोप्यारितीनें दर्शविली आहे, त्यांतील सौंदर्य खुल्या नजरेस दिसत नाहीं. त्यानें यथायोग्य अवयव व लवणारे सांधे, एका बिंदूच्या लहानश्या विस्तारांत स्नायू व तंतू अद्भुत रितीनें गुंफिले आहेत; त्याचें मोठें कृत्य त्यानें ह्मटल्याबरोबर होतें; तो अदृश्य परमेश्वर वस्तूंत क्वचितच प्रगट झालेला दिसतो; त्यास एक अणुरेणु ही मोठें क्षेत्र आहे; हजारो कीटकांच्या आकाराविषयीं आश्चर्य करणें हेंही सुखकारक आहे. किती एक किडे उबवून व किती एक देहांतर पावून होतात; त्यांस नवा देह प्राप्त होतो व तेजस्वी देखावे पहावयास मिळतात; ते एकावेळीं पृथ्वीवर असतात व दुसऱ्या वेळीं हवेंत तरंगतात; जर त्यांस जाडी व आकार असता तर त्यांच्या आकृतीवरून कल्पना करवेल त्या पेक्षां ही ते भयंकर शत्रु झाले असते; त्यांची आरमारा प्रमाणें डोकीं असून तीं सर्पा प्रमाणें खवळानीं शोभिवंत असतात, व ज्या पुष्कळ लक्षावधींचा आतां निर्भयपणें धिक्कार करितां येतो ते मनुष्याच्या उत्तम जन्माचे मोठेपणास वेडावते, त्याच्या किल्ल्यास धिक्कारिते व पृथ्वी लोकहीन करते.

कौपरकृत

# पाठ तेरावा.

## सृष्टीचा निर्माणकर्ता ईश्वर.

सर्व वस्तूंत जो एक आत्मा असून व्यापार करितो तो ईश्वर होय. जंगलांतील सौंदर्यै त्याचीं होत, त्यांहींकरून एकांतस्थळ फार शोभा पावतें; तेथें त्यांस कोणी पहात नाहीं; व ज्या सुंदर आकारांत लागवड शोभा पावते ते त्याचे होत. तो तेजस्वी समारंभ मार्गास लावितो; व वर्षांची सर्व रचना रचितो; तो हिंवाळ्यानें सीमेच्या बाहेर जाऊं नये ह्मणून सीमा करितो व त्याचा तीक्ष्णवेग मोडितो; अशाप्रसंगीं जर तो खरबरीत व रानटी झाला असला तर तो कोवळ्या कोमास इजा न होई अशा अप्रतिम कृतीनें त्यास रक्षितो, व एक फुलांचा ऋतु सुकून मरून गेल्या पूर्वीं पुढल्याचे तेजस्वी चमत्कार योजितो. सर्वांचा प्रभु स्वतः सर्वांत पसरलेला आहे, तो सर्व चालवितो व जें सर्व जीवंत आहे त्याचें जीवन तो होय. सृष्टि हें केवळ कार्य आहे त्याचें कारण ईश्वर आहे. त्याचाच तो आत्मा कीं ज्यानें रक्तबंबाल भ्रुकुटीनीं दाट कांटे स्वीकारले; तो सर्व सृष्टीचें राज्य करितो! त्याच्या अप्रतियोगी कुंचीचे डाग, पट्टे, किंवा चट्टे, पडले नाहींत असें एकही फूल नाहीं. तो त्यांस मधुर सुवास व रंग देऊन त्यांचें डोळे अमृतानें धुतो व समुद्रावर रेती इतके असंख्य कणाचे आकारानीं सर्व पृथ्वीभरून टाकिली आहे. जो त्याजबराबर चालतो तो धन्य! त्यास फळांत कि-

वा फुलांत मधुरपणा व सुवास जो आढळतो, किंवा मोठ्या ओकझाडापासून जी सूर्य किरणांत हिरवी पात चकचकते, तेथपर्यंत जें कांहीं सृष्टींत मोठें व सुंदर दिसतें, तेणेंकरून ईश्वर विद्यमान आहे अशी स्मृति मनांत होत्ये.

कौपर कृत.

## एक कल्पित गोष्ट.

दोनमुलें एकेदिवशीं संध्याकाळीं आपल्या आईबापांपाशीं असें बडबडलीं, "अगेआई, त्या वादळी ढगाकडे पाहापाहा! त्याचें शाई सारिखें अंतःकरण कश्यानें झांकलें आहे बरें? मला तें इतकें काळें दिसतें कीं, खचित सांगतों, तें पाहावयास मी अगदीं कांपतों." "आणि बाबा, बाबा, तीं दुसरीं तांबुस व सोनेरी रंगांचीं आतां पाहा. त्यांचा रंग किती सुंदर व चकचकित! मी ही तेथें वर असतों, तर बरें झालें असतें. कारण कीं जर तीं येथून इतकीं चांगलीं दिसतात तर कोणी जवळ असेल त्यास कशीं असावीं बरें!" (हांसत) बाप ह्मणाला, "मुलांनो, मी डोंगराच्या उंच बाजूवर चढून थोडावेळ ढगांमध्यें गेलों होतों. तेथून तीं फार दूर नव्हतीं व जवळून पाहिलीं तों मला कबूल केलें पाहिजे कीं ढगें कावरीं असून छायेमध्यें एकमेकाहून कमी जास्त नाहींत, परंतु प्रत्येक आपल्या बधूंप्रमाणें रंगांत आहे. व जें ढग तुह्मास इतके काळें दिसतें तेंच दुसऱ्या कोणास सोनेरी रंग धारण करितें असें दिसतें. त्याच प्रमाणें माझ्यामुलांनो, ज्यांस दैवाने हलक्या

स्थितींत ठेविलें आहे ते दुरून आपल्या राजांस पाहून ते किती अद्भुत प्राणी आहेत असें आश्चर्य करितात 'अरेरे किती जुलमी! भयंकर नसीब! त्याच्या अपराधांनीं आमच्या जमिनींत अंधार केला आहे.' "काय जुलमी! नाहीं नाहीं, हा शूर आपल्या सर्व सुखाचा तेजस्वी उगम आहे.' परंतु जे जादु वाल्याच्या मंडळींत राहतात ते सूक्ष्म रितीने पाहून जाणतात कीं कितीएक लोकांकडून आपल्या मंडळीची वाहावा होते व दुसऱ्याकडून हेलना व धिक्कार होतो, ह्मणून जसी जादू साधारण डोळ्यांस दिसते त्या प्रमाणें ती फार खालीं जात नाहीं किंवा उंच होत नाहीं. ज्यास आपली मंडळी शूर, व शत्रु ज्युडस किंवा निरो मानितात ह्मणजे तो अद्भुत योग्यतेचा पुरुष किंवा ज्याचें पृथ्वीला ओझें आहे असा नीच दरिद्री, त्यास आपला तेजस्वी किंवा काळा रंग दूरच्या व पक्षपाती लोकांच्या विचाराप्रमाणें प्राप्त होतो. कारण तीं काळीं किंवा सोनेरी नाहींत, परंतु प्रत्येक मध्यम काभरें आहे."

## प्राण्यावर क्रूरता.

जरी सुधारलेल्या रिती भाती व चांगली बुद्धि असली तरी अक्कल नाहीं असा जो मनुष्य किड्यावर निरर्थकपाय ठेवितो त्याचें नांव मी माझ्या मित्रांच्या यादीवर घालणार नाहीं. गोगलगाई मोठ्या रस्त्यावरून संध्याकाळीं रांगत असतां बेफाम पावलानें चिरडून जाईल; परंतु ज्यांस दया आहे त्यास सूचना केली असतां तो एका बाजूस होऊन त्या उरःसर

सजीवंत राहूं देईल. नाश कारक रांगणारा प्राणी, दृष्टीस त्रासकारक, विषानें भरलेला, असा आगत स्वागत नकरण्या जोगायेणारा, नीट व विश्रांतीस पवित्र अशा स्थळांत, मांडवांत, व खोलींत किंवा दिवानखान्यांत आला असतां त्यानें मरावें: आवश्यक कृत्यानें कांहीं दोष घडत नाहीं. जेव्हां आपल्या योग्य सीमेंत अपराधांचे दोषी नसून ते हवेंत असतात किंवा विस्तीर्ण मैदानांत खेळकरितात तेथें त्यानीं मरूंनये: तेथें त्यांस हक्क आहे, व जो तेथें त्यांस उपद्रव किंवा अपकार करतो तो दुष्ट कर्मांचा दोषी आहे; कारण तसें केल्याने ईश्वराच्या राज्याच्या व्यवस्थेंत अडथळा येतो; त्याणें जेव्हां त्यांस निर्माण केलें तेव्हां त्यांस राहाण्यास ठिकाण नेमून दिलें. सारांश – जर मनुष्याची सोई, आरोग्यता किंवा निर्भयपण हीं आंत आलीं तर त्याचे हक्क व अधिकार त्यांपेक्षां श्रेष्ठ आहेत ह्मणून त्यांचा अधिकार व हक्काह्यांचा नाश करावा; नाहीं तर ते सर्व ह्मणजे अगदी नीच आहेत ते देखील जसा प्रथम त्यांस उत्पन्न करण्यास ईश्वर स्वतंत्र होता तसे ते राहाण्यास मोकळे आहेत. त्यानें आपल्या राजकीय शाहणपणानें त्या सर्वांस उत्पन्न केले. यास्तव् तुह्मांनून ज्यांस दयाआवडते त्यानीं आपल्या मुलांस ही ती आवडेल असें शिकवावें. बहुत करून आपल्या वर्षांचा वसंत काल वाईट कृत्याचें अंकुरारोपण करून लवकर अपमान व हेलना पावतो. त्या वाईट कृत्यांस प्रतिबंध करण्यास चतुर हस्त पाहिजे. परंतु हर हर ! प्रतिबंध केला नाहीं तर क्रूरते

पेक्षां दुसरें कोणतें ही उद्दामपणानें वाढत नाहीं. त्यांतील ही क्रूरता तर फारच आसुरी होय. जो दया दाखवितो त्यावर दयाकरणें हा तिच्या कृत्याचा नियम व योग्य मर्यादा आहे, तेणेंकरून अपराधी मनुष्यास क्षमा करण्याविषयीं ईश्वरास कळवळा येतो; व जो दया दाखवीत नाहीं तो वयातीत होऊन आपण जें दुष्ट अचरण करितों त्याचें ज्ञान असून दया शोधूं लागेल तर त्यास आपल्या पाळीमध्यें दया सांपडणार नाहीं. कौपरकृत

# खंड २ – भाग १

## वर्णनात्मक भूगोलविद्या.

---

पाठ—पहिला.

### ब्रिटिश बेटें.

ब्रिटिश बेटें हीं ऐरिश व इंग्लिश लोकांस अत्यंत भूगोलाचा अतिशय मनोरंजक भाग आहे; व आपला जसा युरोपांतील देशांतून प्रवास करण्याचा बेत आहे तसा प्रवास स्वभावतः एथून चालू झाला पाहिजे.

ग्रेटब्रिटन नामें बेट इंग्लन्ड, स्काट्लन्ड आणि वेल्स यांहींकरून झालें आहे तें, व ऐर्लंड बेट व ऐरिश समुद्रांतील म्यानचें बेट व उत्तर किनाऱ्याच्या आसपासचीं पुष्कळ बेटें मिळून युरोपांतील ब्रिटिशराज्य झालें आहे. ह्या बेटांतील लोकांची भाषा, (निदान जे विद्वान् आहेत त्यां सर्वांची तरी) राणी व कायदे एकच आहेत आणि जरी ते धर्मोपासनेंत भिन्न आहेत तरी ते सर्व एकाच देवाची सेवा करितात व येशूच्या नांवानें आपणांस ह्मणवितात. जरी बळवान्लोक दुर्बळांवर जुलुम करित व दुर्बळ बळवानांचा धिक्कार करित असे एकमेकांच्या व्यवहारांत इतिहासावरून त्यांचे तंटे व अपराध कळून येतात तरी वर सांगितलेल्या गोष्टी त्यांस भाऊबंद करण्यास समर्थ आहेत; परंतु त्यांचे

कर्तव्यकर्मांचे चांगल्या ज्ञानावरून पुढील इतिहासास चांगल्या गोष्टी लिहिण्यास मिळतील.

ऐर्लंड हें ऐसलंड खेरिजकरून युरोपांतील कोणत्याही देशापेक्षां फारच पश्चिमेस आहे, व ज्या किनाऱ्यास आट्लांटिक महासागर येतो तो हा युरोपाचा पहिला किनारा. आणि तें सुंदर बेट आहे – नद्यांचे व सरोवरांच्या पाण्यानें भरपूर असून पुष्कळ उंच डोंगर, हिरवीं मैदानें व पिकाच्या चांगल्या जमिनी ह्यांहीं शोभा पावतें.

इंग्लंडापेक्षां एथील हवा फार सौम्य आहे, परंतु फारकरून वृष्टिमय व वादळी आहे, व उन्हाळ्याचे दिवस थोडकेच असतात.

तुह्मास माहित असेलच कीं ऐर्लन्डाचे चार प्रांत केले आहेत, व पुरातनकाळीं प्रत्येकास स्वताचा राजा किंवा सरदार असे. इंग्लन्डच्या समोर पूर्व किनाऱ्यावर जो लिन्स्टर प्रांत आहे त्यांत ऐर्लन्डची राजधानी डबलीन् शहर आहे. डबलीन् लिफी नदीच्या मुखाजवळ आहे व ती त्या शहराचे दोन भाग करित्ये. तिच्या किनाऱ्यावर दुकानानी भरलेले धक्के आहेत; एथें न्यायदरबारें व मांडवी जेथें व्यापाराचा कारभार चालतो अशीं हीं ठिकाणें आहेत.

डबलीन शहरामध्यें दुसऱ्या पुष्कळ सुंदर व प्रसिद्ध तस्याच उपयोगी इमारती आहेत. तेथें पेढी, लोकांकरितां डांकेची कचेरी, व माहाल ह्मणजे जेथें उमराव हकीम राहतो अश्या इमारती आहेत. तेथें हजारांवर मुलें शिकवितात अश्या तीन प्रजासंबंधिक शा-

ळा आहेत. शिक्षकां ( पुरुष किंवा स्त्री ) करितां ही शाळा आहेत, तेथें त्यांस तयार करण्याकरितां व त्यांची परीक्षा घेण्याकरितां सर्वोत्कृष्ट अध्यापक असतात.

डबलीन्मध्यें पुष्कळ मोलवान् धर्म कृत्याचीं ठिकाणें आहेत; मुख्यत्वेंकरून दवाखाने; तेथें आजारी व ज्यांस अपाय घडले असतात त्यांचा स्वीकार करून मोठे चतुर वैद्य व शस्त्रवैद्य त्यांस उपचार करितात. त्याच्या नजीक एक न बरे होणाऱ्या लोकांसाठीं दवाखाना आहे व त्या सभोंवती एक मोठी रमणीय बाग आहे अस्या ठिकाणीं त्यांस ठेवून त्यांचें हुशारीने व ममतेने पाळन पोषण करितात, तेणेंकरून स्वस्थपणाच्या स्थितीचें व ममताळू सोबत्यांचें त्यांस सुख प्राप्त होतें.

डबलीनच्या पश्चिमबाजूस फिनिक्स वाडा आहे. ती मृगयाभूमि फार सुंदर, झाडीने युक्त व चरण्याजोगीजागा आहे व लोक गाडींतून अथवा पायानें तेथें फिरावयास जातात. त्यामध्यें प्राणिमात्र विद्या विषयक*बाग असून ते फार सुंदर रितीने रचिले आहेत व त्यांत दुसऱ्या देशांतील पक्षी व पशू ठेविले असतात. वाघ व चित्ते घरांत ठेविलेले आढळतात; आस्वलें खाड्यांत, व त्यांस वर चढण्यास काठी असते; माकडें चांगल्या हवेंत तारेच्या लहान घरांत ठेविलीं असतात; व सर्व प्रकारचे चमत्कारिक पक्षीही दिसण्यांत येतात. कधीं कधीं प्रसिद्ध शाळेंतील विद्यार्थ्यांस ह्या बागांतून फिरण्यास परवानगी देतात.

डबूलीनूच्या नजीक ग्ल्यासूनविन् नामें खेड्यां-

---

* ह्मणजे प्राणिमात्रांचे ज्ञान संपादन घेण्याकरितां.

त आंधळ्यांस व बहिऱ्यांस बोटांनी बोलण्यास, वाचण्यास, व लिहिण्यास, व दुसऱ्या पुष्कळ गोष्टी करण्यास शिकविण्याकरितां एक शाळा आहे. जीं मुलें*माडेल शाळेंत शिकविलीं जातात त्यांस शेतकीचें काम शिकविण्यास एथें एक विस्तीर्ण शेत आहे.

पापलिन कापड, मखमाल व कांच अश्या कांहीं सुंदर वस्तु डबलीनांत होतात; व तेथें एकेवेळीं पुष्कळ कारखाने होते; परंतु कामगार लोक त्यांच्या बऱ्याच वेतनाने खुशी नसल्यामुळें आपण ठरावि-लेल्या दरापेक्षां कमी दराने काम करण्यास नाकारूं लागले, व तितके दर देण्यास मालकांस शक्ति नसल्यामुळें ते कारखाने मोडून गेले, व मालक आपला पैका व यंत्रें घेऊन दुसऱ्या ठिकाणीं गेले.

विकलो प्रांत सुंदर देखाव्याविषयीं प्रख्यात आहे, त्याखेरिज लिनस्टर प्रांत सपाट आहे.

ऐर्लन्डच्या उत्तरेस अल्स्टर प्रांत आहे; त्यापासून फार दूर नाहीं असी पूर्वेस एक खाडी आहे ती अरुंद ठिकाणीं २४ मैलांपेक्षां अधिक नाहीं, तिणे करून वियोग झालेला स्काटलन्डचा नैर्ऋत्य भाग आहे. एथील बहुत्येक लोक स्काटलन्डमधील लोकांच्या वंशाचे आहेत, व त्यांस स्काटलन्डच्या कांहीं मितव्ययीव उद्योगी रिती माहित आहेत.

बेलफास्ट हें ऐर्लन्डांतील व्यापार व हस्त कौशल्य ह्यां विषयींवें दुसरें प्रसिद्ध शहर आहे. तें बेलफास्टलफ नामें उपसागरांत आहे. कांच, लोखंड, साबू, दोर

* ही एका प्रकारची शाळा आहे.

व सर्व प्रकारचीं यंत्रें ह्यांच्या कारखान्याखेरीज येथें ताגाचें वस्त्र व कापसाचें वस्त्र ह्यांचे कारखान्याचीही मोठी जागा आहे. चार्लिसांवर आगबोटी बेलफास्ट बंदराशीं व्यापार करितात. सन १८५२ ह्या सालांत जीं तारवें येथें आलीं त्यांची संख्या ५८१३ इतकी होती.

आर्म्याज आणि लंडन्डरी हीं अलस्टर प्रांतांत दोन दुसरीं मोठीं शहरें वसलेलीं आहेत. ऐर्लंन्डाचा उत्तर किनारा उभार व खडकी आहे. आंट्रिम प्रांताच्या किनाऱ्यावर ब्यासाल्ट नामें खडकाचे पुष्कळ उंच स्तंभ आहेत, ते एकाठिकाणीं एका लहानशा भूशिरावर पुलाप्रमाणें सुमारें ७०० फूट लांब आहेत. ह्याला राक्षसी पूल ह्मणतात, कारण हे खांब इतके मोठे व उंच आहेत कीं ते तेथें राक्षसानें ठेविले आहेत असें मानित. परंतु आतां असें समजण्यांत आलें आहे कीं ज्या कारणानें धरणीकंप होतो तशाच कांहीं आंतील फेरफारानें ते झाले असावे.

पश्चिम किनाऱ्यावर कानॉट प्रांत आहे. तो रानटी प्रदेश आहे व तेथें ऐरिश भाषा पुष्कळ बोलतात; व कॉनिमरा ह्मणून एक सुंदर परंतु ओसाड प्रांत आहे, त्यांत तर विशेषेंकरून ती बोलतात. . तेथील लोक दुसऱ्या प्रांतांतील लोकांपासून निराळा पोशाक करितात. कानॉटच्या दक्षिण भागांतून मोठी श्यानॉन नदी दक्षिणेकडील मनस्टर प्रांतास वरील प्रांतापासून निराळाकरून व तिच्या ओघांत पुष्कळ सरोवरें बनाऊन वाहते.

मनस्टर प्रांत ऐर्लंन्डच्या दक्षिणेस पूर्वेपासून

पश्चिमेपर्यंत पसरला आहे; त्याच्या केवळ प-श्चिमेस किलर्नी नामें फार सुंदर सरोवरें केरी डोंगरांत आहेत. तेथें युरोपाच्या सर्व भागांहून परकीयलोक येतात. त्यांमध्यें जांभळीच्या झाडांनी शोभायमान अशीं सुंदर हिरवीं बेटें आहेत. त्यांस करवंदाप्रमाणें पावसाळ्यांत फळें येतात.

मनस्टर परगण्यांत पुष्कळ चांगलीं शहरें आहेत. पश्चिमेस शानन नदीवर लीमारिक आहे; पूर्वेस व किनाऱ्यास वाटर फोर्ड आणि दक्षिणेस समुद्राच्या कांठ्यावर कार्क हीं शहरें आहेत. ऐर्लन्डांतील कार्क हें दुसरें शहर असें मानितात व येथून पुष्कळ जीवंत प्राणी व लोणी रवाना होतात. त्यामध्यें कितीएक सुंदर प्रसिद्ध इमारती व बाजार आहेत व कार्कचें बंदर पृथ्वीवर एक सर्वोत्कृष्ट आहे.

ऐर्लन्डाचे दोन अति चमत्कारिक व स्वाभाविक देखावे त्यांतील मोठालीं सरोवरें किंवा मध्यसमुद्र आणि पानथळें हीं आहेत. पीट*पानथळें त्या जमिनीचा एक सप्तमांश वेष्टितात. आलेनचें मोठें पानथळ कितीएक परगण्यांपर्यंत आहे. हीं मोठालीं काळसर दिसणारीं मैदानें फार शून्याकार आहेत. त्यांतून कित्येक भागांचें पाणी काढून टाकण्याविषयीं व ती जागा बटाटे लावण्याविषयीं योग्य करण्याकरितां कांहीं मेहनत केली आहे.

ऐर्लन्डांतील लोक हुशार व शाहाणे आहेत.

---

* पीट हें एका प्रकारचें झाड आहे त्याहीं करून व्याप्त अशीं पानथळें.

पूर्वी ते फार मद्यपी व अज्ञानी होते; परंतु त्यांस आ-तां युरोपांतील एक अप्रमत्त प्रजा असें मानितात; व ते आतां सर्वोत्कृष्टरितीनें शिकले नाहींत तर मग तो त्यांचा अपराध आहे.

# पाठ-दुसरा

## इंग्लंड आणि वेल्स.

सेंटजार्जच्या खाडींतून गेल्यावर आपण ग्रेट ब्रि-टननामें बेटास पोचतों. तुह्मास माहित असेलच कीं इं-ग्लंडाच्या नैर्ऋत्य प्रांतांतील मिडल सेक्स नामें प्रांता-मध्यें टेम्सनदीवर त्याची राजधानी लंडन आहे. पृ-थ्वीमध्यें लंडन हें फार मोठें व समृद्धिमान् शहर आ-हे; त्याच्या शाखानगरांतील खेडीं व घरें मिळूनच बहुधा एक शहर होईल.

लंडनाचे खुद्द तीन भाग केले आहेत; ते येणेंप्र-माणें–सिटी ( ज्यास शहर असें ह्मणतात ) ह्मणजे ज्या-ठिकाणीं व्यापार व हस्तकौशल्यें चालतात ती जागा: वेस्ट मिनूस्टर–जेव्हां राणी साहेब लंडन शहरांत अ-सतात त्यावेळेस त्यांचे दरबाराची जागा, आणि सौथ वर्क किंवा बरो. वेस्टमिनूस्टरमध्यें पार्लमेंटचीं जीं दो-न घरें आहेत तीं टेम्सनदीवर आहेत. प्रजेविष-यीं इंग्लंड, स्काटूलंड, व ऐर्लंड एथील लोकांनीं जे-गृहस्थ निवडले असतात ते जेथें मसलत करण्याकरि-तां जमतात त्या ह्या जागा आहेत. मोठ्या डामडौ-लानें प्रत्येक वर्षी राणीसाहेब आपल्या दरबारांतील

मुख्य गृहस्थांस बरोबर घेऊन पार्लमेंट उघडण्यास (त्यास उघडणें असें ह्मणतात) जातात ह्मणजे त्यां-साठीं तयार केलेल्या गादीवर बसून प्रधानां-नीं आपल्या करितां भाषण लिहून ठेविलें असतें तें मोठ्यानें वाचितात. बर्कूस प्रांतामध्यें लंडन पासून कांहीं मैलांवर प्रख्यात विंडझरचा किल्ला आहे, तेथें वर्षांतून बहुतेक महिनेपर्यंत राणी साहेब रहातात. तो जुना चांगला किल्ला असून सुंदर व विस्तीर्ण झाडांनीं व्याप्त अशा प्रदेशांत आहे.

लंडन शहराच्या दक्षिणेचे व ब्रिटीश खाडीच्या किनाऱ्यावरील प्रांतांची जमीन बहुधा केवळ खडू-ची झालेली आहे. त्यांमधून लहान टेंकऱ्याच्या पुष्कळ रांगी आडव्या गेल्या आहेत त्या फोडून उ-घड्या पाडल्यावर फार चमत्कारिक दिसतात, कारण मग त्यांच्या बाजू बर्फासारिख्या पांढऱ्या होतात. केंटमधील मुख्य बंदर डोव्हर ह्याचे याप्रकारचे कडे आहेत, एथून फ्रान्सचा किनारा स्वच्छ हवेमध्यें साफ दिसतो. ईशा-नीकडील प्रांतांपैकीं केंट हा मोठा प्रांत आहे तो विला-यती आंबाडे (हाप्स) ह्यांच्या लागवडीकरितां प्र-ख्यात आहे. ते मोठाल्या शेतांत लावून काठ्यांवर चढवितात तेणेंकरून सुंदर देखावा मुख्यत्वेंकरून जमा करण्याच्यावेळीं दिसतो.

प्राचीनकाळीं ह्यांपूशायरचा बहुतेक भाग एका मोठ्या रानानें वेष्टिला होता, त्यास न्यू फारेस्ट (नवेरान) ह्मणतात. ह्याचा आतां ब-हुतेक भाग कापून टाकिला आहे. परंतु अजून ही

त्यास फार सुंदर व भरपूर रानवट देश व्हावयास बरेंच राहिलें आहे. ह्यांपूशायरमध्यें मोठें प्रख्यात शहर पोर्टस्मथ इंग्लंडांत लढाऊ जाहाजाकरितां मोठें बंदर आहे, त्यांच्या समोर वैट नामें बेट आहे, तें सौंदर्य व सौम्य हवा ह्याविषयीं प्रख्यात आहे. इंग्लंडचे पूर्वेकडील प्रांत जे जर्मन सागराच्या किनाऱ्यावर आहेत, उदाहरण नार्फोक, सफोक, केंब्रिज, येसेक्स आणि लिंकान शैयर, ते दुसऱ्या सर्व इंग्लंडाच्या प्रांतांपेक्षां सपाट व एकसारखे आहेत. त्यांचे ओहोळ ओंगळ व स्तब्ध असून बहुतेक भागांत व विशेषेंकरून लिंकोन शायरमध्यें पूर्वीं देशभर पसरत, आणि पानथळ जागा करीत. तेथें हंसाचे मोठे कळप, पेनें व पिसें मिळावीं याकरितां, पाळिले होते. हीं पानथळें आतां सुकविल्यावरून इंग्लंडांत कितीएक समृद्धिमान् जागा झाल्या आहेत.

इंग्लंडच्या पूर्वेकडील मुख्य शहरांपैकीं नारविच, नार्फोकची राजधानी हें एक मोठें कलाकौशल्याविषयीं प्रख्यात शहर आहे व केंब्रिजमध्यें दोन मोठ्या इंग्रजी विद्यालयां ( युनिव्हरसिटी ) पैकीं एक विद्यालय आहे.

इंग्लंडच्या मध्यभागांतील प्रांत, बहुधा ह्मटलें असतां, समृद्धिमान् व फळद्रूप आहेत व त्यांत मोठमोठालीं पुष्कळ शहरें आहेत. आॅक्स फोर्ड शायरची राजधानी आॅक्स फोर्ड हें चांगलें जुनें शहर असून तेथें इंग्लंडांतील मुख्य दुसरें विद्यालय ( युनिव्हर्सिटी ) आहे. वारीक शायरमध्यें बार्मिंगह्याम ह्मणून

मोठें व आबादान शहर आहे. एथें लोखंड व तिखें ह्यांच्या वस्तू फार सुंदर व पुष्कळ होतात, व हें शहर पृथ्वीच्या बऱ्याच भागास त्या वस्तू पुरवितें. बर्मिंग ह्यामच्या आसपासचे लोक लोखंडाच्या कारखान्यांत ह्मणजे जी मिश्र धातू सांपडते तिजमधून लोखंड विस्तवांत वितळवून स्वच्छ काढलें जातें अश्या ठिकाणीं, कामास फार लागलेले असतात. रात्रीं विटांच्या भट्ट्या व धुरांडी ह्यांच्या ज्वाळा व धूर जिकडे नजर द्यावी तिकडे पसरलेल्यामुळें जाणूं काय सर्व देश जळतच आहे असा दिसतो.

डरबिशायरमध्यें लोक मुख्यत्वेंकरून तांब्याच्या व सिशाच्या खाणींत कामकरायास लागले असतात. त्या धातूंच्या यापरगण्यांत पुष्कळ खाणी आहेत. जरी एथील डोंगर फार उंच नाहीं तरी हा खडकी व पाहाडी देश आहे. तेथील अतिउंच डोंगरास पीक असें ह्मणतात. टेकऱ्या लांब, अंधारी, वांकड्या तिकड्या गुहांनीं भरल्या आहेत, आणि किती एक नद्या देखील आपल्या क्रमांत कांहीं ठिकाणीं जमिनीखालून वाहतात.

मध्यभागांतील बहुत्येक परगण्यांपेक्षां वेल्सच्या किनाऱ्याजवळील देश फारच पहाडी व रानटी आहे. हीयरफोर्डशायर व उर्स्टरशैयर ह्या जागा जांब व निवडुंग ह्याविषयीं प्रख्यात आहेत, त्यांपासून एका जातीची दारु करितात, ती जेव्हां जांबापासून करितात तेव्हां सैडर, निवडुंगापासून करितात तेव्हां पेरी असें ह्मणतात. रस्त्याच्या बाजूस पुष्कळ जां-

बाच्या व निवडुंगाच्या झाडांच्या रायी असून पावसाळ्यांत फळाने भरून जातात व वसंत ऋतूंत मोहराने पांढरीं होऊन जातात.

इंग्लन्डाची उत्तर, मध्य व दक्षिण या दोहोंहून फार भिन्न आहे. लॉंकूशायर आणि यॉर्कूशायर हीं दोन शहरें व्यापार व कसब ह्याविषयीं मुख्यत्वेंकरून प्रसिद्ध आहेत. यॉर्कूशायर येथील जिन्नस लोकरीचें वस्त्र, सुऱ्या, व कातऱ्या, आहेत; शफिल्डमधून पृथ्वीच्या कित्येक भागांत शस्त्रादिक पुरविलीं जातात. यॉर्कूशायरमध्यें हंबर नदीच्या मुखाजवळ फार अगत्याचें शहर हल्लनामें बंदर आहे.

लॉंकाशायरमध्यें फार प्रख्यात शहरें लिव्हरपूल व म्यांचेस्टर हीं आहेत. इंग्लन्डांतील मोठे कापसाचे कारखाने म्यांचेस्टरमध्यें आहेत. लिव्हरपूल हें व्यापाराचें प्रख्यात बंदर ह्मणून सर्वांस माहित आहे.

कंबर्लन्ड व वेस्टमोर्लन्डचे प्रांत अगदीं डोंगरांनीं व्यापून गेले आहेत, त्या डोंगरांत पुष्कळ सुंदर सरोवरें आहेत व इंग्लन्डांत काय तीं तींच सरोवरें. ह्यांतील फार मोठ्या सरोवरास वुइंडूर मियर असें ह्मणतात. ह्या प्रांतांत स्लेटी ( पाट्या ) च्या खाणी आहेत, व वेस्टमोर्लन्डमध्यें केनूडालच्या नजीक एका खाणींत ज्या काळ्या सिशाच्या लेखण्या करितात तें सांपडतें.

इंग्लंडाच्या ईशानीकडील भागांत डेव्हनूशायर ह्मणून फार पहाडी प्रांत असून कोठें कोठें फार सुंदर आहे. इंग्लंडांत पोरट्स्मथच्या खालोखाल

तारवांकरितां, त्याच प्रांतांत प्लीमथ नामें बंदर आहे. इंग्लिश खाडीच्या त्या भयंकर भागापासून तारवांस सूचना करण्यास समुद्रामध्यें कांहीं मैलांवर प्रख्यात येडिस्टन ह्मणून दांडी ( लाइट्हौस ) तेथें बांधिली आहे.

इंग्लंडांतील फारच पश्चिमेकडील प्रांत कारनूवाल आहे. तो ज्या ठिकाणीं डेव्हनूशायरास जोडला आहे त्या खेरीज त्याच्या सर्व बाजू समुद्रानें वेष्टिल्या आहेत. ( ग्रानिट ) काळ्या खडकाचें टोंक जे अट्लाँटिक् महासागरांत गेलें आहे त्याणे त्याची सीमा झाली आहे व त्यास ल्यांड्झएन्ड असें ह्मणतात. तें इंग्लंडांतील एकच काय तें टोंक ज्याचें अट्लांटिक महासागराकडे तोंड आहे व तें इतकें उजाड व थंड आहे कीं त्यांत समुद्रांतील पक्षीमात्र राहूं शकतात. कार्नवाल कथलाच्या खाणी व मासे ह्याविषयीं प्रख्यात आहे. वेल्स लोकांच्या जातीचे कारनिश लोक असून सुमारें एक शतकापूर्वीं वेल्स भाषेचाच एक प्रकार जी कारनिश भाषा तीते बोलत असत.

## वेल्स.

सेंटजार्जच्या खाडीच्या किनाऱ्यावरून इंग्लंडाच्या पश्चिमेस वेल्सची **प्रिन्सिप्यालिटि** आहे. असें ह्मणण्याचें कारण इंग्लंडचा राजा किंवा राणीच्या वडील पुत्रास **प्रिन्सआव्हवेल्स** ( वेलसचा राजपुत्र ) चा नेहमीं किताब असतो. त्याचे **उत्तर व दक्षिण वेल्स** असे दोन भाग केले आहेत.

जरी तो सर्व देश डोंगरी आहे तरी उत्तरेकडे तर फारच डोंगरी आहे; त्याची सर्व सपाटी खडबडीत व तीक्ष्ण टोंकानी भरून गेली आहे, त्यांतून फारच उंच टोंक स्नोडन हें आहे. ऐर्लंड प्रमाणेंच ह्या डोंगरांतील खिडी पांथळानीं भरल्या आहेत. झरे व ओढे डोंगराच्या बाजूनें वाहातात किंवा एका खडकावरून दुसऱ्या खडकावर पडतात त्यांस शुद्ध पिवळा रंग त्या खिडीवरून प्राप्त होतो. वेस्टमोरलंड शहराप्रमाणें बहुत्येक भागांत स्लेटी ( पाटी ) च्या खाणी आहेत व सर्व घरांवर व लहान झोंपड्यावर देखील स्लेटी घालतात, तेणेंकरून तीं फार नीट नेटकी दिसतात. दक्षिण वेलसमध्यें गुळगुळीत वाटोळे व हिरवे डोंगर कांहींसे उंच टेंकऱ्यांसारिखे आहेत, परंतु त्यांतून एकही स्नोडन इतक्या मोठ्या उंचीचा नाहीं.

ब्रिटनांतील सर्व रहवाश्यांवर जर्मनींतील लोकांनीं हल्ला करून त्यांस वेल्स येथें हाकून लावीपर्यंत तेथील लोक पूर्वी वेल्स भाषा जी वेल्सच्या सर्व भागांतील लोक बोलतात ती बोलत असत तरी इंग्रेजी भाषा शहरांतील लोकांस समजत होती. वेल्स लोकांचा वेष व चेहरा इंग्रेज लोकांपासून फार भिन्न आहे. तेथील स्त्रिया साफ चांगल्या व बर्फासारिख्या पांढऱ्या जाळीच्या टोप्यांवर पुरुषांच्या काळ्या चिवर जनावराच्या टोप्या रुमालानें गच्च बांधून बहुधा अस्मानी कापडाच्या बंड्या घालतात. त्या फारच निर्मळ, हुशार व उद्योगी असून त्यांचीं घरें व

शरीरें फार नीट नेटकीं असतात व एक पळही व्यर्थ जाऊंनये ह्मणून जेथें जातात तेथें आपणाबरोबर हातानें विणण्याचें काम घेऊन जातात. इतक्या त्या तत्पर असतात. त्या वारंवार डोक्यावर टोपल्या किंवा गांठोडें असतांना हातांत विणण्याच्या सुया घेऊन लोंकरिचे पायमोजे, कानटोप्या व ऊर्णा वस्त्राच्या दुसऱ्या वस्तू करितात.

वेल्सलोक संगीताचे फारच शोकी असतात. मोठें हार्प ( वीणा ) हें त्यांचे प्रियवाद्य आहे आणि बहुत करून प्रत्येक धर्मशाळेंत तें वाद्यवाजविणारा सांपडेल.

# पाठ तिसरा.

## स्काटलंड.

स्काटलंड देशाचे लोलन्डूस् ( हेट प्रदेश ) व हैलंडूस् (डोंगरी देश) असे भाग केले आहेत. त्याच्या नैर्ऋत्येकडील सर्व भागास लोलंडूस् ह्मणतात; कारण त्याचा बहुतेक भाग सपाट आहे.

इंग्लंड देशापासून लोलंडूस् चिव्हीएट टेंकऱ्यानीं विभक्त केलें आहे. नारथंबरलंड व सेंटज्यार्जच्या खाडीचा फांटा ज्यांमध्यें सालवे नदी वहाते त्यांच्या किनाऱ्यावरुन त्या टेंकऱ्या आहेत.

ऐरीश खाडीवरील प्रांत मुख्यत्वेंकरून सपाट आहेत, तरी आंतील कितीएक भाग पाहाडी आहेत. एथील लोक शिल्पिकामास फारच लागलेले असतात. स्काटलंडच्या पश्चिमेस मुख्य शहर ग्लयास-

गो हें आहे. तें लंडन व म्यानचेस्टर यां खालोखाल ग्रेट ब्रिटनांत मोठें शहर आहे, व तें व्यापार आणि कापसाचे कारखाने यांविषयीं प्रख्यात आहे.

दक्षिणेचे किंवा किनाऱ्यावरील प्रांत असें ज्यांस ह्मणतात ते खडकी व ओसाड आहेत. विशेषेंकरून राक्सबर्गशैयर फारच पहाडी आहे. हे प्रांत मेंढे चरविण्यास मात्र यथायोग्य ठिकाणें आहेत. ह्मणून तेथील बहुतेक लोक धनगर किंवा मेषपाल आहेत. मिडलोथीयनच्या परगण्यांत स्काटलंड देशाची एडिंबरो राजधानी आहे. तें सुंदर शहर तीन उभ्या कड्यांवर बांधलें असून जर्मन समुद्राचा फांटा (फोर्थची खाडी) तिजपासून फार दूर नाहीं. एडिंबरो शहराचें जुनें व नवें शहर असे दोन भाग केले आहेत. जुनें शहर खरोखर फार प्राचीन असून त्यांत अरुंद व वांकडे रस्ते व कोठें कोठें दाहा अकरा मजली उंच घरें आहेत. नवीन शहर फार सुंदर रितीनें बांधिलें आहे. फोर्थखाडीच्या व स्काटलंडच्या ईशान्येस उत्तर लोलंड्स् आहेत. ह्या परगण्यांतून मोठा आबर्डीनशैयर ह्मणून एक परगणा आहे, त्याची राजधानी आबरडीन हें बरेंच शहर असून त्यांत स्काचयुनिव्हर्सिटी (विद्यालय) पैकीं एक आहे. उत्तरेकडील जमिनी बहुधा सपाट आहेत; व किनाऱ्यानजीक सुपीक आहेत; परंतु मध्यभागीं बरीच नापीक पांथळ जमीन आहे.

लोलंड्स् येथील स्काच लोक दृढ निश्चित व उद्योगी असून त्यांमध्यें शाळा इतक्या साधारण आहेत

कीं त्यांपैकीं कोणास वाचतां लिहितां व हिशोब करितां येत नाहीं असा सांपडणें विरळा. स्काच लोक प्रेसबिटीरियनभक्तसमूहांतील प्राटेस्टंट आहेत. स्काटलंड देशाच्या मधून ग्र्यांपियन टेकड्या आहेत, त्या हैलंड्सपासून लोलंड्स निराळें करितात.

लोलंड्सच्या लोकांपासून हैलंडलोकांचा पोषाक, भाषा व जात अगदीं भिन्न आहे. ते प्रथमत: ऐरिश जातीचेच असावे असें वाटतें व जी भाषा ते बोलतात तिला गेयलिक किंवा अर्स ह्मणतात. ती ऐरिश भाषेसारिखीच बहुधा आहे. ते लोलंड येथील लोकांपेक्षां फारच गरीब आहेत; परंतु बहुधा फार बुद्धिमान् व सुशिक्षित असतात. बहुधा सर्व हैलंड लोकांचीं कुळें केलीं आहेत ह्मणजे लोकांच्या जातीं किंवा कुटुंबें सर्व परस्परें संबंधी असून एकच उपनाव धारण करितात. कुळाच्या मुख्यास सरदार असें ह्मणतात व पूर्वीं ह्या सरदारांस फार अधिकार असे व शेजाऱ्यांबरोबर जेव्हां त्यांस लढाई करावी असें वाटे तेव्हां आपल्या अनुचरांस बोलावीत असत व ते एकमेकांसीं नेहमी लढाईंत गुंतल्यामुळें मोठीं पुष्कळ युद्धें व रक्तस्राव होत असत. परंतु आतां ह्या सर्वांचा शेवट झाला. हीं कुळें आतां तमाशे व मौज ह्यांशिवाय दुसऱ्या कोणत्याही कामाकरितां जमत नाहींत. व प्रत्येक कुळ निराळ्या पट्याचे कपडे घालितात, ह्मणून सहज ओळखितां येतात. चकचकित रंगाच्या पट्यानीं आडवें व छेकलेलें कापड तुह्मांतून बहुत्येकांनीं पाहिलें आहे त्यास प्लयाड

( पट्याचें कापड ) ह्मणतात. हैलंड येथील लोक तें वारंवार उपवस्त्राप्रमाणें आपल्या भोंवतीं लपटून घेतात. हैलंड पलटणीमध्यें जसा तुह्मी पोषाक पाहातां तसाच बाकीचा त्यांचा सर्व पोषाक असतो. इतकेंच कीं तो कांहीं जाड्यावस्तूचा असतो, आणि ते तांबड्या अस्मानी आणि हिरव्या किनारीच्या टोप्या घालितात. लग्नझालेल्या स्त्रिया एका प्रकारची टोपी घालतात, तिला कर्च ह्मणतात; व ज्यांचें लग्न झालें नाहीं त्या डोक्यासभोंवतीं पट्टा बांधितात. परंतु सर्व प्ल्याड ( उपवस्त्र ) घेतात त्याचा येथें झग्याप्रमाणें उपयोग होतो. हैलंड देश डोंगरानीं वेष्टिला आहे असें त्याच्या नावावरूनच कळून येतें. त्यामध्यें दोन पश्चिम व उत्तर असे मोठे प्रांत आहेत. पश्चिम हैलंडचे प्रांत सुंदर सरोवरांनी व्याप्त आहेत. त्यांतील आर जैलशेर फार मोठा प्रांत आहे लॉक लोमंड ह्मणून फार मोठें व सुदर सरोवर स्टरलिंग व डंबारटन यामध्यें आहे. हैलंडच्या या प्रदेशांत बेन्नेवीस ह्मणून ब्रिटिश बेटांत मोठा पर्वत आहे, व ह्याच पर्वताचे शिखरावर मात्र सर्व वर्षभर बर्फाची टिकळी असते. पश्चिम हैलंड्सची राजधानी इनवीरारी आहे परंतु स्काटूलंडच्या उत्तरेकडील फार मोठें शहर इनूवर्नेस् आहे.

पश्चिमेपेक्षां उत्तरेकडील हैलंड्सूतर फारच जंगली व ओसाड आहेत. त्यांमध्यें फार मोठीं किंवा प्रख्यात असीं शहरें नाहींत.

स्काटलंडाचें ईशानी कडचें टोंक डनूहेड हें आ-

हे. तें केथनेस् प्रांतांतील उंच भूशिर व ब्रिटीश बेटांतील फार उत्तर बिंदू आहे.

स्काटलंडदेशाचे पश्चिमेस आर्जैल शैयर जवळ हेब्रिडीस ह्मणून बेटाचे दोन मोठे समुदाय आहेत. ते पहाडी व ओसाड आहेत. त्यांतील मोठें लीविस हें आहे, परंतु फार प्रख्यात स्टाफा हें आहे. त्यामध्यें एक मोठी स्वाभाविक पोकळी किंवा गुहा आहे; तिला फिंगलची पोकळी असें ह्मणतात. तिच्या भिंती, काळ्या काभरट दगडाच्या खांबांच्या किंवा स्तंभांच्या रांगींनीं झाल्या आहेत व जे दुसरे, दगड फुटले गेले त्यांचीं छपरें झालीं आहेत. ही पोकळी १४० फुटी लांब आहे. केथ्नसच्या उत्तर बिंदूवर जवळच ऑर्कूनिस ह्मणून एक बेटांचा समुदाय आहे. त्यामध्यें एक फार मोठें बेट आहे त्यास मेनल्यांड असें ह्मणतात व दुसरीं सुमारें तीस बेटें लहान आहेत. हीं बेटें बहुधा खोलवट, थंड, पाणथळ, व ओसाड आहेत व तेथील हवा इतकी थंड व प्रतिकूळ आहे कीं थोडेसे चणे किंवा इतर वनस्पतींच्या उत्पन्नावांचून त्यामध्यें गहूं इत्यादि कांहीं एक होत नाहीं. तेथील लोक विशेषेंकरून सुक्या मास्यांवर किंवा ग्यानेट किंवा सोलान हंसाचे खारलेले मांसावर उपजीविका करितात. त्या भागांत हा मोठा पक्षी फार सुलभ असून त्याचा स्वाद बहुतकरून मास्यासारखा आहे. बहुत्येक लोक मासे धरून आपला निर्वाह करितात किंवा आर्कनी बेटा जवळील उत्तर समुद्रांत वेल मासे धरण्यास जीं तारवें उ-

युक्त असतात त्यांतले खलाशी होतात. तीं बहुधा ऑर्कनिस येथें येतात. ह्या बेटांची राजधानी कर्क वाल आहे.

याहून फारच उत्तरेस शेटलॉंड ह्मणून बेटें आहेत. तीं, पूर्वीं ज्यांविषयीं वर्णन केलें त्यांपेक्षां कमी थंड किंवा खडकी आहेत असें नाहीं. तेथील रहिवासी ऑर्कनीस व हेब्रिडीस बेटांतील लोकांप्रमाणें मासे व समुद्रांतील पक्षी धरण्यास मुख्यत्वेंकरून आसक्त असतात. खडकाच्या भेगांतील घरोट्यांतून त्यांची आंडीं ते मोठ्या आयासानें व संकटानें काढितात. एथें जीं सुंदर लहान तट्टें कधीं कधीं दिसतात तीं शटूलंड मधून येथें येतात. त्यांच्या जन्म लेल्या बेटामध्यें त्यांस मैदानांत व पाणथळांत रानटी स्थितीनें धावूं देतात; व जेव्हां एखाद्यास घोड्याचा उपयोग करण्याची इच्छा होते तेव्हां जसा सांपडेल तसा तो एक धरितो व त्याचें काम झाल्यावर त्यास मोकळा सोडितो.

शटूलंड मधील स्त्रिया व मुली आपल्या शिल्प कौशल्यांत मात्र ह्मणजे शटूलंड मधील मेंढ्याचे लोंकरीचे पायमोजे करण्यांत, बहुधा गुंतलेल्या असतात. ती लोंकर फारच बारीक, गरम व मृदु असते. त्या तिच्या ओढणी व शाली इतक्या बारीक करितात कीं अंतरावरून पाहिल्या असतां त्या फितीप्रमाणें दिसतात.

# पाठ-चौथा

## फ्रान्स

इंग्लंड सोडून आपण ब्रिटीश खाडींतून निघालों असतां युरोप खंडाचा जो अतिशय जवळचा भाग फ्रान्स देश तेथें येतों. त्या खाडीस अरुंद भागीं डोवरची सामुद्रधुनी असें ह्मणतात. तुह्मास स्मृति असेलच कीं त्याच्या, उत्तरेस व पूर्वेस बेलजियम व जर्मनि व दक्षिणेस स्पेन, भूमध्य समुद्र, आणि इटलीच्या उत्तरेचा एक लाहान कोन ह्यांहीकरून सीमा केली आहे.

प्राचीनकाळीं फ्रान्स देशास गॉल असें ह्मणत; ब्रिटन हस्तगत होण्याच्या पूर्वी रोमन लोकांनीं हा देश जिंकला होता व त्यांनी पुष्कळ शहरें स्थापिलीं तीं त्या देशांत अजूनही आहेत. सुमारें पन्नास वर्षां पूर्वी फ्रान्सचे प्रांत केले होते; पुनः आतां त्याचीं संस्थानें केलीं आहेत; व त्यामध्यें ज्या नद्या किंवा डोंगर आहेत त्यांप्रमाणें त्यांस नांवें पडलीं आहेत.

तुह्मास ठाऊक असेल कीं आपले किती एक देशांतील लोक फ्रान्स देशांत आगीच्या रस्त्यावर किंवा कारखान्यांत काम करावयास गेले आहेत व ते बहुधा ज्या देशाविषयीं मी तुह्मास सांगत आहें, तेथील भाषा व रिती भाती शिकून परत येतील. तर मग कदाचित् तुह्मास किंवा दुसऱ्या कोणत्याही परकीय गृहस्थास प्रथमतः फ्रान्स देश कसा दिसावा हें

जाणण्याची इच्छा होईल. सामुद्रधुनींतून क्याले ए-थें उतरल्यावर धक्क्यावर किंवा बंदरावर कांहीं कोळणी काळ्या कापडाचे लहान लहान झगे, मुलामा दिलेल्या कानांत मुद्या व डोक्यावर रुमाल किंवा पांढऱ्या टोप्या घालून सर्व एकत्र होऊन फ्रेंच भाषेंत बडबड करिताहेत असा प्रकार तुह्मास दिसेल. तुह्मास प्रथमतः परकीय भाषेंत लोकांची बडबड व गोंगाट ऐकून व कोणी इंग्रेजीभाषा समजत नाहीं हें पाहून फार विलक्षण वाटेल. क्याले हें देखील विलक्षण दिसणारें शहर असून लहान रेतीच्या टेंकऱ्यांत अर्धें पुरून गेलें आहे. त्या सभोंवतीं सर्व उंच भिंती व ओंड खंदक आहेत, त्यांस किल्ले बंदी (तटबंदी) असें ह्मणतात, व आपल्यासारिखे मोठे रस्ते व गुळगुळीत चिरे यांच्या बद्दल एथील रस्ते सर्व अरुंद व काळोखी असून टोंकदार दगडानीं फरसबंदी केली आहे. एथें व दुसऱ्या फ्रेंच शहरांत रात्रीस दिवे दिव्याच्या खांब्यांवर लाविले नसतात. परंतु दोऱ्यांवरून रस्त्यावर आडवे टांगितात. क्याले हा ग्रेट ब्रिटनच्या संस्थानाचा पुष्कळ दिवसपर्यंत भाग होता परंतु सुमारें तीनशें वर्षां पूर्वीं फ्रेंच लोकांनी तो परत घेतला. त्यावेळेपासून तो त्यांच्याजवळ आहे.

क्यालेच्या सभोंवताला देश व फ्रान्स देशाचा फारच उत्तरेकडचा भाग खरोखर सपाट आहे व तेथील शेतांभोंवतीं कुपणें किंवा भिंती नसल्यामुळें तो अधिकच सपाट दिसतो. तेथें पुष्कळ धान्याची लागवड करितात, व सरसांच्या बियांपासून तेल का-

ढण्याकरितां लागवड केलेलीं सरसांचीं मोठालीं शेतें रस्त्याच्या बाजूंनीं नेहमी दिसतात. त्यांहींकरून सर्व देश केवळ पिवळा होऊन जातो. उत्तरेकडच्या एका प्रांतांत सीन नदीवर प्यारिस नामें त्या देशाची राजधानी असून ती युरोपांत एक मोठें विख्यात शहर आहे. हें मोठें सुंदर व डौलदार शहर असून त्यांत पुष्कळ चांगले रस्ते व घरें तसेच त्यासभोंवते प्रसिद्ध बाग व रमणीय व्यायामकरण्याच्या जागा आहेत; त्यांत लोक बहुत मौजा मारितात, कारण कीं ते हुशार लोक असून त्यांस सर्व प्रकारच्या कर्मणुकी करण्यास व पुष्कळ वेळपर्यंत उघड्या हवेंत फिरावयास आवडतें.

प्यारिसजवळ फ्रान्सच्या राजाचें राहाण्याचें पूर्वीचें मुख्य ठिकाण वारसेलीचें सुंदर मंदिर आहे, परंतु तें आतां इतिहाससंबंधीं संग्रहालय झालें आहे. मंदिराचे सभोंवतील बागांचें व कारंजाचें मोठें आश्चर्य करितात.

सीननदीवर, प्यारिस व समुद्रकिनारा यामध्यें रूवन ह्मणून मोठें शहर आहे. त्या ठिकाणच्या स्त्रिया बुरुजाप्रमाणें चमत्कारिक उंच टोंकाच्या पांढऱ्या टोप्या घालितात ह्मणून प्रख्यात आहेत.

फ्रान्सच्या उत्तरेस ब्रेस्ट आणि हाव्रडीग्रेस ह्मणून मुख्य बंदरें आहेत. फ्रान्सच्या पूर्वकिनाऱ्यावर ब्रिटनी ह्मणून एक प्रांत आहे त्यांत ब्रेस्ट हें शहर आहे व तेथें बाकीच्या फ्रेंच लोकांपासून फार भिन्न लोक राहतात. स्याक्सन लोकांपासून जे तेथें प-

ळून गेले त्यापूर्वींच्या ब्रिटन लोकांचे ते वंशजच आहेत व ते अजून कांहींशी वेल्स भाषेप्रमाणें भाषा बोलतात.

ब्रिटनी या शहरापासून ओळखण्याकरितां ब्रिटन नामें बेटास ग्रेटब्रिटन असें ह्मणतात. फ्रान्सचा मध्यभाग कितीएक ठिकाणीं सपाट, वालुकामय व ओसाड आहे, परंतु कितीएक नद्यांचे मुख्यत्वेंकरून प्रख्यात लायर नदीचे किनारे फार चांगले व फलद्रूप आहेत. एथील हवा द्राक्षें होण्यापुरती उष्ण आहे. द्राक्षांचा मळा पाहावयास चांगली वस्तू नाहीं; अंतरावरून तो कांहींसा लालमुळयाच्या हिरव्या शेताप्रमाणें दिसतो; पण जेव्हां तुह्मी त्याजवळ जाल तेव्हां लहानलहान काठ्यांवर द्राक्षवेली चढविल्या आहेत असें तुह्मास दिसेल; परंतु फ्रेंच लोक त्यांची लागवड उपयोगाकरितां करितात, व शोभेकरितां करित नाहींत. फ्रान्सचा मध्य व दक्षिण भाग दारुविषयीं प्रख्यात आहे. मध्य प्रांतांतील लायर नदीवर टूर्स व आर्लियन्स हीं दोन मुख्य शहरें आहेत. फ्रान्सच्या पूर्व बाजूस आलसेसचा प्रांत व रैन नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर स्ट्रासबर्गचें चांगलें शहर आहे; हें शहर पूर्वीं जर्मनीचे स्वाधीन होतें व अजून येथील बहुत्येक लोक जर्मन भाषा बोलतात. युरोपांतील आल्पूस पर्वताचे खालोखाल उंच पिरिनीझ् पर्वत यानें स्पेनपासून फ्रान्सचा नैर्ऋत्य प्रदेश विभागला आहे. त्याविषयीं स्पेनच्या वृत्तांतांत तुह्मी अधिक ऐकाल. फ्रान्सच्या या भागांतून ग्यारोन ह्मणून मो-

ही नदी वाहते; तिच्या मुखाजवळ बोर्डो नामें फार चांगलें शहर असून फ्रान्सच्या नैर्ऋत्येस मोठें बंदर आहे, त्यांत दारू होते ह्मणून देखील तें प्रख्यात आहे.

फ्रान्सदेशाचा आग्नेय भाग आल्पस पर्वतानें इट-लीपासून विभागला आहे. या पाहाडांसभोंवतील देश इतका स्विट्झर्लंडप्रमाणेंच आहे कीं त्याविषयीं आपण येथें वर्णन करित नाहीं, कारण जेव्हां आपण स्विट्झर्लंडाविषयीं बोलूं तेव्हां तुमच्या ऐकण्यांत आल्पस पाहाडाविषयीं पुष्कळ येईल. फ्रान्सच्या या भागां-त लायन्स शहर आहे. तेथें फ्रेंच रेशीम मुख्यत्वेंक-रून करितात रेशमाच्या किड्यास तुतीचीं पानें चारि-तात व त्या करितां त्या झाडांची लागवड केली जाते व रेशमाच्या किड्यांस चारण्याकरितां त्यांचीं पानें बुचाडलीं जातात, तेव्हां तीं फार ओंगळ दिसतात, कारण कीं फक्त काठ्यांशिवाय दुसरें त्यांवर कांहींच नसतें. रोन नामें फ्रान्स देशांत जी सर्वोत्कृष्ट नदी आ-हे तिजवर लैन्स शहर आहे.

फ्रान्सचे फारच दक्षिणेचे प्रांत भूमध्य समुद्रावर आहेत. एथील हवा उष्ण व सुखकारक असून आकाश स्वच्छ व चकचकित असतें, प जीं झाडें आपण उष्ण घरांत ठेवितों तीं येथें उघड्या हवेंत भ-रांत येतात. येथें मुख्य बंदर मारसेलीस् आहे. भू-मध्य सागरांत कारसिकानामें मोठें बेट आहे; तें पूर्वी इटलीचे स्वाधीन होतें, परंतु आतां फ्रान्सचे हस्तगत आहे. एथील लोक अजून इटालियन भाषा बो-

लतात. फ्रेंचलोकांचा बादशाह बोनापार्ट हा येथें जन्मला ह्मणून हें प्रख्यात आहे.

इंग्रेजलोकांपेक्षां फ्रेंच लोक बहुधा कांहींसे काळे व ठेंगणे आहेत. ह्या देशांतील लोक कितीएक भागांत फार छांदार पोषाककरितात, परंतु बहुधा सर्व ठिकाणीं पुरुष व बायका लांकडी जोडे वापरतात. बायका शेतकीचें बहुतेक काम करितात. त्या नागरसुद्धां धरितात; फ्रान्स देशाचा धर्म रोमनक्याथोलीक आहे; परंतु तेथें बरेच प्रॉटेस्टंटपंथाचे लोक देखील आहेत.

## पाठ-पांचवा.

### बेलजियम्.

बेलजियम् आणि हालन्ड या दोहोंचें वारंवार एकत्र वर्णन करितात; कारण जरी ते देश आतां अगदीं भिन्न भिन्न आहेत तरी ते एकावेळीं एकाच अमलांत होते. ते दोन्ही पूर्वी नेधरलन्ड किंवा लोकंट्रीस् यानांवाखालीं असत. बेलजियम ह्यास फ्ल्यांडर देखील ह्मणतात, व त्या नांवानें अजून त्याची प्रख्याति आहे. तेथील रहवास्यांस जसें बेलजिअन्स् वारंवार ह्मणतात त्याचप्रमाणें फ्लेमिंग्स् देखील ह्मणतात. त्यांचा सांप्रतचाराजा लीओपॉल्ड आपल्या राणीचा चुलता लागतो.

बेलजियम देशाचा बहुत्येक भाग सपाट व उदास आहे. परंतु दक्षिणेस विशेषेंकरून मियुसनदी

जवळ कित्येक सुंदर जागा आहेत. तेथील जमीन सफळ आहे व बेलजियन लोक पृथ्वींतील सर्वोत्कृष्ट शेतकऱ्यांपैकीं कितीएक असे मानले आहेत. जमिनीच्या प्रत्येक भागाची लागवड केली जाते व त्यांस कुपणें नसल्यामुळें सर्व देश उंचीवरून पाहिला असतां एका मोठ्या शेताप्रमाणें दिसतो.

बेलजियमची ब्रुसेल्स नामें राजधानी, फार सुंदर व रमणीय शहर आहे. त्याच्या सभोंवती झाडांच्या पंगति आहेत, त्यांच्या छायेखालून लोक चालतात किंवा रविवारीं व सणाचे दिवशीं मौजमारण्यास बसतात. राजाच्या मंदिरापाशीं वाडा आहे तो देखील शहरांतील लोकांस मौज मारण्यास रमणीय जागा आहे.

ब्रुसेल्समध्यें ( तसेंच बेलजियमच्या सर्व उत्तर भागांत ) बहुतेक लोक मुख्यत्वेंकरून फ्लेमिश भाषा बोलतात, त्या भाषेचा उच्चार ऐरिश भाषेपासून भिन्न आहे असें नाहीं, परंतु त्यांस फ्रेंच भाषा देखील बहुधा समजते. तथापि दक्षिणेस, फ्लेमिश भाषेपासून केवळ भिन्न भाषा बोलतात तीस वलुन असें ह्मणतात. दक्षिण बेलजियमचे लोक उत्तरेकडील लोकांपासून चेहऱ्यानेही भिन्न आहेत. त्यांचे केस व तोंडें कांहीं काळीं असतात; व उत्तर प्रांतांतील लोक बहुधा गोरे व पातळ केसांचे असतात.

बेलजियम लोकांची पत त्यांच्या शेजारचे डच् लोकांपासून फार भिन्न आहे, ते स्वभावानें कांहींसे मंद व जड आहेत तरी धीट व निश्चल असतात.

परंतु बेलजियम लोक चंचल, बोलके, व कडक स्वभावाचे असतात.

बेलजियम एथें हस्तकौशल्याने केलेल्या वस्तु पुष्कल आहेत. त्यांतील मोठी प्रख्यात ब्रुसेल्स् फीत जिच्या सौंदर्याविषयीं सर्व पृथ्वीभर विख्याति आहे. ती फीत हाताने केल्यावरून पुष्कळ गरीब स्त्रियांस रोजगार सांपडतो.

बेलजियमच्या दक्षिणेच्या लीज ह्या मुख्य शहरांत कांहींशा कमी नाजूक वस्तू होतात; त्यांपैकीं मुख्य बंदुका होत. तेथील पुष्कळ कारखान्याचे धुरामुळें या शहराचा अंधुक देखावा असतो परंतु तें मियुस व दुसऱ्या दोन लहान नद्यांच्या संगमाजवळ चांगलें असून बेलजियमच्या कांहीं सुंदर भागाचे थोडक्याच अंतरावर आहे.

शाळांच्या प्रख्यातीविषयीं लिज शहर विख्यात आहे. खुद्द त्यांशाळांकरितां पुष्कळ पुस्तकें छापतात. त्यांपैकीं "*ईझिलेसन्स आन् मनि म्याटर" या नांवाचें पुस्तक तुह्मी वाचता त्याचें येथील मुलांच्या उपयोगाकरितां फ्रेंच भाषेंत भाषांतर केलें आहे. तें सर्व बेलजियमभर व फ्रान्समध्यें देखील चालवितात.

बेलजियम लोकांचा धर्म रोमनक्याथोलिक आहे. त्यांचें राज्य परिमित एकाधिपत्य आहे; त्या विषयीं पूर्वीच वर्णन केलें आहे.

*ह्मणजे संपत्तीविषयीं सोपे धडे.

# पाठ सहावा.

## हालन्ड.

हालंड युरोपखंडाचा फारच सपाट देश आहे. त्यामध्यें डोंगर किंवा टेंकरी ह्यांप्रमाणें कांहींच नाहीं व जमीन इतकी ओलसर व दलदलीत आहे कीं प्रत्येक दिशेस पुष्कळ नळानीं पाणी काढून टाकल्यावरून मात्र तो देश राहाण्याजोगा झाला आहे. त्या जमिनीचे कितीएक भाग समुद्राच्या सपाटीपेक्षांही फार खोलवट आहेत. त्या समुद्रानें सर्व देशास पूर येऊंनये ह्मणून रेतीचे ढीग केले आहेत, त्यांस बांध ह्मणतात. हे बांध किनाऱ्याच्या सुट्या रेतींत पहिल्यानें झाडांचे सोट खोंचून करितात, त्यांस थर ह्मणतात, मग रेती व चिकणमाती मिश्रकरून त्यांवर थापतात; बांध बराच उंच उभारल्यावर समुद्राकडील बाजू माती वाहून जाऊंनये ह्मणून एका जातीचा बांबू व पेंढा यांच्या कुडानें आच्छादितात.

परंतु जरी बांध उभारण्याकरितां इतकी काळजी बाळगितात व त्याची नेहमीं डागडुजी करितात तरी ते अपाय घडण्यास पात्र असतात. कधीं कधीं समुद्र त्यांत शिरून देशाचा सर्व प्रदेश ग्रासून टाकितो. तो येणेंप्रमाणें—घरें बुडवितो, कुरणांस व बागांस पूर आणतो व गुरांस व ज्या दुर्दैवी बहुतेक माणसांस त्यावेळीं आपलें रक्षण करण्यास होड्या मिळत नाहींत त्यांस देखील बुडवून टाकितो.

हिंवाळ्यामध्यें जेव्हां ह्या पुरांस फार भ्यावें लागतें तेव्हां रात्रदिवस संकटसमय आला असतां सावध होण्याची सूचना देण्यासाठीं किनाऱ्यावर चौकीदार ठेविलेले असतात. जे हालंड देशाचे भाग समुद्रतीरापासून दूर आहेत ते पुराच्या संकटापासून मोकळे नाहींत; कारण नद्या किनाऱ्यावरून वाहून सभोंवतील देशाचा बराच नाश करितात. असे हे गैरफायदे असतांही हालंड देशाचे लोक फार संतुष्ट असतात. त्यामध्यें गरीबलोक थोडे आहेत. त्यांच्या शाळा पुष्कळ असून चांगल्या रीतीनें चालविल्या असतात. ते जमिनीची मोठ्या काळजीने लागवड करितात. परंतु त्यांची ओलसर जमीन दुसऱ्या कोणत्याही कामापेक्षां गुरें चारावयास चांगली योग्य आहे. त्यांजपाशीं गायींची चांगली संतती असून ते दुभत्याच्या व्यवस्थेमध्यें फार चतुर आहेत. डच पन्हेर व लोणी पृथ्वीच्या सर्व भागांत प्रख्यात असून हालंड देशांतून जे जिन्नस रवाना होतात त्यांतून हा एक मुख्य जिन्नस आहे. डचलोक बागशाईचे फार शोकी आहेत व विशेषेंकरून ते सुंदर हैयशींथ्स ( दवणा ) व ट्युलीपविषयीं प्रख्यात आहेत. प्रत्येक डचपुरुष ज्या कोणास साधनें आहेत, त्याने लहान बाग मोठ्या काळजीनें रचलेला असतो व त्यांत ज्या फुलांची त्यास फार आवड असते त्यानें भरलेला असतो. डचलोक आपल्या बागाविषयीं काळजी बाळगितात, त्यापेक्षांही आपल्या घराची काळजी फार करितात. खोल्या व सामान फारच स्वच्छ राखितात. धुळीचा

एक देखील कण खुर्चीवर किंवा मेजावर राहूं देत नाहींत; झाडणे व साफ करणें जें दररोज सावधपणें डचदासी करित असतात त्यामध्यें एक कोंपरादेखील हेगय केलेला राहवयाचा नाहीं.

हालंडची राजधानी ऑमस्टरडम् फारच प्रख्यात शहर आहे, तेथील जमीन चिखलट व सुट्या रेतीची असल्यावरून घराचा भार धरवत नाहीं ह्मणून बांध बांधण्यामध्यें जसें करितात त्याप्रमाणें फार खोल खांब रोवून त्यावर हें शहर बांधलें आहे. या शहराच्या प्रत्येक दिशेस नळ आडवे काढले आहेत, ते होड्या व तारवें ह्यांनी बहुधा भरले असतात; तेथें रस्त्यापेक्षां नळ अधिक आहेत ह्मणून गाड्यांच्या चाकांचा आवाज क्वचित् ऐकूं येतो.

हालंडदेशांत इतकेंच नाहीं सर्व युरोपखंडांत देखील जो मोठा नळ आहे त्यास ग्रांडशिपकनाल ह्मणतात; तो टेकसल बेटाच्या समोर ऑमस्टरडमपासून हेल्डरपर्यंत पन्नास मैल लांब आहे. ह्या नळामुळें अगदीं निर्भयपणें ऑमस्टरडमच्या बंदरांत झिडरझीच्या भयंकररेतीच्या किनाऱ्यावरून गेल्याशिवाय येऊं शकतात.

हालंड देशाचा राजा ऑमस्टरडम एथें राहत नाहीं, परंतु हेग मध्यें राहतो. तें जरी फार कमी महत्वाचें शहर आहे तरी राहाण्यास रमणीय स्थान आहे. तेथील राजाच्या मंदिराजवळील वाड्यांत हालंड देशांतील जीं सर्वोत्कृष्ट झाडें आढळतात तीं मात्र आहेत.

हालंड देशाची हवा दमसर व धूसर असून हिवाळयांत फार थंड असते. असें असतां ही उन्हाळा हा फार रोगी ऋतू असतो; त्यावेळीं लोकांस तापापासून फार इजा भोगावी लागते. हालंडदेशाचे कितीएक भाग खरोखर इतके चिखलट व रोगी आहेत कीं कोणत्याही ऋतूमध्यें विषम तापापासून ते मोकळे नाहींत.

डच लोकाचें राज्य परिमित आहे; साधारण ह्मटलें असतां त्यांचा धर्म प्राटेस्टंट आहे.

# पाठ सातवा.

## डेनमार्क व त्याच्या ताब्यांतील संस्थानें.

डेनमार्कामध्यें जटलंडचें द्वीप कल्प व बालटिक समुद्रांच्यातोंडाजवळ पुष्कळ बेटें आहेत; त्यांतील झीलंड व फ्युनन ह्मणून मुख्य होत. हॉल्स्टिनचा जर्मन प्रांत ही आतां डेनमार्काचा भाग झाला आहे.

डेनमार्काची मुख्य जमीन सपाट आहे. त्याची विलक्षण आकृति व पुष्कळ खाड्या व उपसागर यांवरून तेथें समुद्र किनाऱ्याचा मोठा विस्तार आहे व समुद्रापासून दाहा मैलांच्या अंतरापेक्षां अधिक त्याचा एक ही भाग नाहीं.

एथील हवा दमसर व धुरकट असते; परंतु फार थंड नसते. जरी डेनमार्कास फार सौंदर्याविषयीं किंवा सफलतेविषयीं वढाई करवत नाहीं तरी हालंडापेक्षां कांहींसें जास्त रानवट असल्यानें त्यास फाय-

दा होतो. किनाऱ्यापेक्षां आंतील भाग फार नापीक व खराब आहे. त्या कितीएक प्रदेशांत पाण्याच्या किनाऱ्यापर्यंत समुद्रांत देखील गेलेलीं व कोठेंकोठें उतरत आलेलीं हिरवीं कुरणें आहेत व कोठेंकोठें चांगल्या रितीनें झाडांनीं व्याप्त आहेत. डेनमार्कमधील मुख्य शहर कोपनुह्यागनू झीलंडच्या बेटांत आहे; तें व त्याचें बंदर व गोद्या मिळून सुमारें १५ मैल परिघाच्या भिंतीनें वेष्टिलें आहे. झीलंडमधील दुसरें महत्वाचें शहर एल्सिनोर मात्र आहे; तें सौंडच्या अरुंद भागावर आहे; ती समुद्राची खाडी त्या भागीं तीन मैल मात्र रुंद आहे. प्रत्येक तारूं जें या सौंडमधून जातें तें आपल्यां वरील शिडें उतरून एल्सिनोर एथें जकात भरतें. ह्याला सौंडचें ऋण फेडणें असें ह्मणतात. तेथील पुष्कळ खडक व ह्या भयंकर किनाऱ्यांतील डोह समजण्याकरितां दांड्या व इशाऱ्याकरितां कांहीं बांधण्याचा डेनमार्कानें मक्ता केल्यावरून थोडी रक्कम देण्यास बॉलटिक समुद्रांतील व्यापाऱ्यांनीं कबुल केलें त्यावरून ही चाल उद्भवली असावी असें ह्मणतात.

डेनमार्काहून धान्य, लोणी व पऱ्हेर रवाना होतात. एथील लोक हस्त कौशल्यानें मुख्यत्वेंकरून घरगुती उपयोगासाठीं तागाचीं व लोकरीचीं वस्त्रें करितात. डेन्सलोक स्थिरपणें उद्योगीपुरुष असून युरोपखंडांतील फार सुधारलेल्या लोकांमध्यें ते गणले जातात. शरीरानें ते बहुधा ठेंगणे असून गोऱ्यावर्णाचे व पातळ केंसांचे आहेत.

डेनमार्कचा राज्य कारभार स्वतंत्र आहे. परं-

तु ड्यानिश राजे सौम्य व लोकप्रिय असे अधिकार चालविणारे बहुधा असतात. तेथील धर्म प्राटेस्टंट आहे. जी भाषा नार्वेमध्यें बोलतात त्याचप्रमाणें ही असून जर्मन भाषेशीं तिचें कांहींसें सादृश्य आहे.

डेनमार्कचे स्वाधीन ऐसलंड ह्मणून मोठें बेट आहे व तें उत्तर वर्तुळाच्या किनाऱ्यावरील उत्तर सागरांत आहे. तें प्रत्येक ठिकाणीं उंच व बर्फानें आच्छादिलेले पर्वतांच्या रांगींनी विभागलें आहे. त्यांही करून त्या देशास ओसाड व अंधुकपणा येतो. ह्यांतील कितीएक पर्वत ज्वालामुखी आहेत; त्यांतील मुख्य हेकला हा आहे. तो युरोपखंडांतील एक फार प्रख्यात ज्वालामुखी आहे.

परंतु ऐसलंडामध्यें फारच चमत्कारिक दिसणारे कढत ओहोळ आहेत. त्यांस बहुधा कुंडें ह्मणतात. त्यांविषयीं एका *प्रवास्याने ऐसलंडच्या वृत्तांतामध्यें मनोरंजक वर्णन केलें आहे. तो ह्मणतो कीं, जरी आमच्या सभोंवतीं पुष्कळ कढत झरे होते तरी त्यांतून कोणत्यावर आमचे आश्चर्य करणारे डोळे लावावे ह्याविषयीं आह्मास अडचण पडली नाहीं. मैदानाच्या उत्तर टोंकाजवळ मोठा ढीग झऱ्यानें पदार्थ जमल्यावरून झाला आहे. तो ग्रेटगेसर या नांवानें खरोखर ओळखतां येतो. ह्या ढीगावर चढल्यानंतर आह्मी आमच्या पायाजवळ एक मोठें कुंड निर्मेपेक्षां अधिक स्वच्छ गरम पाण्यानें भरलेलें पाहिलें. त्यावरील वाफ त्या कुंडाच्या मध्य भागांतून

*प्रोफेसर हेन्डरसन्.

स्वभावतः नळानें निघून जाई. तो झरा स्थिर असल्यावरून तेथें ताबडतोब भेग होण्याचीं चिन्हें नसल्यामुळें आह्मी जेथें आमचे घोडे ठेविले होते त्या ठिकाणीं परत आलों. थोडक्याच वेळानंतर जमिनीच्या किंचित हालण्यानें आह्मास सावध केलें कीं लवकरच मोठा आवाज व्हावयाचा आहे. प्रथमतः पाण्याचे थोडे कारंजे उडाले, परंतु मधून मधून जमीन ही हालत असे व कुंडांतील पाणी जोरानें कढूं लागलें; दुरच्या तोफेच्या आवाजाप्रमाणें मीं आवाजही ऐकिले. ह्या गोष्टीवरून असें अनुमान केलें कीं ज्या चमत्कारांची फार दिवस अपेक्षा केली होती ते लवकरच घडणार ह्मणून मीं ढिगावर धांवत गेलों, तो माझ्या पायाखालीं हालूं लागला व मला कुंडांत पहावयास वेळ न मिळाला इतक्यांत झऱ्यांतून आवाज निघाला व मला अंतरावर जाणें जरूर पडलें.

त्या नळांतून आश्चर्यकारक वेगानें पाणी वरचढून हवेंत अनियमित कारंजे उडत व त्यांसभोंवती पुष्कळ वाफेचीं ढगें असत. ह्यांतील शेवटला कारंजा जो सर्वांपेक्षां मोठा होता तो निदान ७० फुटी उंच गेला. जे मोठे दगड आह्मी त्या नळांत पूर्वीं टाकिले होते ते फारच उंच उडले व विशेषेंकरून त्यांतील एक पाण्यापेक्षां देखील अधिक उंच उडाला. भेग होणें बंद झाल्यावर पाणी ताबडतोब नळांत उतरलें परंतु लवकरच पुनः त्या छिद्रावर सुमारें अर्ध फूट चढून तेथें शांत राहिलें.

ऐसलंडमध्यें कढत पाण्याच्या झऱ्याचीं आश्चर्यें न-

सतीं तर तेथें परकीयलोक क्वचितच येते; कांकीं तो थंड व ओसाड देश आहे इतकेंच नाहीं, परंतु त्याच्या सभोंवता वादळाचा व भयंकर समुद्र आहे. तेथें रहवासी फार नाहींत, जे थोडे आहेत ते किनाऱ्यावर जे पुष्कळ मासे असतात, त्यांवर आपली मुख्यत्वें करून उपजीविका करितात.

जवाच्या थोडया पिकावांचून दुसरी कोणतीही जिन्नस उत्पन्न होण्यास ती जमीन फारच नापिक आहे. ऐसलंड येथील लोकांस संकटें भोगावीं लागतात तरी ते संतुष्ट लोक आहेत. ते रीति भातीमध्यें शांत व नियमित असून बहुधा फार सुशिक्षित असतात. ऐसलंड येथील पुरुषांचा एकमुख्य उद्योग आपल्या मुलांस शिकवणें हा आहे. हिंवाळ्यांतील मोठ्या संध्याकाळीं जेव्हां बाहेर सर्व काळें व थंड होतें तेव्हां सुखकारक विस्तवासभोंवती कुटुंबास मिळवून त्यांस बाप मोठ्यानें वाचून दाखवितो.

# पाठ आठवा.

## नार्वे, स्विडन आणि ल्याप्लंड.

नार्वे, हा देश पूर्वीं डेनमार्कच्या स्वाधीन होता, तो आतां जरी त्याचे जुने कायदे राखितो तरी एकच राज्याच्या अधिकाराखालीं स्विडनास मिळाला आहे. नार्वे व स्विडन हे दोन्ही देश फार पहाडी असून त्यांत पुष्कळ नद्या व सरोवरें आहेत. ह्या नद्या फार लांब नाहींत, कारण डाफरफेल्ड नामें जे पर्वत ना-

र्वेपासून स्विडन निराळें करितात, त्यांतून त्यांचा उगम असून त्या बहुतकरून त्या अरुंद देशांतून आडव्या वाहातात, आणि उभ्या वहात नाहींत. नार्वेमधील नद्या उत्तर समुद्राकडे व स्विडन मधील बाल्टिक किंवा बोथूनियाचे आखाताकडे आपला मार्ग काढतात. तेथील मोठी नदी डाहल आहे, तिजवरून स्विडन मधील एका पाहाडी प्रांतास डालीकार्लिया ह्मणून नांव पडलें आहे.

मेलर सरोवरामध्यें पुष्कळ सुंदर वालुकामय द्वीपकल्पें आहेत, त्यांवर स्विडनची राजधानी स्टॉकहॉम् आहे. त्यास सरोवर ह्मणण्यापेक्षां उपसागर ह्मटलें असतां बरें. त्याच्या किनाऱ्यावर घरें, देवळें, दवाखाने व त्यांसभोंवतील हिरवे व मंडपाचे बाग अगदीं पाण्याच्या किनाऱ्यापर्यंत गेले आहेत. उन्हाळ्यामध्यें तेथून प्रत्येक दिशेस नेहेमी पुष्कळ तारवें जातात त्यामुळें तें शहर सुंदर दिसतें.

स्विड्स हे शूर व प्रमाणिक लोक आहेत, आणि ते इतके भले आहेत कीं आपली माल मत्ता नाहींशीं होऊंनये ह्मणून कोणांसही घरास कड्या व कांबी लावण्याची गरज पडत नाहीं. डालीकार्लिया प्रांतांतील लोक आपल्या इतर देश बांधवांपासून पुष्कळ प्रकारें भिन्न आहेत. ते शरीराने उंच व मोठे असून त्यांचीं तोंडें खरबरीत व वर्ण काळा असतो; परंतु दुसरे स्विड्स लोक मध्यम उंचीचे असून त्यांचे पांढरे केस व अस्मानी डोळे असतात.

स्विडन मधील कोक्सनामें प्रवासी असें ह्मणतो,

कीं स्विडन मधून प्रवास करीत असतां मला कुणबी लोकांच्या रीतिभाती व खाणें पहाण्याचे वारंवार प्रसंग पडत. एका झोंपड्यांत गेल्यावर तेथील सर्व माणसें ताग विंचरण्यांत, दोर करण्यांत, व जाड *लीनन करण्यांत व कोठें कोठें कापड करण्यांत गुंतले आहेत, असीं मला नेहेमी आढळत असत. हे कुणबी फार युक्तिवान् पुरुष असल्यावरून ते अगदीं जाड्या भरड्यावस्तू कांहीं तरी उपयोगी कामास लावितात. ते डुकराच्या केसाचे, घोड्याच्या आयाळीचे व झाडांच्या सालीचे दोर करितात. व लगामीकरितां ईल (पोक) मास्यांच्या कातड्याचा उपयोग करितात. त्यांचें अन्न मुख्यत्वेंकरून खारें मांस व मासे, आंडीं, दूध आणि कठिण भाकरी असते. मिकलम्यासच्या वेळीं ते बहुधा आपलीं गुरें कापून येत्या हिंवाळ्यांत वसंतऋतूकरितां खार देऊन ठेवितात. वर्षांतून दोनदा ते आपल्या भाकरी मोठ्या वाटोळ्या पोळ्यांप्रमाणें करून भाजतात. त्यांस काठ्यांच्या जुड्यांस अडकावून झोंपड्याचे दालना जवळ टांगितात. त्या इतक्या टणक असतात कीं, त्या कुराडीने वारंवार फोडाव्या लागतात, परंतु त्या रुचिकर नाहींत असें नाहीं, कुणबीलोक आपल्या साधारण पिण्यांत बियर दारूचा उपयोग करितात. व ते अर्कांच्या मद्यांस फार आसक्त असतात. पश्चिम किनाऱ्यावरील प्रांतांत व आंतील जमिनीपासून फार अंतरावर नव्हे अशा ठिकाणीं स्विडीश झोंपड्यांत नेहेमी चाहा व

* तागाचें वस्त्र.

काफी आढळतें. त्यांच्या झोंपड्या जरी लांकडाच्या एक मजली बांधल्या असतात तरी त्या सुखकारक व सोयवार असतात. ज्या खोलींत कुटुंब निजतें त्यामध्यें बिछान्याचे थराच्या रांगी असतात, (थर ह्मणजे एकावर एक असें समजावें.) ज्या बिछान्यावर बायका निजतात त्याच्या लांकडी खाटीवर पुरुषांकरितां दुसरे बिछाने असतात, त्यावर ते शिड्यांनीं चढतात. ज्या एकाद्या पुरुषाने नुकताच जर्मन देश सोडून बऱ्याच धर्मशाळा पाहिल्या असतील त्यास स्विडीश झोंपड्या कदाचित् दरिद्री खोपट्या वाटतील. मला याहून कमी सोईच्या जाग्याची पुष्कळ दिवसांपासून सवय पडल्यामुळें त्या मंदिराप्रमाणेंच दिसतात. प्रवास्यास तेथें पुष्कळ सोई व विशेषेंकरून कुटुंब राहातें त्या खोलीखेरीज एक निराळी खोली मिळते, तशी पोलिश आणि रशियन् खेड्यांमध्यें मिळत नाहीं. ह्या दोन देशांतून माझ्या प्रवासांत मोठ्या शहराखेरीज बिछान्याचें क्वचितच दर्शन होई व तेथें देखील नेहमी पूर्ण मिळत नसे. परंतु सुखाच्या ह्या वस्तूमध्यें स्विडन एथील अगदीं गरीब झोंपडींत कधीं न्यूनता नसते. हें एक उघड प्रमाण आहे कीं स्विडीश कुणबी पोलंड व रशिया एथील कुणब्यापेक्षां बरेच सुधारलेले आहेत. ह्या दोन देशांच्या कुणब्यांची गुलामगिरी पाहिल्यानंतर पुन्हा मी आतां मोकळ्या लोकांमध्यें ह्मणजे जेथें मालमत्तेचा सारिखा विभाग; गुलामगिरी नाहीं, हलक्या प्रतीचे लोक आपल्या शरीराचा व मालमत्तेचा अभयपणा अनुभवितात व ह्या

हक्कापासून फायदे साधारण अवलोकन करणाऱ्यांस दृश्य आहेत अशा राज्यांत आहे असें पाहून मला मोठा आनंद होई. स्विडीश भाषेचें इंग्लिश भाषेशीं किंचित् साम्य आहे; परंतु ती बहुधा ड्यानीश भाषेप्रमाणेंच आहे.

जरी नार्वे एथील लोक आपली स्वतः निराळी जाति मानतात तरी त्यांचीं शरीरें व भाषा स्विडन एथील लोकांप्रमाणें आहे. ते अत्यंत स्वदेश प्रीति करणारे लोक आहेत व त्यांच्या लोकांचे गीत ज्यास ते ( जुनें नार्वे ) ह्मणतात, त्याच्या स्तुत्यर्थ आहेत. नार्वेमधील लोक शेतकरी आहेत, परंतु त्या कामांत ते फारसे कुशळ नाहींत. व तेथील नापीक जमीन केवळ रायी व जव लावण्यास मात्र योग्य आहे.

आपल्या दुभत्याच्या उत्पन्नावर उदर निर्वाहाकरितां त्यांचा बहुतकरून भरवसा असतो. तेथें दुष्काळ फार पडतात त्यावेळीं ते एका प्रकारची भाकर बहुधा खातात.

ती फरझाडाची आंतील साल दळून त्यांत थोडें पीठ मिश्र करून करितात. असें असतां ही भाकर इतकी सुकी व कडू असते कीं गरजेवांचून ती कोणी खाणार नाहीं. स्विडन व नार्वे या देशांतील उपयोगाचीं हस्त कौशल्यें नाहींत. परंतु त्यांचा व्यापार बराच आहे. नार्वेच्या किनाऱ्यावर विस्तीर्ण मासे धरण्याच्या जागा आहेत व तेथून पुष्कळ खारे काड ( सुरमय ) मासे, स्टाकफिश् ( मत्स्यसंचय ) या नांवानें रवाना होतात. परंतु त्यांचे मुख्य व्यापाराचे जि-

न्नस लांकूड व लोखंड हे आहेत. स्विडन एथील लोखंडाच्या खाणी सृष्टींत मोठ्या उत्पन्नाच्या आहेत. तेथें कांहीं उपयोगी तांब्याच्या व सिस्याच्या खाणी देखील आहेत. नार्वेमधील कांग्सबर्ग शहरांतील रुप्याच्या खाणी युरोप खंडांत फार समृद्धिमान् आहेत. नार्वे व स्विडन एथील राज्य कारभार परिमित आहे. सांप्रत तेथील राजा फ्रेंच वंशाचा आहे; परंतु स्विडन मधील लोकांशीं तो फार मिळून असतो असें ह्मणतात. पूर्वी मी सांगितलें आहेच कीं, नार्वे एथील राज्यकारभार स्विडन एथील राज्यकारभारापासून पुष्कळ प्रकारें भिन्न आहे. ह्या दोन्ही देशांचा धर्म प्राटेस्टंट आहे.

तुह्मास ठाऊक असेलच कीं ल्यापलंडदेश स्विडनच्या स्वाधीन असून युरोपखंडांतील फार उदास देश आहे. त्याच्या दीर्घ थंड हिंवाळ्याच्या बहुत्येक दिवसांत तेथील रहवास्यांस दिवसाचा उजेड नसतो व त्यांच्या तोकड्या उन्हाळ्यांत क्वचितच काळोख असतो. एखादा पुरुष जसजसा उत्तर ध्रुवाकडे जातो तसतसे तेथील दिवस व रात्री मोठ्या होतात. ध्रुवामध्यें काळोखाचे साहा महिने व उजेडाचे साहा महिने असतात, परंतु जरी सर्व उन्हाळाभर सूर्य थोडावेळपर्यंत मावळतो तरी ल्यापलंडमध्यें अगदीं उजेड नसतो असा थोडावेळ आहे.

ल्यापलंड एथील लोकांस ल्याप्स ह्मणतात. ते विलक्षण दिसणारे लोक शरीरानें ठेंगणे व मजबूत असून त्याचे जाड, काळे केंश व धूर व बर्फ यामुळें बारीक

डोळे झालेले असतात. बर्फ डोळ्यांस इतका इजा देणारा आहे कीं उत्तर देशांत एक रोग उद्भवतो त्यास बर्फांध्य ह्मणतात. ल्यापलंड एथील लोक बहुधा तंबूंत राहून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं भटकत असतात. त्यांची संपत्ति काय ती मृगाचे कळप होत हें जनावर ( त्याच्या नांवावरून समजतें ) एका जातीचें हरण आहे, तें ल्यापलंड एथील लोकांस गायी घोडे व मेंढे यांच्या बद्दल आहे. ह्यांतून एकही जनावर इतक्या थंड प्रदेशांत राहूं शकणार नाहीं. मृग फार चपल असल्यावरून ल्यापलंड एथील लोक त्यांस आपल्या गाड्या ओढण्यास शिकवितात. जो थोडा चारा त्यांस सांपडतो त्याजवर त्यांच्यानें निर्वाह करवतो व हिवाळ्यामध्यें ते एका प्रकारच्याच केवळ निळीवर मुख्यत्वेंकरून उपजीविका करितात ती ते आपल्या पायानीं बर्फांतून उकरून काढतात. ह्या मोलवान् जनावराचें दूध व मांस ल्यापलंड एथील लोकांचें मुख्य अन्न होय. ते त्यांचीं कातडीं वस्त्रप्रावरण करण्यास व आपल्या तंबूस आच्छादन करण्यास लावितात. ल्यापलंड एथील लोक फार अज्ञानी आहेत असें त्यांच्या भटकणाऱ्या रीतीवरून अनुमान करितां येतें. तसेंच त्यांस शाळा नाहींत व फार थोडीं देवळें आहेत. स्वभावानें ते नम्र व अनपकारी आहेत, परंतु भितरे, आळसी व रीति भातीमध्यें ते फारच ओंगळ आहेत.

# पाठ नववा.

## रशिया.

युरोपांतील फारच मोठा देश रशिया आहे. र- शियाच्या संस्थानाचा बराच भाग एशियांत आहे प- रंतु आतां मी युरोपांतील रशियाविषयीं मात्र बोलेन. त्याचा ( युरोपाचा) एशियापासून युरल पर्वत व व्हा- लगा नदी ह्यांहींकरून वियोग झाला आहे. रशिया- मध्यें बादशाह राज्य करितो तो स्वतंत्र असतो ह्मणजे आपल्या इच्छेप्रमाणें राज्य करितो व त्याच्यावर पा- र्लमेंटाचा अधिकार नाहीं. रशियन लोकांचा धर्म ग्रीक पंथ आहे. पोलंड व दुसऱ्या पुष्कळ देशांत जी भाषा बोलतात तीपासून रशियन लोकांची भाषा फार भिन्न नाहीं; परंतु त्यांचा लिहिण्याचे भाषेचा प्रका- र व मुळाक्षरें दुसऱ्या कोणतेही भाषेपासून अगदीं निराळींच आहेत. ह्या व दुसऱ्या कारणास्तव रशियन भाषा शिकण्यास फार कठिण व परकीय लोक त्या देशांत राहातात त्यांखेरीज दुसरे थोडेच ती शिकण्या- स धजतात.

तुह्मांस माहित असेलच कीं सेंटपीटर्सबर्ग आणि मॉस्को हीं रशियांतील मुख्य शहरें आहेत. फिनलं- डच्या अखातानजीक निव्हा नदीच्या मुखीं सेंटपी- टर्स बर्ग आहे व नदीनें झालेलीं बेटें एकमेकासीं व मुख्य जमिनीसीं पुष्कळ पुलांनीं जोडलीं आहेत त्यां-

वर तें बांधिलें आहे. तें बंदर आहे ह्मणून फार मः हत्वाचें आहे व तें इंग्लंड व इतर पुष्कळ देशांबरोबर व्यापार चालवितें. एथेंच बादशाह व त्याचें कुटुंब राहतें. या देशाच्या मध्यभागीं मॉस्को हें सेंटपीटर्स बर्गपेक्षां फार प्राचीन शहर आहे व पूर्वीं रशियाची तीच काय ती राजधानी होती.

त्याचा एक भाग उंच जमिनीवर असून शहरा- च्या बाकीच्या भागापासून भिंतीनें निराळा केला आहे त्यास क्रेमलिन असें ह्मणतात. त्यामध्यें राज मंदिर आहे त्याविषयीं रशियन लोक फार अभिमानी आहेत. त्याखेरीज किती एक देवळें, मठ, व दुसरीं प्रसिद्ध घरें आहेत. सन १८१२ रांत नेपोलीयन बो- नापार्टानें रशियावर हल्ला केला तेव्हां तें शहर फ्रेंच यांच्या हस्तगत न व्हावें ह्मणून तेथील लोकांनी तें जाळून टाकिलें. तेथील लोक आपलीं कुटुंबें व माल मत्ता घेऊन गेल्यावरून फ्रेंच फौजेस नाश केलेल्या भिंतीखेरीज कांहीं सांपडलें नाहीं. दैववशात् क्रेम- लिन अग्नीपासून बचावलें. फ्रेंच लोकांस लवकरच मॉस्को सोडून घरचा रस्ता धरणें जरूर पडलें, परंतु अगदीं हिवाळ्यामध्यें प्रवासांत अन्नाची कमताई, व त्याहून अधिक हें कीं रशियन फौज वारंवार त्यांचा पाठलाग करी, या इतक्या विपत्ति त्यांस भोगाव्या लागल्यामुळें फ्रान्स देशास पोंहचण्यास थोडेच राहिले आणि बोनापार्ट स्वतां मोठ्या आयासानें बचावला. त्या दिवसापासून आतां मॉस्को शहर पुन्हा बांधलें गेलें आहे; जशीं दगड किंवा विटांचीं घरें बांधण्यास

वेळ लागतो तितका तेथें पूर्वींचीं घरें लांकडी असल्या-
मुळें लागला नाहीं.

वर्षाच्या बहुत्येक भागांत रशिया एथील हवा फार थंड असते, परंतु जसें एकाद्यास वाटेल कीं अशा हवेमुळें तेथील लोकांस फार इजा होत असेल तसें कांहीं दिसत नाहीं. दैवयोगें त्याच्याजवळ सर्पणाची भर पूर्णता असल्यामुळें त्यांचीं घरें बहुधा बरींच उबदार असतात, आणि जेव्हां ते उघड्या हवेंत असतात त्यावेळीं आपल्या तोंडाचा एकादा भाग उघडा न ठेवितां लोंकरीच्या कापडांत किंवा मेंढ्याच्या कातड्यांत आपल्या स्वतांस गुंडाळून घेतात. ही सर्व काळजी बाळगित असतांहि एथील लोकांचीं बोटें व नाकें कधीं कधीं धुक्यानें खराब झालेलीं (चावलेलीं) असतात. व त्याजपासून भयंकर परिणाम घडूं नये ह्मणून त्यांस त्यांजवर बर्फ चोळणें जरूर पडतें.

एथील तीक्ष्ण हवा असतांहि रशियन लोकांच्या दरवाज्याबाहेरील पुष्कळ कर्मणुकी आहेत; ह्यांतील मुख्य ही कीं थिजलेल्या नद्यांवरून किंवा नळांवरून अर्ध्या होडीप्रमाणें चाकाशिवाय एका घोड्याकडून जी खोलवट गाडी ओढवितात जिला स्लेज असें ह्मणतात त्यांत बसून फिरणें. त्यांची दुसरी प्रिय कर्मणूक ही कीं बनावलेल्या उंच ढिगावर बर्फाचे गोळे घालून त्यावर पाणी ओतल्यानें तें ताबडतोब थिजतें ह्मणजे अगदीं गुळगुळीत सपाटी होते मग ते लोक त्या उभ्या उतरणीवरून जलदी लहान गाड्यांत (स्लेजिसमध्यें) सरकून पडतात. जरी रशियाम-

धील हिंवाळा इतक्या तीक्ष्ण रीतीनें थंड असतो तरी उन्हाळा ऐर्लंडापेक्षां अधिक उष्ण असतो. तेथें वसंत ऋतु असतो असें एकाद्याच्याने क्वचितच ह्मणवेल, कां कीं बर्फ वितळला नाहीं इतक्यांत पानें व फुलें येऊं लागतात. असें असतां बहुतेक दक्षिण भागांत बहुधा हवा इतकी थंड नसते; आणि उत्तर किनाऱ्यावर जो ध्रुव सागर आहे तो नेहमी बर्फानें आच्छादिला असतो, ह्मणून जें कांहीं मीं वर्णन केलें तें रशियाच्या केवळ एक भागासंबंधीं होय व तोच काय तो मोठा भाग आहे.

तो देश बहुधा फार सपाट असून मनोरम नाहीं ज्या मोठ्या मैदानांतील देखाव्याची समता काढून टाकण्यास कांहीं मैलपर्यंत एकही वस्तू दिसत नाहीं, अश्या मोठ्या मैदानांस काप ह्मणतात. ह्या कापांतून प्रत्येक हिंवाळ्यामध्यें व्यापारी लोक गाड्यांत बसून लोंकर व दुसऱ्या वस्तु सैबेरियाहून मास्को आणि सेंटपीटर्स बर्ग याठिकाणीं विकण्याकरितां घेऊन जातात. सैबिरिया हा तुह्मास ठाऊक असेलच कीं रशियाच्या संस्थानाचा एशिया खंडांतील भाग आहे.

रशियाचे दक्षिण प्रांत सफळ व रमणीय आहेत व मुख्यत्वेंकरून ज्या द्वीपकल्पास क्रीमीया ह्मणतात तो होय. तो काळ्या समुद्रांत गेलेला आहे व फार सुंदर असून त्यांत फळें व फुलें पुष्कळ होतात व तेथील हवा गरम व सुखकारक आहे.

पुढील पाठांत ज्या बादशाहानें सेंटपीटर्स बर्ग श-

हर स्थापिलें त्याविषयीं वृत्तांत देईन; त्यास पीटर धि ग्रेट असें ह्मणत असत.

## पाठ दाहावा.

### पीटर धि ग्रेट.

पीटर यास नंतर पीटर धि ग्रेट असें ह्मणत. तो सन १६७२ व्या वर्षी जन्मला. तो दाहा वर्षांचा असतां त्याचा बाप आलेक्सिस बादशाहा मरण पावला आणि सत्राव्या वर्षी रशियन लोकांनीं त्यास आपला बादशाह असें कबुल केलें.

त्यावेळीं रशियन लोक फार अज्ञानी व रानटी प्रजा होती; परंतु पीटर यास ज्यांचा तो राजा होता त्यांचप्रमाणें आपणास शिक्षण नाहीं असें दैवयोगेंकरून वाटलें. तो आपलें राज्य करूं लागला तेव्हां रशिया देशांत व्यापार व बहुधा हस्तकौशल्यें नव्हतीं. पीटरास ह्या कला आपल्या देशांत आणण्याची आवश्यकता दिसली; परंतु त्याला हेंही वाटलें कीं दुसऱ्यांस शिकविण्यापूर्वी आपणास शिकलें पाहिजे. त्यानें डच आणि जर्मन भाषा शिकण्याचा आरंभ केला; कारण रशियामध्यें त्यावेळीं पुस्तकें दुसरीं कोणतीच नव्हतीं.

ह्या अभ्यासामध्यें त्याला लेफोर्टनामे पुरुषाकडून पुष्कळ साह्य मिळालें, तो स्विटसूलंडामधील जिनी-

वा शहरांतून आला; आणि तो फार शाहणा सुशिक्षित गृहस्थ होता. आपल्या देशांत तारवांपेक्षां दुसरें कांहीं असावें अशी पीटरास फार उत्सुकता नसे, कारण त्याला वाटे कीं, त्यांवाचून रशियन लोकांस दुसऱ्या लोकांशीं व्यापार करणें अशक्य आहे. त्यानें एका डच तारूं बांधणारास आणून कांहीं तारवें बांधण्यास लाविलें. परंतु जसें सर्व प्रथमच्या यत्नामध्यें तसेंच या कार्यांत त्याला रशियन मजुरांच्या अज्ञानावरून व कुशलता नसल्यामुळें पुष्कळ अडचण भोगावी लागली. हें संकट जितकें दूर करवेल तितकें करण्यासाठीं त्यानें कितीएक तरुण पुरुषांस निवडून निरनिराळ्या उपयोगी कला शिकण्याकरितां दुसऱ्या देशीं पाठविलें. परंतु त्यानें ह्याहीपेक्षां एक अधिक केलें, ते हें कीं, जें कांहीं आपल्या लोकांनीं शिकावें अशी त्याची इच्छा होती तें आपल्या दृष्टीनें पाहण्याकरितां त्यानें कांहीं वेळपर्यंत देश सोडून जाण्याचा निश्चय केला. ह्मणून त्यानें आपल्या बरोबर थोडे लोक व त्यांतच आपला मित्र लेफोर्ट ह्या सर्वांस घेऊन तो रशिया देश सोडून गेला व परकीय लोकांच्या जिज्ञासेवरून अडथळा होऊंनये ह्मणून त्यानें आपले नांव व पदवी लपविली.

पीटरानें जर्मनीमधून हालंडास गमन केलें, तेथें दुसऱ्या ठिकाणापेक्षां तारवें बांधण्याची कला व दुसऱ्या पुष्कळ गोष्टी आपणास चांगल्या समजतील ह्मणून त्यानें राहाण्याचा बेत केला. तो आमस्टरडम एथें न रहातां होडींतून सारडम ह्मणून जें समुद्र

किनारीं एक शहर आहे व जेथें पुष्कळ डच लोकां- चीं तारवें बांधितात तेथें गेला.

तेथें पोंहचल्यावर तो व त्याचे सोबती सुतार आहेत व ते उद्योगाचे शोधार्थ आले आहेत असें त्यानें दर्शविलें. तो दुसऱ्या बिगाऱ्यांत बसून आपणास जाणूकाय भाकरी मिळविण्याकरितां मोठ्या उद्योगानें काम करी. कारण त्यास वाटे कीं तारूं बांधण्यांत आपण साह्य केल्यानें जसा त्याचा आपणास प्रत्येक भाग पुरा समजेल तसा दुसऱ्या कोणत्याही उपायानें समजावयाचा नाहीं. आपल्या स्वताच्या इच्छेवरून त्यास पीटर टिमरम्यान किंवा बहुधा मास्टर पीटर असें ह्मणत. टिमरम्यान ह्या शब्दाचा अर्थ सुतार असा होतो. परंतु सारडम शहरांतील लोकांस पीटर हा कोण हें समजतांच लोकांचे जथे त्या बादशाहास डचखलाश्यासारिखा तांबडी बंडी व पांढरी इजार घालून कामकरितांना पाहावयास गोदींत जात (ज्याठिकाणीं तारवें बांधितात त्यास ही संज्ञा आहे) परंतु पिटरास हा अडथळा आवडत नसे, कारण तो हालंड देशांत लोकांस कौतुक करण्यास आला नव्हता तर केवळ ज्ञान प्राप्त करून घेण्यास आला होता.

तारवें बांधण्यापासून तों शिडें व दोर करण्यापर्यंत त्याने प्रत्येक गोष्ट माहित करून घेतल्यावर सारडम सोडून तो सर्व हालंडभर तेथील मुख्य शहरें व कारखाने पाहावयास फिरला. हालंड देश सोडिल्यावर तो जर्मनि व ऑसट्रिया देशांतून परत रशिया देशास आला.

पीटरानें आपण स्वतः जें समजून घेण्याकरितां इतके श्रम घेतले तें तो आपल्या स्वदेशांतील लोकांस आतां शिकवूं लागला. त्याणें त्यांस नौका बांधण्यास, चालविण्यास आणि जमिनीची लागवड करण्यास शिकविलें. त्यानें पुष्कळ शाळा स्थापून इतर भाषेंतून पुष्कळ उपयोगी ग्रंथांचे रशियन भाषेंत तर्जुमे करविले. इतक्या वेळामध्यें फिनलंडच्या अखाताच्या किनाऱ्यावर जें मोठें शहर बांधण्याचा त्याणें बेत केला होता त्याविषयीं तर वर्णन केलें आहेच, तो बेत तो सिद्धीस नेत होता, व त्याच्या योगेंकरून इतर प्रदेशांशीं चांगला व्यापार व उपयोगी व्यवहार राखितां यावा अशी त्याची इच्छा होती. पीटर्सबर्ग बांधीपर्यंत रशियन लोकांस आर्केनजल खेरिज दुसरें बंदर नव्हतें; तें रशियांचे अगदीं उत्तर टोंकास आहे, व तेथें नार्वेस प्रदक्षिणा केल्याने मात्र पोंहचतां येतें, हें तुह्मास माहितच असेल.

पीटर आपलें नवीन शहर तयार करण्यास इतका उत्सुक होता कीं त्यानें बेत करून सर्वांवर देखरेख केली इतकेंच नाहीं तर कामदारांस उत्तेजन देण्याकरितां त्यानें पाहिलें घर बांधण्यांत आपल्या हातांनीं देखील साह्य केलें. पीटर्सबर्ग हें युरोपांतील सर्वोत्कृष्ट शहर असून रशियाची राजधानी मास्को या शहराजागीं होऊन बसलें आहे. आपल्या लोकांची स्थिती सुधारण्याकरितां पीटरानें उत्सुकतेनें व साहसपणें उद्योग केला त्याविषयीं जेव्हां आपण विचार करितों तेव्हां त्यास ग्रेट ( मोठा ) हा

पडे, फितीच्या टोप्या व खांद्यावरून बहुधा तांबडी चांगली शाल घेतात; व अन्न सामग्री किंवा दुसरे सामानाची टोपली आपल्या शालीनें झांकतात.

जर्मनीचा मध्य भाग थोडासा मोठ्या रानांनी वेष्टिला आहे व त्यांतून जरी पुष्कळ डोंगराच्या रांगी आहेत तरी त्यांत एकही फार उंच नाहीं. हार्टझ नामें फारच मोठा पर्वत ब्रंनझिक आणि हानोव्हर-च्या संस्थानांमध्यें आहे, तो निबिड रानानीं वेष्टिला आहे व त्यांत कोळसे व तऱ्हतऱ्हेच्या धातूंच्या खा-णी आहेत. जर्मनीचे मध्यभागीं व उत्तरेस जी मोठी नदी आहे ती एल्ब नामें होय व तिचा बोही-मिआमध्यें उगम आहे. तिच्या किनाऱ्यावर स्या-कूसनीची राजधानी ड्रेसडन् हें सुंदर शहर असून सा-कसन राजा राहाण्याची व त्याचे दरबाराची ती जागा आहे. स्याकसनीमध्यें दुसरें उपयोगी शहर लिप्-सिक आहे, तें जर्मनीमध्यें फारच मोठी व्यापाराची पेठ आहे. प्रति वर्षी त्यामध्यें तीन यात्रा भरतात व प्रत्येक यात्रा तीन आठवडेपर्यंत असते. त्यावे-ळीं शहर सर्व देशाच्या लोकानीं भरून जातें; त्यांचे पोषाक निरनिराळे असतात, व ते निरनिराळी भा-षा बोलतात तेणेंकरून एकदम गोंधळ होऊन जा-तो. सन १८१३ यांमध्यें रशियन आणि जर्मन लोकांची फ्रान्सचा बादशाह बोनापार्ट ज्यानें जर्मनी वर हल्ला केला त्याच्याशीं लिपसिक एथें मोठी लढाई झाली. ही भयंकर लढाई तीन दिवसपर्यंत चाल-ली; परंतु शेवटीं फ्रेंचलोकांस हरवून शहरांतून हा-

कून लाविलें, त्यावेळीं बोनापार्ट मोठ्या आयासानें बचावला.

प्रख्यात रैन नदी जर्मनीच्या सर्व पश्चिमभर वाहते. स्विसआल्प्स् पर्वतापासून ही नदी निघून हॉलंडमध्यें लेडन शहरानजीकच्या समुद्रास मिळते. जर्मनीचा एक अति सुंदर व फलद्रूप भाग त्या नदीच्या किनाऱ्यावरील देशाची लांब पट्टी आहे आणि तिला रैन-प्रशिया असें ह्मणतात. नदीच्या बाजूच्या टेंकऱ्या ज्या द्राक्षवेलीच्या मळ्यांनी व्याप्त आहेत त्यांविषयीं हा भाग प्रख्यात आहे, व कोठें कोठें खडकांच्या अरुंद दऱ्यांमध्यें त्या लाविल्या आहेत, व तेथें माती नसल्यामुळें लोकांस टोपल्यांनी ती नेणें जरुर पडतें. रैन-प्रशियामधील मुख्य शहरें कोलोन् आणि काब्लेंट्झ आहेत. कोलोन या ठिकाणीं सुगंध ज्यास कोलोन वॉटर ( पाणी ) किंवा युडी कोलोन ह्मणतात तें होतें. काब्लेंट्झ हें शहर जर्मनी देशामध्यें जो पूर्वी एक प्रख्यात किल्ला होता त्याच्या समोर आहे.

रैन नदीच्या प्रवाहाच्या उत्तर भागाजवळ ह्मणजे स्विटसरलंडालगत, जर्मनीच्या नैर्ऋत्येस, डोंगरी देशाचा मोठा एक प्रदेश आहे तो दाट रानाने भरला आहे त्यास ब्ल्याक फॉरेस्ट (काळेंरान) असें ह्मणतात, कारण त्यांत मुख्यत्वेंकरून पैन आणि फर झाडें आहेत, त्यांमुळें अंतरावरून पाहिलें असतां तें फारच अंधुक किंवा बहुधा काळें असें दिसतें.

रैन जवळील रानें लांकडाकरितां फार उप-

योगी पडतात, तें समुद्रांत फार चमत्कारिक रितीनें नेतात. झाडांचे एक एक असे तुकडे पाडून खिंडींतून ज्या नद्या व डोंगराचे ओहोळ वाहतात त्यांत खडकांवरून लोटितात. तो प्रवाह त्या लांकडाच्या तुकड्यांस ज्या नदीस तो मिळाला असतो तेथपर्यंत नेतो. रैनजवळच्या नद्या त्या नदीचे फांटे किंवा शाखा आहेत,—ह्मणजे ते त्या नदींत मिळून आपल्या पाण्यानें त्या नदीला फुगवितात. ह्या मिळणाऱ्या नद्यांच्या किनाऱ्यांवर लोक ठेविले असतात; ते डोंगराच्या ओढ्यांतून जीं लांकडें वाहून येतात तीं एकत्र जमवून त्यांच्या मोळ्या बांधितात व खुद्द रैन नदींत वाहत जाव्या ह्मणून सोडून देतात. येथें नावाडी लोक असतात ते ह्या मोळ्यांची एक तरंगणारी होडी होई अशा त्या बांधितात, व तिला ते होडीप्रमाणें वल्याने समुद्रापर्यंत नेतात. ह्या तरींमध्यें नावाडी लोक आपल्या मुला माणसांसुद्धां असतात व आपल्याकरितां लहान लांकडी खोपटें बांधितात, मग तीं तरंगणाऱ्या खेड्यांसारिखीं दिसतात. जेव्हां ते समुद्रास पोंहचतात तेव्हां हे ताफे फोडून तीं लांकडें विकतात व दुसऱ्या देशीं पाठवितात.

बव्हेरिया व आस्ट्रिया या संस्थानांनीं सर्व दक्षिण जर्मनी बहुतकरून वेष्टून टाकिली आहे. तेथील मुख्य नदी प्रख्यात ड्यान्यूब आहे, ती ब्ल्याक फॉरेस्ट ( काळेंरान ) यामध्यें एका गृहस्थाच्या मंदिराजवळच्या वाड्यांतील विहिरींतून उगवते. ह्या विहिरीच्या तळाजवळ बुडबुडे येणारा झ-

रा अजून दिसतो; परंतु हा लहान झरा नंतर युरोप खंडांतील एक फार मोठी नदी होते. तिला पुष्कळ फांटे येऊन मिळतात; व ह्यांतील एक ऐसर नामें आहे, त्यावर बव्हेरी याची राजधानी म्यूनिक नामें आहे; तें मोठें व चांगलें शहर आहे. आस्ट्रियाची राजधानी व्हैयना ही डयान्युब नदीच्या एका लहान फांट्यावर आहे. तें जर्मन देशांत एक फारच सुंदर रमणीय शहर आहे. त्याच्या सभोंवतें प्रसिध्ध बाग आहेत; त्यांतील मुख्य प्रेटर नामें आहे. या विस्तीर्ण वाड्यांत तेथील लोकांस फिरण्यास, घोड्यावर बसून जाण्यास, व गाड्या हाकण्यास, व नाच गायन व तऱ्हतऱ्हेचे तमासे करून आपल्या स्वतांस करमणूक करण्यास, फार आवडतें.

आस्ट्रियाच्या दक्षिण भागास वरील ऑस्ट्रिया ह्मणतात. तो जर्मनीचा फार पहाडी भाग आहे. त्यामधून आल्पूस् पर्वताचे भाग आहेत, ते जर्मनी देशांत फार लांब पसरले आहेत. हे आस्ट्रियन आल्पूस् स्विट्सरलंडच्या आल्पूस् इतके मोठे नाहींत; परंतु मुख्य शिखरें सर्व वर्षभर बर्फाने झांकलेलीं असतात; व त्यांच्या तळाजवळील खिंडींत लहान परंतु सुंदर अशीं पुष्कळ सरोवरें आहेत.

आस्ट्रिया राज्याचा टीरल हा आल्पूससंबंधीं पहाडी परगणा आहे. तो वरील आस्ट्रिया, स्विट्सलंड, व इटली देशाचा उत्तर भाग, यांमध्यें आहे. स्विट्सलंड प्रमाणें तो खडक, ओहोळ, पैन व फर झाडाचीं दाट रानें, व ज्या पर्वतांच्या शिखरांवर सर्व-

व जर्मनी यादेशांनीं त्याची हद्दकरून टाकिली आहे. आल्प्स् व ज्युरा ह्या दोन डोंगरांच्या रांगींनी तो बहुतकरून वेष्टिला आहे. युरोपखंडांतील फार उंच पर्वत आल्प्स् स्विटसरलंडच्या आडवे नैर्ऋत्यदिशेपासून ईशानीपर्यंत आहेत; व ते त्यादेशांत आहेत, इतकेंच नाहीं, कांकीं त्यांचे पुष्कळ भाग जर्मनीमध्यें, इटालीच्या उत्तरेस व फ्रान्सच्या दक्षिणेस आहेत. स्विस्स पर्वतांची दुसरी रांग ज्युरा ही आल्प्स्च्यापेक्षां लाहान व ठेंगणी असून फ्रान्स व स्विटसरलंड या दोन देशांमध्यें सीमा आहे.

जरी स्विटसर्लन्ड लहान देश आहे तरी त्याचे २४ इतके पुष्कळ क्यॉन्टोन किंवा परगणे केले आहेत. तेथील राज्य, लोक सत्ता ज्यास ह्मणतात तें आहे—ह्मणजे त्यांस राजा नसतो, परंतु लोक जे न्यायाधीश निवडून काढतात त्यांकडून राज्य चालतें; व वर्षांतून एकदां हे सर्व न्यायाधीश एकत्र मसलत करण्यास त्या देशाची राजधानी, बर्न, एथें मिळतात. ह्यांतून कितीएक परगणे रोमन क्याथोलिक व कितीएक प्राटेस्टन्ट आहेत, व कितीएकांत या दोहोंची बहुधा समान संख्या आहे.

ह्या पर्वतांमधून व त्यांच्या तळापाशीं रुंद खोल खिंडी आहेत; व या देशाच्या कित्येक भागांत अगदीं डोंगर नाहींत, परंतु त्यांमध्यें रुंद मैदानें व बऱ्याच उतरत्या टेंकऱ्या आहेत. हीं मैदानें व खिंडी फार फळद्रूप आहेत, व हवा इतकी गरम असते कीं रहवाऱ्यांस द्राक्षांची लागवड करितां येते, त्यांची ते दारु

करितात. ह्या मैदानांतील बहुतकरून जमिनीचा प्रत्येक भाग धान्याच्या शेतांनीं, बागांनीं, वाटिकांनीं व चांगल्या आक्रोडाच्या झाडांच्या राईनीं व्यापिला आहे. ह्या आक्रोडांपासून दिव्याकरितां ते तेल काढितात; कारण स्विस्सलोक फार उद्योगी प्रजा असून आपल्या हितांचा चांगला उपयोग करितात. खेड्यांत व मोठाल्या शहरांत देखील लोक फार हस्तकौशल्यामध्यें, विशेषेंकरून लहान व मोठीं घड्याळें करण्यांत, गुंतले असतात.

स्विटसर्लन्ड देशांतील कितीएक खिंडी सरोवरांनीं भरून गेल्या आहेत. ह्यांतील मोठें जिनीवा नामें सरोवर आहे, तें फ्रान्स जवळील स्विटसरलन्डाच्या भागांत आहे; परंतु तेथें दुसरीं ही पुष्कळ आहेत. किती एकांचे सपाट व फलद्रूप किनारे आहेत, व इतरांचे पाण्याच्या किनाऱ्यापर्यंत टेंकऱ्या किंवा उभे कडे आहेत. परंतु ज्या डोंगरांमध्यें उंच खिंडी आहेत तेथील देशाचा देखावा अगदीं भिन्न आहे. तेथें द्राक्षाचे मळे दिसत नाहींत; हवा अधिक ताजी व थंड असते; व टेंकऱ्यांचे बाजूंवर व खडकांतील प्रत्येक भेगींत टवटवीत हिरवे चरण्याचे जागेचे प्रदेश आहेत. त्यांस डोंगरांचे ओहळ जे कड्यांचे बाजूंनी जोराने व फेंसाने वहात येतात, त्यांहींकरून पाणी पुरविलें जातें.

जेथें ओहळ वाहत नाहीं त्या खिंडीच्या भागीं रहवास्यांस पाणी नजीक असावें असें वाटतें तेव्हां ते लांकडी गटरांतून बांधून आणतात. ते गटर एका खडकावरून दुसऱ्या समोरील खडकापर्यंत पुलाप्रमाणें आडवे

टाकितात, व कोठेंकोठें डोंगराच्या बाजूंनीं ते उतरते देखील ठेविले असतात. उन्हाळ्यामध्यें ते आपल्या गायींस व बकऱ्यांस कुरणाच्या ह्या जागेवर चरवितात. प्रत्येक कळपास त्याचा सांभाळ करण्याकरितां धनगर किंवा कोठें कोठें एकादी बायको असते. हा खिल्लारी त्या चरण्याच्या जमिनीजवळ एका लहानशा झोंपडींत रहातो. तिला शाले ह्मणतात, या शब्दाचा अर्थ पाहाडांतील गव्यगृह असा होतो. गुरांचा संभाळ करित असतां तो पन्हेर करण्यांत गुंतला असतो; व उन्हाळा गेल्यावर हवा थंड होऊं लागली ह्मणजे पुनः तो मैदानांत येतो.

ह्या झोंपड्यांच्या व कुरणांच्या देखील फारच वर जेथें चारही नाहीं व सर्व वर्षभर जमिनीवर बर्फ पडलेला असतो अशा डोंगराच्या भागास आपण येतों. तरी येथें देखील थोडी टणक झाडें कोठें कोठें आढळतात व ह्या झाडांतून बहुतेकांस सुंदर फुलें येतात, तीं बर्फ व थिजलेल्या पाण्यानजीक उमललेलीं दिसतात.

ह्यांतून एका उंच डोंगरावरून खालीं पहाणें व गोपुच्छाकृति प्रमाणें बर्फानें पांढरी झालेल्या टोंकदार डोंगराच्या शिखरांची सर्व रांग उन्हांत प्रकाशतां पहाणें हा चांगला देखावा आहे. त्यांच्या बाजू पैन ( सरळ ) व फर ( साया ) झाडांच्या निबिड रानांनीं वेष्टिल्या असतात, या झाडांची डोंगराच्या शिखरावरील पांढऱ्या बर्फा बरोबर तुलना केली असतां तीं बहुधा काळीं भासतात. व नंतर त्या खालीं हिरव्या खिंड्यामध्यें गुरें चरतांना दिसतात. फा-

र उंच खडकांवर एकाप्रकारचे बकरे राहातात त्यांस *कमोईस ( बस्त ) ह्मणतात. ते चमत्कारिक रीतीनें चपळ असतात व एका कड्यावरून दुसऱ्या कड्यावर उड्या मारितात. अशाठिकाणीं दुसरें कोणतेंही जनावर पाऊल ठेवणार नाहीं. जेव्हां बस्तांच्या कळपांतून एकादा आपणास गोळीनें मारण्यास पारधी येतआहे असें पाहतो तेव्हां तो आपल्या सोबत्यांस एकाप्रकारचा शेंवूळी सारखा गोंगाट करून सावध करितो. हा ऐकल्यावर ते सर्व इतक्या जलदीनें उडत जातात कीं फार हुशार मनुष्य त्यांचा पाठलाग करीत असतां बहुधा पडून त्याचे तुकडे होतात, किंवा बर्फांत गाडला जातो. ह्मणून बस्ताच्या पारध्याचें जीवन फार भयकारक आहे. परंतु असें संकट सहन करण्यास देखील न भितां ही पारध आवडत्ये असे पुष्कळ पुरुष आहेत.

डोंगराच्या बाजूस बर्फाचे मोठे ढीग बहुधा पडलले असतात, ते पोकळींत किंवा दरींत शिरून राहातात, मग थिजून शेवटीं बर्फाचे भरीव गोळे होतात. या बर्फाच्या गोळ्यास ग्लेसियर ह्मणतात. अंतरावरून ग्लेसियर साकरेच्या भेल्याचे पालथ्या भांड्याप्रमाणेच दिसतो. बर्फाचे गोळे साकरेच्या तुकड्या प्रमाणें असतात. परंतु कोणीएक जवळून पाहातो तेव्हां हे बर्फाचे फारच मोठे पथरे आहेत असे त्यास

* बाकर साहेब इंग्रेजी शब्दाचा कोश कर्ने या शब्दाचा शामी असा उच्चार मांगतात.

दिसतात; त्यांतून कितीएक इतके मोठे आहेत कीं प्रत्येकास एक एक खोली लागेल, कितीएक अस्मानी कितीएक हिरवे व सर्व चकचकीत असून त्यामध्यें खोल गुहा आहेत. आल्पूसपर्वताच्या सभोंवतील दुसरी चमत्कारिक गोष्ट ही कीं तेथें बर्फांचे वर्षाव होतात. हे बर्फांचे गोळे पर्वतावरून निराळे होऊन घडघडाटासारखे मोठ्या घडाड अस्या आवाजानें त्याच्या बाजूंनीं खालीं येतात. पुष्कळ प्रवासी ह्या बर्फाच्या वर्षावा खालीं पडून दडपून गेले आहेत; व हे कधीं कधीं घरांवर व सर्व खेड्यांवर देखील, पडून त्यांस दडपून टाकून त्यांतील रहवास्यास ठार मारितात.

स्विस लोक पुष्कळ भाषा बोलतात. त्यादेशाचे सर्व मध्यम व उत्तरेंतील लोक जर्मन भाषा बोलतात. जे भाग फ्रान्स देशाजवळ आहेत त्यांत फ्रेन्च भाषा चालते. इटाली देशाच्या किनाऱ्यावरील एक दोन परगण्यांत बहुधा इटालीयन भाषा बोलतात. प्रत्येक परगण्याचा निरनिराळा पोशाक असतो व त्यांतून कितीएक फार सुंदर व विलक्षण देखणे आहेत. बहुधा सर्व बायका आपले केसांची लांब शेंपटाप्रमाणें वेणी घालून फीतीने बांधितात. व बहुत्येक परगण्यांत त्या निरनिराळ्या प्रकाराच्या व आकृतीच्या टोप्या घालतात.

## पाठ तेरावा

### इटाली

स्विटसरलंड व टिरल येथील आल्पूस पर्वताव-

रून गेल्यावर आपण इटाली देशांत येतों. हा देश इतका सुंदर व फळद्रूप आहे कीं त्यास युरोप खंडांतील बाग असें ह्मणतात.

त्याचा फार उत्तरेकडील भाग ह्मणजे पियडमांट व लंबार्डि यांच्यावरील भाग आल्पस पर्वताच्या शाखानीं वेष्टिला असून त्यांत पुष्कळ सुंदर सरोवरें आहेत. परंतु ह्या पर्वतांतील इटाली कडीलबाजू स्विटसरलंडाच्या बाजूंपासून फार भिन्न आहे येथील हवा फार उष्ण असून ह्या प्रांतांत अधिक ऊन पडतें व स्विटसरलंड व टिरल एथील हिरवीं कुरणें व काळीं पैन रानें ह्यांच्याबद्दल तेथें स्पानिश हिरवे चार पिस्ताचे, अंजीराचे, व ऑलिव्ह-झाडांचे जथे आहेत. ऑलिव्ह हें काभरट दिसणारें झाड बांबूच्या झाडाप्रमाणें कांहींसें असून रस्त्याच्या बाजूनीं व डोंगरांच्या तळापाशीं असतें. बहुधा रस्त्याच्या बाजूस पॉपलर किंवा एल्मझाडें असून त्यांवर द्राक्षवेली चढविल्या असतात अशा कीं एकाझाडापासून दुसऱ्या झाडापर्यंत माळांप्रमाणें द्राक्षाच्या व पानाच्या डाहाळ्या लोंबत असतात. ह्या झाडांमध्यें एका प्रकारचा टोळ राहतो, तो इटाली देशांत मात्र दिसतो, व तो करवती प्रमाणें नेहमी आवाज करीत असतो. बहुधा बागांत नारिंग व लिंबाच्या झाडांच्या रायी लावितात व त्यांत डाळिंबिचीं झाडेंही लावतात. त्यांस तेजस्वी किरमिजी मोहोर येतो व दुसऱ्या पुष्कळ वनस्पती लावितात. रात्रीं, आगमाशा पाहाणें आनंदकारक आहे. त्या इटालीमध्यें मात्र फार

साधारण आहेत इतकेंच नाहीं परंतु युरोपखंडाच्या सर्व दक्षिण भागांत आहेत. आगमाशी हा प्राणी काजव्या-प्रमाणें अंधारांत उजेड देतो, परंतु रांगत जाण्याबद्दल तो उडतो व काजव्यापेक्षां त्याचा उजेड फार तेजस्वी असून अगदीं स्वच्छ हिरव्या ज्वाळां प्रमाणे अंधारां-तून इकडे तिकडे फांकत असतो. असें सांगतात कीं जर ह्यांतून दोन तीन एका पुस्तकावर ठेविले तर को-णाही पुरुषास त्यांच्या उजेडानें वाचाया पुरतें दिसतें. परंतु ल्यांबार्डिचा मुख्य भाग व पियडमांटची दक्षिणे-ची जी ट्युरीन नामें राजधानी आहे, त्यांत एक मोठें रुंद, सपाट व फार फळद्रूप मैदान आहे. एकादा पुरुष कांहीं मैलपर्यंत रस्त्याच्या बाजूस तुतीचीं झाडें (जीं फ्रान्सप्रमाणे रेशिमाचे किड्यांस चारण्यास रा-खितात,) व मक्का व पांढरा घेवडा ज्या ह्या दोन्ही व-स्तु तेथील लोकांस अन्नाच्या उपयोगीं पडतात त्या-च्या विस्तीर्ण शेतांवांचून दुसरें कांहीं पाहिल्याशिवाय जातो. लंबार्डिची राजधानी मिलन् ह्या मैदानांत आहे; ती इटालीमध्यें एक सर्वोत्कृष्ट शहर आहे. लंबार्डिच्या मैदानाचे उत्तरेस जसा आल्पस् पर्वत आहे तसाच द-क्षिणेस आपीनायन्स आहे आपीनायनस् पर्वताच्या एका भागावरून गेल्यावर भूमध्यसमुद्रावरील जिनो-आ नामें शहरास आपण येतों. तें पियडमांटप्रमाणे सारडिनीयाचे राज्याचे स्वाधीन आहे. तें अगदीं पर्वतांनी वेढलें आहे व ते पर्वत आपला तळ व पाण्याचा किनारा यामध्यें शहरापुरती जागा मात्र ठेवितात. शहरावरील टेंकऱ्यांच्या बाजूस मधून मधून

देवळें व गावांतील घरें आहेत. कारण इटालियन लो-
कांस उंच व उभ्या जमिनीवर इमारती बांधण्यास
फार आवडतें. जिनोआचा उपसागर मोठें व चांगलें
बंदर असून पूर्वीं जिनोआ शहर आरमाराविषयीं प्र-
ख्यात होतें. एथील खलाशी युरोप खंडांत सर्वोत्कृष्ट
असून त्यांनी भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावरील पुष्क-
ळ जागा जिंकून आपल्या स्वाधीन करून घेतल्या
होत्या त्या शेवटीं हरविल्या गेल्या. तुह्मास आठवण
असेलच कीं कोलंबस, अमेरिकेचा शोध लावणारा
हा जिनोआ एथील रहवासी होता. इटालीच्या एका
बाजूस आड्रियाटिकसमुद्र किंवा वेनिसचें आखात या-
च्या सपाट किनाऱ्यावर इटाली मधील एक मोठें प्र-
ख्यात शहर व्हेनिस आहे. दिसण्यामध्यें तें कां-
हींसें आंस्टर्डम प्रमाणें आहे. त्याविषयीं हालंड देशा-
च्या वृत्तांतामध्यें पूर्वीं वर्णन केलेंच आहे. त्या श-
हराप्रमाणें समुद्रांतील पुष्कळ लहान बेटांवर तें श-
हर बांधलें आहे; व घरांच्या रांगींमधून रस्त्याबद्द-
ल त्या शहरांतून सर्व दिशेस नळ काढलेले आहेत.
कितीएक भागांत ह्या नळांवरून पुलांनी जातां येतें.
परंतु बहुधा लोक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिका-
णीं गंडोळ्यामधून जातात. गंडोळा ही एक चमत्का-
रिक आकाराची झांकलेली होडी आहे व तिला का-
ळें शीड लावितात तेणेंकरून त्या होडीचा फार का-
ळसर देखावा असतो. शहरांत गाड्या, गाडे, किंवा
घोडे दिसत नाहींत व कोणासही फिरण्याजोगी जागा
एका प्रकारचा चौक आहे, ज्यास सेंटमार्केसची जागा

असें ह्मणतात, ती कायती मात्र होय. इटाली मधील शहरांपैकीं व्हेनिस हें पूर्वी एक मोठें समृद्धिमान् व बळकट शहर होतें. परंतु तें आतां अनावस्थेंत पडून त्यांतील बहुत्येक घरें मोडकळींत आलीं आहेत.

इटालीच्या मध्यभागीं समुद्रापासून फार दूर नव्हे अशा लहानशा टेंकऱ्यांच्या समुदायावर रोम शहर आहे: ह्या प्रख्यात शहरास पुरातन काळीं “ पृथ्वीची धनीन” असें ह्मणत असत, कारण कीं त्या वेळीं रोमनलोक फार बळकट प्रजा असून आपल्या शूरत्वावरून व लढाईंत कुशलतेवरून त्यावेळीं जेवढी पृथ्वी माहीत होती तितकी त्याणीं जिंकिली होती. जुडीया प्रेषितांच्यावेळीं रोमनलोकांच्या स्वाधीन होती व श्रीपालास रोमन शहरांत बंदीवान करून आणला होता व एथे त्याने दोन वर्षांपर्यंत धर्म पुस्तकांतील उपदेश केला असें तुह्मास लक्षांत ठेविलें पाहिजे. परंतु अजून जरी रोम सुंदर व आनंद कारक शहर आहे तरी तें पूर्वीं होतें तसें आतां नाहीं. त्याचा बहुत्येक भाग अनावस्थेंत पडला आहे व त्यासभोंवतील देश जरी पूर्वीं आनंदकारक व चांगला लागवड केलेला होता तरीं आतां तो इतका रोगकारक आहे कीं उन्हाळ्यांत त्यामध्यें कोणाच्याने सुखरूप रहावत नाहीं, ह्मणून तो केवळ रान होऊन पडला आहे.

इटालीचा दक्षिणभाग पर्वतांच्या रांगींनी विभागला आहे व खोल खिंडींनी भरून गेला आहे. ह्या खिंडींत सर्व प्रकारच्या वनस्पती होतात, ह्मणजे रान-

वट झाडें, फळझाडें, द्राक्षवेली व फार सुंदर फुल झाडें जीं उष्णप्रदेशावांचून कोणत्याहि प्रदेशांत आढळावयाचीं नाहींत तीं एथें होतात. एथें खेडीं व शहरें बहुतकरून कांहीं टेंकरीच्या बाजूस किंवा शिखरावर किंवा उभ्या खडकांच्या पोकळ भेगांत बांधलीं असतात. असें हें इटाली मधील लोक चोरांच्या रस्त्यापासून दूर रहाण्यासाठीं करितात. हे चोर इटालीचे मध्य व दक्षिण भागीं पुष्कळ असतात. ते आपला निर्वाह प्रवासी लोकांस लुटून किंवा त्या मार्गाने जे गांवकरी लोक येतात त्यांची मालमत्ता नेऊन करितात.

इटालीच्या आग्नेय भागांत नेपलूस हें शहर त्याच नांवाच्या उपसागरावर आहे. नेपलूसच्या उपसागराचे किनारे आपलें सौंदर्य, फलद्रूपता व सुखकारक हवा ह्याविषयीं प्रख्यात आहेत. नेपल्स पासून पुष्कळ मैल नव्हे अशाठिकाणीं व्हिसुवियस नामे प्रख्यात ज्वालामुखी किंवा जळका डोंगर आहे. त्याच्या शिखरावर एक खोल छिद्र ज्यास मुख ह्मणतात तें असून त्यांतून धूर, ज्वाला व लाल भडक दगड बहुधा बाहेर निघतात.

इटालिअन काळ्याजातीचे लोक असून बहुतकरून त्यांचे काळे केस व डोळे असतात. या देशाचा धर्म रोमनक्याथोलिक् आहे. निरनिराळ्या राज्यानीं इटालीचीं पुष्कळ संस्थानें केली आहेत, परंतु तीं सर्व जुलमी आहेत. बहुतकरून लोक आळसी आहेत, परंतु हुशार व बुद्धिमान असून गायनामध्यें आपल्या

कुशलतेविषयीं प्रख्यात आहेत. त्यांमध्यें पुरातनकाळीं रंगविण्याची कलाही, बरीच पूर्णतेस आली होती. इटाली मधील भाषा स्वरामध्यें फार मंजुळ व आनंदकारक आहे. एथील लोकांचा पोशाक निरनिराळा असून कधीं कधीं फार सुंदर असतो. लांबार्डिमध्यें स्त्रिया एक विलक्षण डोक्यांतील लांब रुप्याच्या टांचण्याचा* अलंकार डोक्यापाठीमागें घालतात; त्या चाकाच्या अऱ्याप्रमाणें असतात. दुसऱ्या भागांत पांढऱ्या तागाचे वस्त्राचे चौरस तुकडे किंवा मसलीनचे बुरखे किंवा रंगीत रुमाल डोक्यावर घेतात; व त्या बहुधा सुंदर व चकचकीत रंगाचीं वस्त्रें पांघरतात.

एथील साधारण लोक व विशेषेंकरून उत्तरेकडील लोकांचें मुख्य अन्न इंडियन धान्य, ज्यास पोलेंटा ह्मणतात त्याची एक प्रकारची भाकर होय. घेवडा व स्प्यानिशपिस्तें ह्यांची एक प्रकारची भाकर करून याचप्रमाणे उपयोग करितात; व मोठ्या सणाच्या दिवशीं त्याचें प्रियपक्वान्न तारफेऱ्या ह्मणून गव्हांच्या पिठाचा पदार्थ करितात तो होय.

# पाठ चौदावा.

## स्पेन.

स्पेन व पोर्टुगाल हे दोन देश मिळून युरोप खं-

* हा दागिना कांहींसा बाणीप्रमाणे असावा.

डाचा फारच पश्चिम भाग होतो व त्यांस बहुधा द्वीपकल्प असें ह्मणतात; कारण ते दोन देश मिळून एक फार मोठें प्रख्यात द्वीपकल्प होतें. त्याची जी बाजू फ्रान्सच्या दक्षिणेस जोडली आहे त्याखेरीज सर्व बाजू समुद्रानें वेष्टिल्या आहेत. स्पेनमध्यें पुष्कळ प्रांत पूर्वीचीं राज्यें होत. त्यांतील मुख्य, त्या देशाच्या मध्यभागीं क्यास्टिल नामें प्रांत आहे त्यांत मुख्य शहर म्याड्रिड नामें आहे म्याड्रिड उदास नापीक मैदानांत आहे; परंतु तें चांगलें शहर असून स्पेनच्या राणीचे वर्षांतून कित्येक दिवस पर्यंत राहण्याचें व दरबाराचें ठिकाण होतें. त्यापासून फार दूर नव्हे असें येसूक्युरीयलनामें प्रख्यात मंदिर जें स्पेनच्या एका राजानें आपल्यास मोठा जय प्राप्त झाला त्याच्या सन्मानार्थं बांधिलें होतें, तें आहे. तें शेगडीच्या आकाराचें बांधिलें आहे. स्पेनच्या मध्यभागांतील बहुत्येक देश सपाट व वाळवंटाचे आहेत, व हवा कधीं कधीं दाह होण्या इतकी उष्ण व कधीं कधीं फारच थंड अशी तऱ्हतऱ्हेची असते. फारच उत्तरेकडील प्रांत ज्यांतून पिरनीस पर्वताची रांग जाते, तेथील हवा त्यापेक्षां थंड असून दक्षिण देशांतील फुलें व फळें यांतून कांहीं एक आढळत नाहीं; परंतु पर्वताच्या बाजू ओक, व स्पानिश् चिस्ताच्या झाडांनीं वेष्टिल्या आहेत ह्याहून वर, ज्या ओसाड खडबडींत खडकांवर दुसरें कांहीं एक होत नाहीं तेथें स्विटसर्लंड प्रमाणें पैन, व फर झाडें आहेत. पिरनीस पर्वत आल्पूस पर्वता इतका, बहुतकरून उंच ना-

हीं; परंतु त्याचीं कितीएक उंच शिखरें सर्व वर्षभर बर्फानें आछादलीं असतात.

स्पेनच्या दक्षिणेकडील हवा गरम असून जमीन चांगली व फलद्रूप आहे; तिजमध्यें गहूं व इतर प्रकारचीं धान्यें पुष्कळ उत्पन्न होतात इतकेंच नाहीं तर तांदूळ व मेझ ( मका ) हीं होतात. व ज्या मद्याचा ग्रेटब्रिटनामध्यें बहुत खप होतो तें स्पेन मधील ह्या भागांत जीं द्राक्षें उत्पन्न होतात त्यांचें करितात. तेथें उन्हामुळें नारिंगें व लिंबेंही पिकतात. व त्यांतील कितीएक प्रतिवर्षीं एथें पाठवितात. नारिंगाच्या झाडास फळें लागलीं ह्मणजे तें फार सुंदर दिसतें. त्याला उभा दांडा व गुळगुळीत काळसर हिरवीं पानें व पांढरा मोहोर असतो. त्या मोहरास मधुर सुगंध आहे ह्मणून फुललेल्या ह्या झाडांच्या राईच्या सभोंवतील सर्व हवेस वासच येतो. तेथें तसींच अंजिरें, आंबोरी ( तुति ) आंलिव्ह ( ज्यांचा स्प्यानियर्ड व पोर्टुगीस लोक खाण्याकरितां फार उपयोग करितात व ज्याचें गोडें तेल काढितात ) व दुसरीं पुष्कळ फळें होतात त्यांहीकरून स्पेनचा दक्षिणभाग समृद्धिमान् व सुंदरच बागाप्रमाणें होतो. एथील मुख्य शहर सीव्हिली आहे. हें शहर फलद्रूप मैदानाच्या मध्यभागीं असून त्याच्या मधून मधून खेडीं देवळें व द्राक्षमळे आहेत, त्यांतून गोडालक्विव्हर नदी शहराच्या अगदीं तटा खालून वहाते. स्पानीयर्ड लोक सिव्हीली विषयीं फार गर्व करितात, परंतु जरी त्यामध्यें फार चांगल्या पुष्कळ इ-

मारतीं आहेत तरी रस्ते अरुंद काळोखी व उदास आहेत. सूर्याचीं किरणें पडूं नयेत ह्मणून ते अशा रितीनें बांधले आहेत.

ह्याच्याही खालीं जिब्रालटरची खाडी आहे; तुह्मी शिकले आहांच कीं ती खाडी स्पेनदेशाचा आफ्रिका खंडापासून वियोग करिते, ह्या खाडीवर जिब्रालटरची भूशलाका आहे, तो उंच व फार उभा खडक असून त्याच्या शिखरावर मजबूत किल्ला आहे, तो ग्रेटब्रिटनच्या स्वाधीन आहे. जिब्रालटर हेंच काय तें स्पेन मधील शहर आपल्या हस्तगत आहे. त्यामध्यें तारवांकरितां चांगलें बंदर आहे, या खेरीज तें युरोप खंडांतील एक फार बळकट व महत्वाचें ठिकाण आहे. सन १७०४ या वर्षीं स्पानियर्ड लोकांकडून ग्रेटब्रिटनानें तें घेतलें, व तें परत जाऊं नये ह्मणून आपण तेथें नेहमीं शिपाई ठेवितों. प्राचीनकाळीं लोक तो पृथ्वीचा शेवट, असें मानीत असत; कारण त्याच्या पलीकडे ते कधीं गेले नव्हते. जिब्रालटर विषयीं दुसरी चमत्कारिक गोष्ट अशी आहे कीं युरोपखंडांत रानटी माकडें आढळतात अशी काय ती तीच जागा आहे. ज्या ठिकाणीं मनुष्याच्यानें जाववत नाहीं अशा मुख्यत्वेंकरून उभ्या कड्यामध्यें झाड्या व झाडांवर ह्यांतील पुष्कळ जनावरें चढतांना व आपल्या विलक्षण व रिझिवणाऱ्या खोडी करतांना दिसतात.

स्पेनमधील निरनिराळ्या ठिकाणचे लोक फारच भिन्न दिसणारे आहेत. दक्षिणेस सिव्हिलीच्या आ-

सपासचे लोक फार काळे व त्यांचे काळे डोळे व केस असतात; उत्तरेकडील भागांत ते त्यांहून गोरे आहेत. जी भाषा ते बोलतात ती जरी बहुतकरून स्पानिष असते तरी तिला कधीं कधीं क्यास्टिलियन असें क्यास्टिल या परगण्यावरून ह्मणतात. ती फार चांगल्या स्वराची भाषा आहे. स्पेनच्या प्रत्येक प्रांतांत साधारण लोक निराळा पोशाक करितात व ह्यांतील कितिएक पोषाक फार सुंदर व खुबिदार असतात व असे विशेषेंकरून सणाच्या दिवशीं जेव्हां पुरुष व स्त्रिया फार सुंदर रीतिनें सजले असतात तेव्हां असतात. या स्त्रिया जेव्हां बाहेर फिरावयास जातात तेव्हां डोकें व खांदे यांवरून काळ्यारेशमाचें उपवस्त्र घेतात त्यास पिछोडी असें ह्मणतात व टोप्या घालित नाहींत व हातांतून नेहेमी त्या मोठे पंखे घेऊन जातात.

स्प्यानियर्ड लोक गाणे व नाचणें ह्यांविषयीं फार शोकी आहेत. गरीब लोकांत देखील गिटार ह्मणून एकाप्रकारचें दोऱ्याचें वाद्य बोटांनीं वाजविणें साधारण आहे. श्रीमंत लोकांचीं घरें चौकासभोंवतीं कांहींशीं वाड्याप्रमाणें बांधिलीं असतात ह्या चौकावर उन्हाळ्यामध्यें ऊन पडूंनये ह्मणून अस्मानगिरी किंवा छत लाविलें असतें व थंडीकरितां त्यांत लोक पुष्कळ वेळ घालवितात. दिवसाचा मध्यांन्ह प्रहरीं इतकी गरमी होत्ये कीं दोन तास प्रत्येक जण निजायास जातो. ह्या दोन प्रहरच्या झोपेस वामकुक्ष किंवा निद्रेचा चुटका असें ह्मणतात. व

ही होत असतां सर्व रस्ते रिकामे पडतात व दुकानें बंद होतात; असें कीं कोणी ह्या निद्रेच्या चुटक्याच्या वेळीं एकाद्या शहरांत आला असतां त्यास तेथील रहवास्यांनीं तें शहर सोडलें, असें वाटेल. परंतु जेव्हां सूर्य खालीं जाऊं लागतो तेव्हां पुन: रस्ते लोकांनी भरून जातात, खिडक्या उघडतात व शहरांतील गोंगाट व गडबडाट नेहमीप्रमाणें सुरू होतात. स्पानिर्यड लोक पूर्वीं फार चपळ व साहसी असून त्यांनीं परकीय देशास, व विशेषेंकरून नव्या सृष्टीच्या शोधा करितां पुष्कळ सफरी केल्या; व ज्या आरमारानें कोलंबसाने अमेरिका खंड शोधून काढलें, तें आरमार स्पेनच्या एका राजानें तयार केलें होतें, असें तुह्मास पाठाच्या दुसऱ्या पुस्तकाच्या पुरवणींत वाचल्याची आठवण असेल.

स्पेन एथील धर्म रोमनक्याथोलिक आहे; एथील राज्यकारभार परिमित आहे. स्पानिश पार्लमेंटास ( दरबारास ) कोर्टिस ह्मणतात व त्यांवर या सांप्रतकाळीं एक राणी राज्य करिते.

## पाठ पंधरावा.

### पोर्टुगल.

टेगसनदी स्पेन.व पोर्टुगल यामधूनही जाते. पोर्टुगल नकाशावर स्पेनचा एक कापलेला भाग असें दिसतें.

ज्या पुष्कळ गोष्टी स्पेनविषयीं सांगितल्या तशाच

पोर्टुगलविषयीं देखील सांगतां येतील. स्पेनप्रमाणेंच एथील लोकांचा धर्म रोमनक्याथोलिक आहे, व त्यांचा राजकारभार परिमित आहे. जी भाषा ते बोलतात तीस पोर्टुगीझ असें ह्मणतात; ती स्प्यानिश भाषे सारखीच आहे.

स्पेनदेशाच्या हवेसारखीच ही हवा निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळी आहे; परंतु सर्व गोष्टी लक्षांत आणल्या असतां या दोहोंपैकीं पोर्टुगल देश उष्ण आहे. युरोपाच्या बहुधा कोणत्याही भागापेक्षां उन्हाळ्यांत समुद्र किनाऱ्यावर फार गर्मी असते: परंतु आंतील कितीएक प्रांत डोंगरी आहेत आणि तेथें कांहींशी थंडी असते. एथील एका प्रांतांत दोन वसंतऋतू होतात. पहिला फेब्रुवारी महिन्यांत आपल्या हिवाळ्याचे भरांत चालू होतो. जून महिन्यांत शेतें कापितात; आणि नंतर फार कडक उन्हाळा येतो, तेणेंकरून चार आणि हरळी सुकून जाते, व जमीन अनावृष्टीमुळें अगदीं कोरडी पडते. परंतु अक्टोबर महिन्याच्या आरंभीं दुसरा वसंतऋतू येतो; कुरणें नवीन चारीने भरून जातात, पावसाळ्याच्या फुलांबद्दल वसंतऋतूचीं फुलें येतात, नारिंगीचीं झाडें मोहरानेंभरून जातात; सारांश, पावसाळ्यामध्यें एथील लोक वसंतऋतूचीं महिना सवामहिना सुखें भोगितात.

स्पेनच्या दक्षिणेस जीं फळें होतात तींच बहुत करून पोर्टुगल देशांतही होतात. बदामें, अंजिरें, मनुका, व दारू, यांखेरीज आपणास पोर्टुगाल देशाहून बहुतेक नारिंगें व लिंबें मिळतात. गर्मी असतांही

एथील हवा इतकी निरोगी मानितात कीं, ग्रेटब्रिटन् व इतर उत्तरेकडील देशांतील आजारी लोक आपल्यास आरोग्य प्राप्त करून घेण्यास बहुत करून तेथें जातात.

जेथें टेगसनदी आटलान्टिक सागरास मिळते, तिच्या मुखाजवळ या देशाची राजधानी लिस्बोन् नामें आहे. हें मोठें व उपयोगी शहर असून एथें तारवांकरितां एक चांगलें बंदर आहे. सुमारें नव्वद वर्षांपूर्वी या शहराचा बहुत करून अर्धा भाग भूमिकंपाने विध्वंस्त केला होता. तो भाग आतां पुनः रचून पूर्वीपेक्षां रस्ते फार सुंदर व रुंद केले आहेत. ह्या शहराचा जुना भाग जो धरणीकंपापासून बचावला गेला, तो अंधूक व ओंगळ असून त्यांत फार अरुंद रस्ते आहेत.

लिसबोनूच्या खालोखाल दुसरें मोठें शहर ओपोर्टो आहे. हें शहर डोरो नदीच्या मुखापाशीं दोन टेंकड्यांवर चांगलें वसलें, आहे. ज्या दारूस आपण पोर्टवैन ह्मणतों ती ह्याच्या आसपासच्या ठिकाणाहून येत्ये.

स्प्यानियर्ड लोकांप्रमाणें पोर्टुगीझ् लोक फार काळे सांवळे व त्यांचे केंस आणि डोळे ही काळे असतात. त्यांचे पोशाक तऱ्हे तऱ्हेचे असतात. लिसबोनांतील स्त्रिया व पुरुष अतिशय गरमीमध्यें देखील जाड कापडाचा खांद्यांवरून मोठा झगा किंवा आंगरखा घेतात. एथील स्त्रिया टोप्या घालीत नाहींत, परंतु डोक्यांत पुष्कळ बनावलेलीं फुलें व

दागिने घालितात, व जेव्हां त्या बाहेर जातात तेव्हां डोक्यांवरून पांढरा रुमाल टाकितात. स्प्यानियर्ड लोकांप्रमाणें याच देशाच्या दुसऱ्या भागांत त्या काळा झगा घालितात.

स्पेन आणि पोर्टुगल ह्या दोन्ही देशांमध्यें ओझें वाहण्यास, खटारे व गाड्या ओढण्यास, व जें काय आपण बहुधा कंठाळीचे घोड्यांपासून काम करवितों तें सर्व करण्यास खेचरे फार लावितात. जेव्हां त्यांची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं ओझें वाहण्याची गरज पडती, तेव्हां एकामागून एक असे त्यांस दोरांनी बांधून एका दोरीने चालवितात व त्यांच्यापुढें त्यांस रस्ता दाखविण्यास जो मनुष्य चालतो त्यास खेचरवाला असें ह्मणतात.

पुरातन काळीं पोर्टुगीझ् लोकांनी पृथ्वीच्या फार दूरच्या भागांत सफरी केल्या, व नवीन देश शोधून काढले, त्यांवरून त्यांची स्प्यानियर्ड लोकांप्रमाणें प्रसिध्धी होती.

ज्या पहिल्या पुरुषानें हिंदुस्थानास समुद्रानें पर्यटन केलें, व केपआव् गुड होप शोधून काढिलें, तो मोठा सफरी करणारा पोर्टुगीझ् वॉसको डी गामा होता. ज्या वर्षीं कोलंबसाने अमेरिकेचा शोध लावला त्याच वर्षीं ह्मणजे सन् १४९२ वांत त्यानें पर्यटन केलें. दक्षिण अमेरिकेंत ब्राझिल हा देश पूर्वीं पोर्टुगीझ लोकांचे स्वाधीन असून त्यांनी वसविलेला होता. परंतु सांप्रत त्या देशाचें स्वसत्तात्मक राज्य आहे.

# पाठ सोळावा.

## ग्रीस.

टर्की आणि ग्रीस हे देश फारच पूर्वेकडे असून युरोपखंडाच्या दक्षिणेस आहेत. ते भूमध्य समुद्राच्या ज्या भागास लिव्हांट ह्मणतात त्यावर आहेत. या शब्दाचा अर्थ पूर्व किंवा सूर्याचें उगवणें असा होतो. पुरातनकाळीं हे दोन्ही देश ग्रीस या नांवानें प्रसिद्ध असत. त्यावेळीं ग्रीस मोठा बलाढ्य देश असून त्यामध्यें पृथ्वींतील त्यावेळच्या दुसऱ्या कोणत्याही देशापेक्षां फार शाहाणे व हुशार व सर्व प्रकारच्या कलाकौशल्यांमध्यें आणि उपयुक्त कृत्यांत वाकबगार लोक असत. जिला कोरण्याची कृती ह्मणतात (ह्मणजे स्फटिकेचे दगडाचे किंवा पितळेचे पुतळे करण्याची कळा) तिजमध्यें ग्रीक लोक विशेषेंकरून निपुण होते.

प्रेषितांच्यावेळीं ग्रीस देश रोमन लोकांनीं जिंकून आपल्या हस्तगत करून घेतला. त्याचवेळीं श्रीपॉलाने त्यांतून प्रवास करून पुष्कळ शहरांस ख्रिस्ताच्या मताकडे वळविलें. कांहीं वेळानें सर्व ग्रीस देश ख्रिस्ती झाला; परंतु प्रेषितांनी पवित्रपण, परस्पर शांती व दया हीं त्यांस शिकविलीं असतां ते त्याप्रमाणें राहिले नाहींत. ते निष्काळजी व संसारिक झाले; ते सुधारणुकेंत तसेच चांगूलपणांत हळूहळू खालीं येऊन शेवटीं अज्ञानी व आळशी लोक झाले. सन् १४५३ ह्या वर्षीं त्यांस टर्क लोकांनीं जिंकिलें, ते रानटी व लढाऊ लोक एशिया खंडांतून आले,

व ढोंगी भविष्यवादी महमद याची पूजा करित असत. त्यांनीं त्यावेळची ग्रीस देशाची राजधानी कॉन्स्टांटिनोपल पुष्कळ वेळपर्यंत रक्तस्रावाची लढाई करून घेतली; या लढाईंत ग्रीक पादशाह मारला गेला; ( कारण त्यावेळीं ग्रीक लोक एकाच्या अधिकारा खालीं होते. ) टर्क लोक सर्व देशाचे धनी झाले, व जे ग्रीक लोक मुसलमान होईनात त्यांस बंदींत व ताब्यांत ठेवून मोठी खंडणी देण्यास जुलूम करीत.

परंतु थोडया वर्षांपूर्वीं त्या देशाचा दक्षिण भाग, जें सांप्रतचें ग्रीसचें राज्य, त्यांतील लोकांनी टर्क लोकांचें स्वामित्व उडवून देण्याचा निश्चय केला. आपल्या क्रूरधन्यांच्याविरुद्ध त्यांनीं एकत्र उठून आपल्याला स्वतंत्र करून घेतले, बव्हेरिया एथील राजपुत्र ओथो यास त्यांनी आपला राजा केला, व त्यांचा राज्यकारभार सांप्रत परिमित आहे.

ग्रीस देशाची मुख्य जमीन ल्याव्हेडिया ही असून तींत आथेन्सनामें शहर असल्यामुळें विशेषेंकरून प्रख्यात आहे. आथेन्स हें शहर पूर्वीं जगांत फार प्रसिद्ध होतें. तें आतां दीनवाणें व फुटकळ होऊन नाशाप्रत पावलें आहे, व एथील लोकांनी जीं मोठालीं देवळें व अर्चास्थानें बांधून देवांस अर्पण केलीं तीं सर्व आतां दुरावस्थेंत पडलीं आहेत. प्रेषितांच्या कृत्यांमध्यें तुह्मी वाचलें आहे त्याची तुह्मास आठवण असेलच कीं ओपॉलाची उपदेशकरण्याची आथेन्स ही एक जागा असे. त्याचप्रमाणें ल्यावेडिया प्रांतामध्यें खाणी सांपडल्या होत्या, त्यांमधून सुंदर पांढरे स्फटिकेचे

दगड निघत, ग्रीक लोक त्यांवर कोरीव कामें करित असत.

अर्वाचीन ग्रीस देशाचा दुसरा मोठा परगणा मोरियाचा द्वीपकल्प किंवा ज्यास प्राचीनकाळीं पिलापॉनिसस् ह्मणत तो आहे. तो ग्रीस देशाच्या मुख्य जमिनीस कॉरिंथ या संयोगी भूमीनें जोडला आहे; ती चार पांच मैल रुंद असून तिजमध्यें कॉरिंथ नामें शहर आहे. कॉरिंथच्या आखातावरील जी उभी व खडबडीत टेंकडी आहे तिच्या तळाजवळ तें शहर आहे. ( ह्या आखातास लीप्यांटोचें आखात असेंदेखील ह्मणतात. ) कॉरिंथ या ठिकाणीं औपाल यानें दीड वर्ष लोटलें. त्यावेळीं तें समृद्धिमान् व मोठें शहर असे; आतां आथेन्ससारिखेंच अर्धवट दुरावस्थेंत पडलें आहे.

मोरिया हा फार पहाडी देश आहे. परंतु तेथील खिंडी सुंदर व फळद्रूप असून हवा गरम व सुखकारक आहे.

ग्रीक लोकांची जात बहुधा काळी असून फार सुंदर आहे. त्यांचा पोशाक चमत्कारिक असतो; पुरुष पांढऱ्या कापडाची लहान बंडी व अंगरखा व कंबरेसभोंवतीं बहुधा लाल ओल व फार लांब रुंद इजारी वापरतात. त्यांच्या डोक्यांत एक तांबडी टोपी व तिला मागें लांब गोंडा असतो. बायकांजवळ लहान कंचुक किंवा झगा असतो व त्यावर बहुधा सोनेरी किंवा रुपेरी कशिदा काढला असतो व ढील लांबतें गवन ( पेशवाज ) असतो; व त्या पुरुषांप्रमाणेंच

तांबड्या टोप्या घालितात. त्यांच्या लग्नाच्या वेळीं दोन आंगठ्या व दोन फुलांच्या माळा नवरा व नवरीच्या बोटांत व डोक्यांत घालितात व पुष्कळवेळपर्यंत पुढें मागें अशा जागा बदलीत असतात. नंतर ते कांहीं पोळी व दारू एकत्र बसून खातात, व संध्याकाळीं नवरी आपल्या पुष्कळ मित्रांसह व सोयऱ्यांबरोबर नवऱ्याचे घरीं जाते, तेथें त्यांस नाच, गाणें व भोजन चालीप्रमाणें मिळतें.

ग्रीक लोक रोमेईक ह्मणून एक भाषा आहे ती बोलतात. ते रशियन लोकांप्रमाणें ग्रीक चर्च (देवूळ) चे ख्रिस्ती आहेत.

आर्चिपेलेगोमधील बेटें, हवा आणि उत्पन्न यांनी ग्रीस सारखींच बहुधा आहेत त्यांतील कितीएक बेटें खडकाळ व नापीक आहेत; ऐओनियन समुद्रांतील करफ्यु, सिफेलोनिया आणि झ्यांटी येथें अंजिरें, ऑलिव्ह झू द्राक्षें, व इतर फळें व फुलें पुष्कळ होतात. सुकलेलीं जीं पुष्कळ अंजिरें व मनुका आपण ( ऐरिशलोक ) खातों तीं ग्रीक बेटांहून येतात, व आपलें बहुतेक स्यालड नामक तेल तेथील ऑलिव्ह झाडांच्या बियापासून करितात. गोल दगडावर जें चाक फिरतें त्यांत त्या बिया चेंचतात; व पिशव्यांत घालून मग स्क्रु-( मळसुत्राने) पिळतात. ह्या रितीनें दर दिवसास दोन मजूर १०—१२ तेलाची दबडी भरून काढितात.

ह्या बेटांतील दुसरें मुख्य उत्पन्न ज्यांस आपण व्यापाराची खीसमीस (बेदाना) ह्मणतो तीं फळें आहेत. हीं फळें खरोखर मनुका नाहींत, परंतु ज्या बारीक

काळ्या द्राक्षाची मोठ्या मेहेनतीने विशेषेंकरून इयां-टीमध्यें लागवड करितात ती होत. सेपटेंबरमहिन्यामध्यें मनुका गोळा करून युक्तीनें निवडल्यावर एकेक अ-श्या दगडयाच्या जमिनीवर उन्हांत सुकण्यास उघड्या हवेंत घालतात. जर हवा खराब असली तर सुकण्या-स पंधरवडा लागतो. गडगडाटाच्या वादळानें फळांचा समूळ नाश बहुधा होतो. सुकल्यावर त्या पिपांत भरून विकतात, व दुसऱ्या देशीं पाठवून देतात.

आयू ओनियन बेटांतील बहुतेक लोक ग्रीक आहेत; परंतु एकवेळीं ते इटालीच्या स्वाधीन होते, व त्यांमध्यें इटालीयन पुष्कळ ठाणेदार अजून ही आहेत. ते ब्रिटिश राज्याच्या आश्रयाखालीं आहेत.

## पाठ सतरावा.

### टर्की.

ग्रीस देशापेक्षां फार मोठें व उपयोगी संस्थान युरोपांतील टर्की हें आहे. तें, भूमध्य समुद्र व काळा समुद्र या दोंहीकरून बहुधा वेष्टिलेलें आहे, व त्याचा ड्यान्युब नदीवरील प्रदेश रशिया व ऑसूष्ट्रिया यांच्या प्रदेशांस जडला आहे असें तुह्मास नकाशावर आढळेल.

युरोपांतील इतर रहिवाशांपासून फार भिन्न लोकांच्या जातीने टर्कीदेश वसला गेला आहे. तेलोक खरोखर पाहिले असतां एशियांतील एकजातीचे आहेत, व आपण ग्रीसविषयीं बोलत असतां वर्णन केलें कीं, ते मुस-

लमान लोक आहेत, ह्मणजे महमद ढोंगी भविष्यवाद्यास अनुसरणारे होत. त्याविषयीं आपण आर्बस्थानाचें वर्णन करते वेळीं विशेषेंकरून बोलूं.

सुलतान हें जें पूर्वेकडील राजाचें नांव आहे तसेंच एथील राजास ह्मणतात. युरोपांतील दुसऱ्या कोणत्याही राजापेक्षां तो फार जुलुमी असतो; कारण तो लोकांच्या साह्यावांचून राज्य करितो, इतकेंच नाहीं परंतु, जर त्याचे मानकरी किंवा हुजरे यांनीं त्याची मर्जी खपा केली तर तो त्यांचा तपास केल्यावांचून त्यांस मारून टाकण्यास तावडतोब हुकूम करितो.

टर्कीची राजधानी किंवा सुलतानाचें राहण्याचें स्थान कॉनस्टानटिनोपल आहे, तें चांगलें शहर, बॉसूफरसची किंवा कॉनस्टानटिनोपलची खाडी जी काळ्या समुद्रास आणि मारमोरा समुद्रास जोडिते, आणि युरोप आणि एशियाचा वियोग करिते, तेथें आहे.

कॉनस्टानटिनोपलाजवळ पृथ्वीमध्यें एक फार चांगलें बंदर आहे, परंतु टर्क लोक त्याचा व्यापारासाठीं फारच थोडा उपयोग करितात, कारण ते गर्विष्ठ व आळशी लोक असून मेहनतीचा धिक्कार करितात, व त्यांस भटकण्यामध्यें, लांब विड्या ओढण्यांत, आणि काफी पिण्यांत दिवस लोटण्यास आवडतें, ती काफी साकर किंवा दुधाशिवाय फार जाड व काळी करून सडकून पितात. त्यांच्या रीतिभाती फार चमत्कारिक आहेत. एथील लोक घट्ट टोप्या घालतात व त्यावर शाल किंवा मलमलीचा रुमाल डोक्याभोंवती चमत्कारिक रितीनें गुंडाळितात, त्यास ते पागोटें ह्मणतात.

त्यांचे झगे लांब पांयघोळ, इजारी भरपूर, व पिवळे जोडे असतात. जेव्हां त्यांस कोणास मान देण्याचें किंवा खोलींत येण्याचें असतें, तेव्हां ते डोकें उघडें करून येण्याबद्दल जोडे काढतात व सलाम करण्या बद्दल छातीवर हात ठेवून "तुला शांति असो" असें ह्मणतात. एथील बायका पुरुषांप्रमाणेंच पोशाक करितात व भरपूर इजारी देखील पेरितात, परंतु त्या जेव्हां दरवाजा बाहेर जातात तेव्हां तोंड अगदीं झांकून जाईल अशा प्रकारें आपल्या सभोंवती जाड्या अथवा लीनन कापडाचा लांब बुरखा घेतात, व तोंड आणि डोळ्याकरितां मात्र बुराख राखतात. कोणत्याही स्त्रीस ह्या बुरख्याशिवाय घराबाहेर येण्यास परवानगी नाहीं, व त्या घरीं असतांना देखील प्रत्येक टर्क आपल्या स्त्रियांस घराच्या एकांत भागांत टाळून ठेवितो ( स्त्रियांस ह्मटलें कारण त्यास पुष्कळ स्त्रिया करण्यास परमानगी आहे ) व त्यांस तेथें जाऊन पाहाण्यास परक्यांस परवानगी नसते.

टर्क लोक खुरच्यांचा कधींच उपयोग करीत नाहींत, परंतु तक्यांवर मांड्या घालून बसतात; व ते सुऱ्या व कांट्याबद्दल बोटांनीं नेहेमी खातात. टर्की लोकांच्या भजन पूजन करण्याच्या जागेस मशिदी ह्मणतात. त्यांत पुरुषांशिवाय दुसऱ्या कोणास येण्यास परवानगी नाहीं, व जेव्हां त्या रिकाम्या असतात त्यावेळीं मात्र खिस्ती लोकांस येण्यास परवानगी असते. त्यांजवळ घांटी नसतात, परंतु त्याबद्दल एक मनुष्य मशिदीच्या शिखरावर उभा राहून दिवसाच्या नेमलेल्या

वेळीं लोकांस प्रार्थनेस बोलावितो. कारण त्यांच्या सर्व इमारती सपाट छपऱ्याच्या असतात.

कॉन्स्टांटिनोपल बाहेरून फार शोभायमान शहराप्रमाणें दिसतें, परंतु आंत रस्ते अरुंद, ओंगळ, आणि उदासीन आहेत. रात्रीं पायीं चालणारास कुतरे फाडून तुकडे करतील ह्मणून भय असतें; त्या कुतऱ्यांस धन्यांवांचून शहरांतून हवें तसें फिरूं देतात, व ते रानटी जनावरांप्रमाणेंच उग्र असतात. एथील लोकांच्या निष्काळजीमुळें व बहुतेक घरें लांकडाचीं बांधल्यामुळें, आगी फार लागतात, व पुष्कळ वेळां शहराचा भागही जळून जातो. परंतु कॉन्स्टांटिनोपलमध्यें आगीचें भय आहे इतकेंच नाहीं तर एक नाशकारक रोग ज्यास पटकी ह्मणतात, तो सर्व टर्की मिसर देश व एशिया मैनरभर साधारण आहे. या भयंकर रोगामुळें दरसाल पुष्कळ लोक मरून जातात.

ड्यान्युब नदीवरील मोलडेव्हिया, वॉलाचिया, सरव्हिया व दुसरे पुष्कळ प्रांत टर्क लोकांच्या स्वाधीन आहेत. हे प्रांत बहुतकरून ग्रीक चर्चाच्या ख्रिस्ती लोकांनी वसविले आहेत. ते जी भाषा बोलतात तिला स्क्ल्याव्होनियन असें ह्मणतात, व ती कांहींशी रशियन भाषेप्रमाणें आहे.

ह्या भागांत फारच प्रख्यात शहर सरव्हियाची राजधानी बेल ग्रेड नामें होय, ही टर्कीच्या संस्थानांत फारच बळकट किल्ला आहे.

# भाग २ एशियाखंड.

## पाठ अठरावा.

### प्यालेस्टैन आणि सीरिया.

युरोपांतील टर्कीमधून आपण एशियामधील टर्कीमध्यें जातों. त्यास टर्की असें ह्मणण्याचें कारण तो टर्कीच्या राज्याचा भाग आहे. त्यामध्यें, तुह्मास ठाऊक असेलच कीं, सर्व एशिया मैनर, व सीरिया व प्यालेस्टैन प्रांत आहेत; व ह्या शेवटल्याविषयीं आतां आपण बोलूं.

भूमध्य समुद्रानें, व पूर्वेस व दक्षिणेस अर्बस्थानच्या मैदानानें व्यापिलेलें असें प्यालेस्टैन किंवा पवित्र स्थान आहे. पवित्रस्थान ह्मणजे केनूनची जमीन जी मिसर देशांत इजराएल लोकांस "दुधानें व मधानें वाहलेली अशी कबूल केली होती ती होय;" यावरून तो समृद्धिमान व फळद्रूप देश असें समजावें, व त्याचा बहुत्येक भाग अजून तसाच आहे. ज्युडिया ह्मणून जो प्यालेस्टैनचा भाग त्यांत येरुसलम आहे. तो जरी पुष्कळ दिवसांपासून लागवड नसल्यामुळें ओसाड व भयंकर झाला आहे, तरी त्याचा बराच भाग अजून फळद्रूप आहे. या प्रांतामधून डोंगरांची रांग जाते, व ह्या रांगेच्या दोन बाजू स्वरूप व गुण ह्यां कडून फार भिन्न आहेत. पश्चिम रांगेवर समुद्रापासून जमीन उंच भूमीकडे चार गच्चाप्रमाणें चढून चांगल्या हिरव्या चारीनें भरली आहे. परंतु

पूर्वबाजू ह्याहून कांहींशी कमी आनंदकारक आहे. टेकडीच्या शेंड्यापासून मृत समुद्र किंवा असफालटिटिझ् सरोवरापर्यंत एक मैदान असून तें दगड व माती व थोड्या कांटेरी झाडावांचून कशानेंही वेष्टिलें नाहीं. जसजसे आपण पुढें जाऊं लागतो तसतशा डोंगराच्या बाजू फार मोठ्या, उंच व नापिक होत गेल्या आहेत असें दिसतें. तेथें वनस्पती थोडक्याअसून त्याही हळूहळू सुकून मरतात व नीळही दिसत नाहीं, व जे खडक प्रथम अगदीं सफेत असतात ते लालभडक रंगानें रंगतात. ह्या भयंकर मैदानाच्या मध्यभागीं रखरखीत रुंद खिड असून तिजसभोंवती टेकड्या आहेत, त्यांवर पिवळ्या रंगाचे खडे मधून मधून आहेत व त्या टेकड्यामधून पूर्वेकडेस एक छिद्र आहे, त्यांतून मृत समुद्राचें अस्मानी पाणी व अर्बस्थानच्या, व पलीकडील मोआबच्या टेकड्या दिसतात. ह्या दगडी देशाच्या मध्यभागीं एका बाजूस विध्वस्त इमारती, खुरटलेलीं सैभस झाडें व कांटेरी निवडुंगाच्या झाडांच्या झाड्या आपणास दिसतात व दुसऱ्या बाजूस मोठ्या, पुष्कळ, चौरस इमारती एकत्र पडलेल्या आहेत, त्यांस धुरांडी व खिडक्या नाहींत, व त्या बंदिखाने किंवा कबरीसारिख्या असून त्यांस सपाट छपरें आहेत. जर देवळांचीं टोकें व मनोरे किंवा मुसलमान लोकांच्या मशिदींचीं शिखरें मधून मधून वर गेलीं नसतीं तर त्या छपरांमुळें एकसारिखी सपाटी दिसती. ही जागा येरुसलेम होय. ज्या ठिकाणीं इस्राएल लोकांच्या टोळ्या प्रतिवर्षी पूजाकरावयास जात, तें हें येरुशलेम नव्हे; कारण

येशूच्या जन्मानंतर सत्तर वर्षांनीं त्या शहराचा रोमन बादशाहा टैटस यानें इतका नाश केला कीं, एकावर एक दगड असा एकही राहिला नाहीं. ह्याविषयीं नव्या व जुन्या करारांत जागोजागीं भविष्य करून ठेविलें होतें.

परंतु ह्या भयंकर नाशानंतर कांहीं वर्षांनीं दुसऱ्या एका रोमन बादशाहानें जेथें पूर्वींचें शहर होतें, त्या ठिकाणीं सांप्रतचें येरुसलेम नामें शहर बांधिलें; परंतु तें देवालय पुन: बांधिलें नाहीं व धर्म पुस्तकांत उघड सांगितलें आहेच कीं, तें कधीं बांधिलें जावयाचें ही नाहीं.

सध्याचें येरुसलेम, अनेक देशाच्या लोकांनी ह्मणजे टर्क, यहुदी, अरब, एशियाखंडांतील ग्रीक व कितीएक युरोपियन यांहींकरून वसलें गेलें आहे. ज्या कयालव्हरी किंवा गोलगाथा पर्वताच्या भागीं येशूस सुळावर चढविलें व जेथें त्याची कबर बांधिली होती, असें मानितात त्याठिकाणीं किती एक खिस्ती लोकांनीं देवालय बांधिलें आहे.

ह्या शहराच्या अगदीं वर टेकडीचा कडा आहे, तो पुष्कळ ढेंगण्या झाडीच्या आलिव्ह झाडांनी भरून गेला आहे, व त्याच्या उंचीवरून प्रवाशास येरुसलेमचे रस्ते खालीं दिसतात. येरुसलेमाविषयीं येशू रडतेवेळीं ज्या डोंगरावर उभा होता, तो हा आलिव्हचा पर्वत होय, व एथें तो आपल्या शिष्यांसहवर्तमान बसला होता; तेव्हां त्यानें त्यांस असें भविष्य सांगितलें कीं, हें देवालय व शहर नाशाप्रत पावेल. ह्या

डोंगराच्या तळाजवळून केद्रून झरा वाहातो, त्याजवळ ज्या रात्रीस त्याचा विश्वासघात केला त्याच रात्रीं गेथ्सेमेनच्या बागेंत तो प्रार्थना करीत होता; व दक्षिणेकडील एका टेकडीवर चांगल्या एका ठिकाणीं बेथनि ह्मणून खेडें आहे, तेथें येशूचें मित्र लाझरस व त्याच्या बहिणी मारथा व मेरी राहत असत. आलिव्ह पर्वताच्या शिखरावरून सर्व येरुसलेम शहराचें मात्र दर्शन होतें इतकेंच नाहीं, तर ज्युडियाच्या बऱ्याच प्रदेशाचें देखील होतें; व डाव्या बाजूस उंचवटे दिसतात. त्यांत बेथलम ह्मणून येशूची जन्मभूमी आहे, —तें खेडें, द्राक्षाचेमंडप व आलिव्ह व अंजिर, व बदाम यांच्या झाडांच्या रायींत, मध्यभागीं एका टेकडीवर आहे. ह्या झाडांस वाहतें ओहळाचें पाणी पोहचतें. ह्या सुंदर जाग्यानजीक धनगर लोक शेतांत राहत असत. प्रभूचें तेज आपल्या सभोंवतें प्रकाशतांना त्यानीं पाहिले त्याचरात्रीं देविदाच्या शहरांत आपणामध्यें तारक उत्पन्न झाला, असें ही ऐकिलें. देविद तेथें जन्मला होता ह्मणून त्याच्या नांवें बेथलम शहर प्रसिद्ध होतें.

येरुसलेमापासून मृतसमुद्रापर्यंत तो देश ज्यॉरडून नदीच्या किनाऱ्यांखेरीज थंड व दगडी आहे. ते किनारे झाडें, बोरु व झाड्या ह्यांच्या दाट रानांनी बहुधा आछादिलेले आहेत. एकेवेळीं जेथें साडम व गामोरा हीं दुष्ट शहरें होतीं, ती जमीन आतां मृतसमुद्र आछादितो. त्याचें पाणी फार खारें व कडू असून इतकें तरंगविणारें आहे कीं, जड वजनें त्यांत टाकिलीं असतां बुचाप्रमाणें सपाटी वर येतात. स्यामेरिया व

ग्यालिली हीं शहरें ज्युडियाप्रमाणें नाहींत. ह्या शहराविषयीं जसें मोश्यानें इस्राएल लोकांस वर्णन करून सांगितलें, त्याप्रमाणें किती एक ठिकाणीं तीं अजून फळद्रूप व रमणीय आहेत. किती एक भाग उदास व दगडी आहेत; परंतु दुसरे भाग अरब लोकांच्या मेंढ्यांच्या व इतर कळपांस चरण्यास चांगलीं कुरणें होत. डोंगराच्या बाजूंनीं पाण्याचे ओहोळ वाहत असतात व खडकांच्या दरींत रानटी मधमाशा मधाचीं कोठारें करितात, तीं कधीं कधीं खालीं वाहताहेत असीं दिसतात; व आलिव्ह व अंजिराचे बाग द्राक्षाचे मंडप, व सुंदर रानटी फुलें फारच आहेत, परंतु ह्या सुखकारक प्रदेशांतील लोकांस स्वस्थतेनें आपलीं सुखें भोगावयास मिळत नाहींत, कारण तो देश अरब लोकांच्या टोळ्यानीं वेढला आहे, ते शेतांवरून व खेड्यावरून चाल करून येतात व लुटीत असतात.

येशूख्रिस्त लहान असतां ज्याठिकाणीं आपल्या आईबापापाशीं राहत असे, व ज्या शहरावरून ख्रिस्ती लोकांस अजून यहूदी लोक न्याझरीन्न ह्मणतात, तें न्याझरेथ शहर टेकड्यांनी वेष्टिलेल्या एका खिंडींत टेबर पर्वताच्या अगदी समोर आहे, व ज्या पर्वतावर येशूख्रिस्त आपल्या शिष्यांस व्याख्यानें देऊं लागला तोच हा पर्वत असावा असें मानिलें आहे. त्याजवरून एक रुंद मैदान दिसतें. त्याच्यामागें एक सुंदर शांत सरोवर पसरलेलें असून त्याच्या उत्तरेस डोंगरांचीं टोकें सर्वदा बर्फानें अच्छादिलेलीं असतात. हें टैबरीयसचें सरोवर, ग्यालिलीचा समुद्र किंवा गेनीसरेथचें

सरोवर आहे. कारण त्याचींच ही सर्व तीन नांवें होत. जेथें येशूनें प्रथम आपल्या प्रेषितांतील किती ए-कांस मासे धरणें सोडून आपल्या मागें येण्यास सांगि-तलें; जेथें त्याणें लाटा स्थिर केल्या व जो माणूस पिशाच ग्रस्त झाला होता त्यास बरें केलें, व इतकीं पराक्रमाचीं कृत्यें बजाविलीं तें हें सरोवर होय.

प्यालेस्टाईनपेक्षां सीरियाविषयीं थोडेंच सांगाव-याचें आहे, कारण बहुधा त्याचप्रमाणें सीरियांतील हवा जमीन व उत्पन्नें आहेत; इतकेंच कीं, ह्याचे डों-गर त्यापेक्षां अधिक उंच व मोठे आहेत. त्यांतून मुख्य लिबनस किंवा लेबननूची रांग ज्याची झाली आहे ते होत. ह्या डोंगरावरील सीडर झाडांविषयीं ख्रिस्ती धर्म पुस्तकांत जागोजागीं लेख आहेत व यां-तून जरी बहुत्येक मेलीं तरी किती एक अजून आ-हेत.

डमास्कस् शहर लेबनन् पर्वताच्या तळाजव-ळील मैदानांत आहे. ह्या शहराजवळ श्रीपाल ख्रिस्ताच्या भक्तांचा पाठलाग करीत असतां त्याजव-र आकाशांतून वीज पडली, हें एक, व आंटिऑक एकवेळीं मोठें बंदर असून तेथें येशूच्या शिष्यांस प्रथम ख्रिस्ती ह्मणूंलागले असें तुह्मांस प्रेषितांच्या चरित्रांत वाचल्याची आठवण असेल, हें दुसरें, अशीं सी-रियामध्यें दोन मुख्य पुरातन शहरें होतीं. सीरि-याची प्राचीन राजधानी आलेपो आहे, तिला तेथील लोक हालेब ह्मणतात.

सीरिया व पालेस्टैन एथील लोक बहुधा मुसल-

मान असून त्यांच्या रितीभाती टर्क व एशियाखंडांतील इतर लोकांच्या रितीभातीप्रमाणें आहेत. त्यांचीं घरें बहुत करून सपाट छपरांचीं असतात व थंडीकरितां ते नेहमीं ह्या छपरांवर निजतात, किंबहुना राहातात. ही चाल धर्म पुस्तकांत जागोजागीं सुचविलेली आहे.

सीरीया व पालेस्टैन यांमध्यें पुष्कळ यहुदी व निरनिराळ्या मताचे ख्रिस्ती लोकही आहेत; व एक फार विलक्षण जातीचे लोक डोंगरांत राहत असतात; त्यांस ड्रूसिझ ह्मणतात. ते पारधी व चोर असून फार अनाडी व रानटी आहेत. त्यांच्या स्त्रिया डोक्यांत एक फार चमत्कारिक दागिना घालतात तो, असा असतो कीं, डोक्याच्या एकाबाजूस रुपेरी किंवा मुलामा दिलेलें शिंग बांधून त्यावरून बुरखाखालीं पडतो. ह्या शिंगाचें बांधणे इतकें दुःखकारक व कठिण आहे कीं, त्या तें काढण्याचें दुःख भोगण्यापेक्षां किंबहुना नेहमी तशीच निजतात.

# पाठ एकुणिसावा

## अर्बस्थान.

लाल समुद्र व हिंदी महासागर यांमध्यें अर्बस्थान नामें द्वीप कल्प आहे. तुह्मांस धर्म पुस्तकांत असें वाचल्याची आठवण असेल कीं, या देशामध्यें इस्राएल लोक केननच्या जमिनीस पोहोंचल्या पूर्वी ४० वर्षेपर्यंत भटकत होते. ह्या द्वीपकल्पाच्या प-

श्चिमेस लाल समुद्र आहे, तो मिसर देशास अर्बस्थानापासून पृथक् करितो; इस्राएल लोकांस मिसर देशाच्या जमिनींतून बंदींत नेत असतां ज्या समुद्रांतून ते सुक्या जमिनीवर गेले तो हा प्रख्यात समुद्र आहे. अर्बस्थानाचे तीन भाग केले आहेत. त्यांतील फार मोठ्या भागास अरेबिया डेझरटा किंवा रानटी अर्बस्थान, फारच लहान भागास ईमेन किंवा अरेबिया फेलिक्स ह्मणजे सुखी अर्बस्थान, व बाकीच्या भागास अरेबिया पीट्रा किंवा दगडी अर्बस्थान असें ह्मणतात.

दगडी अर्बस्थान असें त्याला तेथील खडकी जमिनीवरून ह्मणतात. हें सुमारें अर्धे लाल समुद्राच्या किनाऱ्यावर आहे. त्यांत वालुकामय व नापीक मैदानाचा पट्टा आहे. त्याचे मागें खडबडीत डोंगराच्या रांगी आहेत. ह्या डोंगरांमध्यें मक्का व मदिना हीं दोन प्रख्यात शहरें आहेत. मक्का एथें ढोंगी भविष्यवादी महमद जन्मला ह्मणूनही जागा प्रसिद्ध आहे. टर्की व ग्रीस देशाच्या वर्णनांत महमद ढोंगी होता असें सांगितलें आहे, ईश्वरानें पाठविलेला भविष्यवादी आपण आहे असें त्याणें ढोंग मातवून एक कुराण नामें ग्रंथ लिहिला; तो ह्मणे कीं, एका दूतानें स्वर्गावरून मला हा ग्रंथ आणून दिला. त्याचा धर्म बहुत्येक अंशीं ख्रिस्ती व यहुदी धर्म मिळून झाला होता. तो उपदेश करी कीं, एक ईश्वर आहे, व येशूख्रिस्त एक मोठा भविष्यवादी आहे असें ही तो कबूल करी, परंतु त्याच्यापेक्षां आपण फारच मोठा भविष्यवादी असें

उघडपणें बोलत असे. त्यानें आपलें देशबांधव अरब लोकांस बाटविलें इतकेंच नाहीं, परंतु एशियाखंडाच्या पश्चिमेच्या सर्व लोकांस आपल्या धर्माकडे वळविलें: व जेव्हां तो एकवेळीं सैन्याचा पुढारी होता तेव्हां त्यानें आपल्या मतास न अनुसरणाऱ्या लोकांस तरवारीनें मारून टाकिलें. मक्का मुसलमान लोकांच्या भविष्यवाद्याची जन्मभूमि असल्यावरून ते तें स्थान पवित्र मानितात, व एथें दर वर्षास सर्व ठिकाणाहून पुष्कळ यात्रेकरू येतात. मदिना एथें महमदाचें थडें आहे.

सुखी अर्बस्थान किंवा ईमन, अर्बस्थानच्या पूर्व कोनास, लाल समुद्र व हिंदी महासागर यांच्या मध्यें आहे. त्या देशाचा हाच काय तो भाग फळद्रूप आहे ह्मणून त्यास सुखी अर्बस्थान ह्मणतात; कारण जरी किनारा सपाट व वाळवंट आहे, तरी आंतील भाग रमणीय खिंडींनी व टेंकड्यांनी शोभायमान् झाला आहे. त्या टेंकड्यांवर सुगंध वनस्पती फार भरल्या आहेत. बोळ, धूप, व मलम हीं सर्व ईमन एथून येतात, व त्यांविषयीं धर्म पुस्तकांत जागोजागीं वर्णन केलें आहे. पृथ्वीवर सर्वोत्कृष्ट काफी, मोखा ह्मणून जें ईमन मधील मुख्य शहर आहे, त्या ठिकाणाहून रवाना होते; तें शहर ब्याबेलम्यांडेबच्या खाडीवर आहे.

अर्बस्थानाच्या सर्व मध्य व पूर्व भागास डेझरटा ह्मणतात; तें नापीक वाळवट मैदान आहे. पाठाच्या दुसऱ्या पुस्तकाच्या पुरवणींत एका "रानाच्या गोष्टींत" अफ्रिका खंडांतील साहारा नामें रानाविषयींचें

वर्णन वाचल्याची तुह्मांस आठवण असेल; ह्मणून तेथें जें ह्मटलें त्याची पुनरुक्ति करण्याची आपणास गरज नाहीं; कारण जें सर्व साहाराविषयीं ह्मटलें होतें, तेंच अर्बस्थानांतील रानास बराबर लागू होईल. ह्या दोहोमध्यें एकसारखें रेतीचें रुंद मैदान असून मध्यें मध्यें लहानलहान कुरणाच्या जागा आहेत. ह्या ठिकाणीं फारच थोडीं झाडें होतात; त्यांपैकीं एक बाभळीचें झाड होय; त्यापासून गोंद उत्पन्न होतो. तो तुह्मी यादेशांत पाहिला असेल. दुसरें खजराचें झाड आहे. तुह्मी ऐकिलें असेलच कीं खजूरीचे झाडास, उंच, सरळ, गुळगुळीत देंट असून त्यास डाहाळ्या नसतात. त्याचीं पानें लांब व टोंकदार असून पानाच्या दांड्यावर वाढतात, त्यांस कधीं कधीं डाहाळ्या ह्मणतात,व त्या झाडाच्या शेंड्यामधून पंख्याच्या किंवा छत्रीच्या काड्याप्रमाणें वाढतात. हें झाड एशिया व आफ्रिका खंडांत साधारण आहे. खजूरीचें झाड अगदीं नापीक जमिनीवर होतें व तें आरब लोकांचें मोठें भाग्यच होय कारण त्यास फळें येतात ज्यांस खजूर असें ह्मणतात त्याचा ते अन्नाचेऐवजीं फार उपयोग करितात. (जो आपणास कधीं कधीं किराण्याच्या दुकानीं सुका आढळतो तो तोच आहे, त्यांस खारका ह्मणतात.)

रानांतील अरब लोकांस बेडूइन्स ह्मणतात. एका "रानाच्या गोष्टीमध्यें" सांगितल्याप्रमाणें त्यांच्या जाती केल्या असून सिक किंवा सरदार लोक त्यांजवर अधिकार चालवितात. त्यांतून बहुतेक प्रवासी लोकांस

लुटून बहुधा उदर निर्वाह करितात. ते सर्व आपलें आयुष्य आपल्या कुटुंबासुद्धां एका हिरव्या कुरणापासून, दुसऱ्याजागीं जाण्यामध्यें घालवितात; व ते सर्व तंबूंत राहातात. ते ज्या जनावरांचा विशेषेंकरून उपयोग करितात तीं उंटें व घोडे होत. तुह्मी उंटाविषयीं वृत्तांत वाचिले आहेत, त्यास "रानांतील तारूं" असें ह्मणतात; कारण जसें तारूं समुद्रांत त्याप्रमाणें त्याचा मोठा पराक्रम, शांती, नम्रता व दुसऱ्या कोणत्याही जनांवरापेक्षां त्यास पुष्कळ वेळ पाण्यावांचून राहवतें, असा त्यास बनावल्यावरून तो रानांत बहुधा आवश्यक आहे. इकडील गाढवांपेक्षां अर्बस्थानांतील गाढवें सुंदर व मोठीं असतात. परंतु अरब लोकांचें मुख्य मोठेपण त्यांच्या घोड्यामुळें असतें, ते फारच जलद व सुंदर असतात. कोणीही अरब आपल्या घोड्यास मित्राप्रमाणें वागवितो, तो त्यास कधीं मारीत नाहीं, व आपल्या आवाजानें त्यास हाकतो, व तो तंबूंत त्याची बायको व मुलें या सहवर्तमान राहातो.

अरब लोकांची लहान व थोडी जात असून ते फार चपळ व निपुण स्वार, व मोठा त्रास भोगण्यास लायक असे लोक आहेत. त्यांचें अन्न, मुख्यत्वेंकरून जवांची भाकर, उंटाचें दूध, व खजूर आहे. एशियाखंडांतील इतर लोकांप्रमाणें त्यांचा पोशाक असतो. व त्यांपेक्षां मात्र फार साधा ह्मणजे अस्मानी कापडाचा झगा, व कंबरेसभोंवता पट्टा लांबलचक व ढील इजार असते. स्त्रियां-

चा पोशाक, त्याचप्रमाणें असतो, इतकेंच कीं त्या इजारी घालीत नाहींत, व बाहेर जाते वेळीं आपल्या डोक्या सभोंवता बुरखा घेतात. श्रीमंत आरब लोक आपल्या डोक्याच्या पोशाकाविषयीं फार गर्व करितात. ते बहुधा पुष्कळ एका वर एक अशा पंधरापर्यंत देखील टोप्या घालतात. मग एका मसलीनच्या पागोट्यास सोन्याचा किंवा रुप्याचा पदर लावून तें त्या सर्वां सभोंवती गुंडाळतात. ते फार आतिथ्यसत्कार करणारे लोक आहेत, व किती ही गरीब असले तरी आपल्या अन्नाचा व तंबूचा परकीय गृहस्थास विभाग देण्यास ते सर्वदा सिध्ध असतात.

## पाठ विसावा.

### हिंदुस्थान.

इंडिया किंवा, ज्यास हिंदुस्थान ही ह्मणतात, तो देश टिबेटाच्या माळजमिनीपासून हिमालय पर्वताच्या रांगेनें विभागलेला आहे. ह्या मोठ्या पर्वतांच्या रांगेमध्यें कितीएक, पर्वत अतिशय उंच आहेत. त्यांचीं शिखरें ढगांत दडून जाऊन सर्वदां बर्फानें आच्छादलेलीं असतात, व त्यांच्या तळाजवळील मैदानें कडकडीत उन्हानें करपून गेलेलीं असतात. हिंदुस्थानच्या पर्वतांपेक्षां त्याच्या नद्या कमी आश्चर्य कारक नाहींत. मोठी प्रख्यात नदी जी गंगा तिचा उगम हिमालयाच्या बर्फांत आहे व ती बंगालच्या खोलवट मोठ्या मैदानांतून वाहत असतां तिच्या प्रवाहांत तिला

पुष्कळ फांटे येऊन मिळतात. हे पावसाळ्यांत सर्व देशास पूर आणून त्याचें मोठें सरोवर बनावितात, त्याचा विस्तार प्रत्येक दिशेस शेकडों मैलांपर्यंत असतो. मग भाताच्या शेतांतून होड्या चालतांना व त्यांत भाताचीं कणसें पाण्यावर आलेलीं दिसतात. बंगाल्याच्या सर्व किनाऱ्यावर बहुधा गंगानदीनें झालेल्या विस्तीर्ण खाऱ्या पानथळ जमीनी आहेत. ती नदी समुद्रास आठ मुखांनी जाऊन मिळते, त्यांतून एकीवर कलकत्ता नामें ब्रिटिश इंडियाची राजधानी आहे.

हिंदुस्थानाचा दक्षिण भाग फार खडकी आहे; मलबार व कॉरोमांडेल किनाऱ्यासमोर दोन पर्वताच्या रांगा आहेत, त्यांस पूर्व व पश्चिम घाट असें ह्मणतात. ते फार उंच नाहींत, पण उभे व खडबडीत आहेत. हिंदुस्थानांत मोठमोठालीं रानें आहेत व त्यांत पुष्कळ तऱ्हेचीं झाडें आहेत, त्यांतून एक प्रख्यात सागवानी झाड आहे, त्याचा तारवें बांधण्यामध्यें पुष्कळ उपयोग करितात, त्याचीं पानें दीड फुटीलांब असतात. परंतु ताडामाडाच्या झाडाइतकी चमत्कारिक व मौल्यवान् झाडें हिंदुस्थानांत थोडीच आहेत, त्या झाडाच्या पुष्कळ जाती आहेत. दक्षिण प्रांतांत माड पुष्कळ होतात; ते दुसऱ्या झाडांपेक्षां रहवाश्यांस फार उपयोगी आहेत.

ते त्या फळाचा अन्नाप्रमाणें उपयोग करितात इतकेंच नाहीं, तर तंतुमय साल जी त्याजवर असते त्याचे दोर, हांतऱ्या, व दुसऱ्या पुष्कळ वस्तु करिता-

त; आणि झांवळ्यांचा बहुधा घरांस छपरें करण्यांत उपयोग करितात. ते त्याच्या सोटास भोसकून एका जातीची दारू काढितात, तिला ताडी असें ह्मणतात. पालमैरा ( केकताड ) दुसरें एक ताडाचे जातीचें झाड कधींकधी शंभर फुटी उंच वाढतें, व त्याचें पान इतकें मोठें असतें कीं तें १०–१२ मनुष्यांस आश्रय देतें.

हिंदुस्थानांत ज्या झाडाची पुष्कळ लागवड करितात तीं निळीचीं झाडें होत. त्यांपासून जो नीळा रंग सर्व पृथ्वीवर माहित आहे तो उत्पन्न होतो, आणि तांदूळ जें हिंदुलोकांचें मुख्य अन्न त्याची ही पुष्कळ लागवड करितात. नीळ व तांदूळ ह्या वस्तु युरोपांत पुष्कळ पाठवितात.

हिंदुस्थानांत रानटीं जनावरें इतकीं पुष्कळ आहेत कीं, त्या सर्वांविषयीं वर्णन करणें अशक्य आहे. त्यांतून मोठे प्रख्यात सिंह व वाघ हे आहेत. ह्या शेवटल्यास त्याच्या आकृति व सौंदर्यावरून राजवाघ असें बहुधा ह्मणतात. तो इतका उग्र असतो कीं, रहवाश्यास मोठ्याभयास कारणभूत होतो. हत्ती चतुष्पदांपैकीं अतिमोठा व शहाणा पशू जो तुह्मास ठाऊक आहे, तो हिंदुस्थानांत साधारण आहे, व त्यास श्रीमंत हिंदू लोक फार मानितात, ते त्यावर स्वारी करितात व कधींकधीं ओझीं वाहाणाऱ्या पशूंप्रमाणें ही त्याचा उपयोग करितात.

हिंदुलोक पुष्कळप्रकारें मोठे सुधारलेले आहेत, परंतु त्यांच्यामध्यें पुष्कळ रानटी चालीअसून ब-

हुधा कांहीं मुसलमान, व पाद्री लोकांनीं ख्रिस्ती धर्मांकडे वळविले लोक, ह्यांवेरीज सर्व मूर्तिपूजक आहेत.

हिंदुलोकांचे कितीएक भाग केलेले आहेत, त्यांस जाती असें ह्मणतात त्या वंशपरंपरेनें चालतात. ह्मणजे प्रत्येक मनुष्य आपल्या आईबापांच्या जातींतला असतो ह्याविषयीं ते लोक प्रख्यात आहेत. प्रत्येक जातीस कांहीं आपआपलीं धर्मकृत्यें असतात; व ज्या प्रकारचे अन्न एकाजातीस खाण्यास परवानगी असते त्याविषयीं दुसरीस मनाई असते. उंच जातीचे लोक नीचजातीच्या लोकांस केवळ दुसऱ्याप्रकारचे प्राणी मानितात; व बहुधा कोणीही हिंदु आपल्या देशापेक्षां जातीस फार जडलेला असतो.

हिंदुलोकांची मूर्तिपूजा फारच रानटी व नीचपदास आणणारी आहे. तिजमध्यें जीं तऱ्हतऱ्हेचीं क्रूरधर्म कृत्यें आहेत त्यांत यापेक्षां दुसरे कोणतेंच भयंकर नाहीं; तें हेंच कीं,— ज्यास्त्रीचा नवरा मरतो ती जिवंत असलीतर तीस त्याच्या शवाबरोबर जळावें लागतें; इंग्रेजसरकारानें ही सर्व भयंकर चाल मोडून टाकण्यास प्रत्येक उपाय योजिल्यावरून ती हळू हळू आतां कमी होत चालली आहे. हिंदुलोकांनी गंगा पवित्र अशी मानिली आहे, आणि ही गोष्ट फार साधारण आहे कीं, आईबापें आपल्या मुलांस जेव्हां या नदीस पूर येईल तेव्हां त्यानीं बहुधा वाहून जावें ह्मणून तिच्या तिरीं ठेवितात. हे दरिद्री मूर्तिपूजक असें समजतात कीं, आपल्या निरपराधी मुलांस अशारीतीने बळी दिल्यानें आपण चांगलें कृत्य

करीत आहों, आणि कधीं कधीं एखादा पुरुष देखील या रितीनें स्वैच्छिक मरण्यास धजतो. हिंदुलोक शरिरानें पातळ व भव्य असून स्वभावतः त्यांचा वर्ण पिंवळा असतो, परंतु जे उन्हांत फार असतात त्यांचा कांहींसा काळा रंग होतो. ते आपल्या निर्वाहाच्या रितीमध्यें फार साधे आहेत; भात व इतर वनस्पती त्यांचें मुख्य अन्न होय, आणि श्रीमंत लोकांखेरीज सर्वांचीं घरें केवळ बांबू आणि मातीनें बांधलेली आहेत. त्यांचा पोशाक बहुधा कापसाचे किंवा मसलीनचे लांब झगे आहेत. खरोखर एथील गरीब लोक फारच थोडी वस्त्रें वापरतात, परंतु बायकांपाशीं सोन्याचे किंवा रुप्याचे आंगठ्या वगैरे दागिनें, नेहमी असतात.

हिंदुस्थानांतील बनावलेल्या वस्तू पुष्कळ आहेत; त्यांतून अतिप्रख्यात मसलीन होय, ती इंग्लंडच्यापेक्षां देखील फार चांगली होती, हिंदुस्थानांतील शालीही सौंदर्याविषयीं प्रख्यात आहेत.

ब्रिटिश सरकारच्या अमलांत किंवा त्याच्या स्वाधीन हिंदुस्थानांतील प्रजा सुमारें बाराकोटी पन्नास लक्ष आहे.

**सिलोन** * हिंदुस्थानाच्या दक्षिणटोंकाच्या पूर्वेस सिलोन नामें सुंदर बेट आहे. त्या टोंकाचा व त्या बेटाचा मनार नामे खाडीनें वियोग केला आहे. सिलोनच्या पश्चिम किनाऱ्यावर एक विस्तीर्ण मैदान आहे, त्याच्या पलीकडे एकामागून एक अशा रानानीं व्याप्त टेंकड्या आहेत. त्या ह्या बेटाचा पुष्कळ

* लंका

भाग वेष्टितात. त्याच्या मध्यभागास क्यांडी असें ह्मणतात, तो जरी ब्रिटिशराजाच्या अमलांत आहे तरी तेथें स्वतंत्र राजा आहे.

तें बेट दाट रानें व झाडया ज्यांस जंगल असें ह्मणतात त्यांहींकरून बहुतकरून व्याप्त असल्यामुळें युरोपियन लोकांस राहाण्यास फार बाधक आहे; परंतु तें सफळ असून त्यांत चमत्कारिक व सुंदर वनस्पती आहेत.

ब्रिटिश लोकांनीं व्यापलेली अशी त्या किनाऱ्यावर पुष्कळ शहरें आहेत, त्यांतून मुख्य कोलंबो, हें राज्य कारभाराची व बहुतकरून सर्व व्यापाराची जागा आहे. या बेटाचें असाधारण उत्पन्न दालचिनी आहे, हा एका जातीचा मसाला आहे. ती तजीच्या झाडापासून प्राप्त होते. व तें झाड सिलोनच्या पुष्कळ भागांमध्यें उत्पन्न होतें, परंतु कोलंबो जवळील बागेंत ज्या झाडांची लागवड करितात त्यांपासून जी उत्पन्न होते ती सर्वोत्कृष्ट असें मानितात. तें झाड तीन वर्षांचें झाल्यावर साल जो मोलवान भाग तो काढून वाळत घालितात, ती तयार करण्यास सर्व काय तें हेंच.

सिलोनच्या रहवाश्यांस सिंगलीझ असें ह्मणतात. ते चांगल्या जातीचे लोक असून कांहींसें हिंदुलोकांसारिखे आहेत. त्यांप्रमाणेंच सिंगलीझ लोक स्वभावानें गरीब व रितीभातीमध्यें सभ्य आहेत, परंतु ठकबाजी व अप्रमाणिकपणा यांस ते फारच जडलेले आहेत. सिलोना मधील किती एक रानें, ज्यालोकांस वेड्डझ ह्मणतात अश्या एका जातीचा रानटी

लोकांनीं वसविलेलीं आहेत, ते आपली उपजीविका पारध करून करितात, व झाडाखालीं निजतात. ते- इतके रानटी व उद्धट आहेत कीं, त्यांच्याशीं युरोपियन लोक थोडाच व्यवहार राखितात.

## पाठ एकविसावा.

### चीन.

चीनाचें मोठें राज्य एशिया मधील फारच पूर्वे- कडील भाग असून भूगोलाच्या त्या खंडांतील एक फारच पुरातन संस्थान मानिलें आहे. पुष्कळ युगें- पर्यंत तेथील रहिवाश्यांकडून राज्य चालत असे, परंतु सुमारें २०० वर्षांपूर्वीं चीन देश, त्याच्या शेजारचे लोक ज्यांस टार्टास ह्मणतात, त्यांनीं जिंकिला व ते आतां त्या देशाचे राजे होऊन बसले आहेत.

चिनाच्या राजास बादशाहाचा किताब असतो; तो स्वतंत्र असतो, परंतु त्याला आपल्या हाताखाल- चे लोक ज्यांस म्यांडरीन् ह्मणतात, त्यांजकडून राज्य चालविण्यास मदत् मिळते.

चिनामध्यें प्रथमतः जेव्हां एकदा युरोपियन पावूल टाकतो, तेव्हां त्याने जें कांहीं पूर्वीं पाहिलें अ- सतें त्यापासून फारच भिन्न असा देश घरें व लोक दिसतात. जसें काय आपण नव्या जगांतच आहों असें त्यास वाटावें: जर तो देशाच्या मध्यभागीं जा- ईल तर त्यास पुष्कळ दिवसपर्यंत एकसारख्या एका मोठ्या मैदानावांचून दुसरें कांहीं दिसणार नाहीं. नं-

तर पुनः तितकेच दिवसपर्यंत कडा फुटलेले डोंगर, सर्व एकसारखे, व सर्व एकमेकाप्रमाणें उघडे अशा डोंगरांतून त्याला जावें लागेल, व शेवटीं कदाचित् सरोवरांतून व पानथळ जागेंतूनही १०–१२ दिवस जावें लागेल.

चिनाच्या कितीएक मैदानांत कापूस व सर्व प्रकारचीं धान्यें होतात. ह्यांहून दुसरीं फार फळद्रूप आहेत, त्यांत पूर्वेकडील सर्व फळें उत्पन्न होतात; व दक्षिणेकडील डोंगरांत मातीच्या भांड्यांचे कारखाने आहेत, व तीं प्रथम ह्या ठिकाणीं केलीं त्यावरून त्यांस चिनी भांडीं असें ह्मणतात. याप्रकारची जिन्नस इंग्लंडांत होण्याच्या पूर्वीं, फार दिवसांपासून चिनचे प्याले व तारें सर्वांस माहित असून तीं फार किमतीचीं असत.

पूर्वीं सांगितलेल्या सरोवरांत व पानथळांत लोक माशांवर निर्वाह करितात. हीं सरोवरें लहानलहान बेटांनीं व्याप्त आहेत, व प्रत्येकांत खेडीं व झोपड्या आहेत. एथील लोक एक पक्षी पाळितात त्यास कारमोऱ्यांट (एका प्रकारचा बगळा) ह्मणतात. त्यास पाण्यांत बुडीमारून मासे धरून आपल्या धन्यापाशीं आणावयास शिकवितात. बदकांचे कळप तरंगणाऱ्या खोपट्या किंवा झोपड्यांत ठेवितात, व ते इतके पुरतेपणीं माणसाळतात कीं, ते त्यांच्या शेवळी प्रमाणें वर्ततात. ह्या सरोवरांतून चाकांनीं चालणारीं तारवें माल व लोक नेण्यास लावितात. परंतु चिनामध्यें जेथें जेथें प्रवासी जाईल तेथें तेथें तो

देश लोकांनीं भरला आहे असें त्यास आढळेल. प्रत्येक ठिकाणीं त्याला मोठे लोकांचे जथे आढळतील, परंतु स्त्रिया आढळणार नाहींत. एकासमाजामध्यें हजारो लोक असतील, पण त्यांत एकही स्त्री असणार नाहीं. एथील पुरुष स्त्रियांप्रमाणें बहुधा दिसतात; त्यांचे लांब झगे, लहान बंड्या, व विलक्षण टोंकदार टोप्या असतात. मागें एक डुकराचे शेपुटी ( शेंडी ) खेरीज ते सर्व हजामत करितात. परंतु स्त्रियांहीं जर आपले केस विंचरले नसते व फुलें डोक्याभर घातलीं नसतीं व त्यांचे पाय लहान नसते तर त्यांच्या लहान बंड्या व इजारीवरून बहुधा पुरुषांसारख्या त्या दिसत्या. चिनी स्त्रिया लहान पाय असण्याविषयीं फार काळजी बाळगितात, व त्यांस तसें करण्याकरितां जेव्हां अगदीं लहान मुली असतात, तेव्हां त्यांचे पाय स्वाभाविक आकारांतून पिळून जावे असे घट्ट बंधांनीं बांधितात. ह्या मुळें त्या बिचाऱ्या लहान मुलींस इतकें दुःख होतें कीं, एकादा दयाळू अंतःकरणाचा बाप ही क्रिया घडत असतां त्यांचें रडणें ऐकूं येऊंनये ह्मणून बहुधा घरांतून बाहेर जातो. पाय चिरडून किंवा घट्ट पट्यानें कंबर बांधून बारीक करणें ( जें ग्रेटब्रिटनांत फार साधारण आहे ) किंवा दुसऱ्या कोणत्याही रितीनें जो आकार ईश्वरानें आपणास दिला आहे, त्याच्या बाहेर जाऊंपाहाणें हें सर्वथा वाईट कर्म आहे.

प्रवाशास प्रत्येक दाहाबारा मैलांवर दुसऱ्या पु-

ष्कळ विलक्षण वस्तू पैकीं लहान लढाऊ लोकांच्या चौक्या आढळतील. त्यांतील थोडे शिपाई विलक्षण रितीनें कागदाचें कवच व रुंवाचे आंगरखे घालतात, व हवा उष्ण असली तर वारा घेण्याकरितां मोठे पंखे घेतात (प्रत्येक चिनी लोकांच्या हातीं ते बहुधा असतात. ) आपले धैर्यवान शिपाई अभयपणें गरमी व थंडी सोसतात त्यांप्रमाणें हे नाहींत. हे चिनी पहारेकरी जेव्हां एकादा सरदार जातांना पाहतात तेव्हां त्यांच्या पायीं पडून त्यांचा सन्मान करितात. मोठ्या गृहस्थाचे मंदिराच्या रीति व आकाराप्रमाणें चिनामध्यें हलकीं झोपडी मातीच्या भिंतीनें व झापाच्या छपरानें बांधितात; तें मंदिर आस्मानी इटाचें बांधिलें असतें व सुंदर खांब्यावर कौंलाचें छपर असतें. सधन किंवा कुणबी यांतून एकही कांचेच्या खिडक्यांचें सुख भोगित नाहीं. मातबर लोकांच्या घरांस मेण कागद, शिंग किंवा बारीक कापड असतें. गरीब लोकांस छपऱ्यांत गवाक्षाशिवाय कांहीं नसतें.

या देशाच्या ओसाडीपेक्षां दुसरें कांहीं मनास अधिक लागत नाहीं. एथें गुरें, कुपणें व हिरवी कुरणें कांहीं एक दिसत नाहींत; चिनी लोक मूर्तिपूजक असल्यामुळें त्यांच्या देवालया जवळील झाडांखेरीज दुसरीं झाडें दिसावयाचीं नाहींत.

आपल्यादेशांत परकीय लोकांस घेण्याविषयीं चिनी लोक नेहेमी लाजाळूअसतात. सर्व राज्यांत जेथें पूर्वीं दुसऱ्या प्रजेंतील लोकांस येण्यास परवानगी होती,

असें एक शहर कंतान नावें बंदरमात्र होतें, व तेथें देखील त्यांची बंदिवानांप्रमाणें बहुधा चवकशी करून त्यांस जपत असत. परंतु चिनी लोकांस मागील लढाईमध्यें जिंकिल्यामुळें कंतान खेरीज दुसरीं चार बंदरें परकीय लोकांस येण्यास मोकळीं झालीं आहेत, व त्या सर्वांमध्यें परकीय देशाचा व्यापार चालतो.

चीनची राजधानी व बादशाहाची राहाण्याची जागा **पेकीन** आहे. चिनांतील कोणतेंहि शहर सुंदर व चमत्कारिक दिसतें. घरें ठेंगणीं असून त्यांची वाटोळीं बाहेर आलेलीं छपरें असतात व त्यांस धुरांडी नाहींत. रोगण, गिलावा व रंग ह्यांहींकरून सर्व दुकानें चकचकतात, व त्यांवर बहुधा वाटेनें जाणाऱ्या लोकांस खचित समजावें ह्मणून तेथें लोकांस ठकवित नाहींत, अशा सूचना करणाऱ्या पाट्या लाविल्या असतात. न्यायाधीश व इतर अधिकारी यांच्या मागून बहुधा प्याद्यांची मालिका असते. ते बावटे, छऱ्या व रंगित फाणसें व अधिकाराच्या दुसऱ्या कांहीं चमत्कारिक खुणा घेऊन जातात रस्त्यांत गोंगाट व गडबडाट दिवसा उजेडीं चालू होतो व सूर्य अस्ताचे वेळींमात्र बंद होतो, नंतर सर्व शांत असतें.

कागद, छापण्याची कला, व बंदुकीची दारू युरोपांत प्रसिद्ध होण्यापूर्वीं पुष्कळ दिवसांपासून चिनामध्यें माहित होती. चीन ज्या व्यापाराचे जिनसेविषयीं प्रख्यात आहे ती चहा होय, हें तुह्मांस माहित असेलच. " वनस्पतीजातीच्या " वृत्तांतांत ह्याविषयीं आपण इतकें पुष्कळ वर्णन केलें आहे कीं, आ-

पणास त्याविषयीं एथेंकांहीं अधिक बोलण्याची गरज नाहीं. दिवसाच्या प्रत्येक तासास चिनीलोक चहा घेतात व या खेरीज दुसरा पदार्थ क्कचित् पितात. चहाच्या प्याल्यांत कांहीं पानें घालून त्यांवर ते कढत पाणी ओततात. नंतर साकर घातल्यावांचून ते तो पितात. त्यांच्या अन्नाचा मुख्य जिन्नस भात आहे, व त्याची ते फार लागवड करितात.

# भाग ३ अफ्रिका.

## पाठ. बेचिसावा.

# मिसर देश.

अर्बस्थाना समोर लाल समुद्राच्या बाजूवर मिसर देश ( इजिप्ट ) आहे. तेथें इस्रायल लोक दोनशें पंधरा वर्षेपर्यंत बंदींत होते.

मिसर देशाच्या जमिनीच्या सध्याच्या स्थिती वरून धर्मपुस्तकांतील भविष्यें कशीं खास पूर्ण झालीं, तीं समजतात. झकराया भविष्यवाद्यानें असें भविष्य सांगितलें होतें कीं, "मिसर देशाचीं राज्यें नाहींशीं व्हावीं" व येझीकायेल या भविष्यवाद्याने सांगितलें होतें कीं, "पुढें मिसर देशांत राजपुत्र व्हावयाचा नाहीं," व आणखी असें सांगितलें होतें कीं, "तें फारच नीच राज्य होईल व पुढें इतर लोकांपेक्षां तें उंच पदास चढणार नाहीं." किंवा "इतर लोकांवर राज्य करणार नाहीं" व ह्या भविष्यवाद्याचे दिवसापासून हें सर्व कसें

बरोबर घडून आलें! पृथ्वी वरील फार पुरातन व बळवान राज्यांतलें मिसर देश हें एक राज्य होतें. ज्या ठिकाणीं कला व शास्त्रें वाढलीं अशाविषयींची ती कांहीं युगांपर्यंत मुख्य जागा होती, व तेथील राजांनीं जीं प्रसिद्ध कृत्यें व मोठ्या शोभायमान इमारती बांधल्या होत्या त्या अजून सर्व सृष्टीस आश्चर्यकारक आहेत. ह्यांतील बहुत्येक भविष्यें झकराया व येझिकायल या भविष्य वाद्यांच्या, वेळानंतर पूर्ण झालीं असावीं; कारण ख्रिस्ताच्या जन्मा पूर्वीं थोडक्या वर्षांवर मात्र तो देश रोमन् राज्यामधील एक प्रांत झाला; व तो रोमन लोकांनीं सुमारें १८०० वर्षांपूर्वीं जिकल्यापासून परकीय अमलापासून कधीं मुक्त झाला नाहीं.

मिसर देशाचें, फारच थोड्या दिवसामागें टर्क लोकांकडून राज्य चालत असे; परंतु सुलतानाच्या खालचा बादशाहा किंवा सरदार महंमद अल्ली ह्मणून होता, त्यानें आपल्या धन्या विरुद्ध बंड मातऊन आपण स्वत: त्या देशाचा स्वतंत्र राजा झाला.

मिसर देशांत मोठ्या नैल नदीनें झालेलीं एक खिंड आहे. ती नदी दरवर्षास किनाऱ्यावरून वाहातें व जमिनीस चांगल्या काळ्या मातीनें वेष्टिते, तेणेंकरून तेथील भूमी फलद्रूप होते. त्या देशाच्या फलद्रूप प्रदेशांस डेलटा ह्मणतात, जेथें लाल समुद्र अर्बस्थानापासून वियोग करितो या खेरीज त्याच्या सर्व बाजू मोठ्या आफ्रिकन रानानें वेढल्या आहेत. मिसरदेशाच्या हवेचे चार निरनिराळे ऋ-

तू आहेत. पहिला नैल नदीचा पूर होय, तो जुलै महिन्यांत सुरू होतो. तेथील लोक ही विना केवळ म्णाप्रमाणें मानितात. जथेचे जथे बांध काढतांना पहावयास जमतात ( ते नळांवरबांधलेले असतात) ह्मणजे मग पाणी जाण्याकरितां तयार केलेल्या रस्त्यानें तें वहातें, परंतु हे नळ असूनदेखील पाण्यानें सर्व देशास असा पूर येतो कीं, ऑगस्त व सेपटेंबर महिन्यांत तो एक मोठ्या समुद्रासारखा होऊन त्यामध्यें शहरें व खेडीं पुष्कळ बेटांप्रमाणें दिसतात. ह्या ऋतूमध्यें हवा दमसर व कधीं कधीं तुषारमय असते. दुसरा ऋतू आपल्या हिंवाळ्याभर असतो, त्यास मिसर देशाचा वसंत ह्मटल्यास चालेल; तेथील दिवस उष्ण असून झाडें जलदी वाढतात. तिसरा ऋतू आपल्या वसंत ऋतूच्यावेळींच होतो, तो रोगकारक असतो; परंतु चौथा ऋतू जो ज्यून महिन्यांतमात्र असतो तो फार रमणीय व मध्यम आहे. मिसर देशांतील रात्री विशेषेंकरून चांगल्या असतात. आकाश इतकें निरभ्र व चंद्राचें तेज इतकें तीक्ष्ण असतें कीं, तेथील लोक ज्यांस उघड्या हवेंत निजण्याची सवय असते ते बहुधा आपल्या डोळ्यांस किरणामुळें इजा होऊंनयें ह्मणून अगदीं झांकितात. कारण त्या किरणांनी नजरेस फारच इजा होते असें ह्मणतात.

मिसर देशांतील मुख्य शहरें भूमध्य समुद्रावरील अलेक झ्यांड्रिया ह्मणून एक मोठें बंदर व ग्रां-

ड केरो त्याची राजधानी हीं आहेत. केरोपासून प्र-
ख्यात पिरमिडझ (थडीं) फार दूर नाहींत. ह्या थड्यां-
मध्यें मिसरदेशचे पुरातन राजे आपल्या मेलेल्यांस
गाडीत असत; त्यांच्या नांवावरून समजतें कीं, तीं दिप-
माळेच्या आकृतीचीं बांधिलीं असून मोठीं आहेत. कांहीं
अंतरावरून पाहिलीं असतां त्यांचीं टोंकें उंच टेकड्या
प्रमाणें ढगांस लागलेलीं आहेत असें दिसतें. ह्या थ-
ड्यांमध्यें पुष्कळ खोल्या बांधलेल्या असतात. त्यां-
त मिसर देशच्या राजांच्या कबरी आहेत. ह्यांतील
प्रेतें कुजूनयेत ह्मणून त्यांत चांगले मसाले घालून
लिनन वस्त्राच्या पुष्कळ पट्यांत गुंडाळितात, त्यांस
ममीझ ( मसालाभरलेलीं प्रेतें ) ह्मणतात. त्यांतून कि-
तीएक अद्यापपर्यंत राहिलीं आहेत. तीं नि-
दान दोन हजार वर्षांचीं जुनीं आहेत, व त्यांती-
ल कितीएक इंग्लंड देशीं आणलीं आहेत. ग्रांडकेरो
ह्मणून मोठें व फार चमत्कारिक शहर असून पृथ्वीं-
तील बहुधा प्रत्येक देशाच्या लोकांनी भरलें आ-
हे. तेथील रहवासी टर्क, यहुदी व कापृसू ह्मणजे
मिसर देशांतले लोक ह्यांखेरीज पुष्कळ ग्रीक
लोक ही आहेत. परंतु ह्या शहरांतून नेहमी प्र-
त्येक राज्यांतील लोकांतले प्रवासीहि जात आहे-
त व रानांतून नेहमी कोणीव्यापारी लोक आपला मा-
ल, उंटें किंवा गाढवें घोड्यांपेक्षां तेथें ज्यांचा फार उ-
पयोग करितात, त्यांवर लादून युरोपियन लोकांची
टोळी किंवा घोड्यांवर उंच खोगिरें बनाऊन मोठ्या
रिकाब्या व लांबलचक झगे लावून पादशाहाच्या शि-

पायांची टोळी ही रानांतून जात असतां रस्त्यांतून पायमार्गानें जाणारास पदोपदीं पडण्याचें भय असतें ( कारण त्यांकरितां उभारलेले पायमार्ग किंवा फरसबंदी नसते ) ह्या दाटींत पुष्कळ स्त्रिया दिसत नाहींत. परंतु जेव्हां मिसर देशांतील गृहस्थांच्या स्त्रिया बाहेर जातात तेव्हां त्या रेशमाचा काळा झगा घालतात. तो डोक्यापासून पायांपर्यंत त्यांस सर्व आछादून कपाळावरून भिवयापर्यंत आणितात. तेणेंकरून त्या कापडाच्या गठ्याप्रमाणें दिसतात. पुढल्याभागीं त्या जाड पांढऱ्या मसलीन कापडाचे बुरखे, डोळ्याखालीं तोंडाचा खालचा भाग झांकून जाई, अशा रितीनें डोक्यास बांधितात. पायामध्यें त्या पिवळे जोडे घालतात. गरीब स्त्रिया एक लहान अस्मानी झगा मात्र पेरतात परंतु ज्या कोणास सामर्थ्य असेल त्या आपल्या तोंडावर कांहीं एक प्रकारचा बुरखा घेतात. एथील पुरुष टर्कलोकाप्रमाणें बहुत करून पोशाक करितात. ते काळ्या लोकांची जात असून त्यांची पिवळी त्वचा व काळे डोळे असतात. एथील स्त्रिया बहुधा आपल्या पापण्या व भोंवयांसभोंवतीं त्या अधिक काळ्या व्हाव्या ह्मणून काळ्या रेघा मारतात.

मिसर देशांतील लोक बहुतकरून मुसलमान आहेत, तरी पूर्वीं सांगितलें आहेच कीं, त्यामध्यें बरेच यहुदी व ख्रिस्ती लोक ही आहेत.

ड केरो त्याची राजधानी हीं आहेत. केरोपासून प्र-ख्यात पिरमिडझ (थडीं) फार दूर नाहींत. ह्या थड्यां-मध्यें मिसरदेशचे पुरातन राजे आपल्या मेलेल्यांस गाडीत असत; त्यांच्या नांवावरून समजतें कीं, तीं दिप-माळेच्या आकृतीचीं बांधिलीं असून मोठीं आहेत. कांहीं अंतरावरून पाहिलीं असतां त्यांचीं टोकें उंच टेकड्या प्रमाणें ढगांस लागलेलीं आहेत असें दिसतें. ह्या थ-ड्यांमध्यें पुष्कळ खोल्या बांधलेल्या असतात. त्यां-त मिसर देशच्या राजांच्या कबरी आहेत. ह्यांतील प्रेतें कुजूनयेत ह्मणून त्यांत चांगले मसाले घालून लिनन वस्त्राच्या पुष्कळ पट्यांत गुंडाळितात, त्यांस ममीझ ( मसालाभरलेलीं प्रेतें ) ह्मणतात. त्यांतून कि-तीएक अद्यापपर्यंत राहिलीं आहेत. तीं नि-दान दोन हजार वर्षांचीं जुनीं आहेत, व त्यांती-ल कितीएक इंग्लंड देशीं आणलीं आहेत. ग्रांडकेरो ह्मणून मोठें व फार चमत्कारिक शहर असून पृथ्वीं-तील बहुधा प्रत्येक देशाच्या लोकांनी भरलें आ-हे. तेथील रहवासी टर्क, यहुदी व कापृसू ह्मणजे मिसर देशांतले लोक ह्यांखेरीज पुष्कळ ग्रीक लोक ही आहेत. परंतु ह्या शहरांतून नेहमी प्र-त्येक राज्यांतील लोकांतले प्रवासीहि जात आहे-त व रानांतून नेहमी कोणीव्यापारी लोक आपला मा-ल, उंटें किंवा गाढवें घोड्यांपेक्षां तेथें ज्यांचा फार उ-पयोग करितात, त्यांवर लादून युरोपियन लोकांची टोळी किंवा घोड्यांवर उंच खोगिरें बनाऊन मोठ्या रिकब्या व लांबलचक झंग लावून पादशाहाच्या शि-

पायांची टोळी ही रानांतून जात असतां रस्त्यांतून पायमार्गानें जाणारास पदोपदीं पडण्याचें भय असतें ( कारण त्यांकरितां उभारलेले पायमार्ग किंवा फरसबंदी नसते ) ह्या दाटींत पुष्कळ स्त्रिया दिसत नाहींत. परंतु जेव्हां मिसर देशांतील गृहस्थांच्या स्त्रिया बाहेर जातात तेव्हां त्या रेशमाचा काळा झगा घालतात. तो डोक्यापासून पायांपर्यंत त्यांस सर्व आछादून कपाळावरून भिवयापर्यंत आणितात. तेणेंकरून त्या कापडाच्या गठ्याप्रमाणें दिसतात. पुढल्याभागीं त्या जाड पांढऱ्या मसलीन कापडाचे बुरखे, डोळ्याखालीं तोंडाचा खालचा भाग झांकून जाई, अशा रितीनें डोक्यास बांधितात. पायामध्यें त्या पिवळे जोडे घालतात. गरीब स्त्रिया एक लहान अस्मानी झगा मात्र पेरतात परंतु ज्या कोणास सामर्थ्य असेल त्या आपल्या तोंडावर कांहीं एक प्रकारचा बुरखा घेतात. एथील पुरुष टर्कलोकाप्रमाणें बहुत करून पोशाक करितात. ते काळ्या लोकांची जात असून त्यांची पिवळी त्वचा व काळे डोळे असतात. एथील स्त्रिया बहुधा आपल्या पापण्या व भोंवयांसभोंवतीं त्या अधिक काळ्या व्हाव्या ह्मणून काळ्या रेघा मारतात.

मिसर देशांतील लोक बहुतकरून मुसलमान आहेत, तरी पूर्वीं सांगितलें आहेच कीं, त्यामध्यें बरेच यहुदी व ख्रिस्ती लोक ही आहेत.

# पाठ तेविसावा.

## मध्य व दक्षिण अफ्रिकेविषयीं संक्षिप्त वर्णन.

मिसर देशाच्या दक्षिणेस न्युबिया आहे व तो त्याचप्रमाणें उष्ण देश आहे. त्यास धर्मपुस्तकांत इथिओपिया ह्मटलें आहे. तेथील जमीन, जेथें कालवांनीं पाणी लाविलें असतें त्या खेरीज फार फळद्रूप नाहीं, त्यासाठीं राहाट गाईकडून फिरवून ते पाणी काढितात.

न्युबिया एथील लोक फार करून काळे आहेत. कितीएकांस काप्रयाप्रमाणें चपटीं नाकें व लोकरी सारिखे केंस असतात, व दुसऱ्यांस युरोपियन लोकांप्रमाणें सरळ तोंडें आहेत. साधारण लोकांचा वेष ढील, अस्मानी झगा असतो. न्युबिया एथील बहुत्येक लोक मुसलमान आहेत, परंतु बरेच मूर्तिपूजकही आहेत. ह्या देशाचा मुख्य भाग मिसर देशाच्या बादशाहाच्या अधिकारा खालीं आहे.

**आबिसिनिया** हा फार डोंगरी देश आहे ह्मणून एथील न्युबिया किंवा मिसर देशासारिखी उष्ण हवा नाहीं. नैल नदीचा या देशामध्यें उगम आहे. एथें ध्रुवप्रदेशांतील फळें व सुगंध उत्पन्न होतात. हा देश सिंह, चित्ते आणि खडेवाघ इत्यादि रानटी जनावरांनी

फार व्याप्त आहे; परंतु हिंदुस्थानाच्या वर्णनामध्यें त्यांविषयीं पुष्कळ सांगितलें आहे ह्मणून आतां एथें कांहीं अधिक बोलण्याची गरज नाहीं. आबिसिनीया एथील लोकांवर बादशाहा राज्य करितो, व त्यांचा धर्म ख्रिस्ती आहे; परंतु ते फार रानटी व आज्ञानी लोक आहेत.

बारबरी यास मोरोकोही ह्मणतात, त्यामध्यें अफ्रिकेचा जो सर्व उत्तरभाग, मिसरदेश व आटलांटिक सागर यांमध्यें व भूमध्यसमुद्र आणि साहारा किंवा मोठें मैदान यांमध्यें आहे, तो होय. त्याची कितीएक संस्थानें केलेलीं आहेत; तेथील हवा, जमीन व लोकांच्या रीतिभाती बहुधा परस्पर एकसारिख्या आहेत. बारबरीचा समुद्रकिनारा सफळ आहे, परंतु मध्यभाग केवळ रेतीचें मैदान आहे. या देशाचा धर्म मुसलमानी आहे व एथीललोकांस मुर्स असें ह्मणतात, त्यांचा वेष, व रीतिभाती टर्क लोकांप्रमाणें बहुतकरून आहेत. बारबरीच्या निरनिराळ्या बहुत्येक संस्थानांवर स्वतंत्र अधिकारी ज्यास डेझ ( बादशाहा ) ह्मणतात ते राज्य करितात. ह्यांपैकीं मोठें बलाढ्य संस्थान॰पुरातनकाळीं ऑलजियर्सएथील डे ( बादशाहा )च्या अम्मलांत असे. तो चांचा होता, ह्मणजे तो भूमध्य समुद्राचे किनारे लुटण्यास व जीं तारवें आढळतील तीं धरून त्यांतील खलाश्यांस व उतारु लोकांस गुलाम करण्यास तारवें पाठवी. तो त्यांस बेड्या ठोकून काम करावयास लावी व त्यांच्यां-

शीं फार क्रूर रितीनें वागत असे. परंतु सन १८१६ व्या वर्षी ऑलजियर्स् एथील लोकांस शिक्षा करण्याकरितां ब्रिटिश व दुसऱ्या कितीएक प्रजांनीं निश्चय केला. त्यांनीं आपल्या अरमारासुद्धा ऑलजियर्स्वर हल्ला करून तेथील बादशाहास सर्व खिस्ती बंदिवान सोडून देण्यास व अशी वर्तणूक पुढें न होण्याविषयीं कबूल करावयास जरूर पाडिलें. असें असतां, त्याणें आपलें वचन पाळलें नाहीं, व कांहीं वर्षांनंतर त्यास शिक्षाकरण्याकरितां फ्रेंच लोकांनी लढाई करून ऑलजियर्स् घेतलें, ह्मणून आतां तें फ्रान्सच्या स्वाधीन आहे.

साहारा किंवा ग्रेटडेसर्ट बार्बरीच्या दक्षिणेस आहे, तें मिसर देशापासून आट्लांटिक सागरापर्यंत असून कितीएक ठिकाणीं सुमारें १००० मैल रुंद आहे. ह्या मोठ्या देशाच्या बहुतकरून सर्व भागांत मोकळी रेती आहे, व त्यांत कांटेरी झाडें यांखेरिज कांहीं एक वस्तू उत्पन्न होत नाहीं. "मैदानाच्या गोष्टी" मध्यें इतकें पुष्कळ सांगितलें आहे कीं, त्याविषयीं एथें पुन: सांगण्याची गरज नाहीं.

गिनी हा अफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर मोठा देश आहे. त्याचे वरचे व खालचे असे दोन भाग केले आहेत. पृथ्वीमध्यें, गिनी हा देश सर्वांत उष्ण आहे, परंतु ज्या गरमीनें युरोपांतील लोक मरून जातील. ती एथील लोकांस चांगली व सुखकारक वाटते; अशी या लोकांची प्रकृती आहे. ते सर्व काफी

आहेत, व एथेंच क्रूर व रानटी असा गुलामाचा व्यापार चालतो. मागील तीनशें वर्षेंपर्यंत युरोपांतील लोक गुलाम विकत घेण्यासाठीं प्रत्येक वर्षी तारवें पाठवून ते गुलाम ज्यांची प्रजा असे, किंवा त्यांस लढाईंत जे बंदिवान करीत त्या काफ्री राजांकडून त्यांस विकत घेत. आतां पुष्कळ गुलाम अमेरिकेंत व वेस्टइंडिझ एथें नेऊन निरनिराळ्या धन्यांस विकत देतात, ते त्यांस काफी व ऊंस लावण्यामध्यें योजितात.

परंतु सुमारें तीस वर्षांपूर्वी कांहीं चांगल्या व परोपकारी लोकांनीं आपल्या प्रजेस गुलामाचा व्यापार गैरशिस्त असें ब्रिटिश सरकारास पुरतेपणीं समजाविलें. ग्रेट ब्रिटनाचें उदाहरण घेऊन दुसऱ्या कितीएक लोकांनीं तसेंच केलें; परंतु दुर्दैवेंकरून कितीएक अजून ही तो व्यापार करणारे असल्यामुळें प्रतिवर्षी आपल्या घरांतून व कुटुंबांतून सर्वदा पुष्कळ दुर्दैवी काफ्री लोकांस भिन्न करून अन्य देशीं कधींकधीं निष्ठूर व क्रूर अशा धन्यांचें जन्मभर काम करावयास लावितात.

सन १८३४ सांत गुलामगिरी ब्रिटिश पश्चिमहिंदिसंस्थनांत बंद केली व काफ्री लोकांची स्वतंत्रता त्यांच्या धन्यांकडून ब्रिटिश लोकांनीं २० कोटी द्रव्य देऊन विकत घेतली, असें तुह्मी अमेरिकेच्या वृत्तांतांत पाहाल. गिनीमध्यें, तांदूळ, फळें, व सुगंधिक मसाले व मलम ही भरपूर आहेत; एथील रहिवाशी कितीएक मुसलमान, कितीएक मूर्तिपूजक आहेत, परंतु सर्व अज्ञानी व रानटी आहेत.

केप आवगुडहोपच्या सभोंवताला देश ग्रेटब्रि-टनच्या स्वाधीन आहे. तेथील हवा चांगली आहे व जरी किती एक भागांत ओसाड व भयंकर जमीन आहे तरी इतर ठिकाणीं फलद्रूप आहे, व सर्व प्रकार-चे वनस्पतीचें उत्पन्न व विषेशेंकरून सुंदर फुलें पुष्कळ होतात. एथून एकादा प्रवासी सर्व रंगांचीं सुंदर झाडें, जाई व विलक्षण प्रकारचीं फुलझाडें ( जीं फुलझाडें आपल्या देशीं रानांत होतात तीं हीं नव्हत परंतु सुंदर गुलाबी, लाल, पांढरीं फुलें येतात अशीं निरनिराळ्या देशांतील झाडें ) व ज्या दुसऱ्या पुष्कळ वनस्पती आपल्याकडे हिरव्या घरांत मात्र होतात, त्यांमधून गेल्यावांचून क्वचित्‌च पाऊल टाकितो; व या खेरीज वेली झाडांवरून चढलेल्या किंवा जमिनीवरून पडलेल्या असतात व त्यांस इंद्रधनुष्याचा प्रत्येक रंग असतो. त्याच प्रमाणें हा देश तेजस्वी रंगाचे पक्षी व पतंग यांविषयीं प्रख्यात आहे. केपा जवळील रानांत एका जातीचा पक्षी राहतो त्यास जरी फार सुंदर पिसारा नसतो तरी तो फार उपयोगी आहे, कारण जेव्हां जेव्हां त्याला रानटी मध माशांनी मधाचा कोठार एकाद्या झाडाच्या पोकळींत केलेला सांपडतो त्या वेळीं तो एका प्रकारची आरोळी मारतो तेणेंकरून मधाचें पोळें कोठें आहे ती जागा समजण्यांत येते. ह्मणून त्याला मध दाखविणारा पक्षी असें ह्मणतात.

केपाच्या राजधानीस केपटौन असें ह्मणतात. ती पूर्वीं डच लोकांच्या स्वाधीन होती व त्या देशास-

भोंवते पुष्कळ डच तसेच इंग्रेज जाऊन राहिले आहेत; परंतु त्या देशांतील खुद्द रहिवासी काफ्री किंवा हार्टेंटोट्स आहेत. काफ्री हे उंच, चांगले स्वरूपाचे पुरुश असून त्यांची काळसर त्वचा आहे. ते आपल्या कळपासुध्धा एका जागेहून दुसऱ्या जागीं जातात, व त्यांच्या राहाण्याचें अमुकच ठिकाण नसतें. ते मुख्यत्वेंकरून दुधावर निर्वाह करितात, व त्यांचा पोशाक, विषेशेंकरून एकाद्या रानटी जनावाराच्या कातड्याचा झगा असतो.

परंतु हार्टेंटाट्स लोक ठेंगणे, छोटेखान, व कुरूप असून त्यांची त्वचा पिवळी व केस लोंकरीप्रमाणें आहेत. ते ज्या खेड्यांत राहातात त्यांस ते कराल असें ह्मणतात; त्यांमध्यें गोपुच्छाकृति एकाजवळ एक पुष्कळ झोंपड्या बांधिल्या असतात. ते कोंबडीच्या ओरडण्या प्रमाणें एक विलक्षण स्वराची जुनी भाषा बोलतात.

काफ्री व हार्टेंटाट्स लोक बहुतकरून मूर्तिपूजक आहेत; परंतु युरोपांतून जे पाद्री मूर्तिपूजक लोकांस धर्मशास्त्र उपदेश करायास गेले त्यांनी हार्टेंटाट्स लोकांतील बहुतेकांस ख्रिस्ती धर्माकडे वळविले आहेत.

अफ्रिकेच्या **मध्यभागा**विषयीं फार थोडें माहित आहे, व युरोपियन लोकांस तेथील हवा इतकी वाईट व रोगोत्पादक आहे कीं, जे त्या देशांतून प्रवास करावयास जातात ते बहुधा परत येण्याच्या पूर्वीच मरून जातात. ह्यांतील लोक बहुतेक काफ्री आहेत.

# भाग ४ अमेरिका.

## पाठ चोविसावा.

### उत्तर अमेरिकेविषयीं संक्षिप्त वर्णन.

पाठाच्या दुसऱ्या पुस्तकाच्या पुरवणींत तुह्मी वाचिलें आहेच कीं सन १४९२ व्या वर्षी कोलंबसानें अमेरिका खंड शोधून काढिलें. स्पेनचे उदाहरण घेऊन युरोपांतील पुष्कळ लोकांनीं नवीन खंड शोधून काढण्यास गलबतें रवाना केलीं व तेथें त्यांस सोन्यारुप्याच्या खाणी लागल्या, त्यावरून तो देश जेवढा आपल्या स्वाधीन होईल तितका करून घेण्याविषयीं त्यांच्याठायीं इच्छा उत्पन्न झाली. त्यांतील कितीएक लोक अज्ञानी व रानटी असल्यावरून व बाकीचे युरोपियन लोकांप्रमाणें लढाईंत हुशार नसल्यामुळें सहजच स्वाधीन झाले. विजयी लोकांनीं पुष्कळांस क्रूरतेनें ठार मारून आपण स्वतः बहुधा सर्व खंडाचे धनी होऊन बसले व ज्यांस मारिलें नव्हतें त्यां सबंदींत ठेवलें. युरोपियन लोकांचीं व तेथील रहिवाशांचीं मोठी लढाई व रक्तस्राव होऊन शेवटीं अमेरिकेचा बहुतेक भाग, स्प्यानियर्ड लोकांत व इंग्रेज लोकांत, व दक्षिण अमेरिका, स्पानियर्ड व पोर्टुगीझ लोकांत विभागली गेली होती. परंतु सन १७८३ व्या वर्षी इंग्रेज लोकांचे वंशज जे उत्तर अमेरिकेच्या मध्यभागीं राहात असत, त्यांनीं ग्रेटब्रिटनापासून भिन्न

होऊन स्वतंत्र लोकसत्ताधिकार स्थापिला, त्यास युनैटेड स्टेटस ह्मणतात.

विषुववृत्ताच्या उत्तरेस व दक्षिणेस स्प्यानिश व पोर्टुगीझ वसाहतींतील लोकांनीं इंग्रजलोकांच्या उदाहरणास अनुसरून स्पेन व पोर्टुगल देशांचा अंमल उडवून त्यांनीं कितीएक स्वतंत्र लोकसत्ताक राज्यें स्थापिलीं.

युनैटेड स्टेट्सच्या अगदीं वरचे देशग्रेटब्रिटनच्या हस्तगत आहेत. ब्रिटिश अमेरिकेमध्यें क्यानडा, नोव्हास्कोशिया नामें द्वीपकल्प व ह्याजवळील बेटें आहेत.

युनैटेड स्टेट्सचा क्यानडापासून थोडा सेंटलारेन्स नदीनें व थोडा पृथ्वीमधील फारच मोठ्या कितीएक सरोवरांतून ह्मणजे सुपीरियर, ह्युरोन, इरै, आणि ऑन्ट्यारिओ यांणीं वियोग केला आहे. ह्या सरोवरांस किंबहुना मध्यसमुद्र ह्मटल्यास चालेल, कारण त्यांवरून जमीन दृष्टीस पडल्यावांचून कांहीं दिवस पर्यंत तारवानें कोणासही जातां येतें. इरै सरोवरांतून आनट्यारिओ सरोवरापर्यंत नायगारा नदी वाहते, ती वाहत असतां तिच्या ओघांत पृथ्वींतील एक फार मोठा धोधा उत्पन्न झाला आहे तो १४२ फुटींपासून १६३ फुटी उंच आहे, व तो वाहत असतां त्याचे दोन भाग झाले आहेत, हे दोन्हीमिळून पावमैल लांब इतकें अर्धवर्तुळ होतें. कांहीं मैलपर्यंत हा मोठा पाण्याचा धोधा गर्जनेप्रमाणें ऐकू येतो व ह्या धोध्याच्या जोरानें हवेंत तुषारांची

व वाफेचीं वळकटीप्रमाणें ढगें होतात, त्यांच्या शि-तोड्यावर सूर्याचीं किरणें पडून परावर्तन होतात, त्यामुळें उनामध्यें इंद्रधनुष्यें प्रकाशूं लागतात.

क्यानडाचा वरचा व खालचा असे दोन भाग केले आहेत. खालचा क्यानडा उंच डोंगरांनीं, ओंड खिंडींनीं व दाट रानांनीं भरून गेला आहे. त्यांतील मुख्य शहर क्युबेक; त्या सर्व देशाची राजधानी असून, सेंट लॉरेन्स् नदीवर एक चांगलें शहर आहे; खालचा क्यानडा पूर्वीं फ्रान्स देशाच्या स्वाधीन होता व तेथील रहिवासी अजून ही बहुत्येक फ्रेंच आहेत, व फ्रेंच भाषा बोलतात.

त्याहून वरील क्यानडा फार सपाट देश असून मोठ्या व फार जुन्या रानांनीं वेष्टिला आहे. तेथील रहिवासी मुख्यत्वेंकरून इंग्लन्ड, स्कॉटलन्ड, व ऐयर्लन्ड, ह्या देशांहून आलेले लोक आहेत. ते रानवट प्रदेशांत जमिनीचा भाग विकत घेऊन तेथें प्रथमतः डाहाळ्यांच्या झोंपड्या अथवा लांकडाच्या तुकड्यांचीं घरें बांधून राहतात. ते दाट झाडें कापून टाकण्या करितां फार वेळ पर्यंत लागले असतात; परंतु त्यांच्या घरांसभोंवतील जमीन साफ केल्यावर, सुकलेलीं पानें पडल्यामुळें जमीन चांगली झालेली असते, व हिची जेव्हां फार जपून लागवड करितात तेव्हां पुष्कळ पीक उत्पन्न होतें.

वरल्या क्यानडांतील मुख्य शहरें किंगस्टन व यॉर्क ही आहेत व हीं दोन्ही शहरें ऑन्ट्यारिओ सरोवरावर आहेत. क्यानडा एथील हवा हिंवाळ्यांत फार-

च थंड असून वर्षांतून पांच सहा महिनेपर्यंत तो देश बर्फांत गडून गेला असतो; मग एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं रशियन् लोकांप्रमाणें स्लेजनामें एकाप्रकारच्या होडीमध्यें बसून तेथील रहिवासी जातात.

सेंटलारेन्स् नदीच्या दक्षिणेस नोव्हा स्कोशिया ह्मणून द्वीपकल्प आहे. त्याचा किनारा, खडकी व नापिक आहे, परंतु मध्यभागीं किती एक प्रदेश फळद्रूप आहेत. एथील रहिवासी कितीएक फ्रेंच क्यानेडियन्स्, कितीएक स्कॉच वसाहत करणारे व कितीएक इंडियन्स् आहेत. हिंवाळ्यामध्यें फार थंड, व वसंतऋतूंमध्यें हिममय अशी एथील हवा असते. परंतु पावसाळ्यांत फार रमणीय असते. त्याची राजधानी ह्यालीफ्याक्स् आहे व तेथून पुष्कळ लांकूड रवाना होतें.

नोव्हास्कोशियाच्या वायव्येस न्यूब्रंझिक् ह्मणून मोठा देश आहे. त्याचे कित्येक भाग खडकी असून त्यांतून चांगल्या नद्या वाहतात; परंतु सर्व देश बहुधा एक सारख्या मोठ्या व शोभायमान रानानें व्याप्त आहे. एथील लोक लांकडाच्या व्यापारांत फार गुंतलेले असतात. हा व्यापार एका प्रकारचे लोक करितात त्यांस लंबरर्स असें ह्मणतात. ते त्या मोठ्या जंगलाच्यामध्यभागीं, भर हिंवाळ्यांत झाडें तोडतात. ते लहानशा लांकडी झोंपड्यांत, मध्यभागीं मोठा विस्तव करून सर्व त्यासभोंवती निजून आपलें संरक्षण करि-

तात. वसंतऋतूंत जेव्हां बर्फ वितळून नद्यांस पूर येतो तेव्हां ते होड्यांतून किंवा तरणांतून लांकूड ह्यालिफ्याक्स् येथें पाठवितात, तेथून मग तें इंग्लन्डास जातें.

केपब्रिटन् आणि प्रिन्स् ऑव वेल्स् ह्या दोन मोठ्या बेटांचा नोव्हास्कोशिया पासून लहान खाड्यांनी विभाग झाला आहे. तेथील हवा हिममय आहे व रहिवासी केवळ मासे धरण्यांत गुंतले असतात. सेंटलॉरेन्स्च्या आखाताच्या मुखाजवळ न्युफौंडल्यांड ह्मणून एक मोठें बेट आहे. ती जागा फार खडबडीत व सुखसाधनरहित असून तेथील हवा हिममय ओलसर असते व कॉड माशाविषयीं मात्र प्रख्यात आहे, ते मासे फारच उपयोगी आहेत. किनाऱ्यावर मंचक किंवा तक्के उभारले असतात त्यांतून मासे धरण्याच्या होड्या जातात. त्या प्रत्येक होडीवर दोहोंपासून चारपर्यंत मनुष्यें असतात, ते दिवसा उजेडीं समुद्रांत जाऊन होडी भरेतोंपर्यंत मासे धरित असतात, मग त्या मंचकावर मासे काढण्याकरितां परत येतात. व पुनः होड्या भरण्याकरितां परत जातात. ते मासे कापून प्रत्येक थरांत मीठ घालून त्यांचे ढीग करितात. अशा स्थितींत त्यांस कांहीं दिवस ठेऊन नंतर धुवून उन्हांत सुकवितात. प्रत्येक ऋतूमध्यें दहा बारा हजार मासे धरून बाजारांत पाठवितात. तो ऋतू एप्रिल महिन्यापासून ज्युलई महिन्यापर्यंत असतो.

युनैटेडस्टेट्स्चा कांहीं भाग, जंगल, अरण्य,

पर्वत आणि सरोवरें यांहींकरून भरला आहे, आणि कांहीं भाग सपाट व लागवड केलेला आहे. तेथील रहिवासी ब्रिटिश वंशाचे असून सर्व इंग्रेजी भाषा बोलतात. न्यूयॉर्क, बॉस्टन्, आणि फिल्याडेल्फिया हीं मुख्य शहरें सर्व पूर्वेकडील किंवा लागवड केलेल्या संस्थानांमध्यें आहेत.

मेक्सिको नामें देशाचा मोठा भाग ज्या आखातास त्याचेंच नांव दिलेलें आहे त्यावर आहे, तो डोंगरांनी अच्छादिला असून बहुधा सर्व त्याची सपाटी समुद्राच्या सपाटीपेक्षां फारच उंच आहे. त्या देशाचे फारच उंच भाग थंड असून त्यांत थोडीच वनस्पती उत्पन्न होते. परंतु जसजसा तो समुद्राकडे उतरत गेला आहे तसतसी तेथील हवा रमणीय व समशीतोष्ण आहे; व तेथें गहुं पुष्कळ होतात, त्यांतून बरेच रवाना केले जातात. समुद्र किनाऱ्यावरील खोलवट मैदानांत फार दाहकारक हवा असल्यावरून तेथील लोक त्यास उष्ण देश ह्मणतात, तो चांगला व शोभायमान असून त्यांत सुशोभित फुलें व फळें, व फार मोठ्या आकृतीचीं रानटीं झाडें पुष्कळ होतात. परंतु हा चांगला प्रांत इतका भयंकर रितीनें रोगोत्पादक आहे कीं, त्यांत कोणाच्यानें राहवत नाहीं व, विशेषेंकरून उन्हाळ्यांत तर नाहींच नाहीं.

या देशाची राजधानी मेक्सिको, लहान लहान सरोवरांनी जी सुंदर खिंड व्याप्त आहे त्यांत आहे; त्यांच्यावरच्या बाजूस दोन उंच डोंगर जे पूर्वी ज्वाला

मुखी होते ते आहेत. मेक्सिकन लोक बहुत करून स्प्यानिश् वंशाचे आहेत. ते स्प्यानिश भाषा बोलतात, व त्यांच्या रीतिभाती स्पेन देशच्या रीतिभातीप्रमाणेंच बहुत करून आहेत.

अजूनही पूर्वींच्या रहिवाशांपैकीं कितीएक मेक्सिकोमध्यें राहतात. जरी ते उत्तर अमेरिकेंतील इंडियनांपासून भिन्न आहेत तरी त्यांस इंडियन्स् ह्मणतात. ते आपली स्वतःची भाषा बोलतात, आणि फार अज्ञानी व रानटी आहेत.

# पाठ पंचविसावा.

## उत्तर अमेरिकेंतील इंडियन् लोक.

उत्तर अमेरिकेंतील इंडियन्लोकांच्या पुष्कळ तऱ्हतऱ्हेच्या जाती असून सर्व एकमेकापासून दिसण्यांत व रीतिभातींत थोड्या बहुत भिन्न आहेत, व त्यासर्व निरनिराळ्या भाषा बोलतात. या देशांत हरणें व दुसरीं रानटीं जनावरें पुष्कळ आहेत, त्यांवर त्यांतून बहुतेक निर्वाह करितात. मैदानें किंवा काप असे ज्यांस ह्मणतात त्यांत पुष्कळ रानटी घोडे सांपडतात ह्मणून बहुतेक जाती पारधीच्या स्वाऱ्यांत घोड्यांचा उपयोग करितात. अमेरिका घोड्याची जन्मभूमि नाहीं ह्मणून जे रानटी घोडे कापांत असतात ते युरोपियनांच्या ठाण्यांतून जे घोडे पळाले आहेत त्यांपासून झालेले आहेत. त्यांची इंडियन्

लोक फार प्रशंसा करितात. ते त्यांस एका लांब काठीच्या टोंकास फांस बांधून धरितात.

इंडियनांच्या जाती एकमेकाशीं बहुधा नेहमी लढत असतात; त्यांचे सरदार त्यांस लढण्यास नेतात, व त्यांचा लढाईच्या वेळीं अधिकार मोठा असतो. जेव्हां स्वस्थता असती तेव्हां सर्व समान असतात कीं इतकेंच, फार शूर योध्द्यांस ते मोठे असें मानितात. त्या मनुष्यांचे पारध व लढणें हे धंदे असल्या वरून बायकांच्या वाट्यास नेहमी मेहनतीचा बहुतेक अंश येतो. त्यांस आपल्याकरितां व पुरुषांकरितां कपडे करावे लागतात. या खेरीज जेव्हां इंडियन लोक स्थायीक असतात तेव्हां त्यांस राहावयाकरितां डाहाळ्यांचीं खोपें किंवा झोंपड्या बांधाव्या लागतात, व प्रवास करित असतां तंबू ठोकावयास व ओझें देखील वाहवयास अगत्य पडतें. असें असतां त्या इंडियन् स्त्रिया आपल्या दुर्दैवाविषयीं कुरकूर करित नाहींत व जर एकादा पुरुष एकादें हलकें काम करूं लागेल तर त्या पुरुषास नीच पद प्राप्त झालें असें समजतील.

इंडियन् लोकांच्या निरनिराळ्या जाती इतक्या पुष्कळ व एकमेकांपासून इतक्या भिन्न आहेत कीं, त्या सर्वांचें वर्णन करणें अशक्य आहे. कितीएकांची तांबुसरंगाची व दुसऱ्यांची पिवळटरंगाची अंगकांति आहे; बहुत करून सर्वांचे केंस सरळ, काळे असून खोलबट डोळे आहेत; परंतु किती एक जाती उंच व सुंदर आहेत, तथापि दुसऱ्या ठेंगण्या व कुरूप दिसणा-

ऱ्या आहेत. रेड्याच्या कातड्याचा मोठा झगा, हा त्यांचा नेहमीचा पोशाक असतो व त्याच्या मध्य-भागीं व कोनांस नकशी काढलेली असते. पायांमध्यें ते सपातें घालतात, ती हरणाच्या कातड्यानी एका प्रकारचे जोडे किंवा पैजारा केलेल्या स्वेच्छेप्रमाणें सुशोभित बहुधा असतात. जेव्हां इंडियन् योद्धा भरपुर पोशाक घालतो तेव्हां तो विचित्र दिसतो. त्याच्या आवडीप्रमाणें त्याचें तोंड लाल, हिरव्या, किंवा पांढऱ्या चट्यांनीं रंगविलें असतें; त्याच्या डोक्याच्या पुढल्या भागाचे केंस काढलेले असतात व पाठीमागल्या केंसांस पिसाचा किंवा घोड्याच्या व हरणाच्या रंगविलेल्या केंसांचा मोठा झुबका बांधितात.

तो आपल्या गळ्यांत नकशीदार शिंप्यांचा केलेला हार व बोटांत रुप्याच्या आंगठ्या व हातात कडीं घालतो. याहुन तेथील स्त्रियांचा वेष साधारण व सर्व जातींत एक सारखा आहे. त्यांचे चकचकीत व काळे केंस कांहीं दागिणे घातल्यावाचून पाठीवर पडतात, परंतु त्यांस गुळगुळीत व साफ राखण्यांत भूषण मानितात. व त्या आपआपले केंसांच्या गेलेल्या ठिकाणीं व गालाच्या बाजूसही लाल रंगानें रंगवितात.

जेव्हां त्यांचीं बालकें फार लहान असतात तेव्हां इंडियन स्त्रिया त्यांस सपाट तक्त्यास सुरूप बांधून आईच्या कपाळासभोंवता जो बंध बांधितात तेणेंकरून त्यांस त्या आपल्या बरोबर नेतात असें के-

त्यानें फार अडचणीवाचून तिला पुष्कळ कामें करितां येतात.

स्वस्थतेच्या वेळीं इंडियन् लोक तऱ्हतऱ्हेच्या खेळांत व नाचांमध्यें मौज मारितात; त्यांच्यामध्यें लढाईचाही नाच आहे, तो ते लढाईस जाण्याच्या पूर्वी नेहेमी करितात. त्यांचे वाद्य एकाप्रकारचें ढोलकें मात्र होय, व त्यावर सूर लावून एकाजातीचें गाणें गातात. गुडगुडी ओढणें त्यांचा मुख्य उपभोग आहे—ते कधीं कधीं तंबाखू व कधीं कधीं एक वनस्पती जिला स्युम्याक ह्मणतात ती ओढतात.

जेव्हां एकाजातीचे लोक दुसऱ्या जातीच्या लोकांशीं सल्ला करण्यास इच्छितात तेव्हां एका टोळीस लांकडाची नळी पुष्कळ प्रकारें सुशोभित केलेली देऊन रवाना करितात, ह्या नळीस सल्ल्याची नळी ह्मणतात. परंतु जर ते लढाई इच्छूं लागले तर ते कुऱ्हाडीचा दांडा तांबडा रंगवून पाठवितात.

इंडियन लोक एका ईश्वरावर विश्वास ठेवितात त्यास ते "परमात्मा" ह्मणतात. ज्या प्रत्येक वस्तूचा ते उपभोग करितात तिजविषयीं त्याचा उपकार मानण्यास चुकत नाहींत; गंभीर व सन्मानकारक रीतीशिवाय त्याचें नाम घेत नाहींत. ह्मणून जरी त्यांस आपूल्याप्रमाणें ईश्वराचें नाम पवित्र मानण्यास कोणी शिकविलें नाहीं, तरी आपणांमधून कितीएकांस त्याप्रमाणें वागण्यास यत्न करावा असें ते उदाहरण दाखवितात. त्यांच्या मूर्ति नसतात व उपासनेची नियमित रीती नसते; परंतु कितीएक जातीमध्यें

प्रत्येक मनुष्याकरितां कांहीं जागा असावी व तेथें त्यानें एकट्यानें प्रार्थना करावी, अशी चाल पडली आहे; व अशा रितीनें गुंतले असतां त्यांजवळ जाण्यास अगदीं लगत सोयऱ्यांस देखील हिंम्मत होत नाहीं.

इंडियनांतील कित्येकांस येशूच्या धर्माकडे वळविले आहेत; परंतु बहुतेकांचे भटकणें, किंवा अस्थिर आयुष्य हें त्यांच्या सुधारणुकेस मोठीच अडचण आहे.

अमेरिकेंतील इंडियन् लोक स्वभावानें शांत व स्तब्ध, व स्वाभाविक प्रीतिवाचून आहेत, असें कधीं कधीं वर्णन करितात, परंतु ही चूक आहे. ते आपल्या मित्रांस फार आस्थेनें जडलेले असतात, व त्यांचेसारिखे अधिक प्रिय असे आईबाप दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं सांपडावयाचे नाहींत.

आयूओवे जातीच्या इंडियन् लोकांच्या एकाटोळीनें कांहीं दिवसांवर डब्लीन एथें येऊन चांगले चमत्कारिक पोशाक व शस्त्रें दाखविलीं. ते चांगल्या प्रकारचे लोक होते व त्यांची हुशार मुखचर्या असून फार सौम्य वृत्ती होती, त्यांच्या रीति भाती सौम्य व उंच प्रकारच्या असून हुशारी कमी नव्हती. कितीएकांनीं आपल्या बरोबर बायका आणिल्या होत्या त्या चांगल्या देखण्या स्त्रिया होत्या, परंतु पुरुषां इतक्या उंच व सुंदर नव्हत्या. दुर्दैवें करून ऐयर्लंडाची हवा ज्या इंडियनांस उष्ण हवेंत राहाण्याची सवयी असे त्यांच्या प्रकृतीस मानली नाही व त्यांतून स्वदेशास

एकही परत गेला नाहीं, परंतु ऐयर्लंड देश सोडल्यावर सर्व लवकरच मरून गेले.

# पाठ सविसावा.

## वेस्ट इंडीझ्.

मेक्सिकोच्या आखाताजवळ वेस्ट इंडीझ बेटें आहेत, व त्यांतून किती एक दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्याजवळ आहेत. त्यांतून आतां बहुतेक ग्रेटब्रिटनाच्या स्वाधीन आहेत; परंतु कितीएक फ्रान्सचे, कितीएक स्पेनचे ताब्यांत आहेत, व थोडकींच, डेन्स व स्विड्झ् लोकांच्या स्वाधीन आहेत.

ह्यांमधील बहुतेक बेटें फार सुंदर आहेत; त्यांची सपाटी बहुधा डोंगरी आहे व त्यांमध्यें फारच चांगलीं फळें व सुंदर व चमत्कारिक फुलें व झाडें आहेत. एथें, महॉगनी झाडाचें बहुतेक सामान करितात तें, काटे अननस, ज्यापासून मधूर फळ प्राप्त होतें, व जें कधीं कधीं उष्ण घरांत लाविलेलें आढळतें तें, ज्या झाडापासून जायफळ मिळतें व जें किरमिजी रंगाच्या सालांत किंवा कवटींत जिला जायपत्री ह्मणतात त्यांत असतें तें, मिरवेल ज्यावेलीपासून काळें मिरीं मिळतें तें, व ह्याच प्रकारचीं दुसरीं चमत्कारिक झाडें येथें साधारण आहेत. परंतु लागवडकरण्याचे मुख्य जिन्नस काफी व साखर आहेत. काफीचें झाड सर्वदा हिरवें असतें; त्याचीं फुलें पांढरीं असून फळें तांबडीं आहेत; ह्याफळांमध्यें ज्या बिया असतात त्यांना

काफी ह्मणतात व तिचा आपण उपयोग करितो. मोठाल्या मळ्यांत ती लावितात व फळें पिकलीं ह्मणजे तीं उपटून उन्हामध्यें सुकत घालतात.

ऊंस व त्याचारस कढवून साखर तयार करण्याचा वृत्तांत वनस्पती जातीच्या वर्णनांत दिला आहे.

पूर्वी वेस्ट इंडिझ् एथील सर्व.काम काफ्रीगुलामांकडून करवून घेत; परंतु ब्रिटिश संस्थानांमध्यें गुलामगिरी बंद झाल्यापासून जीं बेटें ग्रेटब्रिटनाच्या स्वाधीन आहेत, त्यांसर्वांमधील काफ्रीलोक स्वतंत्र झाले आहेत. दुर्दैवेंकरून जीं बेटें स्पेनच्या व इतर परकीय लोकांच्या स्वाधीन आहेत, त्यांत असा प्रकार नाहीं व ह्यांमध्यें गुलामगिरी अजून चालते.

ब्रिटिश वेस्ट इंडिया बेटांतील फारच मोठें बेट ज्यामेका आहे, त्याची राजधानी किंगस्टन् होय. स्प्यानिशबेटांतील मुख्य बेट क्यूबा होय; त्याची राजधानी ह्याव्हाना नामें आहे.

पूर्वी सेंट डोमिंगो किंवा हेटी याचा कांहीं भाग फ्रान्साच्या व कांहीं स्पेनच्या स्वाधीन होता, परंतु ह्या शतकाच्या आरंभींच काफ्रीलोकांनी त्या गोऱ्या लोकांचा अधिकार उडवून लोकसत्ताक राज्य स्थापिलें.

# पाठ सत्ताविसावा.

## भाग पहिला.

### दक्षिण अमेरिका.

ह्या मोठ्या द्वीपकल्पाचीं एकंदर रूप लक्षणें फारच साधारण आहेत. मध्यभागांतून उत्तरेपासून द-

क्षिणेपर्यंत खोलवट देशाचा विस्तार आहे, त्यांत चिख-लट व वाळवट मैदानें असून त्यांतून पुष्कळ नद्या वाहतात. पृथ्वीमध्यें फारच मोठी अशी प्रख्यात अ-मेझान् नदी ह्यां पैकी होय. हिच्या पश्चिमेस समां-तरावर एक विस्तीर्ण मैदान समुद्राच्या सपाटीपेक्षां सुमारें १२००० फुटी उंच आहे, व त्यावर आंडीझ्र पर्वताची उंच रांग आहे. मध्य मैदानाच्या पूर्वेस, पश्चिमेच्यापेक्षां एक कमी उंच उतरण जमिनीचा दुस-रा विस्तार आहे. हे तीन स्वतः सिद्ध भाग मिळून दक्षिण अमेरिकेचें सर्व द्वीपकल्प झालें आहे.

पश्चिमेकडील उतरण जमिनीचा बहुतेक प्रदेश स्प्यानियर्ड लोकांनी व्यापिला आहे, व ब्राझिलचें रा-ज्य या नांवाचा पूर्वेकडेचा सुंदर देश पोर्टुगीझ लोकां-च्या स्वाधीन आहे.

आंडीझ्रच्या रांगा पृथ्वींतील फार उंच पर्वतांपै-कीं आहेत. ह्या पर्वताचें नांव पिरू एथील ज्या श-ब्दाचा अर्थ तांबें असा होतो त्या शब्दावरून पडलें आहे. त्यांत तांब्याच्याच पुष्कळ खाणी आहेत अ-सें नाहीं, परंतु सोनें, रुपें, व दुसऱ्या पुष्कळ धातू-च्याही समृद्धिमान् खाणी आहेत. ह्यांतून पिचिंका नामें एकापर्वतावर कोलंबिया एथील क्वीटो नामें शह-र आहे. तें जरी अगदीं विषुववृत्ताच्या खालीं आहे तरी फार सुखकारक व समशीतोष्ण हवेविषयीं प्रख्या-त आहे, कारण कीं तें समुद्राच्या सपाटीपासून फारच उंच आहे. असें सांगतात कीं दोघे पुरुष, एक डों-गराचें शिखर बर्फानें आच्छादिलें असतें तेथून येणारा

व दुसरा खालच्या दाहकारक मैदानांतून येणारा, हे क्किटो शहराच्या रस्त्यांत भेटले असतां, पहिला गरमीविषयीं गाऱ्हाणें गातो व दुसरा थंडीनें कुडकुडूं लागतो; असें असतां शहरांतील लोकांस हवेची स्थिती आनंदकारक वाटते, कारण कीं ती फार थंड किंवा उष्ण नसते.

एशिया व आफ्रिका या खंडांशीं तुळणा केली असतां दक्षिण अमेरिकेंत फारच थोडीं रानटी जनावरें आहेत. त्यांतील फारच मोठें ल्यामा हें सुंदर जनांवर आहे व त्याचा ओझें वाहाणाऱ्या पशूप्रमाणें उपयोग करितात; त्याची लोकरही मोलवान् आहे, कारण तिचें एक सुंदर प्रकारचें वस्त्र करितात. इतर कोणत्याही जनांवरांपेक्षां ल्यामा हें जनांवर उंटाप्रमाणें बहुधा आहे; परंतु त्यास कोळें नसतें, व त्याची साजरी गती उंटाच्या अस्ताव्यस्त व खुटुरुटू चालीपासून फार भिन्न आहे.

दक्षिण अमेरिकेंतील वनस्पतीपासून उत्पन्न असंख्य आहे; पृथ्वीच्या दुसऱ्या कोणत्याही भागांतील फुलांच्यानीं एथील फुलांशीं सौंदर्यांत सारखेपणा करवत नाहीं, व बहुतेक मोलवान् औषधें, ब्रझिल, पिरू, आणि गायना एथून मिळतात. ह्यांतील एक ज्यास पिरू व्हियन् बार्क ह्मणतात तें चमत्कारिक रितीनें शोधून काढिलें. एक बिचारा इंडियन् रानांत एकटाच विषम ज्वरानें पडलेला होता त्यास फार तहान लागल्यामुळें तो पाण्याच्या टांक्याजवळ रांगत रांगत गेला, त्यांत वाऱ्यानें उपटून पडलेला एक वृक्ष होता.

हा वृक्ष सिंकोना किंवा बार्क झाड होय. त्या इंडियनास तें पाणी फार कडू लागलें, परंतु फार ताऱ्हेमुळें त्याणें त्यांतून कांहीं प्राशिलें, व नंतर इतका बरा झाला कीं, आपण बरा होईपर्यंत तो पुन: पुन: त्याच टांक्याजवळ येई. ह्या प्रमाणें ह्या झाडाची साल तापावर व दुसऱ्या पुष्कळ रोगांवर लागू पडते असें शोध लागला.

दक्षिण अमेरिकेंत मका किंवा जोंधळा व माड, ज्याच्या फळापासून त्याच नांवाचा एक मधूर पुष्टिकारक ष्यावयाचा पदार्थ उत्पन्न होतो तो, व चोकलेट हीं इत्यादि झाडांची मुख्यत्वेंकरून लागवड करितात. एथील लोक म्यानिऑक झाडाची पुष्कळ लागवड करितात, त्याचें मूळ दळलें ह्मणजे त्यास क्यासाव्हा असें ह्मणतात. ह्या मुळाचा रस विषमय आहे, व मुळांतून रस काढून टाकीपर्यंत तें मूळ देखील विषमय असतें. इकडील कितीएक लोक आपलें अन्न पिष्टरूपें सुकें खातात; दुसरे त्याच्या भाकरी करितात, त्या जरी रुचिकर नसतात तरी फार पुष्टिकारक असतात.

दक्षिण अमेरिकेंतील खुद्द रहिवाशांच्या तऱ्हतऱ्हेच्या जाती आहेत, त्या रीतिभातीनें व शरिरानें एकमेकापासून फारच भिन्न आहेत. पुरातनकाळीं पिरू एथील लोक निदान पुष्कळ प्रकारें सुधारलेले होते; ते शहरांत राहत असत, त्यांचा नियमित राज्यकारभार असे, व त्यांस उपजीविकेच्या पुष्कळ कळा माहित होत्या. आतां ते स्प्यानियर्ड लोकांच्या अमलांत आहेत. त्यांस येशूच्या धर्माकडे वळविलें आहे.

परंतु ते शोकार्हरितीचे अज्ञानी आहेत व त्यांचा देश स्प्यानियर्ड लोकांनीं जिंकला त्यावेळेपासून त्यांची पुष्कळ संख्या कमी झाली.

दक्षिण अमेरिकेचे खालचे भाग निरनिराळ्या जातीच्या लोकांनीं वसविले आहेत. जसजसे आपण उंच अक्षांशाकडे जाऊं तसतसे आपणास बहुतकरून असें अढळेल कीं, त्या अधिकाधिक रानटी आहेत. ह्या जातींतील फारच मोठी प्याट्यागोनियन् लोकांची जात होय, व तिजमध्यें फार उंच व मोठ्या हाडाचेलोक आहेत, (असें कीं प्रवासी लोक त्यांस राक्षसह्मणत ) ते शरिरांनीं अगदीं कुरूप असून लाल तांबुस वर्णांचे लोक आहेत. ते कांहीं पारध करून व कांहीं वनमूळें खाऊन उदरनिर्वाह करितात. जे थोडे युरोपियन लोकांच्या ठाण्यांमधून पळून जाऊन रानटी बनतात त्यांस प्याट्यागोनियन् लोक धरून माणसाळवितात, व आपणाजवळ ठेवितात; ते त्यांचा पारध करण्यांत उपयोग करितात इतकेंच नाहीं, तर त्यांचें मांस ही बहुधा खातात. प्याट्यागोनियाच्या फारच दक्षिण टोंकापाशीं टेराडेलफ्युगो ह्मणून बेट आहे. तें फार थंड व दुरवस्थ ठिकाण रानटी लोकांच्या एका टोळीनें वसविलें आहे, ते शरिरानें आकटोविकट आहेत व इतके नीच पदास आलेले आहेत कीं, ते त्यांच्या राहण्याच्या रीतिभातीमध्यें न्युहॉलंड एथील लोकांपेक्षां ही नीच आहेत असें सांगतात.

# भाग दुसरा.

## ल्यानाझ, किंवा दक्षिण अमेरिकेंतील मैदानें.

ह्या सकलकुरणाच्या जमिनीच्या एक सारख्या स्वरूपांमध्यें भयंकर परंतु दुःकारक व उदासीन असें कांहीं आहे. प्रत्येक वस्तू गतीवांचून दिसत. एकादें लहान ढग वरून जात असतां भूपृष्ठावर क्वचितूच छाया पाडतें. आह्मांसभोंवतील सर्व मैदानें आकाशाकडे वर जातआहेत असें दिसे, व तें मोठें व अघोर रान सागराप्रमाणें समुद्रांतील वनस्पतींनीं वेष्टिलें आहें असें दिसूं लागलें. वातावरणांत वाफेचें भिन्नमान व हवेच्या थरांचे निरनिराळें उष्णमान ह्यांवरून क्षितिज कांहीं भागीं स्वच्छ व साफ होतें; दुसऱ्या भागीं उंच नीच, नागमोडी, व जणूं काय पट्या काढलेले होतें. तेथें जमिनीचा आकाशाबरोबर गोंधळ पडे. सुकेंधुकें व वाफेचे थर यांमधून पुष्कळ अंतरावर ताडाच्या झाडांचे सोट ओळखूं येत. त्यांची पालवी व हिरवे शेंडे कापल्याप्रमाणें हे सोट क्षितिजाजवळ तारवांचे डोल जसे दिसूं लागतात त्याप्रमाणे दिसत.

दक्षिण अमेरिकेंतील ल्यानॉझ व पांपझ खरोखर सकल कुरणाच्या जमीनी आहेत. पावसाळ्यामध्यें त्या सुंदर हिरवा टवटवीतपणा दर्शवितात, परंतु मोठ्या अवर्षणाच्यावेळीं रानाचें स्वरूप धारण करितात. त्यावेळीं चारी-

ची धूळ होऊन जाते, जमीन फुटूं लागते, व वसंत-ऋतूच्या पहिल्या सरीनें त्यांस फार दिवसाच्या अ-तिनिद्रेपासून उठवीपर्यंत सुक्या मातींत सुसर व मोठाले सर्प गाडलेले असतात. जेथें जेथें त्या मैदानांवरून नद्या गेल्या नाहींत अशा नापिक ५० किंवा ६० लीग ( दीड कोस ) लांब प्रदेशावर हे अद्भुत चमत्का-र दिसूं लागतात; कारण लहान नद्यांचे बाजूंस व सां-टलेल्या पाण्याच्या लहान टांक्यासभोंवती प्रवाशास मोठ्या अवर्षणाच्यावेळीं देखील नियमित अंतरावर मो-रिशिया नामें एका प्रकारच्या ताडाच्या जातीच्या झाडां-च्या झाड्या अढळतात; ह्या झाडांचीं पानें पंख्याप्रमा-णें पसरतात व तीं तेजस्वी हिरवीं टवटवीत असतात.

दक्षिण अमेरिकेंतील मैदानें किंवा कुरणें ह्यांचें मुख्य लक्षण टेंकडयाची व उंच सखलपणाची अगदीं वा-ण होय—ह्मणजे एथील जमीनीचा प्रत्येक भाग अगदीं सपाट आसतो. ह्मणून स्पानिश जिंकणारे कोरोपासून अपुरच्या किनाऱ्यांपर्यंत प्रथम गेले तेव्हां त्यांनीं त्यां-स रानें, कांप, किंवा कुरणें, असीं नांवें दिलीं नाहींत, परंतु मैदानें, ल्यानॉझ ह्मटलें. तेथें बहुधा तीस चौ-सर लीगांच्या असमंतात एक फुट उंच असा उंचवटा नाहीं. जेथें कापांत निखालस ताडांचीं झाडें नाहींत व जेथून किनाऱ्यावरील व ओरिनोकोचे पर्वत इतके दूर आहेत कीं ते दिसतही नाहींत, अशा ठिकाणींही समुद्र पृष्ठाची साम्यता मनास पराकाष्ठेचीच लागते. जर जमिनीचें क्षितिज वक्र गतीच्या निरनिराळया प्रका-शावरून नेहमीं धुक्याचें नसतें तर तेथें एकाद्या पुरुषा-

स सूर्य यंत्रानें सूर्याची उंची काढण्यास मोह प्राप्त झाला असतां.

हंबोल्डटकृत

ओरिनोकोच्या रचनेविषयीं दुसरा एक प्रवासी खालीं लिहिल्याप्रमाणें वर्णन करितो.

जर आह्मास पायमार्गानें किंवा समुद्रांतून निरनिराळ्या प्राण्यांजवळ गेल्यानें आश्चर्य, आनंद, व भीति उत्पन्न झाली; व जर ओरिनोकोच्या वर जाऊन तेथील पक्ष्यांचे सुंदर पिसाऱ्यांकडे आह्मी आश्चर्यानें पाहूं लागलों तर, जेव्हां जाणुं काय जें कांहीं आह्मी पूर्वीं पाहिलें होतें किंवा कल्पिलें होतें त्यापेक्षां शंभर पट अनुमानानें आपूर वरील लोक वाढतां पाहिलें तेव्हां आह्मास किती चमत्कार, आश्चर्य, व भय व त्या सहवर्तमान कांहीं सुख देखील व्हावें१ जर माझे सर्व मित्र माझ्या खरेपणा विषयीं साक्ष न देते तर जें मी पाहिलें किंवा ऐकिलें त्याविषयीं वर्णन करण्यास भ्यालों असतों. चौदा किंवा सोळा फुट लांब सुसर नदीच्या किनाऱ्या जवळ, सहा किंवा आठ मिळून, चारीवर उन्हांत बसले होते; प्रत्येकक्षणीं दुसरे नदींतून वाहत जातांना दिसत, त्यांतून बहुतेकांस लोकांनी होडीच्या वल्यांनीं मारिलें होतें, व दुसऱ्यांस बंदुका किंवा पिस्तुलें यांनी उघड घायाळ केलें होते, परंतु कोणासही फार इजा पोंहचली नव्हती. रेतीवर फारच मोठमोठाले वाघ व त्यांपेक्षां फारच मोठीं औंस जनावरें दृष्टीस पडत. हें जनावर सिंह असें त्या लोकांस वाटलें परंतु तो बहुतकरून एका प्रकारचा खर-

ड्यावाघ असवा कारण या प्रदेशीं जंगलाचा राजा प्रसिद्ध नाहीं.

नदीच्या एका बाजूहून दुसऱ्या बाजूस उडणारे व आमच्या डोक्यांवरून घिरट्या घालणारे पक्ष्यांचे थवे बहुधा इतके पुष्कळ होते कीं ते मोजतां येईनात व कितीएक कळप इतके मोठे होते कीं त्यांच्या जाण्यानें आमच्या पासून सूर्याचीं किरणें अगदीं झांकून टाकीत, नदीचे किनारे समुद्रांतील व ध्रुवाकडील पक्ष्यांनी मढविले होते, त्या सर्वांनी, जाणूं काय माणसाच्या येण्यास किंवा त्याच्या पराक्रमास न जाणतां, आह्मास न भितां पाहूं व जाऊं दिलें. ते मोठ्या पाणकोळ्यापासून पिंगळ्याच्या लहान जातीपर्यंत होते. एथें फल्यामिंगोपक्षी आपल्या सर्व डवदारींत व डौलांत दिसला. क्रौनक्रेन हा पक्षीही दृष्टीस पडला, व जरी तो आकारांत व दिसण्यांत फार शोभायमान् होता तरी तो पिंगळ्याच्याच जातीचा होय, त्यास मी दक्षिण अमेरिकेंत वारंवार पाहत असे व तेथें त्यास चिटनीस असें ह्मणतात. निरंतर एकामागून एक पक्षी, जनावरें, वनस्थल चारी प्राणी, मासे, व उरःसर दृष्टीस पडल्यामुळें शेवटीं नजरही व्याकूळ झाली व मनास आश्चर्य होईनासें झालें. ह्या घोर रानांतील राहणाऱ्या वेडावणाऱ्या पक्ष्यानें आपल्या उच्चार करण्याच्या शक्तीचा व दोन चार वर्ण उच्चार करण्याच्या योग्यतेचा फारच मनास लागण्याजोगा दाखला दिला व ज्या सर्वांनी त्यास इतक्या स्पष्ट रितीनें आवाज उच्चार करितां ऐकिलें ते आश्चर्य मानूं लागले. पोपटाच्या कोणत्याही जा-

तीविषयीं मी फार आवड धरित नाहीं; कारण मनुष्याच्या स्वरानें ते शब्द उच्चारले किंवा नाहीं असा संशय उत्पन्न व्हावा असें मी त्यांतून एकास ही शब्द स्पष्ट रितीनें उच्चार करितां ऐकिलें नाहीं.

आपूर वर चढल्यावर नेहमींप्रमाणें आमचे लोक आपलें रात्रीचें भोजन करण्यास व दुसऱ्या दिवशीं फडश्या करण्याकरितां अन्न तयार करण्यास उतरले होते. अंमलदार व इतर लोकांनी ती सर्व रात्र किनाऱ्यावर लोटली. ज्या चोपाळ्यावर मी निजलों होतों तो जमिनीपासून कांहीं उंचीवर दोन मोठ्या झाडांमध्यें व विस्तवाच्या बाजूस टांगिला होता. दिवसा उजेडीं जेव्हां मी उठलों तेव्हां एका अंमलदाराबरोबर बोलण्याचें प्रयोजन पडल्यावरून तो मजजवळ न दिसल्यामुळें त्याच्या नांवानें मी मोठ्यानें हाक मारिली. मी त्यास पुनः हाक मारिली तेव्हां तो आपल्या होडीकडे गेला आहे असें कोणी मला सांगितलें. थोडक्याच पळांनंतर मी आपल्याच आवाजासारखा "डेनीस, डेनीस, डेनीस, याप्रमाणें तितकाच मोठ्यानें आवाज ऐकिला व त्यामधून मधून चालीप्रमाणें विराम ही होता. ही हाक क्यापटन डेनीस यास स्पष्ट ऐकू गेली व त्याला ती माझी असें वाटून त्यानें, मी तावडतोब येतों असा जबाब दिला; व निरंतर हाकावरून त्याला वाटलें कीं माझें काम फार निकडीचें असावें ह्मणून तो तावडतोब आला. ज्या कितीएक बिन अखत्यारी अमलदारांनीही ही हाक ऐकिली त्यांनी दुसऱ्यांस क्यापटन डेनिसास तो निरोप पोंहचविण्यास सांगितलें, का-

रण करनल साहेबांस त्याची गरज होती. शेवटीं आमचे डोळे व कान एका ठिकाणीं लागले त्या ठिकाणीं आह्मास असें दिसून आलें कीं, माझा कार्य कर्ता, लक्षपूर्वक, व हाका मारणारा मित्र पक्षिरूपी मजजवळ एका लहान झाडाच्या वरच्या डहाळीवर बसलेला आहे, तेथून त्याणें लवकरच उड्डाण घेऊन तें सर्व रान डेनिस या नांवानें दणाणिवलें.

हिपिसलीची गोष्ट

# पाठ अठ्ठाविसावा.

## गायना.

दक्षिण अमेरिकेंत ब्रिटिश लोकांची संस्थानें आहेत असा काय तो गायना देश मात्र होय. जो देश अमेझॉन् नदीच्या मुखापासून ओरिनोकोच्या मुखापर्यंत विस्तृत आहे त्यास हें नांव दिलें आहे. त्याचे राज्य संबंधानें, इंग्लिश, फ्रेंच, पोर्टुगीझ व डच संस्थानें असे विभाग केले आहेत, परंतु त्याचे स्वतः सिद्ध भाग होत, ते येणेंप्रमाणें–किनारा, रानें, व मागील देश, मागील देश ह्मणजे अमेझॉन् नदी व समुद्र यांमध्यें जी उंच जमीन ती असें समजावें.

गायना देश दरसाल पूर येण्यास पात्र आहे, तेणेंकरून तो फार रोगोत्पादक होतो. मोठ्या पावसांनी नद्या फुगून किनाऱ्यांवरून वाहतात; मग झाडें, झाड्या, व फुलें पाण्याच्या पृष्ठावर तरंगत आहेत असीं दिसतात, व रानटीं जनावरांस उंच जागीं पळून

जाणें किंवा झाडांत छाया शोधणें जरुर होतें. समुद्र किनारा अगदीं सपाट असून चिखलट आहे, परंतु जेथील दाट रानें कापून टाकिलीं आहेत तेथील हवा कांहीं कमी दमसर व रोगोत्पादक झाली आहे. पारामारिबो नामें डच लोकांचें शहर स्युरिनाम नदीवर असून गायनामध्यें एक फारच आबादान ठाणें आहे. रस्त्याच्या बाजूंनी नारिंगें व लिंबें ह्यांचीं झाडें असून तीं एकाच वेळीं फळांनी व फुलांनी भरलेलीं असतात, ह्यामुळें त्या शहराचा सुंदर देखावा असतो. ज्या थोडक्या प्रवाशांनी गायना देशांतील हीं दाट रानें शोधून काढलीं ते त्यांत जीं निरनिराळीं झाडें व जनावरें आहेत त्यांविषयीं आनंदकारक वर्णन करितात. ह्या रानांमध्यें बहुधा ज्या वनस्पती सांपडतात त्यांपासून पुष्कळ मोलवान् औषधें उत्पन्न होतात. फुलें विशेषेंकरून वेली अतिशय सौंदर्याच्या असतात, त्या वेली एक झाडावरून दुसऱ्या झाडावर माळांप्रमाणें लांबून प्रत्येक निरनिराळ्या रंगाचे फुलांनी भरल्या असतात. झाडांप्रमाणेंच गायना एथील पक्षी चमत्कारिक व सुंदर आहेत. असें असतां, हमिंग पक्ष्या (टिटवा ) शीं दुसऱ्या कोणत्याही पक्ष्याची तुलना करितां यावयाची नाहीं. त्याच्या पुष्कळ जाती आहेत, कितीएक इतके लहान असतात कीं, गरीब बिचाऱ्या माशांपेक्षां क्वचित्च मोठे होतील. ह्या लहान प्राण्यांचे समुदाय मोठ्या सकाळीं एका फुलावरुन दुसऱ्या फुलावर उडून ज्या किड्यांवर ते निर्वाह करितात ते पकडतानां दिसतात, व त्यांचा पिसारा इतका तेजस्वी

असतो कीं त्याजकडे पाहिलें असतां बहुतकरून डोळे दिपतात.

गायना एथील चतुष्पदें पक्ष्यांप्रमाणें फार मनोरंजक नाहींत. त्यांतून मोठें भयंकर जागर हें आहे, हें जनांवर खरड्यावाघाप्रमाणेंच बहुधा दिसतें. रान डुकर किंवा रानटी डुकर ह्यांचे एकदांच कधीं कधीं ३०० किंवा ४०० चे कळप अढळतात. तेथें हरणांच्या पुष्कळ जाती व माकडाच्या पुष्कळ तऱ्हा आहेत. गायना एथील रानांत पुष्कळ विषकारक सर्प व किडे आहेत, ते तेथील लोकांस रानटी जनांवरांपेक्षां अधिक त्रासास कारण आहेत कारण कीं, त्यांस प्रतिबंध करणें फार अवघड पडतें. हीं रानें इंडियन् लोकांच्या निरनिराळ्या जातींनी वसविलीं आहेत. ताडाच्या झापाच्या थोड्या झोपड्यांच्या लहान खेड्यांत ते राहतात, मग ते आपल्या झोंपड्यांसभोंवतील एक दोन बिघे झाडें कापून टाकितात. व मग आपल्यास फार उपयोगी अशा वनस्पती व फळ झाडें लावितात. ते कांहीं अशीं पारध करून उपजीविका करितात व आपल्या तीरकमठ्यानी व् एका शस्त्रास ब्लोपैप ( फुंकण्याची नळी ह्मणतात ) तिणेंही नेम मारण्यांत कुशळ आहेत. ह्या शस्त्राचा ते पक्ष्यांस मारण्यास उपयोग करितात; तें पोकळ बोरूचें केलें असतें, त्याची लांबी कधीं कधीं दहा बारा फुटी असते, नउ दहा इंचाइतका लांब तीर त्याच्या टोंकांस विष लावून ह्या नळींत घालतात. मग तो इंडियन् दुसऱ्या टोंकास तोंड लावून एका फुंकाऱ्याने फार उंच झाडावरून

देखील पक्षी खालीं आणण्यास क्वचितूच चुकेल अशा रीतीनें तीर उडवितो. ज्या विषांत ते इंडियन् आपले तीर बुडवितात तें इतकें कडक असतें कीं त्याचा अगदीं थोडा भाग थोड्या वेळांत मरण्यास कारण भूत होतो. त्यांतील एक मुख्य जिन्नस वनस्पती आहे त्यावरून त्याला वाराली ह्मणतात. तरी ह्या रीतिनें मारलेल्या प्राण्यांचें मांस चांगलें असतें.

# पाठ एकुणतिसावा.

## न्यूहालंड.

ऑस्ट्रेलिया किंवा न्यूहालन्ड ह्मणून दक्षिण प्यासिफिक व हिंदीमहासागर यांमध्यें जें मोठें बेट आहे तो पृथ्वीवर एक फारच चमत्कारिक देश आहे. त्याच्या सभोंवती उभ्या डोंगरांची रांग आहे, ते डोंगर किनाऱ्या सभोंवते, कोठें कोठें अगदीं सागरानजीक, व कोठें कोठें त्यापासून बऱ्याच अंतरावर, आहेत. पूर्व किनाऱ्यावर न्यूसौथ वेल्साचा प्रदेश आहे त्या खेरिज ह्या डोंगरांच्या पलीकडचा आंतील देश बहुतकरून अगदीं ठाऊक झाला नाहीं.

आस्ट्रेलियाचे जे भाग आपणास ठाऊक झाले आहेत त्यांतील हवा फार चांगली, सौम्य व समशीतोष्ण आहे. हें बेट दक्षिण अर्ध गोलांत आहे ह्मणून अलबत तेथील ऋतु आपल्या ऋतु विरुद्ध आहेत. डिसेंबर, ज्यान्युआरी, व फेब्रुआरी हे तेथील उन्हाचे महिने होत; तेव्हां हवा फार उष्ण असते, व फळें व

धान्यें पिकतात. ज्युलई हा तेथील हिंवाळ्याचा मध्य भाग आहे, तथापि हवा कधीं फार थंड नसते, व बहुतेक भागांत किंबहुना बर्फ विरळा असतें. तेथील पावसाळा तो आपला वसंतऋतु व वसंतऋतु तो पावसाळा होय.

परंतु ह्या देशाविषयीं ज्या विलक्षण गोष्टी सांगतां येतील त्यांस पार नाहीं. ज्या कारणामुळें आपल्या ऋतुविरुद्ध तेथील ऋतु होतात त्याच कारणानें उत्तरवायू उष्ण व दक्षिण वायू थंड असतो; जसा पूर्व वायू आपणास तसाच पश्चिमवायू तेथील लोकांस रोगोत्पादक आहे.

खुद्द ऑस्ट्रेलियामधील बहुतेक झाडें सर्वदा हिरवीं असतात. त्यांचीं पानें बहुधा देंटावर किनारीनें वाढतात व त्यांस वरची किंवा खालची बाजू नसते. आपले ठाणेदार लोक एका जातीच्या झाडास चारीचें झाड ह्मणतात त्याला चारीसारखीं पानें येतात. दुसऱ्या एका झाडास अगदीं निवडुंगाप्रमाणें फळ बाजतें, परंतु जर प्रवासी तें चाखूं जाईल तर त्याला आपली चूक समजून येईल, कारण कीं तें फळ लांकडाप्रमाणें टणक आहे. चेरी फळाप्रमाणें एक फळ आहे, त्यास बाहेरून आठळी असतें; हें खाण्याजोगें असून त्याचा स्वाद पचपचीत काळ्याद्राक्षाप्रमाणें आहे. परंतु ऑस्ट्रेलिया एथील खुद्द उत्पन्न झालेलीं फळें व झाडें किंवा मुळें ह्यांमधून फारच थोडीं खाण्याजोगीं आहेत; ह्यांतून मुख्य एका प्रकारचें जमिनींतील फळ, नेच्या झाडाचें मूळ, व न्यूहॉलंड एथील गुलछडीचा

देंटहीं होत. गुलछडीच्या झाडाला सुंदर लालफुलें ये. तात. असें असतां, एथील जमीन फार फळद्रूप आहे, व युरोपखंडांतील सर्व प्रकारच्या फळझाडांस व इतर वनस्पतींस लागू पडते. हीं झाडें एथील वसाहतींतील लोक पुष्कळ लावितात.

सृष्टीच्या इतर भागांतील प्राणी व वनस्पती यां. पासून न्यूहॉलंडांतील प्राणी व वनस्पती फारच भिन्न आहेत. एथील कितीएक चतुष्पदें दोन पायांवर चाल. तात; व दुसऱ्यांस पक्ष्यांची चोंच असते. या देशांत का. ळे राजहंस क्वचित् आहेत असें नाहींत; आणि फारच विलक्षण हें कीं एथील कुतरे भुंकत नाहींत; व मधमाशा आंकड्यावांचून आहेत. परंतु नवीन ठाणेंकर लोकांस जें जनांवर फार चमत्कारिक वाटतें तें कंगारो होय, तें आपल्या तंगड्यांवर नेहमी उभें राहतें, आणि जे. व्हां त्यास जलदीनें जावें असें वाटतें तेव्हां तें चालत किंवा धांवत नाहीं, परंतु मोठ्या चपळाईनें एकसारखें उड्या मारित जातें. ह्या जनांवराच्या तीस, चाळीस जाती आहेत; त्यांतून कितीएक मोठ्या व मजबूत आहे. त, आणि इतर बहुतेक फार मोठ्या नाहींत. त्यांचें मांस व कातडें प्राप्त व्हावें ह्याकरितां एथील ठाणेंकरी लोक त्यां. ची पारध करितात. ह्या जनावरांस मार्सूपियल किंवा पिशवीदार असें ह्मणतात, कारण ह्या जनांवराच्या स्त्री जातीस पोटाखालीं पिशवी असते, व जेव्हां तिचीं पि. लें थकून जातात, किंवा घाबरतात तेव्हां तीं ह्या पि. शवींत बहुतकरून शिरतात. ऑस्ट्रेलियामधील खनि.

ज उत्पन्नाविषयीं अजून फार थोडी माहिती झाली आहे, परंतु एथें तांब्याच्या मोलवान् खाणी आहेत, व सन १८५१ वर्नांत सोन्याच्या चांगल्या समृद्धिमान खाणी शोधून काढल्या होत्या; अजूनपर्यंत त्या सोन्याच्या खाणींत मोठ्या हुशारीनें काम चाललें असतें.

न्यूहॉलन्डच्या पूर्व किनाऱ्यावर न्यूसौथवेल्स ह्मणून एक इंग्लिश वसाहत आहे, त्याची राजधानी सिड्नी, हें शहर पोर्ट ज्याक्सन्च्या बंदराच्या किनाऱ्यावरील उतरट टेंकडीवर आहे.

पूर्वीं न्यूसौथवेल्स पारिपत्याविषयींची वसाहत होती — पारिपत्याविषयीं वसाहत ह्मणजे ज्या लोकांनी ग्रेटब्रिटन् व ऐयर्लंडमध्यें अपराध केलेला असतो त्यांस शिक्षेप्रमाणें अमुक वेळपर्यंत किंवा जन्मभर रवाना करितात, त्यांचीही वसाहात होय. ह्या अपराधी लोकांस त्यांच्या टोळ्यां किंवा समुदाय करून व त्यांजवर पहारेकरी ठेऊन काम करावयास लावितात, किंवा निरनिराळ्या धन्यांस त्यांस चाकराप्रमाणें वाटून देतात. ह्या प्रसंगीं त्यांस फार दुःखें भोगावीं लागतात, परंतु नेमल्या वेळानंतर बहुधा त्यांस मोकळें सोडितात, व मग, जर ते चांगल्या रितीनें वर्तले व उद्योगी व व्यवसायी असले, तर ते कधीं कधीं श्रीमंत होतात, व इतर ठाणेंदार लोकांप्रमाणें राहतात.

खचित अपराधी लोकांच्या वसाहतींत राहणें चांगली गोष्ट नाहीं, परंतु आतां न्यूसौथवेल्समध्यें अपराधी लोकांस पाठवित नाहींत, व फार नूतन ब.

नावलेल्या पोर्ट फिलिप किंवा व्हिक्टोरिया, दक्षिण-ऑस्ट्रेलिया, आणि पश्चिमऑस्ट्रेलिया किंवा स्वानरिव्हर इत्यादि दक्षिण व पश्चिम किनाऱ्यांवरील वसाहतींत अपराधी लोकांस कधींही पाठवित नसत. ह्या रूपास यावयाजोग्या व पूर्वीच अबादान अशा वसाहतींकडे युरोपखंडाच्या सर्व भागांतील व विशेषेंकरून ग्रेटब्रिटन व ऐर्लन्ड एथील साहसी व अभ्युदार पुष्कळ परदेशास गेलेल्या लोकांचें लक्ष लागलें आहे. व जर तुह्मी या ठाण्यांपैकीं कोणत्याही ठाण्यास आपल्या आईबापांसहवर्तमान जाल, तर तेथें आपल्याचप्रमाणें चांगल्या शाळा अढळतील; व खरोखर जीं पुस्तकें तुह्मी आतां वाचतां तींच त्यांमध्यें शिकवितात; कारण पुष्कळ ऐरिश न्याशनल स्कूल पुस्तकें नव्या वसाहतींतील अधिकारी व त्यांजबरोबर लोक शिक्षण वाढविण्यास जे सर्व प्रतीचे धर्मोपदेशक उद्योग करितात ते, मागवीत असतात. व सिडनी, मेलबोर्न, आडलेड व दुसऱ्या मोठमोठाल्या शहरांत ठाणेकऱ्यांतील उंच प्रतीच्या लोकांच्या मुलांस शिकविण्याकरितां सर्वोत्कृष्ट शाळा व विद्यालयें आहेत. ह्मणून आपण अशी अपेक्षा धरावी कीं सुधारणूक व खिस्ती धर्म थोडया दिवसांनी ह्या प्रचंड देशाच्या किनाऱ्यासभोंवता होईल इतकेंच नाहीं तर ह्या देशाच्या अगदीं मध्यभागीं ही होईल.

ऑस्ट्रेलिया एथील लोक काळे किंवा तांबूस रंगाचे आहेत व त्यांचे केंस सरळ असून ते स्वरूपानें फार कुरूप आहेत. ते सृष्टींमध्यें फारच नीच आणि

रानटी लोक आहेत. ते आपोझम जनांवराच्या कातड्याच्या झग्यावांचून दुसरे कपडे घालित नाहींत. ते तो झगा थंड किंवा ओलसर हवेंत खांद्यावरून टाकून गळ्यासभोंवती बांधितात. ते नाकांत छिद्र पाडून त्यांत हाडाचा तुकडा चिकटावितात व आंग पांढऱ्या मातीच्या रेघांनीं रंगवितात. ते झाडांच्या सालीच्या आबड धोबड झोंपड्या बांधून त्यांत निजतात. व ते एका ठिकाणीं फारवेळ राहत नाहींत, परंतु मंडळीनें एकत्र भटकत असतात व त्यांस जेथें अन्न सांपडेल तेथें राहतात. त्यांस जमिनीची लागवड करण्याची किंवा कोणत्याही प्रकारचें माणसाळलेले जनांवर बाळगण्याची कल्पना नाहीं; परंतु ते जे रानटी पशु व पक्षी धरितात, किंवा त्या देशांत जीं थोडीं कंदमुळें उत्पन्न होतात, त्यांवर निर्वाह करितात. हीं मुळें तेथील बायका टोंकदार काठीनें जमिनींतून खणून काढितात.

त्यांच्या निरनिराळ्या जाती आहेत व ह्या जाती एकमेकांशीं नेहमीं लढत असतात. त्यांचीं शस्त्रें तीक्ष्ण लांकडी भाले व एक वाटोळा लांकडाचा तुकडा ज्यास ते बोमऱ्यांग ह्मणतात हीं होत. हा लांकडाचा तुकडा अर्ध वर्तुळाप्रमाणें उडून नंतर मोठ्या वेगानें गोंगावून परत येतो. बहुतेक रानटी लोकांप्रमाणें ते लढाईच्या प्रसंगीं फार क्रूर व उग्र असतात; व त्यांस चोरी करण्याची फार चटक लागली आहे. दुसऱ्या रानटी लोकांप्रमाणेंच त्यांजमध्यें मोठा व अयुक्तिक देव भोळेपणा आहे, व ह्या जातींपैकीं बहु-

तेक जरी नाहींत तरी बऱ्याच नरभक्षक किंवा मानवी प्राण्यांचे मांस भक्षक होत.

ह्या प्रकारची रानटी लोकांची स्थिती असते. मन व रीतिभाती यांमध्यें ते मनुष्यांपेक्षां बहुतकरून पशुप्रमाणेंच आहेत; उग्र, दांडगे, घातकी, आपल्या शत्रुच्या हल्ल्यापासून कधीं ही क्षणभर निर्भय नसतात, व अन्न न मिळाल्यामुळें बहुतकरून अर्धपोटीं उपाशी असतात; आणि त्यांचें सौख्य काय तें खाणें पिणें, व आपल्यालोकांस लुटणें व मारणें हें होय. आतां आपल्या युरोपियनांतून कोणा एकामध्यें व ह्या रानटी लोकांमध्यें कशानें अंतर पडतें? उघड, शिक्षण हेंच कारण. तुह्मी लहान असतां तुह्मांतून एकाद्यास न्यूहॉलन्डाच्या किनाऱ्यावर एकटेंच ठेविलें असतें व त्या रानटी लोकांच्या जातींत वाढविलें असतें तर त्यांतीलच एकाप्रमाणें तुह्मी झालां असतां. तुह्मांस ईश्वरानें ख्रिस्ती देशांत घातलें आहे व सुशिक्षणाचा व ज्या ख्रिस्ती धर्माविषयीं अजून पुष्कळ लोक अज्ञानी आहेत त्याच्या उजेडाचा लाभ प्राप्त करून दिला आहे ह्यासाठीं तर तुह्मांस किती उपकार मानिला पाहिजे !

न्यूहॉलन्डाच्या नैर्ऋत्येस व्हांडिमेन्स् लांड नामें बेट फार सुंदर देश असून मुख्य जमिनीप्रमाणेंच एथील हवा व जमीन आहे. ती अजून पारिपत्याविषयींची वसाहत आहे; परंतु आतां फार वाईट प्रकारचे अपराधी लोकांस नॉर्फोक बेटास रवाना करितात, हें बेट मुख्य जमिनीपासून सुमारें (९००) नऊशें मैलांवर बहुत करून सिड्निच्या समोर आहे.

# पाठ तिसावा.

## न्यूझीलन्ड.

मागील थोडक्या वर्षांमध्यें ब्रिटिश लोकांनी वसाहत केली अशी न्यूझीलंड दुसरी जागा आहे. दक्षिण प्यासिफिक् सागरांत, सुमारें १२०० मैलांवर न्यूसौथवेलसपासून जीं दोन बेटें आहेत तीं न्यूझीलन्ड होत, व तीं दोन्ही मिळून बहुतकरून ग्रेट ब्रिटन इतकींच मोठीं आहेत. सर्व दक्षिण व उत्तर बेटाचा बहुतेक भाग उंच पर्वतांच्यारांगा, ज्यांच्या शिखरावर निरंतर बर्फ व बाजू आरण्यांनी व्याप्त असतात त्यांतून गेल्या आहेत. ह्या देशामध्यें नद्या व ओहोळ बरेच असल्यामुळें भरपूर पाणी आहे, व त्यांतील कितीएक भाग फार फळद्रूप आहेत. एथील हवा सौम्य असून फारच निरोगी आहे. ब्रिटिश लोकांचीं ठाणीं मुख्यत्वेंकरून किनाऱ्यावर आहेत.

या देशांतील लोक उंच व सुरेख देखणेअसून त्यांचा वर्ण काळा किंवा पिवळट रंगाचा आहे. न्युहॉलन्ड एथील लोकांपेक्षां हे फार कमी रानटी आहेत, कारण हे अनाडी रितीनें तरी जमिनीची लागवड करितात. त्यांच्याजवळ पावडीं नसतात, परंतु ते लांकडी काठ्यांनी जमिनींत खळगे पाडून आपल्या हातांनी माती खरवडून काढितात. ते न्यूहॉलंड ए-

थील लोकांप्रमाणें भटकणारे नाहींत, कारण तेथें रान-टी जनावरें नसल्यावरून त्यांच्यानें आपला निर्वाह पारध करून करववत नाहीं. ह्मणून ते साध्या भो-ळ्या झोंपड्यांमध्यें एका ठिकाणीं राहतात. त्यांचा पोशाक हातरी किंवा लहान बंडी व वरचा झगा असा असतो, तो झगा एका जातीच्या झाडास न्यूझीलंडांतील ताग ह्मणतात, व जो ह्या बेटांत मात्र सांपडतो त्याचा केलेला असतो. ते ह्या तागाची मासे धरण्याचीं जाळीं, दोर इत्यादि देखील करितात. ते सर्व आपलीं शरीरें नीटनेटकीं (नटवितात) करितात, ह्मणजे कोळश्यांत किंवा एका वनस्पतीच्या रसांत हाड किंवा तीक्ष्णटोंक जें त्वचेस भेदितें तें बुडवून तेणेंकरून रेषा, किंवा नमुने काढितात. ही फार दुःखकारक रिती आहे; त्वचा बरीहोण्यास फार वेळ लागतो, व ज्या खुणा होतात त्या कधीं निघून जात नाहींत.

न्यूझीलंड एथील लोकांस लढणें प्रिय आहे, व लढाईमध्यें ते इतके क्रूर होतात कीं ज्यांस ते लढाईत बंदिवान करितात त्यांचें मांस खरोखर खातात.

या बेटांच्या निरनिराळ्या भागीं ब्रिटिश लोकांनी पुष्कळ भिन्न भिन्न ठाणीं केलीं आहेत. त्यांतून ऑकूलंड नामें शहराजवळील मुख्य होय.

# पृथ्वीपर्यटन.

## आर्या

आद्यंतशून्यतेच्या, चिन्हाजलधेनअंतआदितुला ॥
त्वत्तीरपारजाया, नलगेदोन्यावल्हीशिडेंमजला ॥ १ ॥
तुजवरुनीमन्मनहें, सोत्कंठस्वेच्छपवनसेंवाहे ॥
ध्रुवनिकटहोतिशांता, लाटातेथुनिमनानिघनराहे ॥ २ ॥
शीतळहरितद्वीपीं, हिममयपाषाणसर्वदापाहे ॥
मातेलास्वापत्य, प्रियअसतेंजेंवितेंविजनपदहे ॥ ३ ॥
तदनंतरएकांतीं, ल्याब्रेडरमध्यपतितबर्फांचा ॥
ध्वनिऐकूंदेमजला, यत्पतनेंनाशहोयवस्तूंचा ॥ ४ ॥
परियाहुनिप्रकाशित, देखावावनसरोवरेंआहे ॥
क्यानेडाचात्याप्रति, त्यजुनिमदात्मानिघेचलवलाहे ॥ ५
जेथेंआमचेपूर्वज, एकेवेळींस्वतंत्रहोतेती ॥
नष्टस्वतंत्रताभू न्यूइंग्लंडातुलाअसोप्रणती ॥ ६
लवसरिदुदकेंपिकविति, तीक्ष्णेंपेनसिल्वनीयागे ॥
झालायदर्थनकथीं, रक्ताचापातत्यास्थळींमागें ॥ ७ ॥
रक्षसदाशांतीतें, कींहीचसदाअसेतुझीरीती ॥
याहुनिदुसरीवाटे, मान्यजनांसर्वथानचबरीती ॥ ८ ॥
वेस्टंडीजद्वीपें, प्राक्तनहेस्पिरिडिसांपरीदिसतीं ॥
जेथीलवृक्षवल्ली, संजीवककनकफलसहितअसतीं ॥९॥
जरिऐशीनिर्मियलीं, तरिअसतींदग्धईशशापानें ॥
दास्यप्रतोदताडन, बंधननयनांबुपातपापानें ॥ १० ॥

ऐशादुष्कर्मानें, नीचपणप्राप्तहोयलोकांस ।।
येतेंदूषणमहितें, जेणेंतीपात्रहोयशोकास ।। ११ ।।

## ओव्या

यास्तवभयचकितहोउन ।। मेक्सिकाअखातजायतरुन ।।
दासविक्रयलयापावोन ।। गेलाअसेज्यास्थळीं ।। १२ ।।
पुढेदक्षिणअमेरिकेचाविस्तार ।। पर्वतवनेंसरित्तीरेंअपार ।।
नीतिसंपन्नजनउदार ।। ऐशियायोग्यस्थानेंतीं ।। १३ ।।
सज्जनतेथेंनिवासकरिती ।। कृषिकर्मासिदेहलाविती ।।
इंद्रियांतेंसंतुष्टकरिती ।। ग्रहतारापाहोनियां ।। १४
मागेलनसामुद्रधुनी ।। दोनसागरनिघतीजेथुनी ।।
तेथीलचमत्कारपाहुनी ।। परमाल्हादहोतसे ।। १५
विस्तीर्णपासिफिकूसागर ।। सहस्त्रद्वीपेंव्यापीनिरंतर ।।
कैतवआणिबलात्कार ।। निःशकजेथेंनांदती ।। १६ ।।
परिख्रिस्तिधर्मउदयपाउनी ।। निवटिलेअज्ञानालागुनी ।।
ज्ञानाचाप्रकाशकरुनी ।। लोकसुमार्गीलाविले ।। १७ ।।
ठिकठिकाणींकिरणेंसोडुनी ।। पाषाणहृदयांतेंद्रववुनी।।
देतसेअविनाशसुखाचीखाणी।।मनुष्यमात्रांसर्वकाळ।।१८।।
यावरीदक्षिणध्रुवातेंसोडुन ।। जातांवायव्यदिशाक्रमून ।।
उत्तरचंद्रिकाप्रकाशपाहुन ।। संतुष्टमनजाहलों ।। १९ ।।
पुढेसिबिरियारण्येंलागतां ।। पर्वतोर्ध्वभूमिकानानारिती ।।
कामशाटकापाहुनिनिश्चिती ।।नैर्ऋत्येकडेचाललों ।।२०
पाहोनिसमत्सरचीन ।। तैसेंचिआज्ञातजपान ।।
ममानसहोयउद्विग्न ।। कोतेभूतसमुद्रभासती ।। २१ ।।
पाहेनलावितांएकक्षण ।। पूर्वेससायकुदद्वीपगण ।।
फीनिक्सआणिहांलसीयन।।पक्षीअसंख्यज्यामाजीं ।।२२

न्यूहालंडाच्यासमुद्राभीतरीं ॥अनेकभाटीअसतीनिर्धारीं॥
मोठीनदीनसेबेटामाझारीं॥ लोकअज्ञातवसतीतेथें ॥२३॥
परीईश्वरीआज्ञाऐशी ॥ सुधारावेंत्यालोकांसी ॥
स्थापूनिआपुल्यामहत्वासी ॥मानवींपभूसिजिकावें॥२४
उत्तरदक्षिणहिंदुस्थान ॥ गंगाप्रवाहेंविभागदोन ॥
घोरअनर्थाचेंस्थान ॥ जाहलासेदेशहा ॥ २५॥
उद्यमरूपेंयुध्दपातलें ॥ ब्रिटनेंखड्गहातींधरिलें ॥
गांवेंजाळूनिराज्यमिळविलें॥परिहारविलेंकीर्तीसी ॥२६
जातांपारसीकआखातजवळून ॥इराणदिसेंशोभायमान॥
जेथेंगुलाबावरीबुलबुलबसून ॥ मधुरशब्दकरिताती ॥२७
पुढेंअरबस्थानपाहिलें ॥ जेंरम्यसुगंधानेंदाटलें ॥
परीमनमाझेंनविसंवलें ॥ सोडूनितयातेंचालिलों ॥ २८॥
अगेवादळाचेभूशलाके ॥ तुजवरीभूतप्रेतपिशाचनटिके ॥
आकाशदूतउतरलाकौतुकें ॥ तत्स्थानींवसावया ॥ २९॥
सेंटहेलीनाचीबंदिशाळा ॥ समुद्रांतदिसेबहुकराळा ॥
जेथेंमहावीरनिमाला ॥ नेपोलियनबोनापार्ट ॥ ३०॥
पुढेंदिसतीनौकाअमित ॥ वरीलोकअसतीव्याधिपीडित ॥
ज्यांतेंनेतीविक्रयार्थ ॥ धनलोभेंव्यवसायी ॥ ३१॥
आहाहतभाग्यतेगुलाम ॥ मानितेआपुलेभाग्यपरम ॥
जरीओढवतेंत्यांचेंकर्म ॥ मगरमुखींपडावया ॥ ३२॥
हरक्युलिसातवस्तंभदिसती ॥ अहर्निशजेभूजलरक्षिती ॥
समीपचिहिमव्याप्तअसती ॥शिखरेंअटलसनगाचीं॥३३॥
पहाहीनमूराच्यागुहाबहुत ॥ चौर्येंजेउपजीवनकरित ॥
ऐशियाअपवित्रभूमीप्रत ॥सोडूनिसत्वरचलावें ॥ ३४॥
मिश्रदेशाचेंप्राचीनराष्ट्र ॥ बुडवितीनीलेतरपूर ॥
दासहोवोनिनृपतिक्रूर ॥ राज्यतेथेंकरिताती ॥ ३५॥

जूइ्याचींशहरेंझालींउद्वस्त ॥ तैसेंचिलाबनन आणिका-
रमेलपर्वत ॥
झायननगासिधिःकारयुक्त ॥लोकतुडवितीपायानें ॥३६॥
ग्रीसाद्दीपतुझाप्राचीन ॥ मावळलाज्याचेंस्मारकचिन्ह ॥
थडगींअवघींगेलींभंगोन ॥ तुझातूंविशेषअससी ॥ ३७॥
परीतूंपुनःस्वतंत्रहोसी ॥ माहावीरांतेंप्रसवशी ॥
ज्ञानियांतेंठावदेशी ॥कविजनांचीतूंमाये ॥ ३८ ॥
इटलीत्वत्सौंदर्यअनुपम ॥ संध्यारागापरीमनोरम ॥
वदनजैसादुजासोम ॥ परिअससीतूंअधोमुख ॥ ३९ ॥
सावधव्हातुझीरोमननृपती ॥ जरीऐशीइटलीचीस्थिती ॥
तरीरोमनविद्येसहितनिश्चिती ॥शौर्ययेईलतयांचें ॥ ४० ॥
स्पेनातूंफयूडलराज्यजाण ॥ तुजविषयींअसेकथापुराण ॥
होईपुढेरणालागुन ॥ चर्मकुंतासमवेत ॥ ४१ ॥
निघतांतवनेत्राग्निकल्लोळ ॥ उठाउठींधर्मवेडपळेल ॥
क्रूरपणाहीलयपावेल ॥ ऐकतांतुझियाशब्दांतें ॥ ४२ ॥
पोर्टुगलाउन्नतकरोनिमस्तक ॥ केशधूळीझाडीसम्यक ॥
स्वातंत्र्यार्थयुत्धकरीनिःशंक ॥स्वपक्षखराजाणोनी ॥४३॥
फ्रान्सातुझ्याकांठवरूनी ॥ जातोंसत्वरतुजसोडुनी ॥
कींतुझेंपूर्वरूपजाउनी ॥ सर्वहीनूतनदिसेना ॥ ४४॥
हालंडवायुवेगेंक्रमिलें ॥ सर्वेचिडेनमार्कपाहिलें ॥
स्वीडनरशियांमार्गेटाकिले ॥पुढीलदेशपाहावयां ॥४५ ॥
एल्बीकिंवाडीझरसरिता ॥ मन्मनमोहायाअसमर्था ॥
जर्मनीतोदिनलक्ष्मीआतां ॥ जईस्वद्विद्वज्जनश्रेष्ठहोतीं॥४६॥
आतांतुजकडेआलोंधावोनी॥ तूंसकळद्वीपांचामुगुटमणी ॥
स्वसौंदर्येनेत्रनिववुनी ॥ आनंदविशीमनमाझें ॥४७ ॥
भूमंडळीचीदेशपंक्ती ॥ अनुक्रमेंपाहोनिनिश्चिती ॥

पर्यटनसंपवूनिअंती ॥ कृतकृत्यमीजाहलों ॥ ४८ ॥
इछितोंमीसर्वांचेंकल्याण ॥ परीब्रिटनातूंमज्जन्मभुवन ॥
माझियाविश्रांतीचेंस्थान ॥ह्मणोनिमजबहूआवडसी॥४९

मॉंटगॉमरिकृत.

समाप्त.

# सूचना.

ज्या पुस्तकाचें हें भाषांतर आहे त्यांत किती एक कठिण शब्द आहेत त्यांचा हा कोश करून विद्यार्थ्यांस अभ्यास करण्यास स्वल्प पडावें ह्मणून सादर केला आहे. हें किंवा चौथें इंग्रेजी पुस्तक वाचीत असतां ज्या शब्दांचा अर्थ न समजेल तो शब्द त्यांनी या कोशांत काढून पाहवा, ह्मणजे यांत दोहोंपेक्षां अधिक असे बहुत्येक शब्दांचें अर्थ सांगितले आहेत त्यांवरून कळून येईल. हा कोश, क्यांडीसाहेबांनी कोश केला आहे, त्याच्या अधारानें बहुतकरून केला आहे.

# कठिण शब्दांचा कोश.

Acacia ...... बाभूळ
Adamantine .. वज्रासा, वज्रमय, वज्रसदृश
Addict ...... नादीलागणें, छंदासलागणें
Agility ..... चपळाई, आंगसफाई, चापल्य.
Altitude .... उंची, उच्चत्व.
Amber ...... तृणमणि, तैलस्पटिक
Animal Kingdom .... जीवजाति, जीवगण, जीवकोटी.
Armour...... चिलखत, कवच, शिला, पेटी.
Attendant.... हुजऱ्या, अनुगामी; अनुचारी.
Bed-stead .... खाट, खाटलें, बाज, पलंग.
Bitumen .... शिलाजित, दगडफूल.
Bliss ......... सुख, सौख्य, सुखपद.
Bodkin ...... सलई, सुवा, दाभण.
Bog ........ रुपण, दलदल, बावर.
Boot ........ लाभणें, लाहाणें, लाधणें.
Brushwood .. झाडी, झुडप.
Bud ......... पानाचाअंकुर, मुकुल.
Butterfly .... पाकोळी, पतंग, वेचा.
Caitiff ...... गुलाम, गुलामजादा, लुच्चा, हरामी.
Canal ...... कालवा, सारणी, मोठीप्रणाली.
Car ........ रथ, स्यंदन.
Cataract .... घोंत, धोंदा, घोंघाणी.
Cauli-flower .. फूलकोबी.
Cement...... गारा, गिलावा, संधानवस्तू.
Choir........ गाणारांचीमंडली, चुंग, ताफा.

Chorus …… गायनगण.
Circuit …… फेरा, गिरकांडा.
Cleft……… भेग, संधि, भेर खिंड.
Clumps …. झुंड, गुच्छ, बेट, स्तबक.
Coffin …… प्रेताचीसंदुक, शवपेटिका.
Complexion · अंगवर्ण, कांति, वर्ण.
Conflict …… युद्ध, झुंज, लढणें, झोंबीघेणें.
Constitute …. करणें, नेमणें, योजनाकरणें.
Cramp …… आंखडणें, खोडाकरणें.
Crater …… ज्वालामुखीचें तोंड.
Creeping-plant ताणा, वेल, लता.
Crevice …… फट, भेग, चीर, सांध.
Crimped …. कांतलेला, मुरडींव; मुरडलेला.
Crumbly …. पिठूल, फुसफुसीत, भुसभुसीत.
Crystal ….. स्फटिकाश्मा, बिलोर, स्फटिक.
Cuttery …… लोहारकाम, पोलादकाम.
Dairy …… दुपतें किंवा दुभतें.
Damson …. काळें द्राक्ष.
Dependency .. आलंब, आलंबन, अवलंबन.
Deplore …… रडणें, विलाप करणें, शोक करणें.
Descent …… उतरणें, गोत्रोत्पत्ति, वंश.
Desecrated .. भ्रष्ट, बाटवलेला, विटाळलेला.
Detail …… सुविस्तर, बयादवार, तपसीलवार.
Diadem …. मुकुट, मुगूट.
Dialect …… भाषाभेद, देशभाषा, भाषेचाप्रकार.
Dikes ….. खंदक, बांध.
Dim ……… अंधुक, मंद, पुसट, अतेज.
Disguise …. कपटवेषकरणें, सोंग, भेसबदलणें.
Dreary ….. उदास, शून्याकार, भणभणीत.
Ductile …… प्रसारणीय, प्रसारणयोग्य, प्रसरक्षम.
Due ……… हक्क कर्ज, ऋण.
Economy …. व्यवस्था, बेत, संयोग, बंदोबस्त.

Emigrant .... परदेशवासी, उठून गेलेला.
Entangle .... अनाद्यंतत्व, अनाद्यंतता, अनादित्व.
Eternity .... मोठेपदासचढविणें, प्रतिष्ठादेणें.
Exalt ........ गुंतवणें, गुंतागुंतकरणें, गोंधळविणें.
Exile ......... देशपारकेलेला, देशबहिष्कृत.
Expanse .... सपाटी, तळ, तळवट,
Explore .... निहाळणें, हेरणें, बारकाईनेंशोधणें
Expose ...... उघडेटाकणें, फजितीकरणें, विचकणें.
Fire-arms .... अग्नेयस्त्रें, बंदुका.
Flag-stone .. फरशीथोंडा, सपाट दगड.
Flechera .... वाडा.
Foot-path .... पायवाट, पायरस्ता, पायमार्ग.
Formidable .. भयंकर, भयजनक, घोर.
Fortification .. तटबंदी, कोटबंदी.
Fossil ...... उपधातु, खणतीचेंद्रव्य.
Fringe ...... झालर, लकेरी, झालरलावणें.
Frost ......... तुशार, हिम, इंद्राग्निधूम.
Gang ...... टोळी, थवा, झुंड, मुटाग.
Garnet ...... याकुद.
Gem ......... रत्न, जवाहीर, मणका.
Geology .... भुगर्भविद्या, भुस्तरनिरूपणविद्या.
Gravel ...... वाळू, कंकर, रेव, वाळूका.
Grotesque .... वेडाविद्रा, वेडाविपारा, वेधूड.
Gruel ..... पेज, मंड.
Hallow ..... पवित्रकरणें, पवित्रमानणें.
Hammock .. चोपाळा.
Hardship .... दुःख, कष्ट, हाल, वनवास, ओझें.
Haunt .... भुतवाडा, भुतलागणें, येणेजाणें.
Helmet ...... लढाऊटोपी, जंजीरटोप.
Headland .... टोंक, भूशलाका.
Hideous .... अक्राटविकट, अकरालविकराल.
Hieroglyphic संज्ञीक, सांकेतिक, संकेतात्मक.

Horizon ···· क्षितिज, दिगंत.
Hospitable ·· अतिथिपूजक, अतिथिप्रिय.
Hovel ······ खोपट, खोपटी, कुटीर.
Imitation ···· अनुगमन, नक्कल, उतारा.
Inanimate ···· अचेतन, नीर्जिव, निश्चेष्ट, जड.
Infest ······ उपद्रव देणें, इजा करणें.
Indigenous ·· मुलखीं, देशज, देशीय.
Insipid ······ निचव, बेचव, विरस, पाणचट.
Instinct ······ प्रेरणा, अंगस्वभाव, पशुबुद्धि.
Intercourse ·· जाणेंयेणें, रहवास, वहिवाट.
Intersect ···· परस्पर छेदून जाणें, भेदून जाणे.
Intimidate ·· भिववणें, भयाभीत करणें.
Introduction ·· पूर्वांग, प्रस्तावना, उपोद्घात.
Inundate ···· जळमय करणें, जलप्रलय करणें.
Irritation ···· आग, संताप, चिरड, रागावेश.
Jasamine ···· जाई.
Jet ········ कार, कारंजा, फवारा.
Keel ········ कणा, अडें.
Kiln ········ भट्टी, आवा.
Kingdoms ···· राष्ट्रे, राज्यें.
Label ······ चकती, खूणचिठ्ठी.
Lance ······ भाला, बरची.
Latitude ···· रुंदी, विषुववृत्तापासून अंतर, अक्ष.
Launch ······ लोटणें, ढकलणें.
Legume ···· द्विदळ, द्विदळधान्य.
Lesson ······ धडा, पाठ, व्याख्यान.
Lethargy ···· झांक, अतिनिद्रा, कुंभकर्णी झोप.
Llanos ······ कांप, मैदानें.
Loathsome ·· कंटाळवाणा, किळसवाणा, ओंगळ.
Longitude ···· लांबी, रेखांश, रेखागण.
Lough ······ उपसागर, वांकण, कोल.
Lounge ······ रिकामा बसणें, रिकाम टवाळी करणें.

Maize ...... मका.
Magic ...... जादु, पिशाचविद्या, कुविद्या.
Mammon ... लक्ष्मी.
Manufacture .. शिल्पानेकेलेली वस्तू, कसबानेकेलेला पदार्थ.
Marigold .... झेंडु, मखमाल.
Maws ...... कोठा, पोटाची पिशवी, गाईग, गार
Mercury .... पारा, रसधातू, पारद.
Metallic .... धातूरूप, धातूसंबंधी.
Mill ........ चक्की, घाणा, चरक, घरटी.
Mineral kingdom.... } धातूजाति-गण-कोटी.
Monastery .. मठ, अश्रम.
Monument .. छत्री, यादगारी, चैत्य.
Morass ...... पाणथळ, दलदल.
Navigation .. नौकापर्यटन, नौकागमन-यात्रा
North-East .. इशानी, पूर्वोत्तर.
North-west .. वायवी किंवा वायव्य.
Oasis........ रानांत ओलाव्याची जागा, ओलवण.
Paddle ...... हातवल्हें.
Parallel...... समांतर, एकसारख्या अंतराच्या.
Paracitical .. बांड गुळाचे जातीचा, वृक्ष रुह.
Pattern...... नमुना, फर्मा, मासला, कित्ता.
Peel ........ सोलणें, निसणें, साल काढणें.
Phenomena .. दृष्टिचा विषय, चमत्कार, अद्भुत.
Piracy ...... गलबतावरचा-समुद्रावरचा-दरवडा.
Pistil ...... पुष्पगर्भ तंतु, गर्भकेसर, स्त्रीकेसर.
Pitch ...... राळ, महत्त्वमान, डेरादेणें.
Plague ...... मरी, अरिष्ट, व्याध, सुदर्शन
Plantation .. वाडी, बाग, फड, वन, लावणें.
Plat-form .... मंचक, नकशा बेत.
Polenta...... एकाप्रकारचें धान्य.

Porridge .... घाटा, सांजा.
Potash ...... खार, क्षार.
Pottery .... मातिची भांडी करण्याची कृती.
Prairy ...... तांबेटांचा माळ, कोलंबाचा माळ.
Precarious .. स्थितिसंशयी, जायजणा.
Procession . गमन, स्वारी. यात्रा, वरात.
Prodigy .... उत्पात, अद्भुत.
Professors.... अध्यापक, गुरु, वस्ताद.
Profound .... खोल, ओंड, सखल, गंभीर.
Propagation .. प्रत्युत्पत्ती, अनुक्रमोत्पत्ति.
Property .... गुण, धर्म, स्वभाव, धनीपणा, माल.
Protection.... आश्रय, छाया, छत्र, अभयपण.
Pyramid .... दीपमाळाकृति, थडगें.
Quadrant .... तुरीययंत्र, सूर्य यंत्र.
Quartz ...... काचमणी.
Quay ...... घाट, धक्का.
Quilted...... रूभरलेला, रूदार, रूभरी.
Rape........ स्त्रीसंभोग, सरसी.
Rebel ...... बडकरणें, दंगाकरणें.
Recent ...... नवसर, नुक्ता, थोड्यादिवसांमागें.
Recreation .. विसावा, विश्रांति.
Refraction.... फिरविणें, वक्रगति.
Refulgent .... कांतीमान्, प्रकाशमान्, जोतीवंत.
Reservoir .... जलाशय, टाकें.
Retain ...... ठेवणें, धरणें, राखणें, राहविणें.
Ridge ...... कणा, दांड, रांग.
Rig ........ दोरखडबांधणें, सजविणें.
Right ...... नीट, ठीक, लायक, न्याय, नीति.
Risk ....... भय, जोखाम, धोका, धोक्यांतपडणें.
Roast ..... भाजणें.
Roe ........ माशांची आंडी, गाबोळा.
Ruby ..... माणिक्य, माणिक, लाल, पद्मराग.

Salad ...... सरसीचें तेल.
Sapphire .... नील, नीलकांत, नीलाश्मा.
Sash ........ कंमरबंद, कांन्या.
Scalloped .... करवतलेलें, खांडपडलेलें, कातरकुतर.
Scientific .... शास्त्रीय, विद्याक्रमानुसारी.
Scorpion .... विंचू, विंचडा, वृश्चिक.
Scour ...... घासणें, चोळणें, रगडणें.
Scowl ...... डोळेउभारणें, कोपमुद्रा.
Sculpture .... खोदकाम, नकासकाम, नकशा.
Section ...... खंड, अध्याय, पर्व, कांड.
Sedge .... . एका जातिची वनस्पती.
Sepulchre .... थगडें, समाधि, कबर, शवमंदिर.
Settlement .. निर्णय, निवाडा, स्थिरावणें, ठाणें.
Shiver ...... कांपणें, शिसारियेणें, खुडखुडविणें.
Sinuous .... वांकाचा, नागमोडी.
Slaking ...... उमलणें, पाणीघालणें, विरवणें.
Sledge ...... विनचाकाची गाडी.
Slice ........ फांक, फाड, फांकीकरणें, कापणें.
Sling ...... गोफणणें, गोफणीनें फेंकणें.
Snout ...... सोंड, मुशी.
Sonorous .... खणखणीत, आवाजदार, नादाचा.
South-East .. अग्नेयी, दक्षिणपूर्वा.
South-West .. नैर्ऋती किंवा निर्ऋति.
Spawn ...... गाबोळी, माशांची आंडीं.
Spray ...... तुषार, झट, हेंस, वसाडा.
Spring ...... उपजणें, उडीमारणें, कमाण.
Stagnant .... सांटवलेलें, कोंडलेले, स्थिर.
Stakes ...... खुंट, डांभा, शंकु.
Stamen ...... पुंकेसर, सारांग, सारसाधन.
Straggling .. पांगुन-फुटून, चालणारा, फुटकर.
Stump ...... खुंट, खुंटारा.
Stunt ...... खुरटवणें, वाढमोडणें, खुंटवणें.